वर्ष ३५, अंक १३७, ५ रुपये, शहर आवृत्ती, चतुरंगसह पृष्ठे २०
FACEBOOK.COM/LOKSATTALIVE TWITTER.COM/LOKSATTALIVE LOKSATTA.COM/APPS
Reg. No.PHM / SR / 5 / VIII / 06
पुणे, शनिवार, ६ ऑगस्ट २०२२ WWW.LOKSATTA.COM
लोकसत्ता
७५ अमृत महोत्सव
पुणे, मुंबई, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध
लोकमान्य, लोकशक्ती!

शनिवारचे संपादकीय
**पावरीचा पावा...**
भाषा हा सामूहिक वारसा, तिच्या रक्षणाची जबाबदारी सगळ्यांची. भाषांचे दस्तावेजीकरण, शिक्षणाचे सुलभीकरण होण्यासाठी शब्दकोश आवश्यकच...



क्रीडा
**कुस्तीमध्ये चार पदके**




Vencobb
एक्स फार्म ब्रॉयलर चिकनचा दर*
७५ रु. प्रति किलो
किरकोळ विक्रीचा दर*
जिवंत कोंबडी
१०३ रु. प्रति किलो
ड्रेस (स्किनसह) दर*
१२६ रु. प्रति किलो
अंड्याचा किरकोळ विक्रीचा दर*
५८ रु. प्रति डझन

**तापमान**
कमाल ३१.१°से | किमान २२.६°से
हवामानाचा अंदाज
मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता.

**काय चाललंय काय!**
प्रशांत कुलकर्णी




तुम्ही पुन्हा एकदा विचार करा! ज्या गावांनी दहा वर्षांपूर्वी रस्त्यांची मागणी मान्य करून घेतली ते सारे आता खड्डे आणि भरमसाट टोल यामुळे रडकुंडीला आलेत!!

## कर्ज हप्त्यांचा भार आता अधिक

**मुंबई :** महागाईच्या चिंतेतून रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी साधारण अपेक्षेपेक्षा मोठी म्हणजे थेट अर्धा टक्क्यांची व्याजदरात वाढ केली. बँकांकडून कर्जावरील व्याजदर ज्या आधारे ठरविला जातो त्या 'रेपो दरा'त झालेल्या अर्ध्या टक्क्यांच्या वाढीने, बँकांकडून गृह कर्ज, वाहन कर्ज व अन्य ग्राहक कर्जांचे व्याजदर वाढविले जाणे क्रमप्राप्त दिसत असून, कर्जदारांवरील हप्त्यांचा भार वाढणार आहे. **– अर्थसत्ता**

# शरीर-मनाच्या जखमांनी पीडितेचा रात्रभर आक्रोश

## भंडारा बलात्कार : सरकारी दिरंगाईमुळे उशिराने मदत; वेळ वाया गेल्याने प्रकृती गंभीर

**वार्ताहर, लोकसत्ता**

**कन्हाडमोह (भंडारा) :** नागपूर - रायपूर महामार्गावरील कन्हाडमोह हे छोटे खेडे... पहाट उजाडताच नेहमीप्रमाणे गावातील तरुण महामार्गावरील पुलाजवळ व्यायाम करायला गेले... इतक्यात त्यांची नजर रस्त्याशेजारी असह्य वेदनेने विव्हळणाऱ्या महिलेवर पडली... महिला विवस्त्र होती, पोटापासून पायापर्यंत अर्धे शरीर रक्ताने माखले होते... कुणीतरी अतिशय निर्दयीपणे बलात्कार करून महिलेला गावाजवळ आणून फेकले होते... प्रचंड रक्तस्त्रावामुळे प्रकृती धोक्यात होती... तातडीने उपचाराची गरज होती... परंतु, प्रशासनाला वेळीच खबर देऊनही अपेक्षित सरकारी दिरंगाई झालीच. परिणामी ती पीडिता आता नागपूरच्या मेडिकलमध्ये एका-एका श्वासासाठी झुंजत आहे...

गोंदिया जिल्ह्यातील सावरटोली येथील ही दुर्दैवी पीडिता. निर्दयी पतीने वाऱ्यावर सोडल्याने बहिणीच्या आश्रयाने राहायची. पण, एका किरकोळ वादातून तिने बहिणीचे घर सोडले आणि इथेच तिच्या दुर्दैवाचा फेरा सुरू झाला... रागाच्या भरात ती एकटीच माहेरच्या दिशेने पायी निघाली. रस्त्यात आधी एका कारचालकाने मदतीचे आश्वासन देऊन तिच्यावर तब्बल दोन दिवस बलात्कार केला. त्याच्या तावडीतून सुटून कशीतरी ती *(पान ४ वर)*




१) याच पंक्चरच्या दुकानात ती मदतीची याचना करीत थांबली होती.

२) याच पुलाच्या शेजारी पीडिता गंभीर अवस्थेत पडून होती.

### दिल्ली प्रकरणाहून भीषण...

बलात्कार करूनच हे नराधम थांबले नाहीत तर पीडितेच्या गुप्तांगावर त्यांनी कुठल्यातरी शस्त्रांनी गंभीर जखम केली. त्यामुळे पीडितेच्या गर्भाशयापर्यंतचा भाग चिरला गेला. अत्याचाराने शुद्ध गमावलेल्या पीडितेला या नराधमांनी कन्हाडमोह गावाच्या शेजारी फेकून पळ काढला. तब्बल रात्रभर ती तशीच पडून होती. पहाटे गावकरी मदतीला धावले.

### वैद्यकीय चाचणीची गैरसोय

पीडितेला जवळच्या लाखनी येथील रुग्णालयात न्यायचे की समोर भंडाऱ्याला हे ठरवण्यात वेळ गेला. अखेर भंडाऱ्याला हलवले. परंतु, तेथील जिल्हा रुग्णालयात बलात्कार प्रकरणात आवश्यक वैद्यकीय चाचणीची सोय नसल्याने व पीडितेची प्रकृती आणखी गंभीर झाल्याने नागपूरला पाठवण्यात आले. परंतु, या दिरंगाईत पीडिता मृत्यूच्या दारात पोहोचली.

# मंत्र्यांचे अधिकार सचिवांकडे

## मंत्र्यांअभावी प्रशासकीय कामे ठप्प झाल्याने मुख्यमंत्री शिंदे यांचा निर्णय

**संजय बापट, लोकसत्ता**

**मुंबई :** सचिवांपेक्षा मंत्री वरिष्ठ दर्जाचे असल्याने काही वर्षांपूर्वी प्रशासनाचे मुख्यालय असलेल्या सचिवालयाचे 'मंत्रालय' असे नामकरण करण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार महिन्याहून अधिक काळ रखडल्याने प्रशासकीय कामकाजावर परिणाम होऊ लागल्यानेच मंत्र्यांचे सुनावण्यांचे अधिकार पुढील आदेशापर्यंत सचिवांकडे सोपविण्याची नामुष्की या सरकारवर आली आहे. या साऱ्या घोळामुळे मंत्रालयाचे पुन्हा 'सचिवालय' होऊन सचिवच वरचढ ठरले आहेत.

रखडलेल्या मंत्रिमंडळ विस्तारामुळे नागरिकांची कामे खोळंबत असल्याच्या पार्श्वभूमीवर मंत्र्यांचेच अधिकार सचिवांना बहाल करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी घेतला. त्यानुसार मंत्र्यांकडे सुनावणीसाठी प्रलंबित असलेल्या प्रकरणांवरील सुनावणी त्वरित सुरू करून न्यायनिवाडा करण्याचे आदेश मुख्य सचिवांनी सर्व विभागांच्या सचिवांना दिले आहेत. सचिवांकडून सुनावणी करून त्यावर निर्णय घेतला जाईल.

मंत्री किंवा राज्यमंत्र्यांना सुनावण्यांचे अधिकार असतात. आपल्या विभागातील सुनावण्यांचे कोणते अधिकार स्वतःकडे ठेवायचे वा राज्यमंत्र्यांकडे सोपवायचे याचा निर्णय संबंधित मंत्री घेतो. परंतु मंत्रीच नसल्याने पुढील आदेश येईपर्यंत अपिले, पुनर्विलोकन, पुनरीक्षण अर्ज, अंतरिम आदेश पारित करणे, तातडीची सुनावणी हे सारे अधिकार विभागाच्या सचिवांकडे सोपविण्यात आले आहेत. या संदर्भातील आदेश मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांनी लागू केला.

**न्यायालयांना समांतर व्यवस्था**

मंत्र्यांना न्यायालयासारखेच न्यायनिवाड्याचे अर्धन्यायिक अधिकार असतात. त्यानुसार कोणत्याही प्रकरणावर वाद निर्माण झाला असल्यास त्यावर सुनावणी घेऊन निकाल देण्याचे, परवाना रद्द करणे किंवा बहाल करणे, विभागअंतर्गत होणाऱ्या वादांवर निवाडा करणे आदी विविध प्रकारचे अर्धन्यायिक अधिकार मंत्री आणि राज्यमंत्र्यांना असतात. विशेषतः महसूल, अन्न व नागरी पुरवठा, उत्पादन शुल्क, पर्यावरण, गृह, ग्रामविकास, नगरविकास, सहकार आदी विभागाच्या मंत्र्यांकडे मोठ्या प्रमाणात सुनावणीची कामे चालतात.

महसूल मंत्र्यांना जमीनविषयक वादांवर सुनावणी घेऊन निर्णय घेण्याचे, जमिनींच्या वापराचे वर्गीकरण बदलण्याचे, नगरविकास मंत्र्यास *(पान ४ वर)*

### अधिकार कोणते?



- महसूल, अन्न व नागरी पुरवठा, उत्पादन शुल्क, पर्यावरण, गृह, ग्रामविकास, नगरविकास, सहकार मंत्र्यांकडे मोठ्या प्रमाणात सुनावणीची कामे.
- मंत्र्यांना न्यायालयाप्रमाणेच न्यायनिवाड्याचे अर्धन्यायिक अधिकार.
- कोणत्याही प्रकरणावर वाद निर्माण झाल्यास सुनावणी घेऊन निकाल देणे.
- परवाना रद्द करणे किंवा बहाल करणे, विभागअंतर्गत वादांवर निवाडा करणे.

### फायली मुख्यमंत्री कार्यालयाकडे...

कोणत्याही खात्याला मंत्रीच नसल्याने सर्व फायली संबंधित विभागांना थेट मुख्यमंत्र्यांकडे पाठवल्या जात आहेत. परिणामी मुख्यमंत्री कार्यालयात फायलींचा ढीग वाढत आहे. मंत्री, राज्यमंत्री नसल्याने अर्धन्यायिक सुनावण्या ठप्प आहेत. अर्धन्यायिक अपिले, पुनर्विलोकन, पुनरीक्षण अर्ज, तातडीच्या प्रकरणांवर सुनावणी घेऊन त्यावर निवाडा देणे आदी नागरिकांची महत्त्वाची कामे थांबली आहेत.

### मंत्रालयाचे पुन्हा 'सचिवालय'

राज्यातील सत्तांतर पेचाबाबतच्या अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने गेल्या महिन्याभरापासून मंत्रिमंडळ विस्तार रखडला आहे. मंत्रिमंडळ विस्तार रखडल्याने नागरिकांची कामे खोळंबली आहेत. त्यामुळे मंत्र्यांचे अर्धन्यायिक अधिकार विभागाच्या सचिवांना देण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांना घ्यावा लागला. या साऱ्या घोळामुळे मंत्रालयाचे पुन्हा 'सचिवालय' होऊन सचिवच वरचढ ठरल्याची चर्चा आहे.

# आरेतील झाडांना तूर्त अभय

## पुढील सुनावणीपर्यंत एकही वृक्ष न तोडण्याचे न्यायालयाचे आदेश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मेट्रो ३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) मार्गिकेतील आरे कारशेडच्या कामासाठी पुढील सुनावणीपर्यंत आरेतील एकही झाड कापू नका, असे आदेश शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला (एमएमआरसी) दिले. पुढील सुनावणी १० ऑगस्टला होणार आहे.

राज्य सरकारने आरेतील कामाला देण्यात आलेली स्थगिती उठविल्यानंतर एमएमआरसीने मेट्रो ३ च्या गाडीचे डबे आणण्यासाठी अडचण ठरणाऱ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी सुरू केली. या छाटणीच्या नावाखाली आरेत झाडे अवैधरित्या कापल्याचा आरोप पर्यावरण क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी केला होता.

आरे येथे प्रस्तावित कारशेडच्या जागेतील एकही झाड कापण्यात आले नसून आम्ही केवळ झुडपे कापल्याची माहिती यावेळी 'एमएमआरसी'कडून न्यायालयात देण्यात आली. याप्रकरणाची सुनावणी नवीन खंडपीठासमोर होईल असेही आदेश यावेळी न्यायालयाने दिले. आता पुढील सुनावणी १० ऑगस्टला होणार आहे.



**झाले काय?**

आरेतील झाडे तोडण्यास सर्वोच्च न्यायालयाची बंदी असताना झाडे कापण्यात आल्याचा आरोप करून पर्यावरणप्रेमींनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यावर शुक्रवारी न्यायमूर्ती उदय लळीत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने पुढील सुनावणीपर्यंत एकही झाड कापू नये असे आदेश दिले.

### दावे आणि प्रतिदावे...

कारशेडच्या जागेतील ८ ते ९ फूट उंचीची झाडे कापण्यात आली असून याची सर्व छायाचित्रे, पुरावे आपल्याकडे असल्याचा दावा पर्यावरणप्रेमींनी केला आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) आपण आरे कारशेडमध्ये एकही झाड कापले नसून केवळ गवत आणि झुडपे कापल्याचे स्पष्टीकरण सर्वोच्च न्यायालयात दिले.

# रणजितसिंह डिसले यांचा राजीनामा नामंजूर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**सोलापूर :** वादग्रस्त ठरलेले जागतिक शिक्षक पुरस्कार विजेते रणजितसिंह डिसले यांनी त्यांच्या विरोधात झालेल्या चौकशीच्या पार्श्वभूमीवर शिक्षकपदाचा दिलेला राजीनामा सोलापूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाने प्रशासकीय कारणास्तव नामंजूर केला आहे.

माढा तालुक्यातील परितेवाडीच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सहशिक्षक असलेले डिसले यांनी 'फुलब्राइट शिष्यवृत्ती'साठी शैक्षणिक संशोधनाकरिता अमेरिकेत जाण्यासाठी प्रदीर्घ अध्ययन रजा मागितली होती. त्यासाठी आवश्यक कागदपत्रे सादर न करणे, यापूर्वी लंडनस्थित वार्की फाउंडेशनकडून मिळालेल्या जागतिक शिक्षक पुरस्काराच्या संदर्भात कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता न करणे तसेच नोकरीच्या जागी हजर न होता सुमारे ३४ महिन्यांचा पगार स्वीकारणे यावरून डिसले यांची खातेनिहाय चौकशी झाली होती. यात चौकशी समितीने त्यांच्यावर ठपका ठेवला होता.

या पार्श्वभूमीवर कारवाई प्रलंबित असतानाच डिसले यांनी शिक्षकपदाचा राजीनामा दिल्यानंतर गेल्या महिन्यात अचानकपणे नाट्यमय घडामोडी घडल्या. डिसले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत मंत्रालयात भेट घेतली होती. मात्र ही भेट घडल्यावरही त्यांचा शिक्षकपदाचा राजीनामा प्रशासकीय कारणास्तव नामंजूर करण्यात आला आहे. त्यांच्याविरुद्धचा सोलापूर जिल्हा परिषदेत कारवाईचा अहवाल देखील अद्याप प्रलंबित आहे.

# गृहनिर्माण मंत्र्यांचे अधिकार म्हाडाला

**निशांत सरवणकर, लोकसत्ता**

**मुंबई :** म्हाडातील अधिकारांच्या विकेंद्रीकरणाचा निर्णय उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला असून तसे आदेश गृहनिर्माण विभागाला दिले आहेत. पण मलिदा मिळवून देणारे अधिकार सोडण्यास नव्याने येणारे भाजपचे किंवा शिंदे गटाचे गृहनिर्माण मंत्री तयार होतील का, याबाबत उत्सुकता आहे.

महाविकास आघाडी सरकारच्या अडीच वर्षांच्या काळात आव्हाड यांनी अनेक निर्णय घेतले. मात्र या काळात त्यांनी सर्व अधिकार शासनाकडे घेतले. त्यामुळे 'म्हाडा'सारखी यंत्रणा केवळ प्रस्ताव तयार करण्यापुरतीच उरली. अतिरिक्त चटई क्षेत्रफळाचे वितरण, म्हाडावसाहतींचे पुनर्विकास प्रस्ताव, बृहदसूचीवरील रहिवाशांना घरांचे वितरण, सर्व स्तरांतील अभियंते-कर्मचाऱ्यांच्या बदल्या, जुन्या इमारतींच्या पुनर्विकासांसाठी ना हरकत प्रमाणपत्र, टिटबिट भूखंड, प्राधिकरणातील *(पान ४ वर)*

> म्हाडात काय चालले आहे, हेच आतापर्यंत शासनाला कळत नव्हते. त्यामुळे ही माहिती शासनालाही व्हावी, यासाठीच अधिकारांचेकेंद्रीकरण केले होते.म्हाडाचे उपाध्यक्ष, गृहनिर्माण सचिव यांच्या चाळणीतून शासनाकडे आलेल्या प्रस्तावावर अभ्यास होऊन योग्य तोनिर्णय घेतला जात होता. त्यामुळे मी त्या वेळी घेतलेल्या निर्णयाचे समर्थन करतो. – जितेंद्र आव्हाड, माजी गृहनिर्माणमंत्री

ऐन वेळी ३० कोटी ध्वजांच्या प्रस्तावाला खादी संस्थांचा नकार

# झेंडा 'बंधना'चे पालन अवघड

**बिपीन देशपांडे, लोकसत्ता**

**औरंगाबाद :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त हर घर तिरंगा या राष्ट्रव्यापी मोहिमेसाठी देशातील राष्ट्रध्वज निर्मिती करणाऱ्या खादी संस्थांनी ३० कोटी ध्वज अवघ्या पंधरा दिवसांत पुरवठा करण्याच्या केंद्रीय यंत्रणेच्या प्रस्तावाला स्पष्टपणे नकार दिला आहे.

उपलब्ध मनुष्यबळ आणि यंत्रणा, निर्मिती प्रक्रियेदरम्यान पाळावयाची राष्ट्रध्वजाबाबतची संहिता आणि त्यासाठी हाताने कातलेले आणि विणलेल्या कापडाची उपलब्धता, अशी कामे पंधरा दिवसांच्या कालावधीत उरकणे शक्य नसल्याचे सांगण्यात आले आहे. प्रस्ताव फार पूर्वी पुढे आला असता तर इतक्या मोठ्या संख्येच्या राष्ट्रध्वजाची निर्मितीही शक्य होती आणि खादी संस्थांना करोना काळातून सावरण्यास बळही मिळाले असते, असेही केंद्रीय यंत्रणेच्या निदर्शनास आणून देण्यात *(पान ४ वर)*



### नकाराचे कारण...

राष्ट्रध्वजाची कापड निर्मिती व त्यावर वेगवेगळ्या टप्प्यांवर होणारे संस्कार, राष्ट्रध्वजाची प्रतिष्ठा, घटनेने आखून दिलेल्या संहितेनुसार निर्मितीसाठी केल्या जाणाऱ्या ३० कोटी झेंड्यांच्या प्रस्तावास नकार देण्यात आला आहे.

### थोडी माहिती...

मराठवाडा खादी ग्रामोद्योग संस्थेकडून निर्मित राष्ट्रध्वजाला देशातील १६ प्रांतांमधून मागणी असते. या राष्ट्रध्वजाचे कापड हे उदगीर येथे तयार केले जाते, तर त्याची धुलाई ही अहमदाबाद येथे होते. नांदेड येथे राष्ट्रध्वजातील रंगसंस्कार होतात.

> खादीसाठी हातानेच कातलेले आणि विणलेले कापड लागते. परंतु ऐनवेळी मिलचे कापड, टेरिकॉट, सिल्कचे कापड वापरण्याचाही विचार बैठकीत मांडण्यात आला होता. परंतु राष्ट्रध्वजाची विशिष्ट संहिता पाहता समोर आलेल्या ३० कोटी झेंडे पुरवण्याचा प्रस्तावास नकार दिला. – ईश्वरराव भोसीकर, सचिव, मखाग्रास

# देशात आणखी १० रामसर स्थळे

## केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाकडून घोषणा

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने बुधवारी नवीन रामसर स्थळांची घोषणा केली. त्यामुळे भारतातील एकूण रामसर स्थळांची संख्या आता ६४ झाली आहे. देशातील एकूण पाणथळ क्षेत्रापैकी सुमारे दहा टक्के क्षेत्रफळ आता रामसर पाणथळ प्रदेशात आहे. या नव्या दहा स्थळांमध्ये तामिळनाडू राज्यातील सहा तसेच गोवा, कर्नाटक, मध्यप्रदेश आणि ओडिशामधील प्रत्येकी एकाचा समावेश आहे.

२०१२ पर्यंत भारतात २६ रामसर स्थळे होती. गेल्या दशकात त्यात मोठी वाढ झाली आहे. जुलै महिन्यात पाच नव्या रामसर स्थळांची घोषणा करण्यात आली होती. यात तामिळनाडूतील करिकिल्ली पक्षी अभयारण्य, पल्लीकारणाई मार्श राखीव वन, पिचावरम कांदळवन, मध्यप्रदेशातील सख्या सागर, मिझोराममधील पाला पाणथळचा समावेश आहे. भारतात १९ प्रकारच्या पाणथळ जमिनी आहेत. गुजरातमध्ये *(पान ४ वर)*



### रामसर दर्जा म्हणजे?

१९७१ मध्ये इराणमधील रामसर शहरात एक परिषद झाली. त्यात जगातील महत्त्वपूर्ण पाणथळ जागांचे संवर्धन आणि त्यांच्या पर्यावरणपूरक वापराचे निर्णय घेण्यात आले. त्यासाठीचा कृती आराखडाही तयार करण्यात आला. या आराखड्यानुसार प्रत्येक सहभागी राष्ट्राने आपल्या देशातील जागतिकदृष्टीने महत्त्वपूर्ण पाणथळ जागा शोधून त्यांना 'रामसर स्थळ' घोषित करण्याचे निश्चित करण्यात आले. पाणथळ जागेच्या कक्षेत सरोवरे, नद्या, तलाव, दलदल, गवताळ पाणथळ मैदाने, खाड्या, समुद्र किनारे आदी जागांचा समावेश होतो.

- **तामिळनाडू :** कूथनकुलम पक्षी अभयारण्य, मन्नार मरीन बायोस्फीअर संवर्धन, वेंबन्नूर पाणथळ कॉम्प्लेक्स, वेल्लोडे पक्षी अभयारण्य, वेदांतंगल पक्षी अभयारण्य, उदयमार्थंडपुरम पक्षी अभयारण्य
- **ओडिशा :** सातकोसिया घाट.
- **गोवा :** नंदा तलाव.
- **कर्नाटक :** रंगनाथिट्टू पक्षी अभयारण्य.
- **मध्यप्रदेश :** सिरपूर पाणस्थळ.

SEMINAR on How to prepare for MPSC राज्यसेवा New Pattern
Date : 7th Aug 2022 Time : 11am To 1pm
UPSC & MPSC NEW EVENING BATCH Starting From 8th Aug 2022 Time - 6.30pm To 8.30pm
20 YEARS OF SUCCESS ADMISSION OPEN 2022-23 FOUNDATION UPSC / MPSC NEW BATCH STARTING FROM 20th Aug 2022 Time - 6 pm to 8 pm
LAKSHYA ACADEMY Aim, Think & Achieve www.lakshyaiasacademy.com
UPSC / IAS / IPS / IFS / IRS MPSC / Dp. COLL. / DY. SP.
ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांसाठी रेग्युलर कोर्स
दहावी, बारावी आणि कॉलेज विद्यार्थ्यांसाठी फाउंडेशन कोर्स
Head Office & Main Branch: Dadar (W): 9619071345 | Branches: Mulund (W): 9987579570 | Thane (W) | Nerul (W): 9892908240 | Panvel | Pune
Follow Us On: @Lakshya IAS Academy

## अमेरिकेत ‘मंकीपॉक्स’मुळे आरोग्य आणीबाणी

**वॉशिंग्टन :** वेगाने पसरणारा ‘मंकीपॉक्स’ सार्वजनिक आरोग्य आणीबाणी असल्याचे अमेरिकेने गुरुवारी घोषित केले. अमेरिकेत सध्या सात हजारांहून अधिक नागरिकांना ‘मंकीपॉक्स’चा संसर्ग झाला आहे. आरोग्य आणीबाणी घोषित केल्याने या रोगाचा सामना करण्यासाठी निधी, साधनसामुग्री उभारण्यास गती मिळेल.

ताप, अंगदुखी, थंडी वाजणे, थकवा येणे, अंगावर अनेक ठिकाणी फोड येणे ही या आजाराची लक्षणे आहेत. अमेरिकेच्या आरोग्य आणि मानवी सेवा विभागाचे प्रमुख झेव्हियर बेसेरा यांनी सांगितले, की आम्ही या विषाणूच्या मुकाबल्यासाठी सर्वतोपरी तयारी करत आहोत. प्रत्येक अमेरिकन नागरिकाने ‘मंकीपॉक्स’ची गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे. मंकीपॉक्स प्रतिबंधक लशींच्या अपुऱ्या उपलब्धतेवर बायडेन प्रशासनावर टीका होत असल्याच्या पार्श्वभूमीवर आणीबाणीचा निर्णय घेण्यात आला. न्यूयॉर्क आणि सॅन फ्रान्सिस्कोसारख्या मोठ्या शहरांतील आरोग्य केंद्रांतर्फे सांगण्यात आले, की या लशींच्या दोन मात्रा पुरेशा प्रमाणात मिळाल्या नाहीत. पहिल्या मात्रेचा पुरवठा पुरेशा प्रमाणात करण्यासाठी दुसरी मात्रा बंद करावी लागली. यापूर्वी, ‘व्हाईट हाऊस’तर्फे सांगण्यात आले, की त्यांनी अकरा कोटींहून अधिक मात्रांचा पुरवठा केला आहे. अमेरिकेत ‘मंकीपॉक्स’मुळे अद्याप एकही मृत्यू झालेला नाही.

# देशात लोकशाही संपुष्टात!

## केंद्र सरकार-भाजपविरोधात राहुल गांधींचा घणाघाती आरोप

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** देशातील लोकशाही संपुष्टात आली असून हुकूमशाहीच्या मार्गावर निघाला आहे. महागाई, बेरोजगारी हे लोकांशी निगडित विषय मांडून केंद्र वा भाजपच्या हुकूमशाहीला विरोध करणाऱ्यांवर कारवाई केली जाते. त्यांच्यावर हल्लाबोल केला जातो, त्यांना अटक करून तुरुंगात डांबले जाते, असा घणाघाती शाब्दिक प्रहार काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केला.

गेल्या ७० वर्षांमध्ये झालेली देशबांधणी भाजप ८ वर्षांमध्ये संपवत आहे. इथे २-४ मोठे उद्योजक आणि २ नेत्यांचे राज्य आहे. देशातील लोकशाहीचा मृत्यू झालेला पाहून कसे वाटते? इथल्या हुकूमशाहीचा आनंद लुटत आहात की नाही?, अशी उपहासात्मक टिप्पणी राहुल यांनी पत्रकार परिषदेच्या सुरुवातीला केली.

लोकांचे प्रश्न विरोधक मांडण्याचा प्रयत्न करत असले तरी, केंद्र सरकार त्यावर चर्चा होऊ देत नाही. या दडपशाहीची मोठी किंमत भाजपला भोगावी लागेल, लोक शांत बसणार नाहीत. लोक जाब विचारतील याची भाजपला भीती वाटते. म्हणून भाजप विरोधकांना धमकी देतो. पण, धमकी देणारेच घाबरलेले असतात. त्यामुळे मी भाजपच्या दबावाला घाबरत नाही. पंतप्रधान मोदी मला भीती घालू शकत नाहीत, असे प्रत्युत्तर राहुल यांनी दिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची राहुल गांधींनी हुकूमशहा हिटलरशी तुलना केली.

हिटलरने देखील निवडणुका जिंकूनच देश ताब्यात घेतला होता. हिटलरने देशातील सर्व संस्था ताब्यात घेऊन जर्मनीत हुकूमशाही राजवट आणली होती. इथेही देश हुकूमशाहीच्या मार्गाने जात आहे. लोकशाही घटनात्मक संस्थांच्या स्वायत्ततेवर चालते पण, इथे सर्व संस्था भाजप आणि संघाने ताब्यात घेतल्या आहेत, प्रत्येक संस्थेमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपली माणसे पेरली आहेत. ‘ईडी’, ‘सीबीआय’सारख्या संस्थांच्या माध्यमातून देशात आर्थिक मक्तेदारी निर्माण झाली आहे, असा आरोप राहुल गांधी यांनी केला.



### ‘सीतारामन केवळ मुखवटा, त्यांना अर्थकारण कळत नाही’

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आकडेफेक करतात पण, त्यांना देशातील वास्तव माहिती नाही. सीतारामन निव्वळ मुखवटा आहेत. राज्या-राज्यांनी जीएसटीला विरोध केला होता. सीतारामन यांना अर्थकारणातील काहीही कळत नाही. महागाई, बेरोजगारी अस्तित्वात नाही, करोनामुळे लोकांचा मृत्यू झालेला नाही, चीनने घुसखोरी केलेली नाही, अशी दिशाभूल केली जाते. केंद्र सरकार आणि भाजप सातत्याने खोटे बोलतो. देशातील वास्तव आणि त्यांनी निर्माण केलेला भ्रम यामध्ये फरक आहे, अशी टीका राहुल यांनी केली.

# संसद अधिवेशन काळातही फौजदारी गुन्ह्यात खासदारांवर कारवाई शक्य!

## व्यंकय्या नायडू यांची टिप्पणी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** संसदेचे अधिवेशन सुरू असल्याचे कारण देत सदस्यांना गुन्हेगारी प्रकरणांमध्ये अटक करण्यापासून स्वतःचा बचाव करता येणार नाही. तपास यंत्रणाच्या नोटिसा त्यांना टाळता येणार नाहीत, असे राज्यसभेचे सभापती व्यंकय्या नायडू यांनी शुक्रवारी सभागृहात स्पष्ट केले.

विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी सक्तवसुली संचालनालयाकडून (ईडी) पाठवल्या गेलेल्या नोटिसांचा सभागृहात निषेध केला होता. हाच मुद्दा शुक्रवारीही विरोधी पक्षांच्या खासदारांनी सभागृह सुरू होताच उपस्थित केला. त्यामुळे साडेअकरा वाजेपर्यंत सभागृह तबकूब झाले पण, त्यानंतर कामकाज सुरू होताच सभापती नायडू यांनी ईडीसारख्या तपास यंत्रणाच्या नोटिसांकडे संसद सदस्यांना दुर्लक्ष करता येणार नाही, असे सांगितले. संसदेचे अधिवेशन सुरू असल्याचे सांगून तपास यंत्रणापासून बचाव करण्यासाठी विशेषाधिकारांचा वापर करता येईल हा सदस्यांचा समज चुकीचा असल्याचे नायडू म्हणाले.

संविधानाच्या अनुच्छेद १०५ अंतर्गत संसदेच्या सदस्यांना विशेषाधिकार देण्यात आले असून त्या अंतर्गत कोणत्याही अडथळ्याविना त्यांना संसद सदस्य म्हणून कर्तव्ये पार पाडता येतात. अधिवेशन किंवा समितीची बैठक सुरू होण्याच्या ४० दिवस आधी आणि त्यानंतर ४० दिवसांनी संसद सदस्याला दिवाणी प्रकरणात अटक केली जाऊ शकत नाही. पण, हा विशेषाधिकार फौजदारी गुन्ह्यांमध्ये लागू होत नाही, असे नायडू म्हणाले.

### राहुल-प्रियंका ताब्यात

महागाई, बेरोजगारी, जीएसटी आदी मुद्द्यांवरून काँग्रेसच्या नेत्यांनी काळे कपडे घालून आंदोलन केले. काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी, प्रियंका गांधी-वाड्रा तसेच, मल्लिकार्जुन खरगे आदी निदर्शने करणारे खासदार व कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. संसदेमध्ये लोकांच्या प्रश्नावर केंद्र सरकार चर्चा करू देत नसल्याचा दावा करत काँग्रेसने शुक्रवारी दोन मोर्चे काढण्याचा प्रयत्न केला. संसदेतून राष्ट्रपती भवनाकडे जाणाऱ्या काँग्रेसच्या खासदारांच्या मोर्चाचे नेतृत्व राहुल गांधी यांनी केले. विजय चौकात जमावबंदी लागू केल्यामुळे पोलिसांनी खासदारांना ताब्यात घेतले. संसदभवनात मुख्य प्रवेशद्वारावर सोनिया गांधींसह खासदारांनी घोषणाबाजी केली. काँग्रेस मुख्यालयापासून पंतप्रधानांच्या निवासस्थानी जाणाऱ्या मोर्चाचे नेतृत्व प्रियंका गांधी-वाड्रा यांनी केले. पोलिसांनी केलेली नाकाबंदी तोडून प्रियंका यांनी काँग्रेस मुख्यालयासमोर बसकण मारली. तिथून प्रियंका यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

### ‘काँग्रेसमध्ये लोकशाही आहे का?’

देशात लोकशाही नाही म्हणणाऱ्या राहुल गांधींनी काँग्रेसमध्ये लोकशाही आहे का, हे सांगावे. तुमच्या आजीने, इंदिरा गांधींनी देशात आणीबाणी लागू करून लोकशाहीवर गदा आणली होती, असे प्रत्युत्तर भाजपचे नेते रवीशंकर प्रसाद यांनी दिले.

## दौरे रोखून तैवानला एकाकी पाडणे चीनला शक्य होणार नाही- पलोसी

**टोक्यो :** ‘‘अमेरिकन अधिकाऱ्यांना तैवान दौऱ्यापासून रोखण्याचा प्रयत्न करून चीन तैवानसारख्या स्वयंशासित बेटास एकाकी पाडू शकत नाही,’’ अशी प्रतिक्रिया अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहाच्या अध्यक्ष नॅन्सी पलोसी यांनी गुरुवारी जपान येथे दिली.

पलोसी यांनी चीनवर आरोप केला, की चीनने तैवानला आंतरराष्ट्रीय स्तरावर एकाकी पाडण्याचा प्रयत्न केला. अलीकडे जागतिक आरोग्य संघटनेत सामील होण्यापासून तैवानला चीनने रोखले. चीन तैवानला इतर कुठेही सहभागी होण्यापासून रोखू शकतात परंतु आमचा तैवान दौरा रोखून तैवानला वेगळे पाडू शकत नाही. आपल्या तैवान दौऱ्यामागील उद्देश तैवान बेटाच्या सद्यःस्थितीत कोणताही बदल करण्याचा नव्हता. परंतु तैवानच्या सामुद्रधुनीत शांतता व स्थैर्य राखण्याचा हेतू त्यामागे होता.

तैवानमध्ये मोठ्या अडथळ्यांवर मात करत लोकशाही प्रस्थापित करण्यात आली आहे, याचे कौतुक करून पलोसी यांनी चीनवर व्यापक करारांचे उल्लंघन, शस्त्रास्त्रांचा पुरवठा आणि मानवाधिकारांच्या उल्लंघनाबद्दल टीकाही केली.

## जम्मू काश्मीरमधील भरतीप्रकरणी छापे

**नवी दिल्ली :** जम्मू काश्मीर सेवा निवड मंडळाच्या (जेकेएसएसबी) पोलीस उपनिरीक्षक भरतीतील कथित अनियमितेप्रकरणाची चौकशी करण्यासाठी केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) शुक्रवारी ३० ठिकाणी छापे टाकले. जम्मूमधील २८ तर, श्रीनगर आणि बंगळुरू या शहरात प्रत्येक एका ठिकाणी छापा टाकण्यात आला. जेकेएसएसबीचे सदस्य नारायण दत्त आणि अन्य ३२ आरोपींविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक 1972-2022 Bharose ka Bank Bhavishya ka Bank
प्रस्तुत
लोकसत्ता यशस्वी भव! ५५
आता हाऊसिंग लोन ₹ 70 लाख ₹ 1.40 कोटी पर्यंत.
• शून्य परतफेड शुल्क
• फ्लेक्सिबल परतफेड कालावधी
• NRI साठीही कर्ज उपलब्ध
*अटी लागू.



टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. 1972-2022 Bharose ka Bank Bhavishya ka Bank
50 Years Of Banking Excellence
www.tjsbbank.co.in
Toll Free: 1800 266 3466 / 1800 223 466

# इयत्ता दहावी, एस.एस.सी. बोर्ड - Mathematics Part I – Algebra

## Ch. 2 – Quadratic Eqations (II)

- **Relation of roots to the coefficients in quadratic equation.**

If $\alpha$ and $\beta$ are roots of the quadratic equation $ax^2 + bx + c = 0$, then
$\alpha + \beta = -\frac{b}{c}$ and $\alpha \times \beta = \frac{c}{a}$
$ax^2 + bx + c = 0$ is a general quadratic equation,
Then by dividing by $a$ to equation, we get,
$x^2 + \frac{b}{a}x + \frac{c}{a} = 0$ $\quad x^2 - (-\frac{b}{a})x + \frac{c}{a} = 0$
$\therefore x^2 - (\alpha + \beta)x + \alpha \times \beta = 0$
If $\alpha$ and $\beta$ are known we can construct the quadratic equation.

**Ex 1) If - 3and 5 are the roots of the quadratic equation, then construct the equation.**

**Solution:** Let $\alpha = -3$ and $\beta = 5$
Required equation is
$x^2 - (\alpha + \beta)x + \alpha \times \beta = 0$
$\therefore x^2 - (-3 + 5)x + (-3) \times (5) = 0$
$x^2 - 2x - 15 = 0$

**Ex 2) If - 3 and 5 are the roots of the quadratic equation $x^2 - 2x - 7 = 0$. Find the value of $(\alpha^2 + \beta^2)$ and $(\alpha^3 + \beta^3)$**

Solution: $x^2 - 2x - 7 = 0$ compare this equation to $x^2 - (\alpha + \beta)x + \alpha \times \beta = 0$.
$\therefore \alpha + \beta = 2$ and $\alpha \times \beta = -7$
i) $\alpha^2 + \beta^2 = (\alpha + \beta)^2 - 2\alpha\beta$
$= (2)^2 - 2 \times (-7)$
$= 4 + 14$
$\therefore \alpha^2 + \beta^2 = 18$
ii) $\alpha^3 + \beta^3 = (\alpha + \beta)^3 - 3\alpha\beta(\alpha + \beta)$
$= (2)^3 - 3 \times (-7) \times 2$
$= 8 + 42$
$\therefore \alpha^3 + \beta^3 = 50$

- **Word Problems – (Applications of quadratic equations)**

Several problems in our day to day life can be solved by using factorization method of quadratic equation.

**Ex 3) The sum of the two numbers is 11 and the sum of their squares is 61. Find the numbers.**

**Solution:** Let one of the numbers be $x$.
$\therefore$ Other number is $(11 - x)$
By given information, sum of their square is 61,
$x^2 + (11 - x)^2 = 61$
$\therefore x^2 + 121 - 22x + x^2 = 61$
$\therefore 2x^2 - 22x + 121 - 61 = 0$
$\therefore 2x^2 - 22x + 60 = 0$
$\therefore x^2 - 11x + 30 = 0$
$\therefore \underline{x^2 - 5x} - \underline{6x + 30} = 0$
$\therefore x(x - 5) - 6(x - 5) = 0$
$\therefore (x - 5)(x - 6) = 0$
$\therefore (x - 5) = 0$ or $(x - 6) = 0$
$\therefore x = 5$ or $x = 6$
If one number is 5 then other number is $(11 - 5) = 6$
$\therefore$ Given two numbers are 5 and 6.

**Ex 4) The length of rectangular field is greater than its breadth by 21m. Its diagonal is greater than its length by 6m. Determine the length and breadth of the rectangular field.**

**Solution:** Let breadth of rectangular field be x meters.
$\therefore$ Length is $(x + 21)$ meters.
Diagonal is greater than length by 6m.
$\therefore$ Diagonal $= (x + 21) + 6 = (x + 27)$ meters.
$\therefore$ By Pythagoras Theorem,
$x^2 + (x + 21)^2 = (x + 27)^2$
$\therefore x^2 + x^2 + 42x + 441 = x^2 + 54x + 729$
$\therefore 2x^2 + 42x + 441 - x^2 - 54x - 729 = 0$
$\therefore x^2 - 12x - 288 = 0$
$\therefore \underline{x^2 - 24x} + \underline{12x - 288} = 0$
$\therefore x(x - 24) + 12(x - 24) = 0$
$\therefore (x - 24)(x + 12) = 0$
$\therefore (x - 24) = 0$ or $(x + 12) = 0$
$\therefore x = 24$ or $x = -12$
Breadth is never negative.
$\therefore x = -12$ is not applicable.
$\therefore$ Breadth = 24 meters, and length is = 24 + 21 = 45 meters.

**Ex 5) The speed of a boat in a still water is 15 km/hr. It can travel 45 km upstream and return downstream to the destination in 6 hours and 45 minutes. Find the speed of the stream.**

**Solution:** Suppose the speed of the stream = x km/hr.
Speed of the boat is = 15 km/hr.
$\therefore$ Speed of the boat upstream = $(15 - x)$ km/hr.
$\therefore$ Speed of the boat downstream = $(15 + x)$ km/hr.
Now to go 45km upstream it will take $\frac{45}{(15-x)}$ hrs. and
To come 45km downstream it will take $\frac{45}{(15+x)}$ hrs.
The total time taken by boat is 6 hrs. and 45 minutes means
$6 + \frac{45}{60} = 6 + \frac{3}{4} = \frac{27}{4}$ hrs.
$\therefore \frac{45}{15-x} + \frac{45}{15+x} = \frac{27}{4} \longrightarrow \therefore 45\left(\frac{1}{15-x} + \frac{1}{15+x}\right) = \frac{27}{4}$
$\therefore \left(\frac{1}{15-x} + \frac{1}{15+x}\right) = \frac{27}{4} \times \frac{1}{45} = \frac{3}{20}$
$\therefore \frac{1}{15-x} + \frac{1}{15+x} = \frac{3}{20} \longrightarrow \therefore \frac{15 + x + 15 - x}{(15-x)(15+x)} = \frac{3}{20}$
$\therefore \frac{30}{225-x^2} = \frac{3}{20} \longrightarrow \therefore \frac{1}{225-x^2} = \frac{3}{20} \times \frac{1}{30}$
$\therefore \frac{1}{225-x^2} = \frac{3}{200} \longrightarrow \therefore 200 = 225 - x^2$
$\therefore x^2 = 225 - 200 \longrightarrow \therefore x^2 = 25$
$\therefore x = \pm\sqrt{25} = \pm 5$
$\therefore x = 5$ or $x = -5$ Speed is never negative.
$\therefore x = 5$ is accepted.
$\therefore$ Speed of the stream is = 5 km/hr.

**Ex 6) Shabana takes 6 days less than the time taken by Meena to finish certain embroidery on a saree. If both of them work together they can finish the same work in 4 days. Find the time taken by Meena to finish the work done.**

**Solution:** Suppose the time taken by Meena to finish the work done alone in ‘x’ days.
$\therefore$ Time taken by Shabana to finish the work = $(x - 6)$ days.
In one day Meena Completes $(\frac{1}{x})^{th}$ part and in one day Shabana completes $(\frac{1}{x-6})^{th}$ part of the total work.
If they both work together then the work completed in one day $= (\frac{1}{x} + \frac{1}{x-6})^{th}$ part.
$\therefore$ In one day both will complete $(\frac{x-6+x}{x(x-6)})^{th}$ i.e. $(\frac{2x\ 6}{x^2-6x})^{th}$ part of the total work.
$\therefore$ Total work means 1 work will be done in $\frac{x^2-6x}{2x-6}$ days.
We have given that both have done the work for 4 days.
$\therefore \frac{x^2-6x}{2x-6} = 4$
$\therefore x^2 - 6x = 4(2x - 6)$
$\therefore x^2 - 6x = 8x - 24$
$\therefore x^2 - 14x + 24 = 0$
$\therefore (x - 12)(x - 2) = 0$
$\therefore x = 12$ or $x = 2$
x = 2 is not Possible because Shabana takes 6 days less than Meena.
$\therefore$ Meena works 12 days to complete the embroidery on the saree.

**Ex 7) If $1 + 2 + 3 + \text{----} + t_n = \frac{n(n+1)}{2}$ and $101 + 102 + 103 + \text{---} + m = 15050$. Find m.**

**Solution:** We have $101+102+103 + \text{---} + m = 15050$
$\therefore (100 + 1) + (100 + 2) + (100 + 3) + \text{---} + m = 15050$
$\therefore (100 + 1) + (100 + 2) + (100 + 3) + \text{---} + (100 + n) = 15050$
$\therefore$ 100+ 100+ 100+---+ n times + 1+ 2 + 3+ ----+ ---+ n = 15050
$\therefore 100n + \frac{n(n+1)}{2} = 15050$
$\therefore 200n + n(n+1) = 30100$
$\therefore 200n + n^2 + n - 30100 = 0$
$\therefore n^2 + 201n - 30100 = 0$
$\therefore n^2 + 201n - 30100 = 0$
$\therefore (n + 301)(n - 100) = 0$
$\therefore n + 301 = 0$ or $n - 100 = 0$
$\therefore n = -301$ or $n = 100$
n cannot be negative. $\therefore$ discard value $n = -301$
$\therefore n = 100$
$\therefore m = 100 + n = 100 + 100 = 200$

**Ex 8) If $\alpha$ and $\beta$ are roots of the quadratic equation, such that $\alpha + \beta = 4$, $\alpha^3 + \beta^3 = 28$. Construct the quadratic equation.**

**Solution:** $\alpha+\beta = 4$, $\therefore (\alpha+\beta)^3 = 64$
We know, $(\alpha+\beta)^3 = \alpha^3+\beta^3+3\alpha\beta(\alpha+\beta)$
$\therefore \alpha^3+\beta^3+3\alpha\beta(\alpha+\beta) = 64$
$\therefore 28 + 3\alpha\beta \times 4 = 64$
$\therefore 12\alpha\beta = 64 - 28 = 36$
$\therefore \alpha\beta = \frac{36}{12} = 3$
$\therefore \alpha+\beta = 4$ and $\alpha\beta = 3$
$\therefore$ Required equation is $x^2 - (\alpha+\beta)x + \alpha \times \beta = 0$
$\therefore x^2 - 4x + 3 = 0$

**Ex 9) The area of a rhombus is 240 sq. cm. and it’s one diagonal is less than the other by 14 cm. Find the side of a rhombus.**

**Solution:** Let, one diagonal = x cm
$\therefore$ Other diagonal = $(x - 14)$ cm
$\therefore$ Area of a rhombus is given 240 sq.cm.
$\therefore \frac{1}{2} \times (x) \times (x - 14) = 240$
$\therefore$ By solving x = 30 and side = 17 cm.

**Home Work :**

**Q. 1) Solve the following equations by factorization method.**
i) $x^2 + 9x + 20 = 0$ ii) $x^2 - x - 2 = 0$ iii) $y^2 + 2y - 25 = 0$
iv) $3x^2 + 5x = 0$ v) $6m^2 - 7m + 1 = 0$

**Q. 2) Solve the following quadratic equations by completing square method and formula method.**
i) $3x^2+8x+5=0$ ii) $2x^2=4x+5$ iii) $4x^2 - 3x - 5 = 0$
iv) $2(x^2 + 1) = 7x$ v) $5x^2 - 4x - 2 = 0$ vi) $100x^2 - 20x + 1 = 0$

**Q. 3) Solve.**
1) The sum of three times a number and twice the reciprocal of the same number is 5. Find that number.
2) The perimeter of a rectangular ground is 60 m. and the area is 216 sq.m. Find the dimensions of the ground.
3) The diagonal of a rectangular field is 60 metres more than the shorter side. If the longer side is 30 metres more than the shorter side, find the sides of the field.

**लेखिका - डॉ. जयश्री अत्रे**
सदस्य, गणित अभ्यास समिती, बालभारती
**समन्वयक - जगदीश इंदलकर**, मुख्याध्यापक
(लायन एम.पी. भूता सायन सार्वजनिक स्कूल, सायन, मुंबई)

**उद्याचा विषय : Mathematics II**

# भूक आणि रागाचा संबंध संशोधनाने सिद्ध!




**नवी दिल्ली :** भूक आणि रागाचा परस्परसंबंध असतो का? भूक असताना चिडचिड होते, असे म्हणतात. त्याला शास्त्रीय आधार शोधण्याचे काम नुकतेच करण्यात आले. ब्रिटनमधील अँग्लिया रस्किन विद्यापीठ (एआरयू) आणि ऑस्ट्रियातील कार्ल लँडस्टेनर आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे करण्यात आलेल्या नव्या संशोधनाचे निष्कर्ष 'प्लोस वन' या विज्ञानपत्रिकेत नुकतेच प्रसिद्ध करण्यात आले. त्यानुसार भुकेचा रागाच्या चढत्या पाऱ्याशी तर निश्चित संबंध असतोच, शिवाय भुकेमुळे सुखसंवेदनांचा स्तरही घटतो. या अभ्यासांतर्गत ६४ प्रौढ व्यक्तींवर २१ दिवस प्रयोग करण्यात आला. त्यांच्या भुकेचा स्तर आणि भावनिक स्तर ठरावीक 'अ‍ॅप'द्वारे मोजण्यात आला. त्याच्या निष्कर्षानुसार भूक असताना सहभागींनी नोंदवलेल्या चिडचिडेपणात ३७ टक्के, रागात ३४ टक्के आणि आनंदातील ३८ टक्के चढउतार नोंदवण्यात आला.

संशोधनात असेही आढळले, की नकारात्मक भावना - चिडचिड, राग आणि असमाधान यात भुकेतील दैनंदिन चढ-उतारांमुळे बदल होतात. या अहवालाचे प्रमुख लेखक 'एआरयू'चे सामाजिक मानसशास्त्राचे प्राध्यापक वीरेन स्वामी यांनी सांगितले, की भुकेले असताना आपल्या भावभावनांवर परिणाम होतात. जरी आमचा अभ्यास भुकेने निर्माण होणारी नकारात्मक भावना घटवण्याचे उपाय




सुचवत नसला, तरी भावभावनांच्या चढउतारामागील कारण नेमके समजून तिचे नियमन करण्यास मदत मिळू शकते. तज्ज्ञांच्या मते, जेव्हा दोन जेवणांत बरेच अंतर असते, तेव्हा शरीरातील रक्तशर्करेची पातळी घटते. यामुळे शरीरात तणाव वाढवणारी संप्रेरके (कॉर्टिसोल हार्मोन) आणि 'अ‍ॅड्रेनालाईन'सारख्या आक्रमकतेस पूरक संप्रेरकांचे प्रमाण वाढते. त्यांचे रक्तातील प्रमाण वाढले, की राग, चिडचिड आणि आक्रमकता वाढते. काही व्यक्ती 'कोर्टिसोल हार्मोन'नेही आक्रमक होतात. भुकेले असताना आपल्या मेंदूच्या गतिविधीस कमी ऊर्जा मिळते. त्यामुळे स्वनियंत्रण सुटण्याची शक्यता असते. भुकेशी संबंधित नकारात्मक भावना काही उपायांनी घटवता येतात, असे तज्ज्ञ सांगतात. त्यासाठी ते पुढील उपाय सुचवतात. १) रोज भरपेट नाश्ता, दोन्ही वेळचे जेवण पोषक आहारयुक्त घटकांनी करा. गरजेनुसार मधल्या वेळी खा. २) प्रक्रियायुक्त अन्न, 'जंक फूड' टाळा. तंतुयुक्त, पोषक, पौष्टिक व भरपूर वेळ भूक भागवणारे अन्नसेवन करा. ३) सोबत पोषक 'स्नॅक' ठेवा. आपण घरापासून दूर असताना आपल्याला भुकेले वाटल्यास हे सोबत ठेवलेले 'स्नॅक' मनःशांती प्रदान करते. ४) नियमित व्यायाम करा. ५) पुरेशी विश्रांती घ्या.




# 'एफटीआयआय'च्या वसतिगृहामध्ये गळफास लावून विद्यार्थ्याची आत्महत्या

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेतील (एफटीआयआय) मुलांच्या वसतिगृहामध्ये एका विद्यार्थ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. डेक्कन पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून अद्याप आत्महत्येचे नेमके कारण समजू शकले नाही.

अश्विन अनुराग शुक्ला (वय ३२, रा, गोवा) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. एफटीआयआय मधील मुलांच्या वसतिगृहातील एस १२ बी ब्लॉक रूममध्ये ही घटना घडली.



एफटीआयआयमधील एक खोली आतमधून बंद असल्याची माहिती शुक्रवारी सकाळी नऊच्या सुमारास पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर तत्काळ डेक्कन पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्या वेळी खिडकीतून पाहिल्यानंतर आतमध्ये तरुणाने गळफास घेतल्याचे दिसून आले. अग्निशामक दलाला पाचारण करून तरुणाचा मृतदेह बाहेर काढण्यात आला असून शवविच्छेदनासाठी मृतदेह रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. पुढील तपास डेक्कन पोलीस करत आहेत.

# महापालिका निवडणूक पुढच्या वर्षीच?

## आरक्षण निश्चिती, अंतिम मतदार यादीला स्थगितीचे आदेश

## नव्याने आरक्षणामुळे इच्छुकांत पुन्हा धाकधूक

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** आगामी महापालिका निवडणुकीसाठी करण्यात आलेली आरक्षण निश्चिती, अंतिम मतदार यादीच्या प्रक्रियेला स्थगिती देण्याचे निवडणूक आयोगाचे अधिकृत आदेश शुक्रवारी (५ ऑगस्ट) पालिकेला मिळाले. चार नगरसेवकांचा एक प्रभाग या पद्धतीने निवडणूक होणार असल्याने महापालिका प्रशासनाला पुन्हा नव्याने सर्व प्रक्रिया करावी लागणार आहे. त्यामुळे आगामी निवडणूक पुढील वर्षीच होईल, असेच सध्याचे चित्र आहे. निवडणूक लांबणीवर पडल्याने भाजप वगळता राजकीय पक्षाकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

प्रभागाचा प्रारूप आराखडा करणे, मतदार यादी निश्चित करणे, प्रभागातील आरक्षणे काढणे, त्यावर हरकती-सूचना घेणे तसेच त्यावर सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करणे यासाठी काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे निवडणूक लांबणीवर पडणार असून नव्याने आरक्षणे काढावी लागणार असल्याने इच्छुकांमध्येही धाकधूक निर्माण झाली आहे. निवडणूक पावसाळ्यानंतर होईल, या अपेक्षेने उमेदवारांकडूनही निवडणुकीची तयारी सुरू झाली होती. मात्र ही प्रक्रियाही आता थांबणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

महापालिकेची निवडणूक फेब्रुवारी-मार्च महिन्यात होणे अपेक्षित होते. मात्र इतर मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणाचा मुद्द्यामुळे निवडणूक होऊ शकली नाही. ही निवडणूक त्रिसदस्यीय पद्धतीने होणार होती. त्यासाठी प्रभागाची अंतिम रचना, प्रभागनिहाय मतदार यादी प्रशासनाकडून अंतिम करण्यात आली होती. महापालिकेने जुलै महिन्यात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींबरोबरच सर्वसाधारण गट आणि महिला आरक्षण ३१ मे रोजी निश्चित केले होते. हे आरक्षण निश्चित करताना इतर मागासवर्गीय समाजाचे आरक्षण काढण्यात आले नव्हते. त्यामुळे या जागा सर्वसाधारण गटाला मिळाल्या होत्या.

इतर मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात निकाली निघाला. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने इतर मागासवर्गीय समाजाचे आरक्षण निश्चित करण्याचे आदेश दिले. त्यानुसार अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचे आरक्षण कायम ठेवत अन्य आरक्षणे नव्याने काढण्यात आली. या आरक्षणानुसार इच्छुकांकडून राजकीय गणितांची जुळवाजुळव सुरू असतानाच त्रिसदस्यीय प्रभाग पद्धत रद्द करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. त्यामुळे निवडणूक आयोगानेही निवडणूक प्रक्रिया पुढील आदेशापर्यंत रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे महापालिकेलाही चार नगरसेवकांच्या प्रभागानुसार पुन्हा नव्याने सर्व प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

# टीईटीत गैरप्रकारातील शिक्षकांवर नियमानुसार कारवाई

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** शिक्षक पात्रता परीक्षेत (टीईटी) गैरप्रकार करून प्रमाणपत्र मिळवलेल्या ७ हजार ८७४ उमेदवारांची यादी नुकतीच जाहीर करण्यात आली. संबंधित उमेदवारांची टीईटीची प्रमाणपत्रे रद्द करण्यासह त्यांना पुढील टीईटी परीक्षा देण्यास कायमस्वरूपी प्रतिबंध घालण्याची कारवाई करण्यात आली असून, या गैरप्रकाराबाबत सेवेत असलेल्या शिक्षकांवर नियमानुसार कारवाई केली जाणार आहे.

आरोग्य विभागाच्या परीक्षेतील गैरप्रकाराचा पुणे पोलिसांकडून तपास करण्यात येत असताना टीईटी परीक्षेतील गैरप्रकार उघडकीस आला. टीईटी परीक्षा आयोजित करणाऱ्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतील अधिकारी कर्मचारी, खासगी कंपनीचे संचालक, उमेदवार यांचा या गैरप्रकारात सहभाग असल्याचे तपासात उघड झाले. या संदर्भातील पोलिसांनी काही जणांना अटक केली. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने टीईटी गैरप्रकार केलेल्या ७ हजार ८७४ उमेदवारांची यादी जाहीर केली. संबंधित उमेदवारांची टीईटीची प्रमाणपत्रे रद्द करण्यासह त्यांना पुढील टीईटी परीक्षा देण्यास कायमस्वरूपी प्रतिबंध घालण्यात आला. मात्र संबंधित उमेदवारांपैकी काही जण कार्यरत असल्याने आता शिक्षण विभाग त्यांच्यावर काय आणि कधी कारवाई करणार, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

टीईटीत गैरप्रकार केलेल्या उमेदवारांपैकी शिक्षक असलेल्यांवरील कारवाईसंदर्भात शिक्षण आयुक्त सुरज मांढरे म्हणाले, की टीईटी परीक्षेत गैरप्रकार केलेल्या उमेदवारांवर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. शिक्षकांचे सेवा नियम स्पष्ट आहेत. त्यात गैरप्रकार केलेल्या शिक्षकावर काय कारवाई करायचे हे स्पष्ट नमूद केलेले आहे. संबंधित उमेदवारांनी केलेला गैरप्रकार हा नैतिक अधःपतन असल्याने त्या अनुषंगाने आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून कारवाई करण्यात येईल.






## मालती देऊळगावकर यांचे निधन



**लातूर :** श्री गोदावरी देवी लाहोटी कन्या विद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षिका मालती चंद्रकांतराव देऊळगावकर (वय ९०) यांचे शुक्रवारी राहत्या घरी सकाळी नऊ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा अतुल, मुलगी अनघा, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मालती देऊळगावकर यांच्या इच्छेनुसार त्यांचा देह एम.आय.एम.एस.आर. वैद्यकीय महाविद्यालयास दान करण्यात आला.

## देशात आणखी १० रामसर स्थळे

*(पान १ वरून)* त्याचे सर्वाधिक क्षेत्रफळ असून त्यानंतर आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश आणि पश्चिम बंगालचा क्रमांक लागतो. प्रामुख्याने उत्तर प्रदेश आणि गुजरातमधील पाणथळ जागा स्थलांतरित पक्ष्यांसाठी महत्त्वाची आहे. कोरल रीफ, सीग्रास बेड आणि खारफुटी या तीन वेगवेगळ्या तटीय परिसंस्थांनी संपन्न असलेले मन्नारचे आखात हे सागरी जैवविविधतेच्या दृष्टिकोनातून जगातील सर्वात श्रीमंत प्रदेशांपैकी एक मानले जाते. तसेच जागतिक महत्त्व असलेल्या अद्वितीय सागरी विविधतेसाठी ओळखले जाते. कुंथनकुलम पक्षी अभयारण्य ही एक महत्त्वपूर्ण मानवनिर्मित पाणथळ जमीन आहे. तामिळनाडूच्या तिरुनेलवेली जिल्ह्यातील नांगुनेरी तालुक्यात स्थित असलेले हे अभयारण्य दक्षिण भारतातील रहिवासी आणि स्थलांतरित पाणपक्षी प्रजननासाठी सर्वात मोठे राखीव क्षेत्र आहे. ओडिशातील महानदी नदीवरील सातकोसिया घाटी ही फुलांच्या आणि प्राण्यांच्या प्रजातींच्या विविध लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करणाऱ्या समृद्ध परिसंस्थेचे वैभव आहे.

## दिनदर्शिका

**शनिवार, ६ ऑगस्ट २०२२**
भारतीय सौर श्रावण १५ शके १९४४
मिती श्रावण शुक्लपक्ष नवमी
उ रा ०२ : ११ पर्यंत.
नक्षत्र : विशाखा १७ : ५१ पर्यंत.
चंद्र : तूळ १२ : ०६ पर्यंत.

- **मेष :** कामे सकाळीच उरका.
- **वृषभ :** दुपारनंतर उत्साह वाटेल.
- **मिथुन :** संभ्रमावस्था राहील.
- **कर्क :** शुभ पडघम वाजेल.
- **सिंह :** कुटुंबाची साथ मिळेल.
- **कन्या :** मनोरंजन घडेल.
- **तूळ :** आवक वाढेल.
- **वृश्चिक :** निवारण मार्ग निघेल.
- **धनू :** विचार करून बोला.
- **मकर :** प्रलंबित येणी येतील.
- **कुंभ :** कार्य सिद्ध होईल.
- **मीन :** धार्मिक गोष्टीत सहभाग.

**शुभ राशी : कर्क, कन्या**

## नेटक्लिप्स




व्हिडीओ बघण्यासाठी वरील क्यूआर कोड स्कॅन करा..

- दृश्य कथा • दैनिक ब्रीफिंग
- वाचनीय लेख • बातम्यांचा अनुभव

लोकसत्ता.COM

- ‘दे धक्का २’ शूटिंगदरम्यान सिद्धार्थ जाधववर का भडकले महेश मांजरेकर?
- सोनं आणि रोख रकमेबद्दल भारतीय कायदा काय सांगतो?

## वाचकांची पसंती

- अग्रलेख : रेवडीचा जुमला!
- संजय राऊतांच्या अटकेनंतर उद्धव ठाकरेंचा ‘दैनिक सामना’ संदर्भात मोठा निर्णय
- राज्यपाल कोश्यारींच्या ‘मोदींच्या आधी विदेशात भारतीयांना किंमत नव्हती’ या विधानावरून रोहित पवारांची टीका; म्हणाले, ‘मोदी हे...’
- ‘...तेव्हा आदित्य ठाकरेंची बदनामी करण्याचा प्रयत्न’, दीपक केसरकरांनी पुन्हा घेतले नारायण राणेंचे नाव

# अपात्र ‘श्रीमंत’ मजूर दरेकर पुन्हा मुंबै बँकेचे अध्यक्ष

## भाजपचे वर्चस्व पुन्हा सिद्ध

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी,**



**मुंबई :** राज्यात सत्ताबदल होताच मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर (मुंबै बँक) अंतर्गत तडजोड करीत भाजपने पुन्हा एकदा आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. या निवडणुकीत मजूर म्हणून निवडून आल्यावर सहकार विभागाने अपात्र ठरविलेले विधान परिषदेतील माजी विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर हे पुन्हा अध्यक्षपदी बिनविरोध निवडून आले आहेत. याआधी अध्यक्ष असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे सिद्धार्थ कांबळे यांनी उपाध्यक्ष होण्यात समाधान मानले आहे.

गेल्याच आठवड्यात मुंबै बँकेचे अध्यक्ष सिद्धार्थ कांबळे व उपाध्यक्ष विठ्ठल भोसले यांनी वैयक्तिक कारण देऊन अचानक राजीनामे दिले. होते. तेव्हाच मुंबै बँकेवर भाजपचा अध्यक्ष येईल, हे स्पष्ट झाले होते. गेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत अध्यक्षपदाच्या निवडणुकीत कांबळे यांच्या विरोधात भाजप नेते प्रसाद लाड यांनी अर्ज भरला होता. त्यामुळे यंदाही लाड हेच अध्यक्षपदाचा अर्ज भरतील अशी अटकळ होती. परंतु प्रत्यक्षात दरेकर यांचे अध्यक्षपदासाठी नाव पुढे करण्यात आले. या नावाला कोणीही विरोध न केल्याने त्यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली तर सिद्धार्थ कांबळे यांनी उपाध्यक्ष होणे पसंत केले. सत्ताबदल होताच कांबळे यांनी स्वखुशीने अध्यक्षपद सोडल्याची चर्चा असली तरी या अंतर्गत तडजोडीमागे भाजप सत्तेवर आल्याचेच कारण सांगितले जात आहे.

दरेकर यांच्या अध्यक्षपदाच्या निवडीला न्यायालयात आव्हान देणार असल्याचे आम आदमी पार्टीचे महाराष्ट्र सचिव धनंजय शिंदे यांनी सांगितले. मजूर या प्रवर्गातून अपात्र ठरलेली व्यक्ती अन्य प्रवर्गातून निवडून आली असली तरी तिने फसवणूक केलेली आहे. अशावेळी ती अध्यक्षपदाच्या निवडणुकीत उभी कशी राहू शकते, याबाबत कायदेशीर सल्ला घेऊन पुढील कारवाई करणार आहोत, असे शिंदे यांनी सांगितले.

### मंत्रिपद हुकणार ?

शिंदे-फडणवीस सरकारमध्ये वर्णी लागावी म्हणून प्रवीण दरेकर हे प्रयत्नशील आहेत. पण दरेकर यांची मुंबै बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांचा मंत्रिमंडळात समावेश होणार नाही असा तर्क बांधला जात आहे. मुंबईतून आशिष शेलार यांचे नाव निश्चित असल्याने दरेकर यांना संधी मिळणे कठीण मानले जाते. यातूनच बहुधा दरेकर यांनी मुंबै बँकेचे अध्यक्षपद स्वीकारून त्यातल्या त्यात समाधान मानून घेतले आहे.

### अपात्र ठरूनही...

या निवडीमुळे मजूर म्हणून अपात्र ठरलेली व्यक्ती बँकेचे अध्यक्ष म्हणून निवडणुकीस उभी राहू शकते का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. सदस्य म्हणून अपात्र ठरल्यानंतर वर्षभर निवडणूक लढविता येत नाही. परंतु दरेकर हे मजूर म्हणून अपात्र असले तरी सहकारी बँक प्रवर्गातून ते निवडून आल्यामुळे अध्यक्षपदासाठी पात्र ठरतात, असा युक्तिवाद सहकार खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्याने केला आहे. अपात्र सदस्याबाबत सहकार कायद्यात स्पष्ट तरतूद नाही, असा दावाही या अधिकाऱ्याने केला.

# गृहनिर्माण मंत्र्यांचे अधिकार म्हाडाला

*(पान १ वरून)*

ठराव आदी सर्वच प्रस्तावांना शासनमंजुरी आवश्यक करण्यात आली होती. त्यामुळे आर्थिक मलिद्याचे ‘एक टेबल’ वाढल्याची चर्चा होती. मात्र म्हाडा अधिकारी प्रचंड भ्रष्ट असल्यामुळे त्यांच्यावर वचक बसावा, यासाठी आपण हा निर्णय घेतल्याचे समर्थन त्या वेळी जितेंद्र आव्हाड यांनी केले होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानंतर आता पुन्हा अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत जारी करण्यात आलेल्या टिप्पणीमध्ये या सर्व निर्णयांचे पुनर्विलोकन करून प्राधिकरणाच्या आणि क्षेत्रीय स्तरावर अधिकार प्रदान करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे म्हाडा प्राधिकरण तसेच विभागीय मंडळांना अधिकार मिळणार आहेत. म्हाडा अध्यक्ष आणि इतर मंडळांतील सभापतींची नियुक्ती झाली की शासनाचे सर्व अधिकार प्राधिकरण तसेच विभागीयमंडळांना प्राप्त होणार आहेत. अशा वेळी नवा गृहनिर्माण मंत्री अधिकारांविना राहील का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

प्रकाश मेहता गृहनिर्माणमंत्री असताना अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात आले होते. मात्र मेहता यांच्या जागी राधाकृष्ण विखे-पाटील यांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी म्हाडा स्तरावरील बदल्या, नियुक्त्या आणि इतर सर्व निर्णयांना शासनाची मंजुरी आवश्यक केली होती. म्हाडा अध्यक्ष असलेल्या उदय सामंत यांना शह देण्यासाठी विखेपाटील यांनी हे निर्णय घेतले होते. आव्हाड यांनीही त्याचीच पुनरावृत्ती केली होती.

### नवे काय?

प्रत्येक निर्णयाच्या फायलीला राज्य शासनाची मंजुरी घेण्याचा तत्कालीन गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांचा आदेश रद्द करून सर्व अधिकार पुन्हा ‘महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण’ (म्हाडा) तसेच विभागीय मंडळांना बहाल करण्याचे आदेश फडणवीस यांनी दिले आहेत.

# झेंडा‘बंधना’चे पालन अवघड

*(पान १ वरून)*

आले. केंद्रीय खादी आयोगाच्या अध्यक्षांच्या उपस्थितीत २८ जुलै रोजी मुंबईत एक बैठक घेण्यात आली. या बैठकीला देशभरातील दहा-बारा खादी वस्तूंसह राष्ट्रध्वज निर्मिती करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीला नांदेड येथील मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीचे सचिव ईश्वरराव भोसीकर हेही उपस्थित होते. बैठकीत खादी संस्थांपुढे ३० कोटी झेंड्यांचा १३ ऑगस्ट पूर्वीपर्यंत पुरवठा करण्याविषयी विचारणा झाली. त्यास नकार देण्यात आला.

‘मखाग्रास’चे सचिव ईश्वरराव भोसीकर यांनी सांगितले, की संस्था दरवर्षी २५ हजार राष्ट्रध्वज निर्माण करते. कारसारख्या वाहनात लावण्यात येणाऱ्या लहान आकारापासून ते सचिवालयाच्या ठिकाणी फडकवण्यात येणाऱ्या १४ बाय २१ आकारातील राष्ट्रध्वजाची निर्मिती संस्थेकडून केली जाते. करोनाकाळातही कामगारवर्गाच्या हाताचे काम थांबलेले नव्हते. स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून राष्ट्रध्वजाच्या निर्मितीचा वेग वाढवलाही आहे. गेल्या सहा महिन्यात २५ हजार राष्ट्रध्वजाची निर्मिती केली. आणखी १० हजार ध्वजांची निर्मिती करता येईल, एवढेच संस्थेकडे कापड आहे. ३० कोटींच्या संख्येने राष्ट्रध्वजांची निर्मिती करण्यासाठी खादीच्या कापडाचीही मुबलकता आवश्यक आहे. परंतु खादीतील निर्मितीतील विशिष्ट संस्कारित पद्धत पाहता तेवढे कापड उपलब्ध करणे आणि अवघ्या पंधरा दिवसात राष्ट्रध्वज तयार करून त्याचा पुरवठा आयत्यावेळी शक्य नाही. मराठवाड्यातील प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांनीही स्वतंत्र बैठक घेऊन खादी संस्थेला राष्ट्रध्वज पुरवठ्याबाबत विचारणा केली. मात्र, जिल्हास्तरावरही ३ ते ४ लाखांपर्यंतच्या राष्ट्रध्वजाचा पुरवठा खादी संस्थांना शक्य नाही. शिवाय खादीच्या राष्ट्रध्वजाची किंमत साधारण मोठ्या आकारातल्या झेंड्यांची किंमत ३०० रुपयांपासून सुरू होते. प्रशासनाला ३० रुपयांत झेंडा मिळावा, असे अपेक्षित दिसते आहे. त्यामुळे आम्ही स्पष्टपणे नकार दिला, असे भोसीकर यांनी सांगितले.

रविवार, ७ ऑगस्ट २०२२
लोकरंग
‘भारतीयत्वाचा शोध’ लेखमाला...
लेख पहिला : चित्रकलेतील भारतीयता
स्वातंत्र्याची ७५ वर्षे

## देश-काळाचे ताणेबाणे...

अभिजीत ताम्हणे

रंगरेषांची भाषा एखाद्या देशापुरती कधीच नव्हती. त्यामुळे भारतामध्ये पाश्चात्य कलाशिक्षणाचा प्रसार होण्यापूर्वीच पाश्चात्य धाटणीनं भारतीय विषय हाताळणारे राजा रविवर्मा देशभर लोकप्रिय होऊ शकले. मात्र त्यानंतरच्या काळात भारतीयतेचा शोध बुद्धिपुरस्सर सुरू झाला. भारतीय विषय आणि भारतीयता यांमधला फरक त्यातून स्पष्टही झाला. शैलीच्या अनेक प्रेरणा याच शोधातून मिळत गेल्या आणि अमूर्तचित्रांसारखी नवी वाटही सापडली. भारतीयतेच्या शोधाची सक्ती कधीही कुणावर नव्हतीच, पण जागतिकीकरणामुळे भारतीय चित्रकारांना आयतीच ओळख मिळत गेली... देश आणि काळ यांच्या उभ्या-आडव्या धाग्यांचा हा प्रवास आजवर असा होता... तर यापुढे तो कसा असेल ?



# भंडाऱ्यातील अत्याचाराचा सर्व स्तरांतून निषेध

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** बलात्काराच्या घटना या अमानुष असून यातून विकृत मानसिकतेचे दर्शन होते. भंडाऱ्यातील अत्याचाराच्या घटनेचा निषेध करावा तेवढा कमी आहे. या प्रकरणातील दोषींना कठोरात कठोर शिक्षा करावी, अशी मागणी सामाजिक व राजकीय क्षेत्रात नेतृत्व करणाऱ्या महिलांनी केली आहे.



**“बलात्काराच्या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध करत आहे. दोषींवर कठोर कारवाई करावी. नागपूरच्या मेडिकल रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर गुप्ता, भंडाऱ्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक, नागपूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक छेरिंग दोरजे यांच्याकडून घटनेची घेतली आहे. पीडितेला समुपदेशन तसेच मनोधैर्य योजनेतून पुनर्वसनासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.**
– **डॉ. नीलम गोऱ्हे,** उपसभापती, विधान परिषद

**“ही अत्याचाराची घटना अतिशय वाईट आहे. शनिवारी भंडाऱ्यात जाऊन तिच्या कुटुंबीयांची भेट घेणार आहे. पोलिसांनी कशी चौकशी केली याबाबत माहिती घेणार आहे.**
– **चित्रा वाघ,** भाजप नेत्या

**अत्याचाराची घटना निंदनीय आहे. विकृत पुरुषी मानसिकता यातून दिसून येते. अजूनही महिला सुरक्षित नाही. दोषींवर तातडीने कठोर कारवाई करावी.**
– **आभा पांडे,** सदस्या, राज्य महिला आयोग

**महिलांना आजही सुरक्षा नाही. बलात्कार करणाऱ्या नराधमाच्या विरोधात महिलांनी एकजूट होऊन संघर्ष केला पाहिजे. या घटनेचा पाठपुरावा करून दोषींना फाशीची शिक्षा व्हावी यासाठी प्रयत्न करणार आहे.**
– **शिल्पा बोडखे,** शहर महिला आघाडी संपर्क प्रमुख, शिवसेना

**दिल्लीच्या निर्भया प्रकरणासारखी ही घटना आहे. हे प्रकरण द्रुतगती न्यायालयात चालवावे. आरोपींना मदत करणाऱ्यांना सहआरोपी करण्यात यावे. संबंधित महिला मानसिकदृष्ट्या खचली आहे. सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन तिचे समुपदेशन करणे आवश्यक आहे.**
– **नूतन रेवतकर,** शहर अध्यक्षा, नागपूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस

**समाजाची प्रगती होत आहे. पायाभूत सुविधा विकसित होत आहेत; परंतु पुरुषांची मानसिकता बदललेली नाही. ते समाजाचे ठेकेदार बनून फिरतात. त्यांनी आधी मानसिकता बदलावी. केवळ भारतमाता की जय म्हणून चालणार नाही. महिलेच्या सन्मानाशिवाय घोषणा व्यर्थ आहेत.**
– **नॅश अली,** अध्यक्ष, नागपूर शहर महिला काँग्रेस

**समाजाचे नियंत्रण सुटले का, या प्रश्नासह अनेक प्रश्न यानिमित्ताने निर्माण होत आहेत. सरकारने अशा घटना गंभीरपणे घेऊन शिक्षेमध्ये कठोर तरतूद करावी. दोषी व्यक्तींमध्ये भीती निर्माण झाली पाहिजे.**
– **अरुणा सबाने,** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या

# शरीर-मनाच्या जखमांनी पीडितेचा रात्रभर आक्रोश

*(पान १ वरून)*

पुन्हा महामार्गाला लागली. हातात पैसे नाही, घशाला कोरड पडलेली म्हणून एका पंक्चर दुरुस्ती करणाऱ्याच्या दुकानात थांबली. तर त्याचीही नियत फिरली. त्याने दुचाकीवर घरी पोहोचविण्याचे आमिष दाखवून आणखी एकाला सोबत घेऊन तिला गावाबाहेरच्या शेतात नेले व तिथे आळीपाळीने अत्याचार केला.

गावातील पोलीस मित्राने महिला पोलीस पाटलाला याबाबत कळवले. त्यांनी घरातील चादरीने पीडितेचे अंग झाकले. गावात आणताच इतर महिलांनी साडी दिली. कारधा पोलीस ठाण्याला कळवण्यात आले. सहायक पोलीस निरीक्षक ताफ्यासह पोहचले. सोबत रुग्णवाहिका होती.

### प्रकृती बिकट..

पीडितेची स्थिती खूपच गंभीर आहे. वारंवार तिची शुद्ध हरपत आहे. तिला रुग्णालयात आणले तेव्हा काहीवेळ शुद्धीवर असताना तिने पोलिसांना घटनेची जुजबी माहिती दिली. त्यावरून गुन्ह्याची नोंद करण्यात आली. मूळ घटनास्थळ गोंदिया जिल्ह्यात असल्याने हे प्रकरण भंडाऱ्याहून गोंदिया पोलिसांकडे वर्ग करण्यात आले.

**अधीक्षकाचे पद रिक्त...**

हे सामूहिक बलात्काराचे गंभीर प्रकरण उघडकीस आले तेव्हा भंडारा जिल्हा पोलीस अधीक्षकांचे पद रिक्त होते. भंडाराचे तत्कालीन पोलीस अधीक्षक वसंत जाधव यांनी एका शाळेच्या प्रकरणात स्थानिक आमदार नरेंद्र भोंडेकर यांच्यावर गुन्हा नोंदवला होता. त्याचा राग मनात धरून आता शिंदे गटात सामील झालेल्या भोंडेकर यांनी मुख्यमंत्री शिंदेंना सांगून वसंत जाधव यांची तडकाफडकी बदली करून घेतल्याची चर्चा आहे. अधीक्षकच नसल्याने भंडाऱ्याचे पोलीस प्रशासन वाऱ्यावर होते. त्याचाही फटका या प्रकरणातील तपासाला बसल्याची माहिती आहे. दरम्यान, पोलीस अधीक्षक पद रिक्त असल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्यावर टीका होऊ नये म्हणून जाधव यांच्या जागी गुरुवारी उशिरा रात्री नागपूर परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त लोहित मतानी यांची नियुक्ती करण्यात आल्याचे कळते.

# मंत्र्यांचे अधिकार सचिवांकडे

*(पान १ वरून)*

जमिनीच्या वापर किंवा आरक्षण बदलाचे, ग्रामविकास मंत्र्यांना सरपंचावर कारवाई करण्याचे किंवा त्यांना अभय देण्याचे, सहकार मंत्र्यांना सहकारी संस्थावरील कारवाईबाबत सुनावणीचे, अन्न नागरी पुरवठा मंत्र्यांना परवान्याबाबतच्या वादावरील सुनावणीचे अधिकार असतात. जमिनीच्या वादात लोकांना विभागीय आयुक्तांच्या निर्णयाविरोधात महसूलमंत्र्यांकडे दाद मागावी लागते. एकूणच न्यायालयांचे दिवाणी अधिकार कमी-अधिक प्रमाणात मंत्र्यांना असतात. न्यायालयांना समांतर अशी ही व्यवस्था सर्वसामान्य लोकांसाठी अत्यंत महत्त्वाची असते.

सध्या एकाही खात्याला मंत्री नसल्याने मंत्रालयात कोणत्याही निर्णयाची किंवा प्रकरणाची फाईल विभागांना थेट मुख्यमंत्र्यांकडे पाठवावी लागत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री कार्यालयावरील फायलींचा भार वाढला आहे. तर दुसरीकडे मंत्री, राज्यमंत्री नसल्याने त्यांच्याकडे होणाऱ्या अर्धन्यायिक सुनावण्या थांबल्या आहेत. मंत्रीस्तरावर चालविण्यात येणारी अर्धन्यायिक स्वरूपाची अपिले, पुनर्विलोकन, पुनरीक्षण अर्ज त्याचप्रमाणे अंतरिम आदेशासाठीचे अर्ज दाखल करून घेणे, त्यावर आवश्यकतेनुसार अंतरिम निर्णय देणे, तसेच तातडीच्या प्रकरणांवर सुनावणी घेऊन त्यावर निवाडा देणे अशी सामान्य नागरिकांच्या जिव्हाळ्याची कामे ठप्प झाली आहेत. नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत मंत्र्यांचे अर्धन्यायिक अधिकार थेट विभागाच्या सचिवांना देण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला आहे. त्यानुसार विभागाच्या सचिवांनी अशा प्रकरणांवर सुनावणी घेऊन ही प्रकरणे तातडीने निकाली काढावीत, अशा सूचना मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांनी एका आदेशान्वये सचिवांना दिल्या आहेत.

## शब्दकोडे- ८००

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | | ■ | ४ | ५ | | ■ |
| ६ | | ■ | | ■ | ७ | | | ■ | ८ |
| | ■ | ९ | | १० | | ■ | ११ | १२ | |
| १३ | १४ | | ■ | १५ | | १६ | ■ | १७ | |
| ■ | १८ | | १९ | ■ | २० | | | | ■ |
| २१ | | ■ | २२ | | ■ | | ■ | २३ | २४ |
| २५ | | २६ | | ■ | २७ | | | ■ | |
| | ■ | २८ | | २९ | ■ | | ■ | ३० | ■ |
| ■ | ३१ | ■ | ३२ | | ३३ | ■ | ३४ | | ३५ |
| ३६ | | | ■ | ३७ | | | | ■ | |

**आडवी विधाने :**
(१) ज्याला कुणीही शत्रू नाही असा (४) कुकर्म, पाप
(६) वट, वृक्ष (७) पडदा (९) पंढरपूरला ठरल्या वेळी जाणारा निष्ठावंत भक्त
(११) उंची किमतीचे (१३) तृष्णा (१५) सावधगिरी, जागरूकता
(१७) वाईट व्यसन, खोड (१८) कोल्ह्यासारखा दिसणारा वन्यप्राणी
(२०) एका पक्ष्याचे नाव (२१) बैठक (२२) आनंद, मोद
(२३) ध्यान, चित्त, भान (२५) घोडे विकणाऱ्या अरबांचा तांडा
(२७) कथा, गोष्ट (२८) मुस्लिमांचे प्रार्थनास्थळ
(३२) भिजवलेल्या पिठाचा गोळा
(३४) तर्क, अनुमान (३६) पराकाष्ठा, कमाल
(३७) भित्रा, कायर

**उभी विधाने :**
(१) जाणलेला, समजलेला (२) स्थूल, धिप्पाड (३) काया, तनू
(४) पाणी झाडाकडे किंवा पिकाकडे नेण्याची छोटी नाली
(५) फार बारीक व मऊ विणीचे (७) पाहणी करणारा, परीक्षा घेणारा
(८) सोबत, जोडलेला; मैत्री (९) कपी, माकड
(१०) पुरुषांचे नेसण्याचे रेशमी वस्त्र (१२) चलनवलन, वळवळ
(१४) साहाय्य, मदत (१६) तारून नेणारा (१९) कोणतीही गोष्ट सहन करणारा
(२१) प्रभात, पहाट (२४) जखम, व्रण (२६) डावा (२९) पाषाण, पत्थर
(३०) एक प्राचीन आयुध (३१) दरारा, जरब (३३) दरवाजा, फाटक
(३४) आकडा; मांडी (३५) विश्व, दुनिया

**– सरोज ताठरे**

## सुडोकू - ८००

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २ | | | ८ | ५ | |
| | | | | ८ | | ४ | | |
| | | १ | ३ | | ४ | | ७ | |
| | | ३ | | | | | २ | |
| १ | ५ | | | | | | ९ | ६ |
| | ४ | | | | | ५ | | |
| | ६ | | ९ | | १ | ७ | | |
| | | ७ | | २ | | | | |
| | ३ | ४ | | | ७ | | | |

## सुडोकू - ७९९चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ६ | २ | ३ | ७ | १ | ८ | ९ | ५ |
| ५ | ३ | ९ | ६ | २ | ८ | ७ | १ | ४ |
| १ | ७ | ८ | ४ | ९ | ५ | ६ | ३ | २ |
| २ | ४ | ५ | १ | ६ | ७ | ९ | ८ | ३ |
| ९ | ८ | ६ | ५ | ३ | ४ | २ | ७ | १ |
| ७ | १ | ३ | २ | ८ | ९ | ५ | ४ | ६ |
| ८ | २ | ४ | ९ | १ | ६ | ३ | ५ | ७ |
| ६ | ५ | ७ | ८ | ४ | ३ | १ | २ | ९ |
| ३ | ९ | १ | ७ | ५ | २ | ४ | ६ | ८ |

## शब्दकोडे - ७९९चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सुं | ध | रा | ■ | क | र | प | ल्ल | वी |
| रं | ■ | ड | क | ला | ■ | ज | य | ■ | ट |
| ग | र | ग | ट | ■ | वा | त | ■ | गा | ■ |
| ळ | ■ | त | ■ | ना | डी | ■ | प्र | भा | त |
| ■ | प्र | ■ | अ | ट | ■ | ब | क | रा | ■ |
| सिं | हा | व | लो | क | न | ■ | र | ■ | हो |
| च | र | ■ | ट | का | ■ | त | ण | स | डी |
| न | ■ | वि | ■ | र | म | ल | ■ | जा | ■ |
| ■ | ब | रा | क | ■ | न | वा | र | ■ | कै |
| मो | स | म | ■ | वा | न | र | ■ | मो | द |

# वक्त्यांच्या संवादातून 'उत्तुंग' व्यक्तिमत्त्वांच्या स्वभावाचे पैलू उलगडले

## सुधीर गाडगीळ यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** स्वरभास्कर पं. भीमसेन जोशी, लता मंगेशकर, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, सचिन तेंडुलकर या चार भारतरत्नांसह शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, शरद पवार, आशा भोसले या आपापल्या क्षेत्रातील 'उत्तुंग' व्यक्तिमत्त्वांच्या खास आठवणी, त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्यपूर्ण पैलू आणि हजरजबाबीपणाचे गमतीशीर किस्से उलगडतच प्रसिद्ध निवेदक आणि मुलाखतकार सुधीर गाडगीळ यांच्या 'उत्तुंग' या पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम शुक्रवारी रंगला.

राजहंस प्रकाशनातर्फे प्रकाशित या पुस्तकाचे 'भावार्थ'तर्फे आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ नाटककार सुरेश खरे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. ज्येष्ठ नेते उल्हास पवार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, राजहंस प्रकाशनचे डॉ. सदानंद बोरसे आणि 'भावार्थ'च्या कीर्ती जोशी या वेळी उपस्थित होत्या.



'भावार्थ'तर्फे राजहंस प्रकाशनच्या वतीने सुधीर गाडगीळ यांच्या 'उत्तुंग' या पुस्तकाचे प्रकाशन सुरेश खरे यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. कीर्ती जोशी, उल्हास पवार, प्रा. मिलिंद जोशी आणि डॉ. सदानंद बोरसे या वेळी उपस्थित होते.

खरे म्हणाले, 'मुलाखत हे चरित्र आणि आत्मचरित्राचा मिलाफ असते. सकृतदर्शनी सोप्या वाटणाऱ्या मुलाखतीसाठी शास्त्र, तंत्र, कला आणि कौशल्य आवश्यक असते. अबोल माणसाला बोलते करणे आणि खूप बोलणाऱ्या माणसाला थोपवून धरणे, या दोन्ही गोष्टींचे कसब गाडगीळ यांच्याकडे आहे.'

पवार म्हणाले, की इतक्या दिग्गज व्यक्तिमत्त्वांच्या मुलाखती घेताना गाडगीळ यांनी प्रत्येकाचा सखोल अभ्यास करून प्रश्न विचारले. या प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वातील बारकावे टिपण्यात ते यशस्वी झाले आहेत.

जोशी म्हणाले, की लेखणी आणि वाणी ही शब्दसृष्टीची दोन्ही अंगे सुधीर गाडगीळ यांना प्रसन्न आहेत. निवेदन या कलेचा इतिहास लिहिला गेला तर त्यात गाडगीळ यांचे मानाचे पान असेल.

गाडगीळ म्हणाले, की बोलणं आणि बोलतं करण्याचे काम गेली पन्नास वर्षे करतो आहे. या काळात अनेक उत्तुंग व्यक्तिमत्त्वांच्या मुलाखती घेता आल्या. त्या शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न या पुस्तकातून केला आहे. पुढील पिढीसाठी हे पुस्तक संदर्भग्रंथ म्हणून उपयुक्त ठरेल, असा प्रयत्न आहे. डॉ. सदानंद बोरसे यांनी प्रास्ताविक केले. केतन गाडगीळ यांनी सूत्रसंचालन केले.

---

# पुणे जिल्ह्यात ४४४ जणांना नव्याने संसर्ग

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** शुक्रवारी दिवसभरात जिल्ह्यातील ४४४ जणांना करोना संसर्गाचे निदान झाले आहे. राज्याच्या साथरोग सर्वेक्षण विभागाने याबाबत माहिती दिली. मात्र, बहुसंख्य करोना रुग्णांना



सौम्य लक्षणे असून ते घरच्या घरी बरे होत असल्याने घाबरून जाण्याचे कारण नसल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

शुक्रवारी दिवसभरात आढळलेल्या ४४४ नवीन रुग्णांपैकी २५४ रुग्ण पुणे महापालिका क्षेत्रात आहेत. ११० रुग्ण पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात, तर ८० रुग्ण जिल्ह्याच्या उर्वरित भागात आढळले आहेत. संसर्गाचा प्रसार रोखण्यासाठी विशेषतः जोखीम गटातील रुग्ण, सहव्याधीग्रस्त आणि ज्येष्ठ नागरिकांनी तसेच लसीकरण न झालेल्या नागरिकांनी मुखपट्टी वापरासह सर्व आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. शुक्रवारी आढळलेल्या ४४४ नव्या रुग्णांमुळे पुणे जिल्ह्यातील एकूण करोना रुग्णसंख्या १४ लाख ८९ हजार ७५३ एवढी झाली आहे. गेल्या महिन्याभरात देशातील इतर भागांप्रमाणेच पुणे शहर आणि जिल्ह्यातही करोना रुग्णांची संख्या वाढत गेलेली पाहायला मिळाली होती. मात्र त्यामध्ये काही दिवसांपासून घट होत आहे.

---

# प्रवेश जाहीर झालेल्यांपैकी निम्म्याच विद्यार्थ्यांचे प्रवेश

## अकरावीच्या पहिल्या फेरीतील प्रवेशासाठी शनिवारी अखेरची मुदत

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांतील अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीत प्रवेश जाहीर झालेल्या ४२ हजार ७०९ विद्यार्थ्यांपैकी जवळपास निम्म्याच विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. पहिल्या फेरीत प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करण्यासाठी शनिवारी (६ ऑगस्ट) अखेरची संधी आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील ३१७ कनिष्ठ महाविद्यालयांतील १ लाख ११ हजार ४३० जागा प्रवेशांसाठी उपलब्ध आहेत. त्यापैकी ८६ हजार ७९१ जागा केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतून (कॅप) भरल्या जाणार आहेत. पहिल्या फेरीच्या गुणवत्ता यादीमध्ये ४२ हजार ७०९ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला होता. त्यातील २४ हजार ७१८ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले. प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना कागदपत्र पडताळणी करून प्रवेश निश्चित करण्यासाठी ६ ऑगस्टपर्यंतची मुदत देण्यात आली होती. मात्र शुक्रवारी सायंकाळपर्यंत झालेल्या प्रवेशांची संकेतस्थळावरून माहिती घेतली असता २० हजार ४८४ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केल्याचे दिसून आले. तर ५ हजार ५८२ विद्यार्थ्यांनी राखीव कोट्यातून प्रवेश घेतला आहे. प्रवेश प्रक्रियेत पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळूनही प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांना पुढील फेरीत सहभागी करून घेतले जाणार नाही. प्रवेशाची दुसरी फेरी ७ ऑगस्टपासून सुरू होणार आहे, असे प्रवेश समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी सांगितले.

---

# धरण क्षेत्रात हलका पाऊस

## खडकवासला धरणसाखळीत २१.०९ अब्ज घनफूट पाणी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला साखळी प्रकल्पातील चारही धरणांतील पाणीसाठा २१.०९ अब्ज घनफूट (टीएमसी) एवढा झाला आहे. गेल्या वर्षी याच कालावधी चारही धरणांतील पाणीसाठा २७.६१ टीएमसी एवढा होता. चारही धरणे सध्या ७२.३७ टक्के भरल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली. दरम्यान, गेल्या चोवीस तासांत धरणांच्या पाणलोट क्षेत्रात हलक्या पावसाची हजेरी होती.

खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या चारही धरणांतून शहराला पाणीपुरवठा केला जातो. जुलै महिन्यात सलग आठ ते दहा दिवस झालेल्या जोरदार पावसामुळे तळाला गेलेला पाणीसाठा वाढण्यास सुरुवात झाली. आजमितीस चारही धरणे ७२.३७ टक्के भरली असून त्यामध्ये २१.०९ टीएमसी एवढा पाणीसाठा आहे. चारही धरणांत समाधानकारक पाणीसाठा असल्याने शहराच्या वर्षभराच्या पाण्याची समस्या संपुष्टात आली आहे. खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातील चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून पावसाची विश्रांती होती.

पानशेत धरण परिसरात एक आणि वरसगांव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात दोन मिलिमीटर पावसाची नोंद झाली. तर खडकवासला आणि टेमघर धरण परिसरात गेल्या चोवीस तासांत मोठ्या पावसाची नोंद झाली नाही. खडकवासला धरणातून आतापर्यंत एकूण ३.३४ टीएमसी एवढ्या पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे. सध्या चारही धरणांमधील पाऊस ओसरला असल्याने खडकवासला धरणातून मुठा नदीत सुरू असलेला पाण्याचा विसर्ग तूर्त थांबविण्यात आला आहे, असे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

**प्रमुख धरणांमधील पाणीसाठा टीएमसी, कंसात टक्क्यांत**

टेमघर २.१८ (५८.९३), वरसगाव ९.३६ (७३.०४), पानशेत ८.४६ (७९.४४), खडकवासला १.०८ (५४.९४)

---

## रिक्षा संघटनांकडून अतिरिक्त भाडेवाढीची मागणी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सीएनजीच्या दरवाढीमुळे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने गेल्या महिन्यात रिक्षांसाठी दिलेली भाडेवाढ रिक्षा संघटनांच्या अक्षेपांमुळे स्थगित केली होती. आता रिक्षा संघटनांनी अतिरिक्त भाडेवाढीची मागणी केली आहे. त्यावर प्राधिकरणाच्या बैठकीत अंतिम निर्णय होणार आहे.

सीएनजीच्या दरवाढीमुळे खटुआ समितीच्या शिफारशींनुसार रिक्षाच्या पहिल्या दीड किलोमीटरच्या टप्प्यासाठी सध्या २१ रुपयांऐवजी २३ रुपये, तर त्यानंतरच्या प्रत्येक किलोमीटरसाठी १४ रुपयांऐवजी १५ रुपयांची वाढ करण्यात आली होती. मात्र, त्यास रिक्षा संघटनांची आक्षेप घेतल्याने सध्या निर्णयाचा फेरविचार करण्यात येत आहे. पहिल्या दीड किलोमीटरसाठी सहा रुपये, तर नंतरच्या प्रत्येक किलोमीटरसाठी चार रुपयांच्या वाढीची मागणी संघटनांनी केली आहे. या मागणीचा प्रस्ताव आता अंतिम मान्यतेसाठी प्राधिकरणाच्या बैठकीत अध्यक्षांपुढे ठेवण्यात येणार आहे.

---

# दहा वर्षानंतर सुरेश कलमाडी पुणे महापालिकेत

## 'पुन्हा येईन' या विधानाने राजकारणात सक्रिय होण्याची चर्चा

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असतानाच काँग्रेसचे नेते, माजी केंद्रीय मंत्री आणि एकेकाळी 'सबसे बडा खिलाडी' अशी ओळख असलेले सुरेश कलमाडी शुक्रवारी महापालिकेत दाखल झाले. तब्बल दहा वर्षानंतर कलमाडी महापालिकेत आले. पुणे फेस्टिव्हलचे निमंत्रण देण्याच्या निमित्ताने त्यांनी महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांची भेट घेतली असली तरी 'मी पुन्हा येईन', या त्यांच्या विधानामुळे कलमाडी पुन्हा राजकारणात सक्रिय होणार का, अशी चर्चा सुरू झाली.



२०१० मध्ये राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा घोटाळा प्रकरणात सुरेश कलमाडी यांच्यावर आरोप करण्यात आले होते. या वेळी विरोधकांनी सुरेश कलमाडी यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. या प्रकरणात सुरेश कलमाडी यांना ९ महिने तुरुंगवास देखील भोगावा लागला होता. त्यानंतर कलमाडी यांच्या राजकीय कारकिर्दीला उतरती कळा लागली. गेल्या काही वर्षांपासून ते शहराच्या राजकारणापासून अलिप्त राहिले होते. मात्र कलमाडी यांनी महापालिका आयुक्तांची भेट घेतल्याने ते पुन्हा सक्रिय होतील, अशी चर्चा शहराच्या राजकारणात सुरू झाली आहे.

कलमाडी यांच्याकडून दरवर्षी गणेशोत्सवाच्या दरम्यान पुणे फेस्टिव्हलचे आयोजन केले जाते. काही दिवसांपूर्वी फेस्टिव्हलच्या नियोजन बैठकीतही कलमाडी उपस्थित होते. या फेस्टिव्हलचे निमंत्रण आयुक्त विक्रम कुमार यांना देण्यासाठी कलमाडी महापालिकेत आले. दहा वर्षानंतर महापालिकेत आल्याने, प्रदीर्घ वर्षानंतर महापालिकेत आलात, असा प्रश्न कलमाडी यांना विचारण्यात आला तेव्हा, आता मी कायम येत राहीन, असे उत्तर त्यांनी दिले.

दहा वर्षांपूर्वीपर्यंत कलमाडी म्हणजे पुणे असेच समीकरण होते. महापालिकाही कलमाडी गटाकडे होती. कलमाडी यांच्या आदेशानुसारच काँग्रेस पदाधिकारी, महापालिकेतील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या होत होत्या. कलमाडी हाऊस हे सत्ता केंद्र झाले होते. पुण्याचे कारभारी अशी ओळख त्यांनी निर्माण केली होती. करोनाच्या दोन वर्षानंतर सुरेश कलमाडी पुन्हा एकदा पुणे फेस्टिवलच्या परवानगीसाठी महापालिकेत आले. विशेष म्हणजे काही वर्षांपूर्वी कलमाडी भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांसोबत गणपती विसर्जन मिरवणुकीला उपस्थित होते. त्यामुळे ते भाजपमध्ये प्रवेश करतील, अशी चर्चा त्या वेळी रंगली होती. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून ते सक्रिय राजकारणापासून दूर राहिले आहेत.

---

**SHRI SOMESHWAR SAHAKARI SAKHAR KARKHANA LTD.**
Someshwarnagar, Taluka-Baramati, Dist-Pune, Maharashtra – 412 306
Telephone:(02112) 282150/ 282476/285477/282412 Email:someshwarsakhar@gmail.com
Ref. No : SSSSKL/E Tender/1840/2022-23 Date : 05/08/2022

**E-Tender Notice (Re-Tender)**

E-Tenders are invited from experienced, bonafide, indigenous/overseas manufacturers and/or their authorized representatives or consortium partners on turnkey basis for design, engineering, manufacturing, supply, erection and commissioning for the following package, for 18 MW Cogeneration Project (Expansion from 18 MW to 36 MW).

| Sr. No. | Name of Package | Make of Turbine | Time Limit | Tender Fee (Rs.) Incl. of GST. | E.M.D. (Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Turbo Generator & Auxiliaries | Siemens or Shin Nippon | 11 Months | 11,800/- | 8,50,000/- |

**Terms & Conditions:**
1. Qualification requirements:
1.1 The Bidder should have produced Steam Turbines of capacity 18 MW or higher, back pressure, with inlet steam parameters of 84 ata and 510 deg.C or higher, during the period of last 5 years and should have been sold minimum 2 units of said capacity which should have been in operation satisfactorily for at least 2 years.
1.2 The bidder / bidder's sub-vendor have produced Synchronous Generator of 22.5 MVA capacity capable of withstanding the grid voltage and frequency variation of +10% and +5% respectively and capable of continuous operation in an unbalanced system like the Indian Grid from last 5 years and minimum of two units of the said capacity and parameters which are in operation satisfactorily for at least 2 years.
2. Joint Venture and / or Consortium or Authorized Dealers of either Simens or Shin Nippon Turbrine is allowed for work of above package and any one of, either Manufacturer/Supplier or Dealer should fulfill the eligible/qualification criteria as mentioned above.
3. Bidders are instructed to refer earlier MOM dated 08.07.2022, along with Bid Documents, are uploaded/ available on said web-portal.
4. Blank Tenders, Tender Documents, Forms, Specifications, Make, Qualification, Information and other details etc. can be downloaded from the website **eprocurement.synise.com** Conditional bids will not be accepted. Blank Tenders will be available online at web site **eprocurement.synise.com** on the prior payment of tender fee (non-refundable) as mentioned above.
5. Last date of uploading/submission of technical & commercial bid is **20/08/2022** (up to 5.00 pm.). Tender should be submitted online as per the instructions given in tender document.
6. There will not be any technical discussion or classifications sought from the bidders after submission of the bids, also the bidders are advised to prepare the bids completely in line with the tender requirements without any commercial or technical deviations.
7. For any Technical & Commercial clarification on the tender documents, the bidders should contact factory and project consultants : M/s. Avant-Garde Systems and Controls (P) Ltd., 67-A, Porur - Kundrathur High Road, Porur, Chennai - 600116. Contact Persons : Mr. N. Thilagar Lingam, DGM - Projects, email id: nthilagarlingam@avant-garde.co.in and Mr. S. Ashok, Assistant Manager - Projects, email id: sashok@ avant-garde.co.in and get their points clarified before the submission of the bids.
8. The Bidders shall furnish unambiguous information, in the appropriate format of the tender, regarding their qualifications and experience. Non-compliance will entail disqualification of the bidder.
9. The Purchaser /Factory will not be responsible for the late receipt of tender document after due date and time of closing of account of any reason related to internet connectivity.
10. The Bidder should have yearly financial average turnover of Rs.25 crores or more during last 5 years, certified by the chartered accountant.
11. Time is essence of the contract & the work is to be necessarily completed within the specified Time Limit only.
12. Bidder shall pay the tender fees through RTGS only and EMD either through RTGS or Bank Demand Draft or Bank Guarantee to sugar factory's bank account. Bank account details– Axis Bank Ltd, Branch-Baramati, Current A/C. 135010100152594, IFSC Code- UTIB0000135.
13. Bidders who remit tender fee and EMD through RTGS should forward written communication mentioning RTGS UTR/Ref. number and respective tender work on sugar factory's email and confirm the same.
14. The bidder would have to carry hard copies of tender document during technical and commercial bid opening to avoid any difficulties in internet connectivity.
15. Technical and Financial Bid Opening: The date, time and venue of the Technical Bid Opening and Financial Bid opening meeting will be communicated to the participated bidders.
16. The Bidder should upload his past experience certificates, last three years Income Tax Returns, Clearance Certificates, Turn Over Certificate, Registration Certificates, PAN & GST Registration etc.
17. With regard to the technical acceptability of the bids, the decision of Commissioner of Sugar/State Level Machinery Purchase Committee will be final and binding to the bidders. Commissioner of Sugar/State Level Machinery Purchase Committee reserves the right to accept or reject tenders without assigning any reason thereof.

**R.N. Yadav** Managing Director | **Anandkumar S. Holkar** Vice-Chairman | **Purushottam R. Jagtap** Chairman

**बजाज फायनान्स लिमिटेड**
CIN-L65910MH1987PLC042961
**नोंदणीकृत कार्यालय:** आकुर्डी, पुणे –४११०३५
कॉर्पोरेट कार्यालय: ४ था मजला, बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, पुणे–अहमदनगर रोड लगत, विमान नगर, पुणे – ४११०१४
**मुदत ठेव योजना**
CRISIL AAA/स्टेबल आणि (ICRA)AAA (स्टेबल) रेटिंग
या योजनेसाठी उपरोक्त रेटिंग हे, वेळच्या वेळी व्याज व मुद्दल यांचे पेमेंट केले जाण्याच्या संदर्भात सुरक्षिततेचे सर्वोच्च मानांकन दर्शवतात.

₹५ कोटी पर्यंतच्या ठेवींसाठी वार्षिक व्याजदर (१ जुलै २०२२ पासून लागू) वैध आहे. अनिवासी भारतीयांसाठी, OCI साठी व PIO साठी
नवीन ग्राहकांसाठी:

तक्ता १

| कालावधी (तक्ता २ व्यतिरिक्त) | संचयी: मुदत पुर्तीला | बिगर-संचयी: मासिक | त्रैमासिक | सहामाही | वार्षिक |
|---|---|---|---|---|---|
| १२ – २३ महिने | ६.२०% | ६.०३% | ६.०६% | ६.११% | ६.२०% |
| २४ – ३५ महिने | ६.९५% | ६.७४% | ६.७८% | ६.८३% | ६.९५% |
| ३६ महिने | ७.४०% | ७.१६% | ७.२०% | ७.२८% | ७.४०% |

तक्ता २

| कालावधी | संचयी: मुदत पुर्तीला | बिगर-संचयी: मासिक | त्रैमासिक | सहामाही | वार्षिक |
|---|---|---|---|---|---|
| १५ महिने | ६.४०% | ६.२२% | ६.२५% | ६.३०% | ६.४०% |
| १८ महिने | ६.५०% | ६.३१% | ६.३४% | ६.४०% | ६.५०% |
| २२ महिने | ६.६५% | ६.४६% | ६.४९% | ६.५५% | ६.६५% |
| ३० महिने | ७.०५% | ६.८३% | ६.८७% | ६.९३% | ७.०५% |
| ३३ महिने | ७.१५% | ६.९३% | ६.९७% | ७.०३% | ७.१५% |

छ. क) नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज ॲक्सेप्टन्स ऑफ पब्लिक डिपॉझिट्स (रिझर्व बँक) डायरेक्शन्स, २०१६ यानुसार कंपनी डिपॉझिटच्या मार्गाने उभी करू शकणारी रक्कम आहे: ५८,८५६.३२ कोटी
ख) प्रत्यक्षात ३१.०३.२०२२ रोजी जमलेली एकूण डिपॉझिट रक्कम आहे : ३०,२८९.५२ कोटी

## संक्षिप्त

### प्रमोद मराठे यांच्या गुरुपूजनाचा कार्यक्रम

गांधर्व महाविद्यालयाचे प्राचार्य आणि ज्येष्ठ संवादिनीवादक प्रमोद मराठे यांच्या शिष्य परिवारातर्फे ९ ऑगस्टपासून दोन दिवस गुरुपूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. गांधर्व महाविद्यालयाच्या विष्णू विनायक स्वर मंदिर येथे सायंकाळी साडेसहा वाजता होणाऱ्या या कार्यक्रमात मिलिंद कुलकर्णी, तन्मय देवचके, रोहित मराठे, अभिनय रवंदे, हर्षल काटदरे, अभिषेक शिनकर, अदिती गराडे, सुखदा पटवर्धन, हृषीकेश पुजारी, ओंकार उजागरे, स्वरूप दिवाण, आर्यन देशपांडे हे संवादिनीवादनाद्वारे अभिवादन करणार आहेत. त्यांना गणेश तानवडे, सौरभ क्षीरसागर, आशय कुलकर्णी हे तबल्याची साथसंगत करणार आहेत.

### जैन तीर्थंकर नेमिनाथ जन्मोत्सव नाटिका

जैन धर्माचे २२ वे तीर्थंकर नेमिनाथ भगवान यांच्या जन्म कल्याणक दिनानिमित्त 'नेमिनाथ जन्मोत्सव' नाटिका सादर करण्यात आली. शंभराहून अधिक जैन मुला-मुलींनी या नाटिकेमध्ये सहभाग घेतला. शासन रत्ना भाग्यपूर्णाश्रीजी म.सा., आनंदपूर्णाश्रीजी म.सा. यांच्या उपस्थितीत श्री ईशा पर्ल जैन संघ चातुर्मास कमिटीतर्फे समाजासाठी उल्लेखनीय सेवा देणारे मुक्त छायाचित्रकार सुशील राठोड आणि पत्रकार मांगीलाल सोलंकी यांचा सत्कार करण्यात आला.

### मसापतर्फे आज श्रद्धांजली सभा

ज्येष्ठ लेखक आणि कृतिशील विचारवंत नंदा खरे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषद आणि मनोविकास प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (६ ऑगस्ट) श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. माजी संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार भवन येथे सायंकाळी सहा वाजता होणाऱ्या या सभेत परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी आणि मनोविकास प्रकाशनाचे संचालक अरविंद पाटकर सहभागी होणार आहेत.

### जैन वधू-वर संस्थेच्या अध्यक्षपदी रणजित शहा

जैन वधू-वर परिचय संस्थेच्या नुकत्याच झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेच्या अध्यक्षपदी रणजित शहा यांची निवड करण्यात आली. संस्थेच्या उपाध्यक्षपदी राजीव शहा आणि सचिवपदी रोहित झवेरी यांची २०२२-२४ या कालावधीसाठी निवड झाली.

### 'मिस यू' लघुपट उत्कृष्ट शैलीत प्रथम

प्रसिद्ध गायिका-संगीतकार धनश्री गणात्रा लिखित, दिग्दर्शित आणि संकलित 'मिस यू' या लघुपटाने सेव्हन सिस्टर्स नॉर्थ ईस्ट इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलमध्ये उत्कृष्ट शैली विभागाचा प्रथम पुरस्कार पटकावला. ध्वनी आणि पार्श्वसंगीत या बाजू धनश्री यांनी सांभाळल्या आहेत. लघुपटाची निर्मिती स्वरचित्रक संस्थेची असून चित्रीकरण स्नेहा ताम्हनकर यांनी केले आहे.

# क्रांती दिनापासून स्वातंत्र्य दिनापर्यंत 'जन की बात'

## राष्ट्रीय एकात्मता समितीचे 'हर घर संविधान' अभियान

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** स्वातंत्र्य चळवळीतील महत्त्वाचे पर्व असलेल्या चले जाव चळवळीची ऐंशी वर्षे आणि स्वातंत्र्यप्राप्तीची अमृतमहोत्सव पूर्ती असा दुहेरी योग साधून राष्ट्रीय एकात्मता समितीतर्फे सामान्यांचा आवाज सरकारपर्यंत पोहोचविण्यासाठी क्राती दिनापासून (९ ऑगस्ट) स्वातंत्र्य दिनापर्यंत (१५ ऑगस्ट) 'जन की बात' मोहीम राबविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे या क्रांती सप्ताहामध्ये 'हर घर संविधान' अभियान राबवून 'हर घर तिरंगा'ला विधायक पद्धतीने उत्तर देण्यात येणार आहे.

स्वातंत्र्याची पंचाहत्तर वर्षपूर्ती हा देशाच्या दृष्टीने हा गौरवाचा आणि अंगावर रोमांच उमटवणारा क्षण आहे. परंतु याचा आनंद केंद्र सरकारने धुळीला मिळवला असून आपल्या धोरणाने लोकांच्या जगण्याचे प्रश्न निर्माण केले आहेत. म्हणूनच क्रांती दिन आणि स्वातंत्र्य दिन या महत्त्वपूर्ण दिवसाच्या निमित्ताने केंद्र सरकारपर्यंत जनतेच्या जीवन-मरणाच्या प्रश्नांविषयी 'जन की बात' पोहोचविण्याचा निर्धार राष्ट्रीय एकात्मता समितीने केला आहे, अशी माहिती राष्ट्रीय एकात्मता समितीचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांनी गुरुवारी दिली. नितीन पवार आणि कम्युनिस्ट पक्षाचे नाथा शिंगाडे या वेळी उपस्थित होते.

बुधवार चौकातील मजूर अड्डा येथील हुतात्मा कर्णिक स्मारक येथून मंगळवारी (९ ऑगस्ट) महागाई आणि संघटित कामगारांच्या प्रलंबित मागण्याविषयी मोर्चा निघेल. केंद्र सरकारचे प्रतिनिधी म्हणून खासदार गिरीश बापट यांच्या कसबा पेठ येथील कार्यालयात महागाईविरोधी निवेदन देऊन मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर जाणार आहे. तेथे सभा होणार असून समाजातील मान्यवर केंद्र सरकारच्या धोरणाविरुद्ध एक दिवसाचे उपोषण करणार आहेत, असे नितीन पवार यांनी सांगितले.

दरवर्षीप्रमाणे १४ ऑगस्ट रोजी रात्री बारा वाजता हुतात्मा स्मारक येथे ध्वजारोहण होणार आहे. त्यापूर्वी सकाळी साडेदहा वाजता हुतात्मा स्मारक ते स्वारगेट येथील जेधे चौकापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूला संविधानाची प्रत आणि ज्योत घेऊन नागरिकांची मानवी साखळी करण्यात येणार आहे.



### सप्ताहातील महत्त्वाचे कार्यक्रम

- १० ऑगस्ट - अंगणवाडी ताईंचा आपल्या मागण्यांसाठी मोर्चा
- ११ ऑगस्ट - सर्व क्षेत्रांचे खासगीकरण आणि कामगार धोरणाविरुद्ध आंदोलन
- १२ ऑगस्ट - शिक्षण, रोजगार आणि आरोग्य या विषयांतील धोरणाविरुद्ध संघर्ष
- १३ ऑगस्ट - देशातील सर्व राजकीय पक्ष संपवण्याचा भाजपच्या कार्यक्रमाचा निषेध

### पुणे-सातारा महामार्गाच्या दुरवस्थेचा मुद्दा अधोरेखित

#### सुप्रिया सुळे यांच्याकडून नितीन गडकरींकडे मागणी

**पुणे :** पुणे-सातारा महामार्गाची ठिकठिकाणी दुरवस्था झाली असून या रस्त्याची डागडुजी-दुरुस्तीसह तेथे सुरक्षाविषयक उपाययोजना करण्याची मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केंद्रीय रस्ते व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे. या संदर्भात त्यांनी सविस्तर ट्वीट केले आहे. यापूर्वीही त्यांनी वारंवार यासंदर्भात केंद्र सरकारकडे या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत पाठपुरावा केला आहे.

पुणे-सातारा महामार्गाची ठिकठिकाणी दुरवस्था झाली आहे. हा महामार्ग नागरी भागातून जातो. महामार्गापासून नागरी भागांना जोडणाऱ्या सर्व्हिस रोडची अवस्थाही अनेक ठिकाणी दयनीय आहे. यामुळे बऱ्याच ठिकाणी वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. म्हणूनच या मार्गावर तातडीने सुरक्षा विषयक उपाययोजना करण्यात याव्यात, असे सुळे यांनी म्हटले आहे.

वाहतूक कोंडीचाही मुद्दा त्यांनी आवर्जून मांडला आहे. 'पुणे-सातारा महामार्गावर विषेशतः वाकड ते चांदणी चौक आणि चांदणी चौक ते नवले पूल या मार्गावर नागरिकांना सातत्याने वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. या मार्गावर वाहन चालविणे जिकिरीचे झाले आहे. येथील नवले पूल परिसरात तर सातत्याने अपघात होत आहेत. मार्गालगत पदपथाचीही दुरवस्था झाली असल्याने त्याचाही विचार करावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# शिरूरमधील सहा ग्रामपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादीचे वर्चस्व

### राष्ट्रवादीचे माजी आमदार गावडे यांच्या पॅनलचा मात्र पराभव

**लोकसत्ता वार्ताहर**

**शिरूर :** शिरूर तालुक्यातील सहा ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. ग्रामपंचायतीच्या विजयी उमेदवारात राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व आहे. दरम्यान, टाकळी हाजी ग्रामपंचायतीत राष्ट्रवादीचे माजी आमदार पोपटराव गावडे यांच्या नेतृत्वाखालील मळगंगा परिवर्तन पॅनेलचा मात्र पराभव झाला. राष्ट्रवादीच्याच पंचायत समितीच्या माजी सदस्या अरुणा घोडे व माजी सरपंच दामूअण्णा घोडे यांच्या नेतृत्वाखालील मळगंगा ग्रामविकास पॅनेलने यश मिळविले आहे.

तांदळी ग्रामपंचायतीत भाजपाचे माजी पंचायत समिती सदस्य राजेंद्र गदादे यांचा पॅनेल पराभूत झाला. शिवसेनेचे जिल्हा संघटक मच्छिंद्र गदादे व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व घोडगंगा कारखान्याचे माजी उपाध्यक्ष प्रा. सुभाष कळसकर यांच्या नेतृत्वाखालील पॅनेल विजयी झाले. तालुक्यात तांदळी, म्हसे, शरदवाडी, माळवाडी, टाकळी हाजी, जांबूत या सहा ग्रामपंचायती करिता मतदान झाले. सर्वात लक्षवेधी निवडणुकीत टाकळी हाजी येथे पोपटराव गावडे यांच्या नेतृत्वाखालील पॅनल व सरपंच दामू घोडे यांच्या पॅनलमध्ये थेट लढत झाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे हे दोन्ही नेते असून त्यांच्यातील लढतीकडे सर्वांचे लक्ष होते. या लढतीत गावडे यांच्या पॅनलने अवघी एक, तर घोडे यांच्या पॅनलने १६ जागा मिळवित एकतर्फी विजय मिळविला. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गावडे यांच्या पराभव धक्कादायक मानला जात आहे.

जांबुत ग्रामपंचायतीत बाळासाहेब फिरोदिया यांच्या नेतृत्वाखालील जय मल्हार ग्रामविकास पॅनलने विजय मिळविला. या पॅनलला ६ जागा मिळाल्या, तर आदर्श ग्रामविकास पॅनलला ५ जागेवर समाधान मानावे लागले. या पॅनलचे नेतृत्व माजी सरपंच जयश्री जगताप व राहुल जगताप यांनी केले. म्हसे ग्रामपंचायतीत काळेश्वरी ग्रामविकास पॅनेलने ५ जागा मिळवित वर्चस्व निर्माण केले. काळूराम पवार यांनी पॅनलचे नेतृत्व केले, तर जय हनुमान विकास पॅनलला दोन जागा मिळाल्या. या पॅनलचे नेतृत्व प्रकाश वायसे यांनी केले. माळवाडी ग्रामपंचायतीत ग्रामविकास परिवर्तन पॅनलने ६ जागा मिळवित विजय मिळविला. सोमा भाकरे यांनी पॅनलचे नेतृत्व केले तर माळवाडी ग्रामविकास पॅनलच्या सोपान भाकरे यांचा पराभव झाला.

तांदळी ग्रामपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादीचे नेते व घोडगंगा कारखान्याचे माजी उपाध्यक्ष प्रा .सुभाष कळसकर व शिवसेनेचे जिल्हा संघटक मच्छिंद्र गदादे यांच्या भैरवनाथ पॅनलने १० जागा मिळवित दणदणीत विजय मिळविला, तर विरोधी भाजपाचे माजी पंचायत समिती सदस्य यांच्या भैरवनाथ ग्रामविकास पॅनलला अवघ्या एका जागी विजय मिळाला.



ग्रामपंचायतींच्या निवडणूक निकालानंतर कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.



विद्यापीठ चौकात शुक्रवारी सायंकाळी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. त्यात काही वेळ पावसाच्या सरी कोसळल्या. त्यामुळे कोंडीत भरच पडली. त्यामुळे वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागला.

### 'गरवारे'चे माजी उपप्राचार्य पी. एल. काळे यांचे निधन



**पुणे :** आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य प्रमोद लक्ष्मण ऊर्फ पी. एल. काळे (८४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे.

उपप्राचार्य पदाबरोबरच काळे यांनी १२ वर्षे भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुखपद सांभाळले. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य या नात्याने त्यांनी विद्यार्थी हितासाठी कार्य केले. भारतीय भौतिक परिषदेच्या पुणे शाखेचे सचिव म्हणून त्यांनी देशभरातील अधिवेशनांमध्ये सहभाग घेत भौतिकशास्त्राच्या प्रचारामध्ये योगदान दिले होते.

# वाढत्या महागाईच्या विरोधात काँग्रेसची पिंपरीत निदर्शने

### मोदी सरकारच्या विरोधात घोषणाबाजी

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पिंपरी :** दररोज वाढत चाललेल्या महागाईच्या विरोधात काँग्रेस पक्षाच्या वतीने शुक्रवारी पिंपरीत निदर्शने करण्यात आली. केंद्रातील मोदी सरकारच्या निषेधार्थ आंदोलकांनी घोषणाबाजी केली.

भाजपच्या सत्ताकाळातील वाढत्या महागाईच्या निषेधार्थ काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी चौकात जेलभरो आंदोलन करण्यात आले. मानव कांबळे, अशोक मोरे, बाबू नायर, निर्मला कदम, सायली नढे, नरेंद्र बनसोडे, दिलीप पांढरकर, विरेंद्र गायकवाड आदी पदाधिकारी आंदोलनात सहभागी झाले होते. या आंदोलकांना पोलिसांनी अटक केली.

मानव कांबळे म्हणाले, घरगुती गॅसवर, अन्नधान्यावर, शालेय साहित्यांवर जीएसटी आकारणारा भारत एकमेव देश असेल. जोपर्यंत जीएसटी मागे घेत नाही, तोपर्यंत लोकशाही पद्धतीने सरकारचा निषेध करावा. कैलास कदम म्हणाले, केंद्र सरकार चुकीची धोरणे राबवीत असून दररोज इंधनाचे दर वाढवीत आहे.

### देहूरोड ते चांदणी चौकापर्यंतच्या कामाचा नवा सविस्तर प्रकल्प अहवाल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी:** मुंबई- बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावरील देहूरोड ते चांदणी चौकापर्यंतच्या कामाचा नवीन सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार असून या कामाची निविदा लवकरच प्रसिद्ध केली जाणार आहे. हे काम मार्गी लागल्यानंतर वाकड, रावेत, ताथवडे, पुनावळ्यातील अनेक वर्षांपासूनची वाहतूक कोंडी सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ अंतर्गत देहूरोड, रावेत, पुनावळे, ताथवडे आणि वाकड येथील भुयारी मार्ग तसेच उड्डाणपुलाची उंची व रूंदी कमी आहे. त्यामुळे तिथे वाहतूक कोंडी होते, असे सांगत खासदार बारणे यांनी केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला होता. नुकत्याच एका बैठकीत गडकरी यांनी या रस्त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार असून लवकरच निविदा प्रसिद्ध केली जाईल, अशी माहिती दिली. यासंदर्भात खासदार बारणे यांनी सांगितले, की महामार्गावरील देहूरोड ते चांदणी चौकापर्यंतचे काम सुवर्ण चतुष्कोन रस्तेबांधणी प्रकल्पाअंतर्गत हाती घेतले होते. हे काम पूर्ण करण्याची जबाबदारी 'रिलायन्स'कडे होती. मात्र, या मार्गावरील काम ठेकेदाराने पूर्ण केले नाही. हे काम पूर्ण झाल्यास या भागातील वाहतूक कोंडी कमी होईल, असा विश्वास बारणे यांनी व्यक्त केला.

# महागाई, बेरोजगारीच्या निषेधार्थ काँग्रेसचे आक्रोश आंदोलन

**लोकसत्ता प्रतिनिधी**




**पुणे :** वाढती महागाई, बेरोजगारी आणि जीवनावश्यक वस्तूंवरील जीएसटी विरोधात काँग्रेसच्या वतीने आक्रोश आंदोलन करण्यात आले. केंद्र सरकारच्या विरोधात या वेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

काँग्रेसचे प्रभारी शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सातारा रस्ता येतील भापकर पेट्रोल पंपाजवळ आंदोलन करण्यात आले. प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष रमेश बागवे, ॲड. अभय छाजेड, संजय बालगुडे, आबा बागुल, वीरेंद्र किराड, कमल व्यवहारे, संगीता तिवारी, अविनाश बागवे लता राजगुरू, अजित दरेकर, रवींद्र धंगेकर, रफिक शेख, सुजाता शेट्टी, वैशाली मराठे यांच्यासह अन्य पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

खोटी आश्वासने देऊन सत्तेत आलेल्या मोदी सरकारने पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस सिलिंडर तसेच सीएनजीच्या दरात वाढ केली आहे. गेल्या पंचेचाळीस वर्षांतील बेरोजगारीने उच्चांक गाठला आहे, अशी टीका अरविंद शिंदे यांनी केली.

## दैनंदिनी

- **परिषद :** एसएनडीटी कला आणि वाणिज्य महाविद्यालय, स्वातंत्र्यलढ्यातील महिलांचा सहभाग या विषयावर एकदिवसीय परिषद, व्याख्याते - डॉ. संतोष दास्ताने, कल्याणी दुर्गा रवींद्र, अंजली कुलकर्णी, डॉ. जास्वंदी बांबुरकर, (सकाळी १०. ३०), भारतीय राज्यघटनेच्या मूळ आवृत्तीमधील चित्रांकनावर आधारित चित्र प्रदर्शन, स्थळ - एसएनडीटी महाविद्यालयाचे सभागृह, कर्वे रस्ता, सकाळी ११ ते सायं. ५
- **श्रद्धांजली सभा :** नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठान, मामासाहेब मोहोळ विद्या विकास मंडळ, अप्पासाहेब मोहोळ हितचिंतक व मित्र परिवार, सदानंद मोहोळ यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सभा, स्थळ - महालक्ष्मी लॉन्स, डी. पी. रस्ता, राजाराम पुलाजवळ, कर्वेनगर, सकाळी ११
- **मार्गदर्शन :** पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी लीगल सेल, पुणे शहर काँग्रेस ज्येष्ठ नागरिक संघ, मोफत कायदेविषयक सल्ला आणि मार्गदर्शन, सहभाग - ॲड. राजेंद्र काळेबेरे, ॲड. संजय साळवी, ॲड. राहुल ढाले, अनिल कांकरिया, ॲड. विठ्ठल आरुडे, स्थळ - काँग्रेस भवन, शिवाजीनगर, सकाळी ११
- **चित्र प्रदर्शन :** महाराष्ट्र कल्चरल सेंटर, रूपेश पवार यांच्या अमूर्त शैलीतील चित्रांचे प्रदर्शन, स्थळ - सुदर्शन कलादालन, शनिवार पेठ, अहिल्यादेवी प्रशालेजवळ, दुपारी ४ ते रात्री ८
- **मार्गदर्शन :** द इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंट्स ऑफ इंडिया, बारावी आणि पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी कॉस्ट ॲंड मॅनेजमेंट अकाउंट्स म्हणून करिअरच्या संधी, वक्ते - नीरज जोशी, चैतन्य मोहरीर, अमित शहाणे, प्रा. मोरेश्वर आपटे, स्थळ - सीएमए भवन, विकास मित्रमंडळ चौकाजवळ, कर्वेनगर, दुपारी ४
- **मुलाखत :** पी. एम. शहा फाउंडेशन, 'सामान्य ते असामान्य', 'शून्य सर्पदंश प्रकल्प'चे डॉ. सदानंद राऊत आणि डॉ. पल्लवी राऊत यांची मुलाखत, स्थळ - वर्धमान प्रतिष्ठान, सेनापती बापट रस्ता, दुपारी ४
- **सांस्कृतिक :** कलामंजिरी, स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त 'दिव्य स्वातंत्र्यरवि' कार्यक्रम, सहभाग - चिन्मय जोगळेकर, पूर्णा दांडेकर, गंधार दांडेकर, साथसंगत - संजय गोगटे, विद्यानंद देशपांडे, निवेदन - मधुवंती दांडेकर, वर्षा जोगळेकर, स्थळ - भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह, सेनापती बापट रस्ता, सायं. ६
- **व्याख्यानमाला :** भारत इतिहास संशोधक मंडळ, प्रा. ब्रह्मानंद देशपांडे स्मृती व्याख्यानमाला, विषय - मूर्तिविज्ञान : शब्दविरहित संपर्क माध्यम, उदय आणि विकास, वक्त्या - डॉ. कुमुद कानिटकर, अध्यक्ष - डॉ. अरविंद जामखेडकर, स्थळ - भारत इतिहास संशोधक मंडळाचे राजवाडे सभागृह, सदाशिव पेठ, भरत नाट्य मंदिराशेजारी, सायं. ६
- **पुरस्कार :** प्रसाद प्रकाशन, डॉ. सच्चिदानंद शेवडे यांना मनोहर तथा बापूसाहेब जोशी स्मृती पुरस्कार, डॉ. अंजली पर्वते यांना मंजिरी मनोहर जोशी स्मृती पुरस्कार प्रदान, हस्ते - डॉ. विजय भटकर, प्रमुख उपस्थिती - पं. वसंतराव गाडगीळ, स्थळ - गोळवलकर प्रशालेचे गणेश सभागृह, टिळक रस्ता, सायं. ६
- **श्रद्धांजली सभा :** महाराष्ट्र साहित्य परिषद, मनोविकास प्रकाशन, ज्येष्ठ लेखक आणि कृतिशील विचारवंत नंदा खरे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सभा, अध्यक्ष - डॉ. सदानंद मोरे, प्रमुख उपस्थिती - प्रा. मिलिंद जोशी, अरविंद पाटकर, स्थळ - पत्रकार भवन, गांजवे चौक, नवी पेठ, सायं. ६

### 'घे भरारी'तर्फे ७ ऑगस्टपर्यंत राखी प्रदर्शन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** 'घे भरारी' ग्रुपतर्फे जंगली महाराज रस्त्यावरील हॉटेल सेंट्रल पार्क येथे राखी प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनात हाताने तयार केलेल्या राख्यांसह विविध उत्पादने मांडण्यात आली असून, हे प्रदर्शन ७ ऑगस्टपर्यंत सकाळी अकरा ते रात्री नऊ या वेळेत सुरू राहील. भाऊ-बहिणीचे नाते साजरे करणारा राखी पौर्णिमेचा सण ११ ऑगस्टला आहे. त्या निमित्ताने घे भरारी ग्रुपतर्फे वैविध्यपूर्ण वस्तूंचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनात हाताने तयार केलेल्या राख्यांसह साड्या, कपडे, दागिने, खाद्य पदार्थ, गृह सजावट, बॅग, पिशव्या, पादत्राणे अशा वैविध्यपूर्ण वस्तू उपलब्ध आहेत.

### एसटी चालक जालिंदर पवार यांच्या जिगरबाज वृत्तीचे कौतुक

# प्रवाशांना सुखरूप करून चालकाने सोडले प्राण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** आपल्या प्रकृतीची तमा न करता गाडीतील २५ प्रवाशांना सुखरूप करून एसटी चालकाने प्राण सोडले. चालक जालिंदर पवार (वय ४५, रा. पळशी, ता. खटाव, जि. सातारा) या चालकाच्या जिगरबाज वृत्तीचे कौतुक होत आहे. 'शो मस्ट गो ऑन...' असे म्हणत दुसऱ्या चालकासह एसटी पुढच्या प्रवासाला मार्गस्थ झाली.

एखाद्या चित्रपटात शोभेल अशी ही करुण कहाणी सर्वांना चटका लावून गेली. प्राणापेक्षा कर्तव्य श्रेष्ठ याची प्रचिती जालिंदर पवार यांनी आपल्या कृतीतून दिली.

वसई-म्हसवड ही गाडी ३ ऑगस्ट रोजी दुपारी दीडच्या सुमारास स्वारगेट स्थानकात आली. तेथे चालकाची बदली झाली आणि जालिंदर पवार यांच्याकडे गाडीचा ताबा आला. २५ प्रवाशांसह गाडी खेड-शिवापूर टोलनाक्याजवळ वरवे गावाच्या हद्दीत आल्यावर गाडीचा वेग कमी झाला. त्या वेळी वाहक संतोष गवळी यांनी केबिनमध्ये जाऊन जालिंदर यांची विचारपूस केली. जालिंदर घामाने चिंब झाले होते. दोन वाक्य पुटपुटत जालिंदर यांनी स्वतःवर ताबा ठेवत प्रसंगावधान राखून गाडी रस्त्याच्या कडेला नेत २५ प्रवाशांचे प्राण सुरक्षित केले आणि स्टीअरिंगवरच डोके ठेवून ते शांतपणे बसले. हृदयविकाराच्या झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. एका प्रवाशाने गाडी नसरापूर येथील रुग्णालयात नेली. तोपर्यंत उशीर झाला होता. जालिंदर यांचे निधन झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले. या दुर्दैवी घटनेने प्रवासी हळहळले.

नसरापूर येथे दुसऱ्या चालकाला बोलावून घेण्यात आले आणि गाडी म्हसवडच्या दिशेने मार्गस्थ करण्यात आली.

### पिंपरी-चिंचवडमध्ये १२ ते १५ ऑगस्टला विशेष स्वच्छता मोहीम

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त पिंपरी महापालिकेच्या वतीने शहरभरात १२ ते १५ ऑगस्ट दरम्यान विविध ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. आठही क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत राबवण्यात येणाऱ्या या उपक्रमात शहरातील नागरिक, विद्यार्थी, सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरण संस्था आदींनी सहभागी व्हावे, असे आवाहन पालिकेचे प्रशासक तथा आयुक्त राजेश पाटील यांनी केले आहे.

केंद्र व राज्य सरकारच्या निर्देशानुसार महापालिकेच्या वतीने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत 'घरोघरी तिरंगा' उपक्रमासह रक्तदान शिबिर, व्याख्यानमाला, ग्रंथोत्सव, प्रभातफेरी, स्वच्छता मोहीम आदींचा समावेश आहे. १२ ऑगस्टला अ आणि फ क्षेत्रीय कार्यालय, १३ ऑगस्टला ब आणि ग क्षेत्रीय कार्यालय, १४ ऑगस्टला ड आणि इ क्षेत्रीय कार्यालय आणि १५ ऑगस्टला क आणि ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ही विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. या कालावधीत पदयात्रा होईल. तसेच, कापडी पिशवी वापराबाबत फळे, भाजी विक्रेते, टपरी, हातगाड्यावरील विक्रेत्यांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे.

## पंजाब नॅशनल बँक — punjab national bank

भारत सरकारचा उपक्रम (A Govt. of India Undertaking)

ORIENTAL United

कॉर्पोरेट ऑफिस : सेक्टर-१०, द्वारका, नवी दिल्ली.
शाखा : पंजाब नॅशनल बँक, ६५, कस्तुरबा मार्केट, सोलापूर

### ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरीता)

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स्, २००२ च्या रूल ८(१) नुसार)

ज्याअर्थी खाली सही करणार **पंजाब नॅशनल बँक** यांचे अधिकृत अधिकारी यांनी, दि सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ च्या सेक्शन १३(२) व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२, रूल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेले कर्जदार यांना सदर नमूद केलेल्या तारखांना **मागणी नोटीस** बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत त्यांच्या नावासमोर नमूद केलेली, बँकेला येणे असलेली रक्कम सदर नोटीसा मिळालेल्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करावी.

कर्जदार सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्याने, कर्जदार व सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सेक्शन १३(४) व सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रूल्स २००२ च्या रूल ८ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेले कर्जदार यांच्या नावासमोर नमूद केलेल्या गहाण मालमत्तांचा खाली नमूद केलेल्या तारखांना **ताबा घेतला आहे.** विशेषत: कर्जदार, तसेच सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तांसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास तो **पंजाब नॅशनल बँक** यांना खाली नमूद केलेली येणे असलेली रक्कम व त्यावरील सदर संपूर्ण रक्कम परत करेपर्यंतचे भविष्यातील व्याज आणि किंमत यांच्या अधीन राहील.

सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदार/जामीनदार/गहाणदाराचे लक्ष सरफेसी अॅक्टच्या सेक्शन १३(८) अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे.

| अ. क्र. | शाखेचे नाव | खाते / कर्जदाराचे नाव | मागणी नोटीसीची तारीख/ एकूण येणे रक्कम रु. | ताबा /नोटीस चिकटविल्याची तारीख | गहाण मालमत्तेचा तपशील | अधिकृत अधिकाऱ्यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शाखा : ०८८८१०- कोल्हापूर - ताराबाई पार्क | मे. प्रसन्न एजन्सीज्, (प्रोप्रायटर - श्री. सुरेश सदाशिव दाभोळे) | १३/०५/२०२२ रु. ५,७३,३७०.९० त्यावरील व्याज व किंमत | ०३/०८/२०२२ | प्लॉट नं. २१६ चे समतुल्य गहाणखत, कात्यायनी कॉम्प्लेक्स, आर.एस.नं. ८०८/१, घरकुल योजना, कळंबा जेलजवळ, बी वॉर्ड, कोल्हापूर-४१६००७. | श्री. विवेक बोधी |
| २ | शाखा : १७३७२०- सांगली | श्री. अरुण रामचंद्र मोरे | १३/०५/२०२२ रु. १३,४६,०९४.५३ त्यावरील व्याज व किंमत | ०४/०८/२०२२ | फ्लॅट नं. २ चे समतुल्य गहाणखत, २ रा मजला, चिन्मय अपार्टमेंट, हॉटेल विहारजवळ, सी.एस. नं. ६६/ए/१, सांगली, मिरज रोड, सांगली-४१६४१६ | श्री. विवेक बोधी |

दिनांक : ०५/०८/२०२२
ठिकाण : कोल्हापूर

(श्री. विवेक बोधी)
मुख्य प्रबंधक व अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक

## पुणे पीपल्स् को-ऑपरेटीव्ह बँक लि., पुणे

(मल्टीस्टेट बँक)

मुख्य कार्यालय: ६०६, सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणे ४११०३० फोन: ०२०-२४४५२३५३/२४४५२८४३/२४४५०६८५

### जाहीर लिलावाने विक्रीची नोटीस

''जशी आहे तशी, जेथे आहे तेथे'' या तत्वावर मिळकतीची विक्री

मी खाली सही करणार सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल अॅसेट अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ च्या कलम १३(१२) अन्वये अधिकृत अधिकारी म्हणून नियुक्त झालेलो असून सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि नियम, २००२ मधील नियम ८ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन खाली निर्देश केलेल्या कर्जदाराच्या तारण मिळकतीचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे. कर्जदाराने मागणी केल्यानुसार कर्ज फेड केली नसल्याने खालील तारण मालमत्ता विकून बँकेच्या येणे रकमेची वसुली करण्याचे ठरविले आहे.

| कर्जदार आणि जामिनदार यांचे नाव | येणे बाकी | मिळकतीचे ठिकाण व तपशील | राखीव मूल्य लिलाव तारीख व वेळ |
|---|---|---|---|
| **१) मे. आनंद इलेक्ट्रिकल्स कॉर्पोरेशन:** ए-२२२, बालाजी प्रसाद अपार्टमेंटस, ४७१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०. मालक संजय यशवंत कुलकर्णी (गहाणखत लिहून देणार आणि कर्जदार (आता मयत) वारसदार: अ) श्रीमती सुजाता संजय कुलकर्णी (पत्नी) (ब) श्री. आनंद संजय कुलकर्णी (मुलगा) (क) गौरी वाळवेकर (विवाहित कन्या) वरील अ ते क राहणार ४/२०, सहकारी सेवक वसाहत, यशश्री, कर्वे रोड, पुणे ४११००४ **२) श्री. राजकुमार मणिकाप्पा निंगडळ्ळी (जामीनदार)** रा. तोरणे बिल्डींग, घ. नं.१४, स. नं. ७८/३, श्री ग्रुप कॉलनी, गजानन महाराज नगर, दिघी, पुणे ४११०१५ **३) श्रीमती सुजाता संजय कुलकर्णी (गहाणखत लिहून देणार आणि जामीनदार)** ४/२०, सहकारी सेवक वसाहत, यशश्री, कर्वे रोड, पुणे ४११००४ | **दि. ३१.०३.२०२१ रोजी रु. १,१४,८५,५४१.९३ अधिक पुढील व्याज व शुल्क इ.** | उपनिबंधक, ता. हवेली जि. पुणे यांचे कार्यक्षेत्रातील आणि पुणे महानगर पालिका हद्दीतील, शनिवार पेठ येथील बालाजी प्रसाद कंडोमिनियम अपार्टमेंट, ए विंग या सिटीएस नं. ४७१ वर बांधलेल्या इमारतीमधील, **दुसऱ्या मजल्यावरील ए-२२२ क्रमांकाचे युनिट,** क्षेत्रफळ ४४.५९ चौ. मि. बिल्टप, म्हणजे ३७.१६ चौ. मि. कार्पेट. **यासी चतु:सीमा पुढील प्रमाणे:** **पूर्वेस** : मोकळी जागा व पलिकडील रस्ता, **दक्षिणेस** : युनिट क्र. ए २२० प्रवेशद्वार आणि डक्ट, **पश्चिमेस** : युनिट नं. ए २२३, **उत्तरेस:** मोकळी जागा आणि पलिकडील रस्ता. सदर मिळकतीसोबत अविभक्त सामायिक जागा वा सामायिक सुविधा यातील २.३५% हिश्यासह. | रु. ५१,००,०००/- दिनांक व वेळ २४.०८.२०२२ दुपारी १२.०० वा. |

**नियम व अटी:**

१) लिलावात भाग घेणाराने लिलावापूर्वी परत मिळणारे डिपॉझिट रु.१,००,०००/- (रु. एक लाख फक्त) तसेच परत न मिळणारी लिलाव प्रोसेसिंग चार्जेस रु.१०००/- बँकेच्या मुख्य कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे.
२) लिलाव बँकेच्या मुख्य कार्यालय ६०६, सदाशिव पेठ, पुणे ३० येथे **बुधवार, दि. २४.०८.२०२२ रोजी दुपारी १२.०० वा.** होईल. मिळकतीची पाहणी इच्छुक खरेदीदारांना/ बोलीदारांना पूर्वनियोजित वेळेनुसार **सोमवार, दि. २२.०८.२०२२ रोजी ११ ते सायं. ४** या वेळात करता येईल.
३) लिलाव मंजूर करणे, स्थगित करणे अथवा कोणतेही कारण न देता रद्द करणे इ. चे सर्व अधिकार अधिकृत अधिकारी यांचेकडे राखीव आहेत.
४) लिलाव मालमत्तेबाबत व लिलावाच्या अटी आणि शर्तीसाठी बँकेच्या मुख्य कार्यालयात संपर्क करावा. (अजय रजपूत, ९३७२०७९४१५)
५) लिलावधारकांनी फोटो ओळख पुरावा, जसे, पासपोर्ट/मतदान ओळखपत्र/ड्रायव्हिंग लायसेन्स/पॅन कार्ड साक्षांकित करुन लिलावाचे वेळी सादर करावेत.

**टीप: बँकेच्या माहितीनुसार सदर मालमत्तेवर अन्य बोजा नाही. मिळकत कर, एमएसईबी इ.बाबतची खातरजमा खरेदी घेवू इच्छिणाराने करावयाची आहे.**

स्थळ : पुणे
दिनांक : ०६.०८.२०२२
(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)

अजय रजपूत
अधिकृत अधिकारी व सहाय्यक सरव्यवस्थापक
पुणे पीपल्स को ऑप.बँक लि.,पुणे

## Kirloskar Ferrous Industries Limited

A Kirloskar Group Company
**Registered Office:** 13, Laxmanrao Kirloskar Road, Khadki, Pune - 411 003. (Maharashtra)
**CIN:** L27101PN1991PLC063223

Kirloskar Ferrous

Statement of Unaudited Financial Results for the quarter ended 30 June, 2022

(Figures are ₹ in Crores unless stated otherwise)

| Sr. No. | Particulars | Standalone | | | | Consolidated | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter ended | | | Year ended | Quarter ended | | Year ended |
| | | 30/06/2022 | 31/03/2022 | 30/06/2021 | 31/03/2022 | 30/06/2022 | 31/03/2022 | 31/03/2022 |
| | | Unaudited | Audited | Unaudited | Audited | Unaudited | Audited | Audited |
| 1 | Total Income from Operations | 949.88 | 900.56 | 822.83 | 3,614.97 | 1,493.82 | 1,033.88 | 3,748.29 |
| 2 | Net Profit for the period (before Tax and Exceptional Items) | 109.23 | 85.52 | 186.35 | 542.69 | 125.61 | 76.02 | 533.19 |
| 3 | Net Profit for the period before Tax (after Exceptional Items) | 109.23 | 85.52 | 186.35 | 542.69 | 125.61 | 76.02 | 533.19 |
| 4 | Net Profit for the period after Tax (after Exceptional Items) | 83.85 | 65.26 | 139.50 | 406.10 | 102.08 | -41.12 | 299.72 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [comprising Profit (after tax) and Other Comprehensive Income (after tax) for the period] | 84.78 | 68.39 | 139.29 | 409.51 | 101.54 | 450.22 | 791.34 |
| 6 | Paid up Equity Share Capital (Face Value of ₹ 5 each) | 69.37 | 69.36 | 69.19 | 69.36 | 69.37 | 69.36 | 69.36 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) | 1,147.41 | 1,061.06 | 866.92 | 1,061.06 | 1,585.63 | 1,490.32 | 1,490.32 |
| 8 | Securities Premium Account | 205.86 | 205.65 | 202.77 | 205.65 | 205.86 | 205.65 | 205.65 |
| 9 | Net Worth | 1,415.10 | 1,330.10 | 1,135.90 | 1,330.10 | 1,366.13 | 1,271.12 | 1,271.12 |
| 10 | Paid up Debt Capital | 250.00 | 250.00 | 0.00 | 250.00 | 250.00 | 250.00 | 250.00 |
| 11 | Debt-Equity Ratio | 0.75 | 0.85 | 0.24 | 0.85 | 0.39 | 0.43 | 0.43 |
| 12 | Earnings Per Share (In ₹) (not annualised) | | | | | | | |
| | (a) Basic | 6.04 | 4.70 | 10.08 | 29.32 | 6.74 | 0.45 | 25.06 |
| | (b) Diluted | 6.03 | 4.69 | 10.03 | 29.23 | 6.73 | 0.45 | 24.99 |
| 13 | Capital Redemption Reserve | NA | NA | NA | NA | NA | NA | NA |
| 14 | Debenture Redemption Reserve | NA | NA | NA | NA | NA | NA | NA |
| 15 | Debt Service Coverage Ratio | 3.52 | 4.13 | 9.56 | 6.83 | 4.19 | 3.78 | 6.67 |
| 16 | Interest Service Coverage Ratio | 6.67 | 8.02 | 35.90 | 20.48 | 7.15 | 6.47 | 19.03 |

The above is an extract of detailed format of quarterly financial results filed with the BSE Limited pursuant to Regulations 33 and 52 of the SEBI (Listing Obligations and Disclosures Requirements) Regulations, 2015. The full format of annual financial Results alongwith notes thereto are available on the website of the BSE Limited at www.bseindia.com and the website of the Company at www.kirloskarferrous.com

For Kirloskar Ferrous Industries Limited
sd/-
R. V. Gumaste
Managing Director (DIN : 00082829)

Place: Pune
Date : 5 August 2022

- Telephone No.: +91 (020) 66084645 - Fax No.: +91 (020) 25813208
- E-mail: kfilinvestor@kirloskar.com - Website: www.kirloskarferrous.com

Mark bearing word 'Kirloskar' in any form as a suffix or prefix is owned by 'Kirloskar Proprietary Limited' and 'Kirloskar Ferrous Industries Limited' is the Permitted User.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, **श्री सुरेश निवृत्तीराव शिंदे** यांनी **गाव मौजे गुलटेकडी** तालुका हवेली जिल्हा पुणे येथील प्लॉट नं. ४, सर्वे नं. ५४१ AB व सर्व्हे नं. ७०० ते ७०३, सिटी सर्व्हे नं. ८/४ या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या कृष्णा चेम्बर्स या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील अपार्टमेंट नं. ५ यासी क्षेत्र ३९३ चौ फूट, ही मिळकत मालकी हक्काने धारण केली असून, त्या कामी केलेले मूळ दस्त अग्रीमेंट टू सेल दिनांक १६/१२/१९९५ (नो. क्र. ८४५१/१९९५) तसेच मूळ नोंदणी पावती आणि सूची क्र. २ हे गहाळ झाले आहेत. तरी तमाम लोकांस या नोटीशीने खबरदार करणेत येत आहे की, कोणास सदरचे मूळ दस्तऐवज सापडल्यास वा ते ताब्यामध्ये असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाले **पासून ७ दिवसांत** आम्हांस लेखी पुराव्यानिशी ज्ञात करावे. तसेच कोणीही सदर मूळदस्तऐवजांपोटी कोणताही गहाण, विक्री इ. व्यवहार करू नये. सदर मिळकत ही आमचे अशील आयडीबीआय बँक यांचे कडे गहाण ठेवली जाणार असून कोणीही त्यांच्या हिता विरुद्ध वापर करू नये. यदाकदाचित जर असा कोणी सदर मूळ दस्तऐवजांचा गैर वापर केल्यास तो त्यांचेवर बंधनकारक राहणार नाही आणि त्यातून होणाऱ्या सर्व नुकसानीची जबाबदारी असा गैरवापर करणाऱ्या व्यक्तीवर राहील.

पुणे, दिनांक ०६/०८/२०२२.

**प्रकाश शर्मा, अॅडव्होकेट,**
**प्रकाश शर्मा अॅण्ड कं करिता**
५१ ते ५४ए, पाटील आर्केड, १९ एरंडवणा, पुणे - ४११००४.

## pnb Housing Finance Limited

पीएनबी हाऊसिंग नोंदणीकृत कार्यालय: ९वा मजला, अंत्रिक्ष भवन, २२, के.जी. मार्ग, नवी दिल्ली-११०००१ फोन्स: ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाईट : www.pnbhousing.com

शाखा कार्यालय : १२, स्पंधन, सर्व्हे नं. ११७/१, पॉप्युलर नगर, वारजे, पुणे-४११०५२, महाराष्ट्र, ईमेल : warje@pnbhousing.com

### ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी वित्तिय मत्तेची सुरक्षितता आणि पुनर्रचना अंतर्गत आणि सुरक्षा हित कायदा २००२च्या अंमलबजावणीच्या नियम ८(१)च्या अनुपालनार्थ, तसेच सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ३ यासह वाचलेल्या कलम १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनांच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत प्रत्येक अकाउंटच्या अनुसार नमूद केल्यानुसार रकमेची परतफेड करण्याकरिता संबंधित ऋणकोंबर फर्मावणारी प्रत्येक अकाउंटच्या अनुसार नमूद केलेल्या तारखे दिवशी मागणी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, ऋणकोंना आणि आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी प्रत्येक अकाउंटच्या अनुसार नमूद केलेल्या तारखां दिवशी उक्त नियमांच्या नियम ८ यासह वाचलेल्या उक्त कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत त्याला / तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषकरून ऋणकोंना तसेच आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की त्यांनी उक्त मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि उक्त मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार कर्ज करारनाम्याच्या अनुसार रक्कम व त्यावरील व्याजाकरिता "पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"च्या आकारच्या विषयाधीन असेल.

**सुरक्षित मालमत्तेच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेत कायद्याच्या कलम १३च्या पोट-कलम (८)च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत.**

| अ. क्र. | लोन अकाउंट नं. | ऋणको/सह-ऋणको / हमीदाराचे नाव | मागणी सूचनेची तारीख | थकित रक्कम | ताबा घेतल्याची तारीख | गहाणवट मालमत्तेचे वर्णन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एचओयू/डब्लूआरजेई/०७१७/ ४०७०१८ व एचओयू/डब्लूआरजेई/ १०१८/ ५९७५५२ शाखा कार्यालय : वारजे | गौतम श्रीपती हरीभक्त व अंजिक्य गौतम हरीभक्त | १४-मे-२१ | रु. ३९,५३,५८३.४५/- (रुपये एकोणचाळीस लाख त्रेपन्न हजार पाचशे त्र्यैंशी व पैसे पंचेचाळीस फक्त) ३०-०३-२०२१ रोजी प्रमाणे | ०३-०८-२०२२ (प्रत्यक्ष) | फ्लॅट नं. १०५, फ्लोअर नं. १, जी.नं. ७,२,२, बिल्डिंग "बी", गगन रिनैसन्स, पिसोली, धमावट पेट्रोल पंप, पुणे-४११०४८, महाराष्ट्र |

स्थळ : वारजे तारीख : ०५-०८-२०२२

प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि.

## GARWARE TECHNICAL FIBRES — गरवारे टेक्निकल फायबर्स लिमिटेड

### ३० जून, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीचा संक्षिप्त स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष

(रू. लाखांमध्ये)

| अनु. क्र. | तपशील | स्वतंत्र | | | | एकत्रित | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संपलेले तीन महिने ३०.०६.२०२२ (अलेखापरीक्षित) | संपलेले तीन महिने ३१.०३.२०२२ (लेखापरीक्षित) | संपलेले तीन महिने ३०.०६.२०२१ (अलेखापरीक्षित) | संपलेले वर्ष ३१.०३.२०२२ (लेखापरीक्षित) | संपलेले तीन महिने ३०.०६.२०२२ (अलेखापरीक्षित) | संपलेले तीन महिने ३१.०३.२०२२ (लेखापरीक्षित) | संपलेले तीन महिने ३०.०६.२०२१ (अलेखापरीक्षित) | संपलेले वर्ष ३१.०३.२०२२ (लेखापरीक्षित) |
| १ | कारभाराद्वारे एकूण उत्पन्न (निव्वळ) | २९,८११.०३ | ३६,६५९.८९ | २४,५२६.४२ | १२०,१५२.४९ | ३०,९२०.४५ | ३६,११२.७७ | २४,९१५.१३ | १२१,४९३.८७ |
| २ | कालावधीसाठी निव्वळ नफा (कर, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींपूर्वी) | ३,३९२.१८ | ७,४५४.०७ | ४,०२१.९५ | २१,०००.७४ | ३,७११.८९ | ७,१३५.८९ | ४,१३३.३८ | २१,६४१.३१ |
| ३ | कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर) | ३,३९२.१८ | ७,४५४.०७ | ४,०२१.९५ | २१,०००.७४ | ३,७११.८९ | ७,१३५.८९ | ४,१३३.३८ | २१,६४१.३१ |
| ४ | कालावधीसाठी करनंतर निव्वळ नफा (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर) | २,६०३.२१ | ५,७१५.२८ | ३,११४.३५ | १६,०७३.०६ | २,८९८.८९ | ५,३८९.१७ | ३,१९३.५४ | १६,४७८.०९ |
| ५ | कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न [कालावधीसाठी करपश्चात नफा (कर नंतर) आणि करपश्चात इतर सर्वसमावेशक उत्पन्नासहीत (कर नंतर)] | २,५६०.९५ | ५,५७१.११ | ३,३६३.४१ | १६,००३.९० | २,७७६.६३ | ५,२४४.९९ | ३,४४२.६१ | १६,४०८.९३ |
| ६ | समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १०/- प्रतिसमभाग) | २,०६१.८२ | २,०६१.८२ | २,०६१.८२ | २,०६१.८२ | २,०६१.८२ | २,०६१.८२ | २,०६१.८२ | २,०६१.८२ |
| ७ | राखीव निधी (पुनर्मुल्यांकित राखीव निधी वगळून) | | | | ९७,५६२.३१ | | | | ९४,९९६.७१ |
| ८ | प्रतिभागावर मिळकत (दर्शनी मूल्य ₹ १०/- प्रत्येकी) (चालू आणि बंद ऑपरेशनसाठी) | | | | | | | | |
| | अ) मूलभूत: | १२.६३ | २७.७२ | १५.१० | ७७.९६ | १३.६७ | २६.१४ | १५.४९ | ७९.९२ |
| | ब) सौमीकृत: | १२.६३ | २७.७२ | १५.१० | ७७.९६ | १३.६७ | २६.१४ | १५.४९ | ७९.९२ |

टिपा:

१. वरील माहिती हि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजअर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियमावली ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसला सादर केलेल्या ३० जून २०२२ रोजी संपलेल्या गरवारे टेक्निकल फायबर्स लिमिटेड (कंपनी) च्या तिमाहीचे अलेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय निष्कर्षांचा तसेच कंपनी व तिच्या सब्सिडरीज व असोसिएट्स चे अलेखापरीक्षित एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा आहे. ३० जून २०२२ रोजी संपलेल्या कंपनीच्या तिमाहीचे अलेखापरीक्षित स्वतंत्र तसेच एकत्रित संपूर्ण वित्तीय निष्कर्ष कंपनीची वेबसाईट www.garwarefibres.com तसेच स्टॉक एक्सचंजेस ची वेबसाईट म्हणजेच बीएसई लिमिटेड www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड www.nseindia.com येथे उपलब्ध आहेत.

२. कंपनीचे ३० जून २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीचे अलेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय निष्कर्ष तसेच कंपनी व तिच्या सब्सिडरीज व असोसिएट्स चे अलेखापरीक्षित एकत्रित वित्तीय निष्कर्ष लेखापरीक्षण समितीने आढावा घेतले आणि शुक्रवार, दिनांक ५ ऑगस्ट २०२२ रोजी झालेल्या बैठकीत संचालक मंडळाने त्यास नोंदी घेतले आणि मान्यता दिली. कंपनीच्या वैधानिक लेखा परीक्षकांनी कंपनीच्या ३० जून २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीचे वित्तीय निष्कर्ष मर्यादित पुनरावलोकन केले आहे.

गरवारे टेक्निकल फायबर्स लिमिटेड साठी
सही/-
व्ही. आर. गरवारे
चेअरमन अॅन्ड मॅनेजिंग डायरेक्टर
डीन: ०००९२२०१

स्थळ : पुणे
तारीख : ०५ ऑगस्ट, २०२२

**नोंदणीकृत कार्यालय:** प्लॉट क्र. ११, ब्लॉक डी-१, एमआयडीसी, चिंचवड, पुणे - ४११ ०१९.
**सीआयएन:** L25209MH1976PLC018939; **दूरध्वनी:** (+९१-२०) २७९९००००; **ईमेल:** secretarial@garwarefibres.com; **वेबसाइट:** www.garwarefibres.com

## बजाज फायनान्स लिमिटेड

CIN-L65910MH1987PLC042961
**नोंदणीकृत कार्यालय:** आकुर्डी, पुणे -४११०३५
कॉर्पोरेट कार्यालय: ४ था मजला, बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, पुणे-अहमदनगर रोड लगत, विमान नगर, पुणे - ४११०१४

### मुदत ठेव योजना

CRISIL AAA/स्टेबल आणि (ICRA)AAA (स्टेबल) रेटिंग
या योजनेसाठी उपरोक्त रेटिंग हे, वेळच्या वेळी व्याज व मुद्दल यांचे पेमेंट केले जाण्याच्या संदर्भात सुरक्षिततेचे सर्वोच्च मानांकन दर्शवतात.

₹५ कोटी पर्यंतच्या ठेवींसाठी वार्षिक व्याजदर (१ जुलै २०२२ पासून लागू) वैध आहे.
नवीन ग्राहकांसाठी:

तक्ता १

| कालावधी (तक्ता २ व्यतिरिक्त) | संचयी मुदत पुर्तीला | बिगर- संचयी मासिक | त्रैमासिक | सहामाही | वार्षिक |
|---|---|---|---|---|---|
| १२ - २३ महिने | ६.२०% | ६.०३% | ६.०६% | ६.११% | ६.२०% |
| २४ - ३५ महिने | ६.९५% | ६.७४% | ६.७८% | ६.८३% | ६.९५% |
| ३६ - ६० महिने | ७.४०% | ७.१६% | ७.२०% | ७.२६% | ७.४०% |

तक्ता २

| कालावधी | संचयी मुदत पुर्तीला | बिगर- संचयी मासिक | त्रैमासिक | सहामाही | वार्षिक |
|---|---|---|---|---|---|
| १५ महिने | ६.४०% | ६.२२% | ६.२५% | ६.३०% | ६.४०% |
| १८ महिने | ६.५०% | ६.३१% | ६.३४% | ६.४०% | ६.५०% |
| २२ महिने | ६.६५% | ६.४५% | ६.४९% | ६.५४% | ६.६५% |
| ३० महिने | ७.०५% | ६.८३% | ६.८७% | ६.९३% | ७.०५% |
| ३३ महिने | ७.१५% | ६.९३% | ६.९७% | ७.०३% | ७.१५% |
| ४४ महिने | ७.५०% | ७.२६% | ७.३०% | ७.३६% | ७.५०% |

अ. ज्यात संचालक/कंपनी यांना ठोस स्वारस्य असा त्याच समूहातील कंपन्या किंवा इतर एन्टिटीज किंवा व्यापार-उदीमाचे प्रकल्प यांना दिलेल्या निधी किंवा बिगर-निधी स्वरुपाची एकूण येणी (कर्ज) ही ११४.३१ कोटी इतकी आहेत (बजाज हौसिंग फिनान्स लिमिटेड - ०.०८ कोटी, बजाज फायनान्शियल सिक्युरिटीज लिमिटेड - ५०.२१ कोटी, बजाज अलियान्झ लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड - २.७१ कोटी, बजाज अलियान्झ जेनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड - ४८.५५ कोटी, बजाज फिनसर्व्ह हेल्थ लिमिटेड - १२.३० कोटी, बजाज ऑटो लिमिटेड - ०.२१ कोटी, हिंद मुसाफिर एजन्सी लिमिटेड - ०.०१ कोटी, बजाज इलेक्ट्रिकल्स लिमिटेड - ०.०२ कोटी, जमनालाल सन्स प्रायव्हेट लिमिटेड - ०.२२ कोटी).

## लोकमानस

loksatta@expressindia.com

### मोदींच्या वक्तव्यामागे ‘आप’ची भीती?

**‘रेवडीचा जुमला!’** हा अग्रलेख (५ ऑगस्ट) वाचला. मोदींनी रेवडीसंदर्भात केलेल्या भाषणावेळी त्यांचा चेहरा उद्विग्न दिसत होता. त्या उद्विग्नतेचे कारण होते आप. आम आदमी पक्षाने ज्या रीतीने वीज देयक माफी जाहीर करून दिल्ली काबीज केली व पंजाबमध्येही भाजपवर मात केली ते पाहता मोदींना चिंता वाटू लागली आहे. याबाबतीत एका टीव्ही वाहिनीने तर दिल्लीतील भाजपच्या पराभवानंतर, दिल्लीवाले कसे फुकटखाऊ आहेत यावर एक प्राइम टाइम शो केला होता. गुजरातमध्येही आप चांगला जम बसवेल असे वाटते. आम आदमी पक्षाने दिलेली वचने पाळली आणि सरकार चालवूनही दाखविले. दिल्लीतील शाळा व वैद्यकीय सेवा यांची जगभर वाहवा होते आहे. याउलट मोदींना त्यांचे १५ लाख रुपयांचे तर सोडाच (तो तर जुमलाच होता) पण ‘अच्छे दिन’चे वचनही पाळता आलेले नाही.

आज परिस्थिती अशी आहे की मोदींनी कुठलेही आश्वासन दिले तर भक्तसुद्धा त्यावर विश्वास ठेवणार नाहीत. आज महाराष्ट्रातही शेतकरीवर्गाच्या वीज देयकमाफीत भाजपने घोळ घालून ठेवला आहे. त्यामुळे महावितरण गोत्यात आले आहे, हे जनता जाणते. मोदी आगामी मध्य प्रदेश, गुजरात व इतर राज्यांतील निवडणुकांत रेवडी वाटतात की नाही, हे पाहावे लागेल.

– **राजेंद्र कोळेकर,** मुंबई

### रेवडीबंदी सर्वच पक्षांनी अमलात आणावी!

**‘रेवडीचा जुमला!’** हे संपादकीय (५ ऑगस्ट) वाचले. रेवडी आणि आश्वासनांतील फरक सत्ताधारी आणि विरोधक अशा सर्वांनीच जाणून घेणे आणि त्याबाबत तारतम्य बाळगणे आवश्यक आहे. सत्ताधारी पक्षांच्या त्या घोषणा, आश्वासने आणि विरोधकांच्या मात्र रेवड्या हे ‘आपला तो बाळ्या, अन् दुसऱ्याचे ते कार्टे’ म्हणण्यासारखे आहे.

राजकीय पक्षांनी निवडणुकांदरम्यान मतदारांना आकर्षित करण्यासाठी घोषणा करणे एक वेळ समजू शकते; पण त्या घोषणा थापायुक्त असतील व त्यात मतदारांची शुद्ध फसवणूकच असेल तर मतदारांसाठी हा जुमला ठरत नाही का? बडे बाप के बेटे असलेले उद्योगपती सतत करमाफी मिळवण्यात यशस्वी ठरतात, तर मग छोटे-मोठे शेतकरी, गरीब शेतमजूर, कामगारवर्ग आणि लघुउद्योजक यांनीच काय घोडे मारले आहे, की त्यांना या सवलतींपासून व विविध सरकारी लाभांपासून सतत वंचित राहावे लागावे, याचाही जरूर विचार व्हावा. या प्रस्तावित योजनेचे मूळ प्रवर्तक असलेल्या सर्वोच्च अधिकाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन सर्वपक्षीय बैठकीत याबाबतीत एकदाच काय तो सोक्षमोक्ष लावणे म्हणूनच इष्ट ठरेल!

– **बेंजामिन केदारकर,** नंदाखाल (विरार)

### मर्यादित अर्थापलीकडेही अल्पसंख्याक...

**५ ऑगस्टच्या** संपादकीय पानाची चातुर्यपूर्ण ‘फाळणी’ झाली आहे. ‘डाव्या’ बाजूला रवींद्र साठे व ‘उजव्या’ बाजूला योगेंद्र यादव, या दोघांना समोरासमोर आणून उभे करण्यात आले आहे. हे धोरणीपण लॉर्ड माऊंटबॅटन यांच्याकडे असायला हवे होते. दोन्ही लेख एकामागोमाग वाचल्यानंतर स्वतंत्र भारताबरोबरच वाढलेल्या आमच्या पिढीच्या (सध्या साठीच्या घरात असलेल्या) मनात येतील असे काही विचार व प्रश्न...

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रवादाबाबतच्या तीन धारणा होत्या, असे साठे यांनी लिहिले आहे. साठेंच्या भाषेतील हिंदी राष्ट्रवाद म्हणजे काँग्रेसप्रणीत निधर्मी सर्वसमावेशक राष्ट्रवाद, हिंदू राष्ट्रवाद व तिसरा द्विराष्ट्रवाद. आता द्विराष्ट्रवाद म्हणजे ज्यांना धर्माधिष्ठित फाळणी हवी होती ते सर्व असे गृहीत धरू या. भारतीय राष्ट्रवादाचा विचार करताना सुरुवात कुठून करायची, हा यादव यांचा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. साठे यांचे याबाबत काय उत्तर असणार त्याची उत्सुकता आहे. आणि हिंदू राष्ट्रवाद व द्विराष्ट्रवाद यांच्यात साम्य व फरक काय याचाही ऊहापोह व्हायला हवा. एकरस समाजात अल्पसंख्याकत्वाला स्थान नाही, असे साठे म्हणतात. १९४७ साली जो भारतीय समाज अस्तित्वात आला तो सर्वार्थाने एकरस होता का? वर्षानुवर्षे विविध आर्थिक- सामाजिक गटांत विभागला गेलेला तो एक मोठा जनसमुदाय होता. तसेच वर्षानुवर्षे सत्ता, संपत्ती, ज्ञान काबीज करून बसलेला एक अल्पसंख्याक गटही होता. त्यांना एकरस करण्यासाठी काही उपाययोजना केल्या गेल्या. त्या उपाययोजना प्रत्यक्षात येऊन ते सर्व गट एका पातळीवर येईपर्यंत त्यांना वेगळे संबोधन द्यायला हवे का? साठे यांच्या मनात अल्पसंख्याक शब्दाचा वेगळा अर्थ आहे. त्या मर्यादित अर्थापलीकडेही बरेच काही आहे. पंडित नेहरूंच्या अलीगड मुस्लीम विद्यापीठातील भाषणाला ‘उपरती’ का म्हणायचे हे समजू शकले नाही. धर्मांधता सार्वत्रिक आहे. व्यापक राष्ट्रीय दृष्टिकोन ठेवून धर्मांधतेवर मात करा असे ते सर्वांना सांगत होते. त्यापासून इतरांना उपरती झाली नाही हे वास्तव आहे.

– **डॉ अनिल जोशी,** पंढरपूर

### विवेकानंद आणि सावरकरांची मते भिन्न

**‘हिंदी राष्ट्रवादाचा** पराभव कशामुळे?’ या आपल्या लेखात (५ ऑगस्ट) रवींद्र साठे यांनी केलेली अनेक भयानक विधाने बाजूला ठेवली तरी त्यांनी विवेकानंद आणि सावरकर यांची जी तुलना केली आहे त्याबद्दल तरी सांगावयास हवे. या देशातील धर्मांतरे मुसलमानांनी तलवारीच्या जोरावर केली असे समजणे योग्य नाही. त्यांनी धर्मांतरे केली पुरोहितांच्या जाचातून मुक्त होण्यासाठी, असे सांगणाऱ्या विवेकानंद यांनी पुढे सांगितले आहे की, ‘मोंगलांच्या दरबारात जे बौद्धिक वैभव होते त्याचा अंशमात्रसुद्धा आपल्याला पुणे आणि लाहोरच्या दरबारात दिसत नाही. मुसलमान राजवटीचे या देशातील योगदान म्हणजे गरिबांची आणि दलितांची स्थिती सुधारली आणि विशेषाधिकार संपले.’ आणि सावरकर सांगतात, ‘शिवाजीने कल्याणच्या सुभेदाराची सून परत केली हे चुकीचे आहे. त्यामुळे शत्रूची वीण वाढणार होती. ती आपल्या मावळ्याला भेट म्हणून देऊन आपली वीण वाढवावयास हवी होती.’

– **दत्तप्रसाद दाभोळकर,** सातारा

### ‘ते’ पत्र विवेकानंदांचे!

**‘हिंदी राष्ट्रवादाचा** पराभव कशामुळे?’ या माझ्या लेखात (५ ऑगस्ट) लोकमान्य टिळक यांनी सरफराज मोहम्मद याला पत्र लिहिले असा उल्लेख झाला आहे. वस्तुतः हे पत्र स्वामी विवेकानंद यांनी अल्मोडा येथून १० जून १८९८ रोजी महम्मद सरफराज हुसैन याला पाठवले होते. मला हे पत्र विवेकानंद यांनी पाठवले असेच म्हणायचे होते, परंतु चुकीने लोकमान्य टिळक असा उल्लेख सदर लेखात झाला आहे. वाचकांनी याची कृपया नोंद घ्यावी.

– **रवींद्र माधव साठे,** मुंबई

### सरकारने स्थगितीचा खेळ थांबवावा!

**प्रभागांचा खेळ** हा ‘अन्वयार्थ’ (५ ऑगस्ट) वाचला. राज्यात सत्तेवर आलेल्या शिंदे-फडणवीस सरकारने आधीच्या सरकारचे निर्णय बदलण्याचा सपाटा लावला आहे. आता प्रभागरचना आणि जागांचे प्रमाण २०१७ प्रमाणे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्याचे मुख्यमंत्री हे ठाकरे सरकारच्या मंत्रिमंडळात नगरविकासमंत्री होते. त्या वेळी जे निर्णय घेण्यात आले त्यांना मंत्री म्हणून शिंदेंची मान्यता होती. तेच शिंदे आपल्याच आधीच्या सरकारने घेतलेल्या निर्णयांना स्थगिती देत आहेत. शिंदेंना हे निर्णय मान्य नव्हते, तर त्यांनी तेव्हाच सरकारमधून बाहेर पडायला हवे होते किंवा जाहीर विरोध करायला हवा होता. शिंदे तेव्हा गप्प का होते, आता ते भाजपच्या दबावाखाली निर्णय घेत आहेत का, असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. सरकारच्या आताच्या निर्णयामुळे मुंबईसहित राज्यातील सर्वच निवडणुका पुढे जातील. संपूर्ण प्रक्रिया पहिल्यापासून सुरू करावी लागेल. शिंदे हे भाजप सांगेल त्याप्रमाणे वागत असल्याचेच आतापर्यंत घेण्यात आलेल्या निर्णयांवरून दिसते. प्रत्येक सरकारने आधीच्या सरकारच्या निर्णयांना स्थगिती देण्याचा खेळ थांबवावा.

– **सुनील कुवरे,** शिवडी (मुंबई)

### सर्वांगीण विकास साधणे शक्य नाही

**‘लोकमानस’ सदरातील** ‘शिक्षकांवर सर्वांगीण विकासाची जबाबदारी’ हे पत्र वाचले. जे शिक्षक नाहीत किंवा ज्यांचा शिक्षण क्षेत्राशी संबंध नाही, अशा सर्वांना वाटते की विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याचे स्वातंत्र्य शिक्षकांना असते किंवा शिक्षण सुधारणा ही शिक्षकांमुळेच होते. तेव्हा लोक हे लक्षात घेत नाहीत की हे सर्व करण्यासाठी शिक्षक स्वतंत्र नसतो. त्याला केंद्र, राज्य सरकारच्या धोरणांना अनुसरून काम करावे लागते, उदा.- मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना एमसीसी हा नवीन विषय आला होता. त्या संदर्भातील प्रशिक्षणासाठी भरपूर निधी वाया घालवल्यानंतर तो विषय अभ्यासक्रमातून काढून टाकण्यात आला. नंतर प्रौढ शिक्षण, मूल्यशिक्षण, सामान्य ज्ञान, पर्यावरण, एड्स जनजागृती अशा अनेक विषयांबाबत असेच घडले.

पाठ्यपुस्तकाच्या बाहेरचे शिकवायला ना सरकारची परवानगी असते, ना बोर्डाची, ना संस्थेची, ना मुख्याध्यापकांची, ना पालकांची, ना विद्यार्थ्यांची! तेवढा वेळही नसतो. शिक्षकाला मतदार यादी तयार करणे, जनगणना, निवडणूकतील कामे, बालकामगारांची यादी करणे, पोलिओ लसीकरण अशा अशैक्षणिक कामांतून वेळ मिळत नाही. कार्यानुभव, शारीरिक शिक्षण, चित्रकला, हस्तकला हे महत्त्वाचे विषय वैकल्पिक म्हणून गणले गेल्याने त्यांच्या तासांचा उपयोग अभ्यासक्रम संपविण्यासाठी केला जातो. अणुरचना, अणुबॉम्बचा स्फोट, तारकांचा स्फोट, जिवाणू, ज्वालामुखी, भूकंप, पूर, इतिहासातील लढाया अशा अनेक गोष्टी ज्या प्रत्यक्ष दाखवता येत नाहीत त्या शिकविण्यासाठी दूरदर्शन संच, संगणक, प्रोजेक्टर इत्यादी साहित्य किती शाळांत उपलब्ध असते? नेहरू तारांगण, जंतरमंतर वेधशाळा, संग्रहालय अशा किती स्थळांना भेट देण्याची संस्थेची, मुख्याध्यापकांची, पालकांची व विद्यार्थ्यांची तयारी असते?

– **नितांत पेडणेकर,** बोरिवली (मुंबई)

# प्रेरणादायी कायदेशीर लढे...

**तमिळनाडूतील २० महिलांच्या प्रेरणादायी कायदेशीर लढ्यांचे निवृत्त न्यायमूर्ती के. चंद्रू यांनी केलेले विश्लेषण...**

**प्राजक्ता कदम**

**‘जय भीम’** हा करोनाकाळात प्रदर्शित झालेला, अत्यंत लोकप्रिय ठरलेला चित्रपट. एका सत्यघटनेवर आधारित या चित्रपटाने त्याचा मुख्य नायक सूर्या याला जेवढी लोकप्रियता मिळवून दिली, त्यापेक्षा काकणभर जास्तच नाव गाजले ते त्याने ज्यांची भूमिका केली त्या न्यायमूर्ती के. चंद्रू यांचे... इरूलर आदिवासी समूहातील, सेंगनी नावाच्या एका महिलेने १९९३ मध्ये दिलेल्या न्यायालयीन लढ्याची कहाणी या चित्रपटात दाखवण्यात आली आहे. त्या वेळी वकील असलेल्या आणि पुढे न्यायमूर्ती झालेल्या चंद्रू यांनी सेंगनीच्या वतीने हा खटला लढवला होता. चंद्रू यांनी वकील आणि न्यायमूर्ती म्हणून केलेले कार्य पहिल्यांदाच या चित्रपटाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचले. सेंगनीची ही एकटीची कथा नाही. व्यवस्थेने, प्रशासनाने नाडलेल्या अशा कित्येक स्त्रिया आहेत, त्यांच्यातील काहींनी मात्र या व्यवस्थेला आव्हान दिले. न्याय मिळवण्यासाठी संघर्ष केला. तमिळनाडूतील अशा काही प्रातिनिधिक स्त्रियांच्या न्यायालयीन संघर्षाच्या कथा निवृत्त न्यायमूर्ती चंद्रू यांच्या ‘लिसन टु माय केस : व्हेन विमेन अप्रोच द कोर्ट्स ऑफ तमिळनाडू’ या पुस्तकातून सविस्तर जाणून घेता येतात.

तमिळनाडू न्यायालयात दाद मागणाऱ्या आणि न्याय मिळविण्यात यशस्वी झालेल्या २० महिलांच्या लढ्याच्या कथा या पुस्तकात कथन करण्यात आल्या आहेत. पोलिसांच्या दडपशाहीपासून ते धर्माचे पालन करण्याच्या आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या अधिकारापर्यंत विविध प्रश्नांना या कथा स्पर्श करतात. तशाच घटना आजही आपल्याला अवतीभोवती घडताना दिसतात. त्यामुळे हे पुस्तक महिलांच्या कथा सांगण्यापुरते मर्यादित राहत नाही. हा लढा जरी प्रेरणादायी असला, तरी परिस्थितीत आजही काहीच बदल झालेला नाही, याची खंत पुस्तक वाचताना सतत वाटत राहते. कायदा कधीही कठोर नसतो, मात्र प्रकरणागणिक त्याचे विविध समर्पक अर्थ लावले जातात, हेही या पुस्तकातून मनावर बिंबविण्यात आले आहे.

किचकट न्यायालयीन प्रक्रिया, न्यायदानात होणारा पराकोटीचा विलंब यामुळे शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये असे म्हटले जाते. एकट्याने तेही व्यवस्थेविरोधात लढणाऱ्या स्त्रियांसाठी तर ही प्रक्रिया म्हणजे एकप्रकारचे दिव्यच! कारण ही वाट आव्हानांनी भरलेली असतेच, शिवाय बहुतेक वेळा कोणाचाही आधार नसल्याने मार्गक्रमण अधिक बिकट होत जाते. अशा या बिकट वाटांवरील अडथळ्यांना न जुमानता न्याय मिळवणाऱ्यांच्या कथा निश्चितच वाचनीय आणि काही प्रमाणात प्रेरणादायीही ठरतात.

काळाच्या ओघात मागे पडलेल्या लहान शहरांतील, उपेक्षित समाजातील २० धाडसी महिलांचा न्यायालयीन लढा निवृत्त न्यायमूर्ती चंद्रू यांनी धुळीने माखलेल्या कायद्याच्या जाडजूड पुस्तकांतून बाहेर काढून जिवंत केला आहे. या पुस्तकातील प्रकरणांचे वर्गीकरणही अतिशय सुसूत्रपणे करण्यात आले आहे. जीवलग व्यक्तीला गमावल्यानंतरचे जीवन, आई आणि मातृत्व, लैंगिक हिंसाचार, धर्म आणि धर्माचे पालन करण्याचा अधिकार, जीवनाचा अधिकार, निवड आणि सन्मान : वैयक्तिक प्रवासाचे मोजमाप अशा अनेक




पैलूंचा समावेश करण्यात आला आहे. प्रत्येक कथा नावीन्यपूर्ण पद्धतीने मांडण्यात आली आहे.

हुंड्याच्या तक्रारीवरून पहाटे अटक करण्यात आलेल्या मुहब्बत बीवीची कथा पुस्तकात आहे. पोलीस ठाण्यात नेताना तिला तिचे कपडे बदलण्याचीही परवानगी नाकारली गेली. एवढेच नव्हे, तर अटकेच्या कारणांची माहितीही तिला देण्यात आली नाही. न्यायालयाने तिला अटक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला डी. के. बसू प्रकरणात अटकेबाबत घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केल्याबद्दल दोषी ठरवले. परंतु पोलीस अधिकाऱ्यावर दंडात्मक कारवाई केली असती, तर त्याला त्याची नोकरी गमवावी लागली असती, त्यामुळे कारवाई झाली नाही. पण मुहब्बत बीवीला सहन कराव्या लागलेल्या बदनामीचे काय? तिच्या आत्मसन्मानाचे काय? त्याला लागलेला धक्का कुठल्याही दंडात्मक कारवाईने पुसला जाणार नाही, हे लक्षात घेऊन न्यायालयाने संबंधित पोलीस अधिकाऱ्याला अभिनव शिक्षा सुनावली. मुहब्बत बीवीला खऱ्या अर्थाने न्याय देण्यासाठी आणि तिचा आत्मसन्मान परत मिळवून देण्यासाठी न्यायालयाने संबंधित अधिकाऱ्याला तिची संपूर्ण गावासमोर माफी मागण्याची शिक्षा सुनावली. अधिकाऱ्यानेही न्यायालयाची ही शिक्षा मान्य केली आणि संपूर्ण गावासमोर तिची माफी मागितली. तिनेही ती स्वीकारली. मुहब्बत बीवीच्या कथेचा शेवट हा एखाद्या सिनेमात शोभावा किंवा अतिशयोक्त वाटावा असाच! किंबहुना तेथील न्यायालयाने प्रत्यक्षात अशा पद्धतीने न्यायदान केले यावरही विश्वास बसणे कठीण. आणि म्हणूनच न्यायालयाने निकालात नेमके काय म्हटले आहे, हे नमूद करून चंद्रू यांनी असेही न्यायदान शक्य असल्याचे दाखवून दिले आहे.

कुंभकोणमच्या जवळ राहणाऱ्या निडर जानकीचा पालिकेविरोधातील लढाही उल्लेखनीय आहे. तिच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्यावर दोन पायऱ्या होत्या. त्या रस्त्यावरील सर्व घरे रस्त्याच्या पातळीपासून दोन फूट उंचीवर बांधलेली होती. परंतु उच्च न्यायालयाच्या निर्देशांचा हवाला देत पालिकेने हे पायऱ्यांचे ‘अतिक्रमण’ तातडीने हटविले. पालिकेच्या या बेकायदा कारवाईविरोधात थेट

**लिसन टू माय केस : व्हेन विमेन अप्रोच द कोर्ट्स ऑफ तमिळनाडू**
लेखक : **न्यायमूर्ती के. चंद्रू**
मूल्य : **१७६ रुपये**
पृष्ठसंख्या : **११४**

आवाज उठवला तर आपल्यालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाईल आणि आपले घराबाहेर पडणे कठीण होऊन बसेल, या भीतीने जानकीने उच्च न्यायालयाला एक पत्र लिहिले. या पत्राद्वारे पालिकेच्या कारवाईबाबत तक्रार केली. न्यायालयानेही तिचे हे पत्र रिट याचिका म्हणून हाताळले. पालिकेची कृती दुर्दैवी असल्याचा निष्कर्ष नोंदवून पायऱ्या पुन्हा उभारण्याचे आदेश न्यायालयाने दिले. न्यायालयाच्या या आदेशामुळे जानकीसह इतरांनाही न्याय मिळाला.

नैतिक पहाऱ्याचा (पोलिसिंग) गाजावाजा सुरू असताना उमादेवी या अंगणवाडीसेविकेने त्या विरोधात दिलेल्या लढ्याची कहाणी विशेष आहे. ३५ वर्षांची उमादेवी आणि ५१ वर्षांचे प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक कृष्णन हे लग्न करण्याचा विचार करत होते. एकदा प्रवास करत असताना दोघेही एका हॉटेलमध्ये थांबले. त्याच वेळी त्या हॉटेलवर पोलिसांनी छापा टाकला आणि अनैतिक व्यापार करत असल्याच्या आरोपांतर्गत दोघांना ताब्यात घेण्यात आले. न्यायदंडाधिकाऱ्यांनी कोणताही सारासारविचार न करता त्यांना पोलीस कोठडी सुनावली. ‘वेश्या व्यवसाय’ केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या व्यक्तींची छायाचित्रे पोलिसांनी माध्यमांसाठी उपलब्ध करून दिल्याने ती स्थानिक वृत्तपत्रांमध्ये झळकली. परिणामी उमादेवी आणि कृष्णन यांना नोकरी गमवावी लागली. त्यांच्या कुटुंबाने आणि समाजानेही त्यांना बहिष्कृत केले. परंतु परिस्थितीसमोर हात न टेकता उमादेवीने अन्यायाविरोधात लढण्याचा निर्णय घेतला. नोकरीवरून काढण्याच्या निर्णयाला तिने आव्हान दिले. अविवाहित असताना उमादेवी एका पुरुषासोबत एका हॉटेलमध्ये वास्तव्य करत असल्याचे आढळले. तिला अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यांतर्गत अटक करण्यात आली होती. त्यामुळे तिला सेवेतून कमी करण्यात आल्याचा दावा ‘महिला व बाल कल्याण विभागा’तर्फे न्यायालयात करण्यात आला. परंतु परस्पर संमतीने राहणाऱ्या दोन व्यक्तींवर कोणतेही गुन्हे दाखल करता येणार नाहीत, असे सांगत उच्च न्यायालयाने पोलीस अधिकाऱ्यांनाच धारेवर धरले. तसेच उमादेवी आणि कृष्णन या दोघांनाही पूर्ण वेतनासह पुन्हा सेवेत सामावून घेण्याचे आदेशही दिले.

मुलाच्या कोठडीतील मृत्यूनंतर त्याचे काय झाले, याचा न्यायालयाच्या माध्यमातून शोध घेणाऱ्या आईचे प्रकरण वाचताना २००३ सालच्या घाटकोपर स्थानकाबाहेर झालेल्या बॉम्बस्फोटातील ख्वाजा युनूस प्रकरणाची आठवण होते. इतर प्रकरणे वाचतानाही अशाच अवतीभोवती घडणाऱ्या घटनांचे संदर्भ अधोरेखित होत राहतात.

या कथांच्या माध्यमातून निवृत्त न्यायमूर्ती चंद्रू अनेक कायदेशीर प्रश्नांना स्पर्श करतात. कायदा काय म्हणतो, याचेही यथोचित विश्लेषण करतात. न्यायालयाने प्रत्येक प्रकरणासंदर्भात निर्णय देताना आदेशात नेमके काय म्हटले होते हेही त्यांनी सविस्तर नमूद केले आहे. यातून स्त्रियांचा वैयक्तिक प्रवास, त्यांच्या मागण्या, आशा- निराशा हे सारे उलगडत जाते. संबंधित प्रक्रियेत मिळालेल्या न्यायाबद्दलची आपली समजही अधिक समृद्ध होते.

पुस्तकातील बहुतांश कथा निवृत्त न्यायमूर्ती चंद्रू यांनी मद्रास उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून कार्यरत असताना दिलेल्या निकालांशी संबंधित आहेत. सद्यःस्थिती लक्षात घेता न्यायालयाने न्यायदान करताना विविध अधिकार व नियमांबाबत काय म्हटले आहे, हे जाणून घेणे गरजेचे आणि महत्त्वाचे आहे, याची चंद्रू यांचे हे पुस्तक वाचताना जाणीव होते. कायदेविषयक पुस्तके बोजडच असतात, या आपल्या समजाला छेद देणारे हे पुस्तक आहे. न्यायमूर्ती चंद्रू यांनी या महिलांचा न्यायालयीन लढा अगदी सोप्या आणि समजेल अशा भाषेत मांडला आहे. त्यामुळे पुस्तक कुठेच कंटाळवाणे होत नाही. प्रकरणांच्या निवाड्यांविषयीही आवर्जून माहिती देण्यात आली असल्याने कायद्याचा अभ्यास करणाऱ्यांना किंवा न्यायालयीन लढा देऊ इच्छिणाऱ्यांना ते फायदेशीर ठरू शकते.



*prajakta.kadam@expressindia.com*

# आदर्शवादी विरुद्ध वर्चस्ववादी

**धर्मवादी वर्चस्वाच्या आग्रहामुळे निरपेक्ष नात्यांमध्ये उभ्या राहिलेल्या भिंतींवर बोट ठेवणाऱ्या कादंबरीविषयी...**

**प्रसाद मोकाशी**

**सारे विश्व** आदर्शवादी असावे, ही कल्पना आजच्या काळात केवळ दिवास्वप्न ठरली आहे. आपल्या मनाप्रमाणे, आपल्या विचारांप्रमाणे सगळ्यांनी वागलेच पाहिजे, आपण सांगू तोच धर्म सर्वांनी मानला पाहिजे, असे प्रत्येकाला वाटत असते. आपण सांगू तसे सर्व जण वागले तर आणि तरच या जगामध्ये आदर्शवाद नांदू शकतो असेही सर्वांना वाटत असते. त्यामुळेच सध्या जगात अनेक गटातटांमध्ये वर्चस्वासाठी सतत संघर्ष सुरू आहे. आपल्या देशातही सध्या हेच वातावरण आहे. सत्ताधारी सांगतील ते आणि तसेच वागले, राहिले पाहिजे असा मतप्रवाह देशभर पसरला आहे. त्यातूनच अन्य धर्मांच्या तुलनेत एका धर्माचे प्राबल्य वाढू लागले आहे. बहुसंख्याक आणि अल्पसंख्याक यांचा हा लढा सुरू आहे.

आपल्या मनाप्रमाणे कोणी वागले नाही तर ते राष्ट्रद्रोही असतात, जगण्यास किंवा या जगात राहण्यास लायक नसतात अशी काहींची धारणा असते. त्यामुळे प्रत्येकावर केवळ संशय व्यक्त करायचा आणि त्याला भावनिक, मानसिक कोंडीत पकडून आपल्या म्हणण्याप्रमाणे वागण्याची जबरदस्ती करायची. त्यासाठी साम, दाम, दंड, भेद सर्व मार्गांचा वापर करण्यासही मागेपुढे पाहायचे नाही. कारण ज्याच्या हाती सत्ता तो सर्वोत्तम, शक्तिशाली असे सर्वांना वाटते. आपल्या देशात यापेक्षा काही वेगळे चालले आहे, असे दिसत नाही.

आदर्शवादी जगाची कल्पना सर्वांनीच मांडली आहे. महात्मा गांधींनी त्यासाठी आपले प्राण दिले तर स्वामी विवेकानंदांनी संपूर्ण जगाला बंधुत्वाची साद घातली. प्रत्येक देशात संघर्ष सुरू आहे तो वर्चस्वासाठी मात्र त्याला मुलामा दिला जातो तो वैश्विक एकतेचा. सर्वांच्या कल्याणाचा. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर हा संघर्ष सुरू आहे. शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थीही या संघर्षात सापडलेले दिसतात. अशीच एक कहाणी एका




**इन ॲन आयडियल वर्ल्ड**
लेखक : **कुणाल बसू**
प्रकाशक : **पेंग्विन रॅण्डम हाऊस इंडिया प्रा. लि.**
पृष्ठे : **१९८**

महाविद्यालयात घडते. दोन भिन्नधर्मी मित्रांमध्ये जेव्हा धर्मांच्या भिंती उभ्या राहतात तेव्हा संशयाच्या भोवऱ्यात सापडलेली त्यांची मैत्री वेगळ्याच स्तरावर जाते आणि उभे राहते एक भीषण नाट्य. हे नाट्य केवळ त्या दोन मित्रांपुरतेच सीमित राहात नाही, तर त्यांचे संपूर्ण कुटुंबच त्यात भरडले जाते.

आज समाजमाध्यमांवर कोणीतरी एक पोस्ट करते आणि आपण त्यावर आंधळा विश्वास ठेवून ती गोष्ट खरीच आहे असे मानू लागतो. कुणाल बसू लिखित ‘इन ॲन आयडियल वर्ल्ड’मधील अल्ताफबाबत हाच प्रकार घडतो. अल्ताफ हुसेन हा तरुण मुस्लीम विद्यार्थी असतो. त्याचे महाविद्यालयाच्या वसतिगृहातून अपहरण केले जाते. हे अपहरण कोणी केले याचा तपास करण्याऐवजी महाविद्यालयाचे प्रशासन हात झटकते आणि पोलीसही त्यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न करतात. अल्ताफ इराकमध्ये जिहाद (धर्मयुद्ध) पुकारण्यास गेला आहे, अशी अफवा सर्वत्र पसरते. भारताला हिंदू राष्ट्र बनविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या कथित राष्ट्रवादी तरुणांची हत्या करण्यासाठी तो येणार असल्याची भयानक अफवा पसरते. अल्ताफ आणि त्याच्या सहकाऱ्यांबाबत सहानुभूती असणाऱ्या मानवतावादी मंडळींमध्ये चलबिचल सुरू होते. मात्र अल्ताफचे अपहरण नेमके कोणी केले हे समजण्यास मार्ग नसतो.

त्याच वेळी बॉबी सेनगुप्ताच्या कोलकात्याच्या घरात वादळ निर्माण होते. बॉबीचे वडील जॉय हे बँक मॅनेजर असतात, तर आई रोहिणी शाळेत शिक्षिका असते. दोघेही मानवतावादी दृष्टिकोन ठेवणारे असतात. त्यांना धर्मसंघर्ष मान्य नसतो. पण बॉबी हा कथित राष्ट्रवादी विद्यार्थ्यांचा नेता आहे आणि अल्ताफच्या गायब होण्यामध्ये त्याचा हात आहे, हे कळताच त्यांना धक्का बसतो. बॉबीबरोबर त्यांचा वाद होतो. त्याच्या एकांगी विचारसरणीमुळे आणि अल्ताफच्या अपहरणामध्ये आपला हात नाही, असे तो सांगत नसल्यामुळे आई-वडील आणि मुलामध्ये संशयाचे धुके निर्माण होते.

अल्ताफच्या गूढ अपहरणाचे कोडे सुटण्याऐवजी जॉय आणि रोहिणी या दाम्पत्याला कट, द्वेष याचे वास्तव पहावे लागते. त्या विद्वेषाचा त्यांना सामना करावा लागतो. प्रेम आणि धैर्य हे कुठेही पाहण्यास मिळत नाही. समाज दुभंगण्यास कारण ठरणारे वास्तव आणि आदर्श याच्यातील संघर्ष पाहणे त्यांच्या नशिबी येते. पण नेमके काय झालेले असते? अल्ताफचा शोध लागतो का, बॉबीचा त्यात खरंच हात असतो का, ते त्याला या सर्व प्रकरणापासून दूर नेऊ शकतात का, दुभंगलेले राष्ट्र जोडण्यासाठीचे त्यांचे प्रयत्न यशस्वी होतात का? या सर्व प्रश्नांची उत्तरे या कादंबरीमध्ये अखेरीस वाचण्यास मिळतात.

या जगात कोणीही कोणाचा नसतो, हे वास्तव स्वीकारण्यास आता सर्वांनीच सुरुवात केली आहे. धर्मांधवादामुळे देश एका दुभंगावस्थेमध्ये सापडला आहे, हे वास्तवही आता सर्व जण स्वीकारू लागले आहेत. दोन पिढ्यांना एकमेकांविरोधात लढविण्यासाठी- भाऊ भावाच्या विरोधात, मित्र मित्राच्या विरोधात उभा ठाकावा यासाठी अनेक शक्ती आपल्या देशात कार्यरत आहेत. आपण आपल्यासाठीच आणि एकमेकांसाठीही अनोळखी झालो आहोत.

प्रत्येक संघर्ष हा केवळ वर्गलढा नसतो तर भावनिक लढाही असतो. अर्थात विश्व आदर्शवत असावे, सगळेच बंधुभावाने रहावेत, असे प्रत्येकाला वाटते. त्यासाठी आपल्या वैचारिक धारणेतून प्रत्येकाचाच प्रयत्न सुरू असतो. जितक्या व्यक्ती तितक्याच विचारधारा असल्याने एकाचा आदर्श हा दुसऱ्याचा आदर्श असेलच असे नसते. त्यातूनच उभा राहतो तो वर्चस्वाचा लढा. त्यांनी हल्ला केला तर आम्ही लढू, असे चे गवेरा यांचे म्हणणे आहे. धर्मांध शक्ती या जिवंत बॉम्ब आहेत. ते फुटले तर विद्वेषाचे लष्कर उभे राहील आणि संपूर्ण जगाचा विध्वंस झाल्याखेरीज राहणार नाही. रागाची आणि विद्वेषाची परिसीमा गाठणारी धर्मांधता वेळीच रोखली नाही, तर या देशाच्या विविधतेतील एकात्मता दुभंगल्याखेरीज राहणार नाही. सध्या देशातील वातावरण अतिरेकी धर्मांधतेकडे झुकलेले आहे. मात्र आदर्शवादी विश्वाची संकल्पना हा आशेचा किरण या वातावरणावर नक्कीच मात करेल, असा विश्वास सर्वांना आहे.

कुणाल बसू हे अत्यंत संवेदनशील लेखक आहेत. ‘जॅपनीज वाईफ’ हा पुरस्कारविजेता चित्रपट त्यांच्या याच नावाच्या कथासंग्रहावर आधारित आहे.

*prasad.mokashi@expressindia.com*

# ‘पावरी’चा पावा...

## भाषा हा सामूहिक वारसा, तिच्या रक्षणाची जबाबदारी सगळ्यांची. भाषांचे दस्तावेजीकरण, शिक्षणाचे सुलभीकरण होण्यासाठी शब्दकोश आवश्यकच...

**राजकीय, सामाजिक,** सांस्कृतिक ऱ्हासाची उदाहरणे सातत्याने समोर येत असतानाच्या विषण्ण वर्तमानात कुठून तरी पाव्याचे मंजूळ सूर उमटावेत तशी पावरी भाषेसंदर्भातली बातमी आहे. महाराष्ट्रात नंदुरबार परिसरात, मेळघाट तसेच मराठवाड्याच्या काही भागात शतकानुशतके राहणाऱ्या पावरा आदिवासींची ही बोलीभाषा. आपल्या देशामध्ये असलेल्या हजारो भाषा, बोलींपैकी एक. या पावरी भाषेमधल्या साडेचार हजार शब्दांचा कोश तयार झाला असून त्याचे ७ ऑगस्टला प्रकाशन होणार आहे हे ते शुभ वर्तमान. हा शब्दकोश मुख्यत्वे शालेय विद्यार्थ्यांसाठी असून त्यात पावरीमधील शब्दांना मराठी, हिंदी तसेच इंग्रजी भाषेतील पर्यायी शब्द देण्यात आले आहेत. साडेचार हजार ही शब्दसंख्या फार नाही असेही कदाचित कुणाला वाटू शकते. पण आपल्या देशातील आदिवासींचे सामाजिक- सांस्कृतिक- प्रादेशिक स्थान आणि विकासाचा असमतोल हे समीकरण लक्षात घेतले तर या कामाचे महत्त्व ठसठशीतपणे जाणवू शकते. पुण्यामुंबईतील शिष्टसंमत वर्तुळाच्या बाहेरचे रसरशीत जग नजरेस पडू शकते. आणि एरवीचा प्रमाणभाषेचा, तसेच आताच्या काळातील ‘एक देश एक भाषा’सारखे आग्रह या जिवंतपणावर कसा वरवंटा फिरवत आहेत, तेही लक्षात येऊ शकते. या उपक्रमाच्या निमित्ताने खरे म्हणजे भाषा, बोली, भाषासंस्कृती, कोशनिर्मिती या सगळ्यावर चिंतन आणि चर्चा होणे अपेक्षित आहे. पण अलीकडच्या काळात सगळ्याच बाजूंनी निर्माण झालेला झाकोळ आणि या गोष्टींबाबत प्रत्येकाच्याच टोकदार झालेल्या अस्मिता पाहता भाषा, संस्कृती, प्रथा-परंपरा अशा सगळ्या गोष्टींबद्दल अगत्याने काही बोलणेदेखील धाडसाचे ठरू लागले आहे.

पहिल्यांदा कोशनिर्मितीबद्दल. अलीकडच्या ‘गूगलम् शरणम्’ म्हणणाऱ्या पिढीला कोश या प्रकाराबद्दल किती उत्सुकता, आत्मीयता, कुतूहल असेल हा प्रश्न आहेच, पण वेगवेगळे कोश म्हणजे भाषेची समृद्धी मिरवण्याचे दालन कसे आहे हे त्यांना आवर्जून सांगण्याची गरज आहे. या बाबतीत मराठी किती श्रीमंत आहे, हे मराठी भाषेतील कोशांच्या यादीवर नजर टाकल्यावर लक्षात येते. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकरांच्या पुढाकाराने महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचे २३ खंड प्रकाशित झाले आणि त्यानंतर अनेकांच्या परिश्रमातून भारतीय संस्कृतीकोश, चरित्रकोश, विश्वकोश, म्हणींचा कोश यांसह अनेक कोशांची निर्मिती मराठी भाषेत झाली. ज्ञानोपासनेचे व्रत, एखाद्या विषयाचा ध्यास, संशोधनाची चिकाटी, अविरत परिश्रम या सगळ्याशिवाय कोशनिर्मिती अशक्य आहे. इंटरनेटचा अल्लाउद्दीनचा दिवा हाताशी नव्हता तेव्हाच्या काळात अनेक प्रज्ञावंतांनी कोशनिर्मितीच्या पातळीवर डोंगराएवढे काम करून ठेवले असले तरी पावरी कोशनिर्माते सांगतात तो एक मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे. गुणवत्ता असूनही आदिवासी मुलांच्या शिक्षणात भाषिक अडसर हा मोठा अडथळा ठरतो, म्हणून ही पावरी भाषेतील शब्दकोशाची निर्मिती केल्याचे ते सांगतात. मराठी ही महाराष्ट्राची राज्यभाषा असली तरी वेगवेगळ्या ठिकाणच्या बोली, वेगवेगळ्या समूहांच्या वेगवेगळ्या भाषा प्रमाण मराठीपेक्षा वेगळ्या आहेत. घरी-दारी आपापल्या भाषेत बोलणारे मूल शाळेत जाऊ लागले की त्याला ती प्रमाणभाषा शिकावी लागते. ती हळूहळू शिकता येतेही, पण सुरुवातीला ती समजत नाही म्हणून साहजिकच परकी वाटू लागते. म्हणजे एके काळी एतद्देशीयांना इंग्रजी जेवढी परकी वाटत असे तितकीच या मुलांसाठी आजही मराठी प्रमाणभाषा परकी. राज्याच्या कानाकोपऱ्यात कुठेही जा, हीच परिस्थिती आहे. जी भाषा त्यांच्या कधी कानावरच पडलेली नसते, तीमधून शिकावे लागणे हे त्या पाच-सात वर्षांच्या जीवावर अन्याय करणारे ठरते. याचा विचार फारसा केला जात नाही, पण तो कधी तरी करणे आवश्यक आहे. या बाबतीत पुण्यामुंबईतल्या शालेय शिक्षण घेणाऱ्या मुलांना जमेस धरण्याची गरज नाही कारण आजकाल ती जन्मल्यापासून बाराखडीऐवजी एबीसीडी गिरवू लागतात आणि उच्च शिक्षणाच्या मिषाने ती थेट इंग्लंड-अमेरिकेतच जातील अशी स्वप्ने त्यांचे आईबाप बघत असतात. इथल्या भाषेशी, संस्कृतीशी, समाजाशी त्यांचा कसलाच संबंध येऊ नये अशी व्यवस्था केल्यानंतर इथल्या प्रसारमाध्यमांमधून, दूरचित्रवाणीवरील कार्यक्रमांमधून मराठीची कशी वाट लागत चालली आहे, असा गळा काढायला ते मोकळे होतात. तो वेगळा मुद्दा. पण मुलांना त्यांच्या मातृभाषेत शिकवले जावे, ते शक्य नसेल तर त्यांच्या मातृभाषेतील शब्दांना प्रचलित महत्त्वाच्या भाषेत कोणते शब्द आहेत, याची ओळख करून देणारा कोश निर्माण करावा ही कल्पनाच भाषेसंदर्भात उभारी देणारी आहे. यामधून पावरी भाषेचे दस्तावेजीकरण तर झालेच आहे शिवाय ती भाषा बोलणाऱ्या मुलांच्या शिक्षणातील मोठा अडथळा दूर होतो आहे. भिलाला, निहारी या बोलीभाषांमधील कोशनिर्मितीचे कामही पूर्ण होत आले आहे. २०१३ साली अहिराणी भाषेचा शब्दकोश तयार झाला. या पद्धतीने राज्याच्या इतर भागात राहणाऱ्या वेगवेगळ्या बोली भाषा बोलणाऱ्या समूहांमधील जाणत्यांनी पुढाकार घेतला आणि त्या त्या भाषेत अशा पद्धतीच्या कोशनिर्मितीचा घाट घातला तर मोठे काम उभे राहीलच शिवाय त्या त्या भाषांचे दस्तावेजीकरण, शिक्षणाचे सुलभीकरण होईल.

> **जागतिकीकरण, इंटरनेट यांच्या रेट्यात भाषिक राजकारण अधिक गुंतागुंतीचे होत असताना छोट्या समूहांची भाषा टिकणे तर अधिकच मोलाचे...**

एवढा सगळा घाट घालण्याची गरजच काय असा प्रश्न एखाद्याला पडू शकतो. त्याचे उत्तर कोणत्याही कॅलक्युलेटरवर मिळत नाही. कारण काही प्रश्न आणि त्यांची उत्तरे ही आकडेमोडीच्या, फायद्यातोट्याच्या पलीकडे असतात. ज्ञात आकडेवारीनुसार जगात आजघडीला ७ हजार ७१७ भाषा बोलल्या जातात. भारतीय संविधानाने आठव्या अनुसूचीमध्ये २२ भाषांची नोंद केली, पण २०११ च्या जनगणनेतील माहितीनुसार, १२१ भाषा अशा आहेत, ज्या बोलणाऱ्यांची संख्या दहा हजारांपेक्षा जास्त आहे. त्यापेक्षा कमी संख्येच्या समूहांनी आपापल्या मातृभाषा म्हणून जनगणनेत नोंदवलेल्या भाषांची संख्याही प्रचंड आहे. भाषेसंदर्भातली लक्षात घेण्याची पहिली गोष्ट म्हणजे ही पृथ्वी जशी आपण कोणीही निर्माण केलेली नाही, पण तिच्या रक्षणाची जबाबदारी आपल्या सगळ्यांची आहे, तशीच कुठलीही भाषा कुणा एका माणसाने निर्माण केलेली नाही, पण तिच्या रक्षणाची जबाबदारी सगळ्यांची आहे. आदिमानवाच्या हुंकारापासून विकसित, उत्क्रांत होत गेलेले भाषा हे मानवी संस्कृतीचे फार मोठे संचित आहे. प्रत्येक भाषा तिची तिची संस्कृती घेऊन आजच्या टप्प्यापर्यंत येऊन पोहोचली आहे. दर पिढीगणिक तिच्यात भर पडत गेली आहे. ती बदलत गेली आहे. माणसाइतकीच ती जिवंत आहे.

काळाच्या ओघात काही भाषा संपून गेल्या, काही वरचढ ठरल्या, काही उत्क्रांत झाल्या, पण ते त्या त्या स्थानिक पातळीपुरते होते. पण गेल्या दोनअडीचशे वर्षांतील औद्योगिकीकरण, जागतिकीकरण या प्रक्रियांच्या रेट्यात भाषिक राजकारण अधिक गुंतागुंतीचे होत गेले. दूरचित्रवाणीसारख्या माध्यमांनी सांस्कृतिक सपाटीकरणाला मोठा हातभार लावला आणि त्याचा सगळ्यात मोठा परिणाम भाषांवर झाला. व्यापाराची आणि नंतर आर्थिक समृद्धीची भाषा म्हणून इंग्रजीला महत्त्व आले. इंटरनेटमुळे जग जवळ आले, पण सगळ्यांना समजणारी एक समान भाषा असणे आवश्यक होऊन बसले. या सगळ्यात होणाऱ्या भाषिक पीछेहाटीला कसे तोंड द्यायचे हा भारतीय भाषांपुढे असलेला तिढा अजूनही सुटलेला नाही. त्यात राष्ट्रीय एकात्मतेच्या नावाखाली ‘एक देश, एक भाषा’ हे धोरण हळूहळू पुढे रेटले जात आहे. विविध रंगांची, वासांची फुले असलेला गुच्छ काढून टाकून फक्त कमळाचा गुच्छ पुढे करण्यासारखे हे आहे. अर्थात हे इतके सोपे नाही, कारण भाषा माणसाला त्याच्या अस्तित्वाइतकीच प्रिय असते. त्याला शक्य असेल तर तो ती टिकवण्यासाठी जिवापाड प्रयत्न करतो. निदान काही माणसे तरी तसा विचार करतात. पावरीचा शब्दकोश हा त्यातलाच एक प्रयत्न. पावरीच्या पाव्याचे सूर मंजूळ वाटत आहेत, ते त्यामुळेच.

# अतिमागासतेचीही ७५ वर्षे...

वन -जन -मन

देवेंद्र गावंडे

**प्रतीकात्मकतेच्या राजकारणाने आदिवासींची स्थिती सुधारत नसते, हे स्वयंसेवी संस्थांनाच ज्या प्रकारे सरसकट आदिवासींचे प्रतिनिधी मानले गेले त्यातूनही दिसते. प्रश्न आहे तो, आता ७५ वर्षांनी तरी आपण काय करणार आहोत, याचा...**

**अवघा देश** स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना याच देशातील आदिवासी समाजामधील ७५ आदिम जमातींपैकी (पीव्हीटीजी) ९२ टक्के माडियांना तर ७४ टक्के कोलामांना ‘स्वातंत्र्य’ म्हणजे काय हेच ठाऊक नाही. एका ताज्या सर्वेक्षणातून या दोन जमातींचे जगणे आपल्यापुढे मांडणारी ही आकडेवारी उघड झाली, तिचे पुढले निष्कर्ष कुणालाही विचार करायला लावणारे आहेत.

देशाच्या विविध भागात भाषिक वादांनी टोक गाठले असताना माडियांमधील ९१ तर कोलामांमधील ६२ टक्के लोकांना ‘भाषेचा अधिकार’ माहिती नाही. अजूनही त्यांच्याच बोलीभाषेत रमणाऱ्या या जमातीतील ९६ टक्के लोकांना प्रशासन व इतरांशी व्यवहार करताना भाषेचा अडसर जाणवतो. याच आदिवासी समूहातील द्रौपदी मुर्मू राष्ट्रपतीपदी विराजमान झाल्या; पण माडियांमधील ९४ तर कोलामांमधील ७३ टक्के लोकांना संवैधानिक अधिकार ठाऊक नाहीत. ‘सन्मानाने जगण्याचा अधिकार’ काय असतो हे या दोन्ही जमातीतील ८५ टक्के लोकांना माहिती नाही. त्यांच्या सेवेसाठी असलेले सरकारी कर्मचारी कधी चुकतात. अशी चूक झाली तर तक्रार करण्याचा अधिकार आपल्याला आहे हे या दोन्ही जमातींच्या आकलनापलीकडले. ७० टक्के कोलाम तर ४९ टक्के माडियांकडे सरकारची विविध ओळखपत्रे (शिधापत्रिका, जात प्रमाणपत्र, जन्माचा दाखला) नाही. शिक्षणाच्या आधिकाराविषयी बहुतांश लोक अनभिज्ञ. कौटुंबिक व इतर वाद गावपातळीवर सोडवण्यात धन्यता मानणाऱ्या ६० टक्के कोलाम व ९० टक्के माडियांना फौजदारी कायदे, प्राथमिक गुन्हे अहवाल म्हणजे काय याची कल्पना नाही. साधे बँकेतून पैसे काढायला तालुकास्थळी जायचे असेल तर ८३ टक्के लोकांचा पूर्ण दिवस जातो कारण वाहतुकीची साधने नाहीत. रस्ते व वाहतूक व्यवस्था नसल्यामुळे ६९ टक्के लोक आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचू शकत नाहीत. या जमातींच्या वसाहतीसुद्धा दुर्गम भागात. त्यामुळे ४६ टक्के माडिया तर ३७ टक्के कोलामांना बसप्रवासाची सुविधा नाही.

न्यायालये आहेत हे त्यातल्या केवळ एक टक्का लोकांना ठाऊक पण त्यासाठी लागणारा खर्च आम्ही करू शकत नाही असे या एका टक्क्यातील साऱ्यांचे एकसुरात सांगणे. सरकारी कार्यालयात गेले तर हाकलून लावले जाते, असा अनुभव ३७ टक्क्यांच्या गाठीशी; तर या जमातींचा नेहमी संबंध येणाऱ्या वनखात्याच्या कार्यालयात कामे टाळली जातात असा अनुभव शंभरातील ७५ जणांनी घेतलेला. ३७ टक्के माडिया तर ७५ टक्के कोलामांनी अजून जिल्ह्याचे ठिकाण बघितलेले नाही. ९७ माडिया उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून. त्यांचे वार्षिक उत्पन्न सरासरी ३० हजाराच्या पुढे नाही म्हणजे ८४ रुपये प्रतिदिवस. रोहयोत मिळणाऱ्या मजुरीच्या निम्म्याहून कमी. तीच अवस्था कोलामांची. त्यांचे वार्षिक उत्पन्न फक्त २६ हजार रुपये.



प्रातिनिधिक छायाचित्र

### खांब आहेत, वीज नाही...

२७ टक्के माडियांनी अद्याप विजेचा बल्ब बघितला नाही. याच जमातीतील ५७ टक्के लोकांच्या गावात विजेचे खांब आहेत पण पुरवठा नाही. २१ टक्के कोलाम सुद्धा वीजपुरवठ्यापासून वंचित. ६० टक्के माडियांना पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था ठाऊक नाही तर कोलामांमध्ये हेच प्रमाण ४८ टक्के. ९४ टक्के माडिया तर ९७ टक्के कोलामांना कायद्याची मदत कधी झाली का, या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही. या जमातीतील कुणाकडेही २ ते ५ एकर पेक्षा जास्त शेती नाही. करोनाच्या काळात खूप हाल झाले असे ६६ टक्के कोलाम तर १८ टक्के माडिया सांगतात. या जमातीतील बहुतेकांना वनहक्काचा फायदा मिळाला तो वैयक्तिक स्तरावर. कुणीतरी गावात आले. त्यांनी कागदावर अंगठे घेतले व मालकीचा कागद नंतर आणून दिला अशी उत्तरे देणाऱ्या या जमातींना वनहक्क, त्याच्या समित्या, त्याचे कार्य काय हे ठाऊक नाही.

हे धक्कादायक निष्कर्ष आहेत ‘पाथ फाऊंडेशन’ व बंगळूरुच्या ‘अझीम प्रेमजी विद्यापीठा’ने संयुक्तपणे केलेल्या सर्वेक्षणातले. नुकतीच ब्रिटनची शेवनिंग शिष्यवृत्ती मिळालेले अॅड. दीपक चटप, बोधी रामटेके, अविनाश पोईनकर, शुभम आहाके, लालसू नगोटी, वैष्णव इंगोले या तरुणांनी मे व जूनमध्ये हे सर्वेक्षण केले. प्रगतीच्या गप्पा मारण्यात मश्गुल असलेल्या या देशातील आदिम जमाती किती मागास आहेत हे या अहवालातून ठसठशीतपणे समोर येते.

या दोन्ही जमाती प्रामुख्याने महाराष्ट्रातल्या. यात आणखी समाविष्ट असलेली एक जमात म्हणजे कातकरी. प्रामुख्याने मुंबई, कोकण, उत्तर महाराष्ट्र या परिसरात वसलेली. माडिया व कोलामांच्या तुलनेत कातकरी थोडे पुढारलेले. त्यांचा या सर्वेक्षणात समावेश नव्हता, पण त्यांची स्थिती इतकी वाईट नाही असे या जमातीसाठी काम करणाऱ्या उल्का महाजन यांचे म्हणणे. कामासाठी परराज्यात स्थलांतरण व त्यातून सोसावी लागणाऱ्या वेठबिगारीमुळे त्याच्याही भोवती अन्यायाचे चक्र नेहमी फिरत असते असे त्या सांगतात.

### सरकारचे ‘स्वयंसेवी’ लक्ष

देशाात ‘पेसा’ (पंचायत्स एक्स्टेन्शन टु शेड्यूल्ड एरियाज अॅक्ट) आणि ‘वनहक्क कायदा’ लागू झाल्यावर सरकारला या जमातींच्या विकासाची आठवण झाली. त्याआधी साठच्या दशकातील ढेबर आयोग व नव्वदच्या दशकात भुरिया आयोगाने या जमातींकडे विशेष लक्ष देण्याची शिफारस केली पण सरकारांना वेळच मिळाला नाही. वनहक्काची अंमलबजावणी सुरू झाल्यावर या जमाती मागे पडत आहेत हे लक्षात येताच केंद्राने १७ सप्टेंबर २०१९ ला राज्यांना निर्देश देणारे एक परिपत्रक जारी केले. राज्यांनी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करावी व या जमातीच्या उन्नतीसाठी विशेष प्रयत्न करावेत असे निर्देश दिले. महाराष्ट्रात या आदिवासींची संख्या दोन लाखाच्या आसपास. त्यासाठी ४ कोटी ३० लाखाचा निधी उपलब्ध करून दिला.

त्यातली ७० टक्के रक्कम या जमातींच्या वाट्याला आलीच नाही. या जमातींमधील समस्यांचे संकलन करण्यासाठी अनेक स्वयंसेवी संस्थांना निधीची खिरापत वाटण्यात आली. जेव्हा की मुंबईच्या स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स व पब्लिक पॉलिसीचे प्रमुख प्रा. नीरज हातेकर यांनी याच मुद्द्यावर सर्वेक्षण व अभ्यास करून सरकारला सविस्तर अहवाल आधीच सादर केला होता. त्याकडे दुर्लक्ष करून नव्या संस्थांचे पालनपोषण करण्याचा मार्ग राज्य सरकारने स्वीकारला. त्यातल्या वर्धेच्या ‘धरामित्र’ या संस्थेने चोखपणे काम केले. इतरांनी काय केले हे वेगळे सांगण्याची गरज नाही. संगणक तंत्रज्ञान क्षेत्रात मनुष्यबळाचा पुरवठा करणाऱ्या व मानववंशशास्त्राचा कुठलाही अनुभव नसलेल्या युनिसेक या मुंबईच्या कंपनीला जमातीतील प्रश्नांचा अभ्यास करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. त्यांनी गडचिरोली व यवतमाळात कार्यालये उघडली जी सध्या ओस पडलेली असतात.

केंद्राने २०१९ चे परिपत्रक काढण्याआधी आदिवासींचे अभ्यासक व निवृत्त सनदी अधिकारी ऋषिकेश पांडा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. यावर राज्यातून तीन प्रतिनिधी पाठवायचे होते. ते या तीन जमातींतील शिक्षित तरुण असावेत अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींना यात प्राधान्य देण्यात आले. केंद्राच्या या पुढाकाराचा फायदा केवळ ओडिशा व राजस्थान या राज्यांनी अचूक उचलला. तिथल्या बोंडो व सहारिया या जमातींसाठी अनेक उपक्रम मिळालेल्या निधीतून उभे राहिले. अन्य राज्यात या जमातींच्या विकासाच्या नावावर स्वयंसेवी संस्थांचीच धन झाली. स्वातंत्र्यानंतर या अतिमागास जमातींचा अभ्यास व्हावा, सोबतच इतर आदिवासी जमातींना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रत्येक राज्यात ‘आदिवासी विकास प्रशिक्षण व संशोधन संस्था ’स्थापण्यात आल्या. अजूनही या संस्था कार्यरत आहेत. मात्र जबलपूर (मध्य प्रदेश) व हैद्रबाद (आंध्र प्रदेश, आता तेलंगणा) येथील संस्थांचा अपवाद वगळता कोणत्याही राज्यातील संस्थेने भरीव अशी कामगिरी बजावली नाही. आजही या जमातींवरील अभ्यासासाठी हैद्राबादच्या संस्थेचे पहिले संचालक व्ही.एन. विकेशास्त्री यांचे नाव आदराने घेतले जाते. असा आदर पुन्हा मिळवावा असे इतर राज्यातील अधिकाऱ्यांना कधी वाटले नाही. नोकरीत असताना बदलीत मिळणारी एक नेमणूक या दृष्टिकोनातून या संस्थांकडे बघितले गेले.

या साऱ्याच्या परिणामी, या जमाती नुसत्या मागास राहिल्या नाहीत तर इतरत्र देशाची प्रगती होत असताना आणखी अतिमागास होत गेल्या. वर उल्लेख केलेला ताजा अहवाल हेच सांगतो.

devendra.gawande@expressindia.com

## विश्लेषण

# विदा संरक्षण विधेयक मागे का घेतले?

सुनील कांबळी

**वैयक्तिक गोपनीय** माहिती-विदा संरक्षण विधेयक केंद्र सरकारने अखेर मागे घेतले. आता कालसुसंगत नवे सर्वव्यापी विधेयक आणले जाईल, अशी ग्वाही माहिती व तंत्रज्ञानमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. मात्र, जवळपास पाच वर्षे विविध पातळ्यांवर विचार-विनिमयातून तयार झालेले हे विधेयक का मागे घ्यावे लागले, हे पाहणे आवश्यक आहे.

### विदा म्हणजे काय आणि तिचा भंग कसा होतो?

‘विदा’ हा ‘डेटा’ या इंग्रजी शब्दाचा प्रतिशब्द. पण जिचे संरक्षण विधेयकाद्वारे होणार होते ती विदा म्हणजे एखाद्या व्यक्तीची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे ओळख स्पष्ट करणारी, वापरकर्त्याशी संबंधित कोणतीही माहिती. वैयक्तिक, आर्थिक, बायोमेट्रिक, जात, धर्म याबाबतचा तपशील ही ‘संवेदनशील वैयक्तिक विदा’ असल्याची वर्गवारी या विधेयकात करण्यात आली आहे. अशी गोपनीय माहिती बेकायदा मार्गाने फोडणे, तिचा ताबा मिळवणे, ती वापरणे, इतरांना पाठवणे, त्यात बदल करणे, नष्ट करणे, तसेच तिची गोपनीयता, एकात्मता आणि उपलब्धतेशी तडजोड करणे म्हणजे विदासुरक्षा भंग मानला जाईल, असे हे विधेयक म्हणते.

### विधेयकाचा हेतू काय?

नागरिकांच्या खासगी माहितीचे संरक्षण करणे हा विधेयकाचा मूळ हेतू. त्यानुसार वैयक्तिक माहितीची व्याख्या निश्चित करणे, विदा संरक्षण प्राधिकरण स्थापन करणे, सरकार आणि समाजमाध्यम मंचाकडून होणाऱ्या नागरिकांच्या खासगी माहितीच्या वापराचे नियमन करणे या विधेयकाद्वारे अपेक्षित आहे.

### विधेयकाची पार्श्वभूमी काय?

खासगीपणा हा मूलभूत अधिकार असल्याचा निवाडा देऊन सर्वोच्च न्यायालयाने वैयक्तिक माहिती विदा संरक्षणासाठी कायदेशीर चौकट तयार करण्याचे निर्देश केंद्र सरकारला दिले होते. त्यासाठी २०१७ मध्ये न्या. बी. एन. श्रीकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. समितीने जुलै २०१८ मध्ये विधेयकाचा मसुदा माहिती- तंत्रज्ञान मंत्रालयाला सादर केला. हे विधेयक ११ डिसेंबर २०१९ रोजी संसदेत मांडण्यात आले. त्यानंतर ते संयुक्त संसदीय समितीकडे पाठविण्यात आले. समितीने डिसेंबर २०२१ मध्ये आपला अहवाल संसदेत मांडला. तो सरकारला अनुकूल असल्याचे नमूद करत न्या. श्रीकृष्ण यांनी त्यावर कठोर टीका केली. हे विधेयक अशा प्रक्षिप्त स्वरूपात मंजूर झाले तर भारत हा प्रत्येक नागरिकाच्या प्रत्येक हालचालीवर नजर ठेवू शकणारे ‘ऑर्वेलियन स्टेट’ बनेल, असा इशाराही न्या. श्रीकृष्ण यांनी दिला होता.

### विधेयकावर आक्षेप काय?

संयुक्त संसदीय समितीने या विधेयकाची छाननी करून ८१ दुरुस्त्या सुचविल्या आणि १२ शिफारशी केल्या. तसेच माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील बड्या कंपन्यांनी या विधेयकातील काही तरतुदींना, विशेषतः ‘डेटा लोकलायझेशन’च्या तरतुदीला आक्षेप घेतला. या तरतुदीनुसार, संवेदनशील वैयक्तिक गोपनीय माहिती भारतात साठवून ठेवणे कंपन्यांना बंधनकारक ठरणार आहे. शिवाय, काही नागरी संघटनांनीही विधेयकातील तरतुदींना आक्षेप घेतला. या विधेयकात खासगी कंपन्यांच्या विदा वापरावर नियंत्रण ठेवताना सरकारी यंत्रणांना मात्र अमर्याद सवलत देण्यात आल्याचा त्यांचा आरोप आहे.

### विधेयक मागे का घेतले?

संयुक्त संसदीय समितीने या विधेयकाचा सखोल अभ्यास केला. ‘‘समितीचा अहवाल लक्षात घेऊन व्यापक कायदेशीर चौकट तयार करण्यात येणार असून नवे, कालसुसंगत विधेयक आणण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यमान विधेयक मागे घेत आहोत,’’ केंद्र सरकारने जाहीर केले. मात्र, पाच वर्षे या विधेयकावर परिश्रम घेतले असताना ते मागे घेणे योग्य नाही, असा एक मतप्रवाह आहे.

### समितीने काय सुचविले?

बिगर-वैयक्तिक विदा या विधेयकाच्या चौकटीत आणण्याची शिफारस समितीने केली. समाजमाध्यम कंपन्यांच्या नियमनाबाबतही समितीने शिफारशी केल्या आहेत. मध्यस्थ दर्जा नसलेल्या कंपन्यांना ‘मजकूर प्रकाशक’ म्हणून गणले जाईल आणि संबंधित मजकुरासाठी त्या जबाबदार राहतील, अशी एक शिफारस आहे. समितीने सुचविलेल्या ८१ दुरुस्त्या आणि १२ शिफारशीपैंकी किती गोष्टींना नव्या विधेयकात स्थान मिळेल, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

### बड्या कंपन्यांच्या विरोधामुळे माघार?

बड्या कंपन्यांना हा कायदा नको होता. विधेयक मागे घेतल्याने या कंपन्यांचा विजय झाला असून देश पराभूत झाला, असा आरोप मूळच्या समितीचे सदस्य व काँग्रेस खासदार मनीष तिवारी यांनी केला. मात्र, सरकारने हा आरोप फेटाळला. प्रचंड वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानासाठी आधुनिक कायदेशीर चौकट आवश्यक आहे. त्यामुळे कोणाच्याही दडपणाखाली हा निर्णय घेतलेला नाही, तर पूर्ण विचारांती घेण्यात आला, असे माहिती तंत्रज्ञानमंत्री अश्विनी वैष्णव यांचे म्हणणे आहे.

### नव्या विधेयकात काय असेल? ते कधी मांडणार?

नव्या विधेयकात काही सुधारणा अपेक्षित आहेत. संयुक्त संसदीय समितीने सुचविल्यानुसार विधेयकात विदा संरक्षणाची व्यापक संकल्पना अंतर्भूत असेल. तसेच खासगीपणा हा मूलभूत अधिकार ठरविणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाशी सुसंगत तरतुदी नव्या विधेयकात करण्यात येतील. नवे विधेयक लवकरच मांडण्यात येईल, असे इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री राजीव चंद्रशेखरन यांनी म्हटले आहे. आधीच रखडलेले हे विधेयक विनाविलंब मांडावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. त्यामुळे हे विधेयक संसदेच्या हिवाळी अधिवेशनात आणले जाण्याची शक्यता आहे. त्यातल्या तरतुदी पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

sunil.kambli@expressindia.com

## व्यक्तिवेध

2. The "Limited Review" of the Unaudited Financial Results for the quarter ended 30th June, 2022 pursuant to Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosures Requirements) Regulations, 2015, has been carried out by the Statutory Auditors.
3. The Consolidated Financial Results include the Financial Results of the wholly owned subsidiaries viz. RIECO Industries Limited, Sudarshan Europe B.V. (The Netherlands), Sudarshan (Shanghai) Trading Company Limited (China); Sudarshan Japan Limited; and the step-down subsidiaries viz. Sudarshan North America Inc. (U.S.A.), and Sudarshan Mexico S de R.L.de CV (Mexico) (Hereinafter referred as "Group")
4. On 18th July, 2022, the Company issued 8.45% Non-convertible Debentures amounting to Rs. 9,900.0 lakhs (Rs.10.0 lakhs each), repayable at the end of third year.
5. The above is an extract of the detailed format of Quarterly / Annual Financial Results as required under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The aforesaid Unaudited Financial Results will be uploaded on the Company's website **www.sudarshan.com** and will also be available on the websites of BSE Limited **www.bseindia.com** and The National Stock Exchange of India Limited **www.nseindia.com** for the benefit of shareholders and investors.

**For and on behalf of the Board of Directors**

**Place : Pune**
**Date : 5th August, 2022**

**R.B.RATHI**
Managing Director

---

# Glenmark LIFE SCIENCES

## Glenmark Life Sciences Limited

Registered Office: Plot No. 170-172, Chandramouli Industrial Estate, Mohol Bazarpeth, Solapur - 413 213, India.
Corporate Office: 4th Floor, OIA House, 470, Cardinal Gracious Road, Andheri (E), Mumbai 400 099, India.
Phone No: +91 22 68297979 CIN: L74900PN2011PLC139963;
Website: www.glenmarklifesciences.com; Email: complianceofficer@glenmarklifesciences.com

## UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER 30th JUNE, 2022

(₹ in Millions, unless otherwise stated)

| Sr. No | Particulars | Quarter ended 30 June' 22 (Unaudited) | Quarter ended 31 March' 22 (Audited) | Quarter ended 30 June' 21 (Unaudited) | Year Ended 31 March' 22 (Audited) |
|---|---|---|---|---|---|
| I | **Income** | | | | |
| | Revenue from Operations | 4,898.70 | 5,140.57 | 5,248.97 | 21,232.14 |
| | Other Income | 94.93 | 50.95 | 39.86 | 147.04 |
| | **Total Income** | **4,993.63** | **5,191.52** | **5,288.83** | **21,379.18** |
| II | **Expenses** | | | | |
| | Cost of Materials Consumed | 2,612.50 | 2,612.72 | 2,599.21 | 10,015.63 |
| | Changes in Inventories of Finished Goods and Work-in-Progress | (323.50) | (61.47) | (5.48) | 413.24 |
| | Employee Benefits Expense | 404.56 | 390.83 | 369.42 | 1,687.23 |
| | Finance Costs | 1.35 | 1.25 | 205.50 | 279.62 |
| | Depreciation and Amortisation Expense | 98.79 | 95.54 | 89.19 | 378.77 |
| | Other Expenses | 737.46 | 776.38 | 681.34 | 2,955.44 |
| | **Total Expenses** | **3,531.16** | **3,815.25** | **3,939.18** | **15,729.93** |
| III | **Profit Before Tax (I-II)** | **1,462.47** | **1,376.27** | **1,349.65** | **5,649.25** |
| IV | **Tax Expenses** | | | | |
| | Current Tax | 362.29 | 369.05 | 322.43 | 1,376.27 |
| | Deferred Tax | 12.85 | 18.25 | 18.09 | 85.74 |
| | **Total Tax Expenses** | **375.14** | **387.30** | **340.52** | **1,462.01** |
| V | **Profit for the Period / Year (III-IV)** | **1,087.33** | **988.97** | **1,009.13** | **4,187.24** |
| VI | **Other Comprehensive Income (OCI)** | | | | |
| | **Items that will not be reclassified to profit or loss** | | | | |
| | (a) Re-measurement of the post-employment benefit obligation | 0.39 | 3.93 | (1.76) | 1.30 |
| | (b) Income tax relating to the above | (0.10) | (0.99) | 0.44 | (0.33) |
| | **Total Other Comprehensive Income/(Loss)** | **0.29** | **2.94** | **(1.32)** | **0.97** |
| VII | **Total Comprehensive Income for the Period/ Year (V+VI)** | **1,087.62** | **991.91** | **1,007.81** | **4,188.21** |
| VIII | **Earnings per equity share (Face Value of ₹2/-) (Not Annualised except for the year ended 31st March)** | | | | |
| | (a) Basic (in ₹) | 8.87 | 8.07 | 9.36 | 35.63 |
| | (b) Diluted (in ₹) | 8.87 | 8.07 | 9.36 | 35.63 |
| IX | Paid up Equity Share Capital, Equity Shares of ₹ 2/- each | 245.05 | 245.05 | 215.61 | 245.05 |
| X | Other Equity excluding Revaluation Reserve | | | | 20,298.07 |

*See accompanying notes to the Financial Results*

**Notes:**

1. The Financial Results have been prepared in accordance with Indian Accounting Standards ("Ind AS") prescribed under section 133 of the Companies Act, 2013 read with relevant rules thereunder and in terms of Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 (as amended).
2. The above Financial Results were reviewed by Audit Committee and thereafter approved and taken on record by the Board of Directors at their meeting held on August 04, 2022. These results have been subjected to limited review by statutory auditor who have issued an unmodified conclusion on the said results.
3. Details of Utilisation of IPO Proceeds is as under: (₹ in millions)

| Particulars | Estimated net proceeds as per Prospectus | Revised Net Proceeds | Utilised up to 30 Jun' 22 | Unutilised as on 30 Jun' 22 |
|---|---|---|---|---|
| Payment of outstanding purchase consideration to the Promoter for the spin-off of the API business from the Promoter into our Company pursuant to the Business Purchase Agreement dated October 9, 2018 | 8,000.00 | 8,000.00 | 8,000.00 | - |
| Funding the capital expenditure requirements | 1,527.64 | 1,527.64 | 762.05 | 765.59 |
| General corporate purposes | 576.75 | 494.40 | 494.40 | - |
| **Total** | **10,104.39** | **10,022.04** | **9,256.45** | **765.59** |

Unutilised amount as at June 30, 2022 were held in monitoring agency account and in deposits with scheduled commercial bank.

4. The Company has identified only one segment i.e. Active Pharmaceutical Ingredient (API) as reporting segment based on the information reviewed by Chief Operating Decision Maker (CODM).
5. As at June 30, 2022, pursuant to Employee Stock Option Plan 2021, 8,88,885 options were outstanding, which upon exercise are convertible into equivalent number of equity shares.
6. The figures for the quarter ended 31st March are the balancing figures between the audited figures in respect of the full financial year and the unaudited year to date figures upto the third quarter of the financial year 2021-22.

**For Glenmark Life Sciences Limited**

Mumbai, August 04, 2022

**Yasir Rawjee**
Managing Director & CEO

MITCON
Solutions for Sustainable Tomorrow

# MITCON Consultancy & Engineering Services Limited

Registered Office: First Floor, Kubera Chambers, Shivajinagar, Pune-411 005, Maharashtra, India
Phone: +91-20-2553 4322, 2553 3309 Email: cs@mitconindia.com Website: www.mitconindia.com
CIN: L74140PN1982PLC026933

## Statement of Unaudited Standalone and Consolidated Financial Results for the Quarter Ended 30th June, 2022 (₹ Lakhs)

| Sr. No. | Particulars | Standalone | | | | Consolidated | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter ended | | | Year ended | Quarter ended | | | Year ended |
| | | June 30, 2022 | March 31, 2022 | June 30, 2021 | March 31, 2022 | June 30, 2022 | March 31, 2022 | June 30, 2021 | March 31, 2022 |
| | | (Unaudited) | (Audited) | (Unaudited) | (Audited) | (Unaudited) | (Audited) | (Unaudited) | (Audited) |
| 1 | Total income from operations | 1,307.49 | 1,882.20 | 1,123.80 | 7,945.28 | 1,971.88 | 2,926.84 | 1,685.41 | 10,775.94 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary Items) | 203.02 | 362.87 | 2.82 | 465.95 | 41.59 | 340.07 | 23.70 | 378.98 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary Items) | 203.02 | 362.87 | 2.82 | 465.95 | 41.59 | 340.07 | 23.70 | 378.98 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary Items) | 141.98 | 107.49 | 5.57 | 218.41 | 55.64 | 89.28 | 32.12 | 149.72 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/ (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 140.34 | 165.01 | 5.57 | 275.93 | 334.36 | 387.69 | 24.94 | 440.95 |
| 6 | Equity Share Capital | 1,342.15 | 1,342.15 | 1,342.15 | 1,342.15 | 1,342.15 | 1,342.15 | 1,342.15 | 1,342.15 |
| 7 | Reserves (Excluding Revaluation Reserves) | | | | 9,084.91 | | | | 7,955.76 |
| 8 | Earnings Per Share (of ₹ 10/- each) (for continuing and discontinued operations) (not annualized) | | | | | | | | |
| | Basic (₹) | 1.06 | 0.80 | 0.04 | 1.63 | 0.41 | 0.67 | 0.24 | 1.12 |
| | Diluted (₹) | 1.06 | 0.80 | 0.04 | 1.63 | 0.41 | 0.67 | 0.24 | 1.12 |

**Notes:** The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of Financial Results for the quarter and year ended 30th June, 2022 are available on the Stock Exchange websites (www.nseindia.com) and Company's website (www.mitconindia.com).

For MITCON Consultancy & Engineering Services Limited
Sd/-
**Ankita Agarwal**
Company Secretary & Compliance Officer

Place: Pune
Date: August 05, 2022



SBI

भारतीय स्टेट बँक, स्ट्रेस्ड ॲसेट रिकव्हरी शाखा, (सार्ब) पुणे, वर्धमान बिल्डींग, २रा मजला, ३२१/ए/३, महात्मा फुले पेठ, सेवन लव्हज चौक, शंकरशेठ रोड, पुणे- ४२.
फोन : ०२०-२६४४६०४३/६०४४. मेल : sbi.10151@sbi.co.in. अधिकृत अधिकारी : सौ. पद्मजा पोळ,मेल : Padmaja.pol@sbi.co.in, मोबा. नं. ७८७५२५५९९४.

## (ई-लिलाव विक्री नोटीस)

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये बँकेस तारण दिलेल्या अचल मालमत्तेची विक्री

खाली सही करणार अधिकृत अधिकारी **भारतीय स्टेट बँक** यांनी सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(४)अन्वये खाली दर्शविलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. तमाम जनतेस' **जसे आहे तसे आणि जे काही आहे ते व तिथे जे जे काही असेल ते**' या तत्वावर लिलाव (ई ऑक्शन) करण्याचे ठरविले आहे.

| १) कर्जदारांची नावे | जामिनदाराचे नाव | येणे रक्कम ज्याकरिता मालमत्ता विक्रीस काढली आहे |
|---|---|---|
| सौ. उमा रिझवाणी आणि श्री. अमित कुमार | ---- | दि. १८.११.२०२१ रोजी रु. ३७,५१,६०८/- (**रुपये सदतीस लाख एक्कावन्न हजार सहाशे आठ फक्त**) अधिक करारातील दरानुसार होणारे पुढील व्याज, झालेले व होणारे कायदेशीर खर्च, शुल्क इत्यादी. |

मालमत्ता धारकांची नावे : सौ. उमा रिझवाणी आणि श्री. अमित कुमार

| मालमत्तेचा तपशिल | राखीव किंमत | बयाणा रक्कम (इएमडी) | बोली वाढ रक्कम |
|---|---|---|---|
| गाव माण, ता. मुळशी जि. पुणे- ४११०५७ येथील एमआयडीसी फेज- ३, व्हीएच टाऊनशिप प्रा. लि., (वोर्नाडो हिंजवडी टाऊनशिप प्रा. लि.), राजीव गांधी इन्फोटेक पार्क मधील प्लॉट नं. आर-२/१ वरील द क्लिफ गार्डन प्रोजेक्ट मधील विंग-डी, (डेझी) सहावा मजल्यावरील **फ्लॅट क्रमांक ६०३**, एकूण क्षेत्र ६१.३३ चौ. मी. आणि बाल्कनी क्षेत्र ७.२४ चौ. मी., (**प्रत्यक्ष ताबा**) | रु. ५४.७२ लाख | रु. ५.४८ लाख | रु. ०.२० लाख |

ई-लिलावाची तारीख/वेळ : दिनांक : १२.०९.२०२२ वेळ : सकाळी ११.०० ते दु. १.०० वा. प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्यादित वाढीव वेळेसह

पोर्टलवर असलेल्या ग्लोबल वॅलेटमध्ये दि. ०९.०९.२०२२ रोजी सायं. ५.०० पूर्वी बयाणा रक्कम जमा करावयाची आहे. | मालमत्ता पाहणीची तारीख व वेळ : दि. २०.०८.२०२२ रोजी सकाळी ११.३० ते दु. १.३० वा.

राखीव किमतीच्याखाली कोणतीही मालमत्ता विकली जाणार नाही.

| २) कर्जदारांची नावे | जामिनदाराचे नाव | येणे रक्कम ज्याकरिता मालमत्ता विक्रीस काढली आहे |
|---|---|---|
| मे. एस. पी. इंजिनिअर्स १) श्री. प्रशांत चंद्रकांत चौधरी भागीदार (मयत) २) श्री. संतोष बापुसाहेब कुंजीर, भागीदार; ३) श्री. चंद्रशेखर प्रभाकर देशमुख, भागीदार. | १) श्री. प्रशांत चंद्रकांत चौधरी (मयत) यांची पत्नी आणि कायदेशीर वारस श्रीमती. जान्हवी प्रशांत चौधरी. २) श्री. संतोष बापुसाहेब कुंजीर ३) श्री. चंद्रशेखर प्रभाकर देशमुख; ४) श्री. प्रभाकरराव लक्ष्मण सातपुते; ५) श्री. अमित अनिल डुंबरे; ६) सौ. रोहिणी चंद्रशेखर देशमुख ७) सौ. ज्योती संतोष कुंजीर; ८) श्री. सिध्दार्थ विजय शहा. | दि. २९.०२.२०१६ रोजी रु. ३,८६,०७,७०७.१५ (**रू. तीन कोटी शहाऐंशी लाख सात हजार सातशे सात आणि पैसे पंधरा फक्त) अधिक खाते बंद होईपर्यंतचे व्याज, खर्च, शुल्क इ.** |

मालमत्ता धारकांची नावे : श्री. प्रशांत चंद्रकांत चौधरी (भागीदार आणि जामीनदार) (मयत) यांची पत्नी आणि कायदेशीर वारस श्रीमती. जान्हवी प्रशांत चौधरी.

| मालमत्तेचा तपशिल | राखीव किंमत | बयाणा रक्कम (ईएमडी) | बोली वाढ रक्कम |
|---|---|---|---|
| बावधन खुर्द, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२१ येथील सर्व्हे नं. ६ (भाग) मधील एनडीए पाषाण रस्ता, डी. एस. के. रानवारा को. ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी लि. मधील शाल्मली बिल्डींग क्र. १९ मधील **फ्लॅट क्र. ९०३**, बिल्टअप क्षेत्रफळ ५५०.९१ चौ. फूट. (**प्रत्यक्ष ताबा) Property ID- SBIN10151004** | रु. ३८.०० लाख | रु. ३.८० लाख | रु. ०.२५ लाख |

| ३) कर्जदारांची नावे | जामिनदाराचे नाव | येणे रक्कम ज्याकरिता मालमत्ता विक्रीस काढली आहे |
|---|---|---|
| मेसर्स ग्लोबल कॉन्स्ट्रो अँड प्रॉपर्टी सोल्युशन्स | श्री. अनिल वसंतराव मुंडे आणि श्री. राजेश मुरलीधर कावळे | दि. २७.०५.२०२१ रोजी रु. ४७,४८,९०४.०२ (**रू. सत्तेचाळीस लाख अठ्ठेचाळीस हजार नऊशे चार आणि पैसे दोन फक्त**) अधिक खाते बंद होईपर्यंतचे पुढील व्याज, खर्च, शुल्क इ. |

मालमत्ता धारकांची नावे : श्री. अनिल वसंतराव मुंडे आणि श्री. राजेश मुरलीधर कावळे

| मालमत्तेचा तपशिल | राखीव किंमत | बयाणा रक्कम (इएमडी) | बोली वाढ रक्कम |
|---|---|---|---|
| रावेत गाव, ता. हवेली, जि. पुणे येथील सेक्टर नं. ३२ए मधील स्थानिक व्यावसायिक प्लॉट नं. एल. सी. १/३ वरील ''हार्मोनी'' नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील सी विंग, पहिल्या मजल्यावरील दुकान नं. १३. कार्पेट क्षेत्र- १९.२० चौ. मी. अधिक पोटमाळा याचे क्षेत्र- ५.७६ चौ. मी. (**प्रतिकात्मक ताबा**) **Property ID- SBIN10151006** | रु. ३०.०० लाख | रु. ३.०० लाख | रु. ०.२५ लाख |

| ४) कर्जदारांची नावे | जामिनदाराचे नाव | येणे रक्कम ज्याकरिता मालमत्ता विक्रीस काढली आहे |
|---|---|---|
| श्री. अलेक्स जॅकोब आणि सौ. प्रियांका अलेक्स जॅकोब | ---- | दि. १३.०५.२०१९ रोजी रु. ४६,००,६१३/- (**रू. सेहेचाळीस लाख सहाशे तेरा फक्त**) अधिक पुढील व्याज, खर्च, शुल्क इ. |

मालमत्ता धारकांची नावे : श्री. अलेक्स जॅकोब आणि सौ. प्रियांका अलेक्स जॅकोब

| मालमत्तेचा तपशिल | राखीव किंमत | बयाणा रक्कम (ईएमडी) | बोली वाढ रक्कम |
|---|---|---|---|
| **श्री. अलेक्स जॅकोब आणि सौ. प्रियांका अलेक्स जॅकोब यांचे नावे असलेला फ्लॅट नं. ६०२,** सहावा मजला, सी विंग, ''स्वस्तिक गंगा'', बिल्ट अप क्षेत्र १३३२ चौ. फूट, सर्व्हे नं. ६४, हिस्सा नं. ७, ८ ए, ८बी/१/१, ८ए+८बी/१/२, होमवुड सोसायटी जवळ, घोरपडी, ता. हवेली, जि. पुणे- ४११००१. (**प्रत्यक्ष ताबा**) **Property ID- SBIN10151986** | रु. ९०.०० लाख | रु. ९.०० लाख | रु. ०.२५ लाख |

| ५) कर्जदारांची नावे | जामिनदाराचे नाव | येणे रक्कम ज्याकरिता मालमत्ता विक्रीस काढली आहे |
|---|---|---|
| श्री. शरद बाबासाहेब दहीफळे | ---- | दि. २०.०४.२०१७ रोजी रु. २६,८४,७९२/- (**रू. सव्वीस लाख चौऱ्याऐंशी हजार सातशे ब्याण्णव फक्त**) अधिक करारातील दरानुसार होणारे पुढील व्याज, खर्च, शुल्क इ. |

मालमत्ता धारकांची नावे : श्री. शरद बाबासाहेब दहीफळे

| मालमत्तेचा तपशिल | राखीव किंमत | बयाणा रक्कम (इएमडी) | बोली वाढ रक्कम |
|---|---|---|---|
| फ्लॅट नं. १, तळमजला, विंग-बी, सिल्व्हर नेस्ट अपार्टमेंट, गट नं. ६९६, कोरेगाव भिमा, ता. शिरूर, जि. पुणे, कार्पेट क्षेत्र- ५४८ चौ. फूट म्हणजेच ५०.९२ चौ. मी. अधिक बागेचे क्षेत्र- ६८९ चौ. फूट. (**प्रत्यक्ष ताबा) Property ID- SBIN200036865088** | रु. १८.९० लाख | रु. १.८९ लाख | रु. ०.२५ लाख |

| ६) कर्जदारांची नावे | जामिनदाराचे नाव | येणे रक्कम ज्याकरिता मालमत्ता विक्रीस काढली आहे |
|---|---|---|
| १) श्री. चंद्रशेखर रत्नाकर प्रभू, २) श्री. रत्नाकर नारायण प्रभू, ३) सौ. सरिता रत्नाकर प्रभू. | ---- | दि. २५.०१.२०२२ रोजी रु. ३१,२४,६०६.०० (**रू. एकतीस लाख चोवीस हजार सहाशे सहा फक्त**) अधिक पुढील व्याज, प्रासंगिक खर्च, शुल्क इत्यादी |

मालमत्ता धारकांची नावे : १) श्री. चंद्रशेखर रत्नाकर प्रभू, २) श्री. रत्नाकर नारायण प्रभू, ३) सौ. सरिता रत्नाकर प्रभू.

| मालमत्तेचा तपशिल | राखीव किंमत | बयाणा रक्कम(इएमडी) | बोली वाढ रक्कम |
|---|---|---|---|
| रहिवासी फ्लॅट क्र. ४०१, (सुधारित मंजूर बिल्डिंग प्लॅननुसार चौथ्या मजल्यावरील युनिट नं. १) कार्पेट क्षेत्र ६३.०३ चौ. मी. बाल्कनी क्षेत्र ५.९२ चौ. मी., लगतचे टेरेस क्षेत्र ५.९० चौ. मी., रेरा, बिल्डिंग/विंग डी २ मजल्यावरील आणि एक मोकळे कार पार्किंगच्या हक्कासह /नं. डी२-३६, क्षेत्र ९.६६ चौ. मी. ''विंडचाईम होम्स'' कॉम्प्लेक्स, गट नं. २५८, २५९, २६०, २७४, सोमाटणे गाव, मावळ, जि. पुणे, ४१०५०६. (**प्रत्यक्ष ताबा**) **Property ID- SBIN200024429606** | रु. ३२.१५ लाख | रु. ३.२२ लाख | रु. ०.२५ लाख |

| ७) कर्जदारांची नावे | जामिनदाराचे नाव | येणे रक्कम ज्याकरिता मालमत्ता विक्रीस काढली आहे |
|---|---|---|
| मेसर्स आभा एन्व्होकेअर प्रायव्हेट लिमिटेड | १) श्री. सुसांता कुमार मंडल, २) सौ. सुस्मिता सुसांता मंडल | दि. २८.०१.२०१९ रोजी रु. १,६०,६३,८३८.०० (**रु. एक कोटी साठ लाख त्रेसष्ट हजार आठशे अडतीस फक्त) अधिक पुढील व्याज, प्रासंगिक खर्च, शुल्क इत्यादी** |

मालमत्ता धारकांची नावे : सौ. सुस्मिता सुसांता मंडल

| मालमत्तेचा तपशिल | राखीव किंमत | बयाणा रक्कम(इएमडी) | बोली वाढ रक्कम |
|---|---|---|---|
| फ्लॅट क्र. ५०४, विंग -बी, प्रोजेक्ट 'अक्षय चंदन', कार्पेट क्षेत्र ७०५ चौ. फू. म्हणजेच ६५.५२ चौ. मी. व बिल्ट अप क्षेत्र ८८१ चौ.फू. म्हणजेच ८१.८७ चौ. मी. + लागून टेरेस क्षेत्र १७२ चौ.फू. म्हणजेच १५.९८ चौ. मी., गांव-मौजे थेरगांव, स. क्र. १४/६ए + ६बी/१, ता. मुळशी, जि. पुणे (**प्रतिकात्मक ताबा**) **Property ID- SBIN200028639903** | रु. ३९.६४ लाख | रु. ३.९६ लाख | रु. ०.२५ लाख |

ई-लिलावाची तारीख/वेळ : दिनांक : २६.०८.२०२२ वेळ : सकाळी ११.०० ते दु. १.०० वा. प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्यादित वाढीव वेळेसह

पोर्टलवर असलेल्या ग्लोबल वॅलेटमध्ये दि. २५.०८.२०२२ रोजी सायं. ५.०० पूर्वी बयाणा रक्कम जमा करावयाची आहे. | मालमत्ता पाहणीची तारीख व वेळ : दि. १२.०८.२०२२ रोजी सकाळी ११.३० ते दु. १.३० वा.

अनुक्रमांक १-३ साठी संपर्क मो. ७५०६२५९८३३ आणि अनुक्रमांक ४-७ साठी संपर्क मो. ९९७०००६०४८
राखीव किमतीच्याखाली कोणतीही मालमत्ता विकली जाणार नाही.

**ई लिलावाच्या संक्षिप्त अटी व शर्ती. विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम २००२ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसारच होईल.**
**ई लिलाव ' जसे आहे तसे आणि जे काही आहे ते व तिथे जे जे काही असेल ते' या तत्वावर ऑन लाईन पध्दतीने करण्यात येईल.**

**१)** लिलाव आयबीएपीआय च्या **https://ibapi.in** या टर्मिनलद्वारा करण्यात येईल. याच संकेत स्थळावर ई लिलाव डॉक्युमेंट, ज्यामधे ऑन लाईन ई लिलावाचे निविदा फॉर्म, घोषणापत्र, सर्वसाधारण अटी व शर्ती इ. उपलब्ध असतील. **२)** बोलीदारांना सूचित करण्यात येते की त्यांनी ऑन लाईन सहभाग घेण्यासाठी आमचे सेवा पुरवठादार एमएसटीसी लि. यांच्या **www.mstcecommerce.com** या संकेत स्थळाला भेट द्यावी.इच्छुक बोलीदारांनी लिलावाच्या **https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/index.jsp** या संकेत स्थळावर आपली नोंदणी करणे आवश्यक आहे. **३)** नोंदणी होण्यासाठी अंदाजे कमीत कमी तीन दिवसांचा कालावधी लागत असल्याने इच्छुक बोलीदारांनी लिलाव तारखेपूर्वीच आपली नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी. **४)** कालावधी आणि भरणा करण्याची पध्दत: यशस्वी बोलीदारास अधिकृत अधिकारी यांनी प्रस्ताव मंजूर केल्यानंतर निश्चित झालेल्या किंमतीच्या २५% इतकी रक्कम ( भरलेला ईएमडी वजा करुन) विक्री निश्चिती होताच त्याच दिवशी किंवा दुसऱ्या कार्यालयीन दिवशी भरणे आवश्यक आहे.. तसे न केल्यास त्याने भरलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. ठरलेल्या किमतीच्या ७५% इतकी उर्वरीत रक्कम तारण मिळकतीच्या विक्री निश्चितीच्या नंतर १५ दिवसांचे आत किंवा कर्ज देणाऱ्या संस्थेने मान्यता दिल्यास वाढीव कालावधीत भरावयाची आहे. हा कालावधी कोणत्याही परिस्थितीत विक्री लिलाव तारखेपासून तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही. **५)** ईएमडी/बयाणा रक्कम **https://ibapi.in** या संकेत स्थळावरील ग्लोबल ईएमडी वॅलेटमधे जमा करावयाची आहे. बोलीदाराने ही ईएमडीची रक्कम त्याचे बँक खात्यावर नावे पडून ग्लोबल वॅलेटमधे एम एसटीसी मध्ये एनईएफटी/आर टी जी एस द्वारा जमा झाली आहे किंवा नाही याची खातरजमा करावयाची आहे. जर बोलीदाराचे वॅलेटमधे ही रक्कम जमा झालेली असेल तरच सिस्टीम त्याला लिलावात सहभागी करुन घेवू शकेल. अन्यथा त्याला लिलाव प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. **६)** मिळकतीबाबतची अधिक माहिती आणि मिळकतीचे फोटो यासाठी आणि या संबंधातील अधिक स्पष्टीकरणासाठी **https://ibapi.in** या संकेत स्थळावर व **१८०० १० २५०२६**'किंवा '**०११-४११०६१३१** क्रमांकावर संपर्क करावा. **७)** जर लिलाव प्रक्रिया यशस्वी होवू शकली नाही तर बोलीदाराने भरलेल्या बयाणा रकमेच्या परताव्यासाठी त्याच्या वॅलेट मार्फत बँकेकडे त्याच्या एम एस टीसी कडे असलेल्या खात्यामार्फत विनंती सादर करावयास हवी. अशी रक्कम त्याला त्याच्या बँक खात्यामार्फतच परत केली जाईल. अधिक माहितीसाठी कृपया बँकेच्या अधिकृत अधिकारी यांचेशी संपर्क करावा. **८)** यशस्वी बोलीदारास अधिकृत अधिकारी यांनी प्रस्ताव स्वीकारताच किमतीच्या २५% इतकी रक्कम (त्याने भरलेली बयाणा रक्कम वजा करुन) लगेच, म्हणजे लिलावाचे दिवशीच किंवा पुढच्या कार्यालयीन दिवशी भरावयाची आहे. असे न केल्यास त्याने भरलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. विक्री किमतीमधील उर्वरीत ७५% रक्कम तारण मिळकतीच्या लिलाव तारखेपासून १५ दिवसांचे आत भरावयाची आहे. **९)** अधिकृत अधिकारी यांचे माहिती आणि ज्ञानानुसार सदर मिळकतीवर अन्य कोणताही बोजा नाही. तथापि, इच्छुक बोलीदाराने आपल्या स्वतंत्र यंत्रणेमार्फत मिळकतीवर असलेला बोजा, मालकी हक्कासंबंधातील खात्री, त्यावर असलेले दावे, हक्क, देणी इ. बाबतची खातरजमा लिलावात बोली सादर करण्यापूर्वी करुन घ्यावी. ई लिलावाची जाहिरात म्हणजे बँकेने दिलेली कोणत्याही प्रकारची मंजुरी किंवा आश्वासन किंवा निवेदन नाही. मिळकत बँकेस माहीत असलेले किंवा नसलेले तिवर असलेले कोणत्याही प्रकारचे बोजे इ. यासह विकली जात आहे. अधिकृत अधिकारी व तारणावर कर्ज देणारी वित्तसंस्था सदर मिळकतीवरील भविष्यातील कोणत्याही प्रकारच्या बोजा, दावे, हक्क, देणी इ. बाबत जबाबदार असणार नाही. सदर विक्री ही सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ मधील तरतुदीनुसारच होईल. ई लिलावाच्या अन्य अटी व शर्ती **www.sbi.co.in** आणि **https://ibapi.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेल्या आहेत. **१०)** यशस्वी बोलीदारास परिशिष्टानुसार ई लिलावाचे वेळी त्याने कबूल केलेली अंतिम किंमत व लिलाव स्वीकृत असल्याचे निदर्शक म्हणून आणि लिलावाचे अटी शर्तीव्यतिरिक्त अन्य अटी नाही हे नमूद करत, ठरलेली किंमत इ.बाबतचे पत्र सही शिक्यानिशी तिथेच सादर करावयाचे आहे. **११)** जर ई लिलाव प्रक्रियेदरम्यान निर्धारित मुदतीत कोणतीच ऑफर/प्रस्ताव आला नाही तर स्टेट बँक ऑफ इंडिया त्यांचे अधिकारात सुरुवातीची किंमत बदललेल किंवा ई लिलाव प्रक्रियाच रद्द करेल किंवा पारंपारीक निविदा पध्दतीने लिलाव विक्री करेल. **१२)** कोणत्याही कारणाने बोलीदाराला लिलावाचे वेळी जर संकेत स्थळावर जाता आले नाही, किंवा त्यात काही अडथळे आले तर त्यासाठी बँक किंवा बँकेस या संबंधातली सेवा पुरविणारे सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाहीत. **१३)** इच्छुक बोलीदारांनी सेवा पुरवठादारांनी निर्धारित केलेया ई लिलावाच्या अटी व शर्ती मंजूर असल्याबाबतचे स्वीकारपत्र लिलावात सहभागी होण्यापूर्वी द्यावयाचे आहे. **१४)** एकदा बोली सादर केल्यावर बोलीदारास सादर केलेली बोली रद्द करता येणार नाही, किंवा माघारी घेता येणार नाही आणि त्याला अंतिम बोलीला मिळकत विकत घेणे बंधनकारक असेल. ई लिलावाच्या अटींपैकी कोणतीही अट पूर्ण करण्यात बोलीदार अपयशी झाला तर त्याने भरलेली रक्कम जप्त केली जाईल. **१५)** लिलावात जो कुणी यशस्वी होईल त्याची घोषणा अधिकृत अधिकारी करतील आणि त्यांचा हा निर्णय सर्व बोलीदारांवर बंधनकारकच असेल. **१६)** कोणतेही कारण न देता अधिकृत अधिकारी यशस्वी बोलीदाराची घोषणा करण्यापूर्वी कोणतेही कारण न देता लिलाव प्रक्रिया रद्द करु शकतील. **१७)** बयाणा रकमेच्या भरण्याशिवाय सादर झालेली बोली सरासर नाकारण्यात येईल. तसेच मिळकत राखीव किमतीपेक्षा कमी किमतीस विकली जाणार नाही. **१८)** अटी असलेले प्रस्ताव अपात्र समजण्यात येतील. कृपया नोंद घ्यावी की एकदा प्रस्ताव सादर केल्यानंतर त्यात बदल सुचविणारी विनंती असणारा कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही. **१९)** अयश्स्वी बोलीदारांनी भरलेली बयाणा रक्कम त्यांनी नमूद केलेल्या बँक खात्यावर परत करण्यात येईल. बोलीदाराला या रकमेवर व्याज, खर्च किंवा अन्य आकार मागण्याचा अधिकार असणार नाही. **२०)** सर्वाधिक किमतीचीच बोली स्वीकारली पाहिजे असे अधिकृत अधिकारी यांचेवर बंधन नाही. त्यांच्याकडे कोणतीही किंवा सर्व बोली स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे, लिलावप्रक्रिया स्थगित करणे, पुढे ढकलणे किंवा ई लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचे सर्वाधिकार असून त्यासाठी कोणतेही कारण देणे त्यांचेवर बंधनकारक नाही. विक्री ही सिक्युअर्ड क्रेडिटर यांच्या अंतिम मान्यते अधीनच असणार आहे. **२१)** अटींची पूर्तता न करणारा (डिफॉल्टींग बोलीदार) बोलीदार यास भविष्यात सदर मिळकत विकल्यानंतर त्यातून कोणत्याही प्रकारे त्याची जप्त केलेली रक्कम किंवा त्याचा हिस्सा मागण्याचा अधिकार असणार नाही. **२२)** यशस्वी बोलीदारास सदर मिळकत त्याचे नावावर करण्यासाठी लागणारे सर्व खर्च, स्टँप ड्युटी/ अतिरिक्त स्टँप ड्युटी, नोंदणी खर्च, फी, ट्रान्स्फर आकार इ. स्वत:ला करावे लागतील. **२३)** जर लिलाव प्रक्रियेदरम्यान बोली प्रस्तावाच्या वैधतेविषयी, बोली रकमेविषयी, बयाणा रकमेविषयी किंवा बोलीदाराच्या पात्रतेविषयी किंवा बोलीदाराचा प्रतिनिधी म्हणून आलेल्या व्यक्तीच्या बाबत काही वाद उपस्थित झाला तर अधिकृत अधिकारी यांनी त्याचा लावलेला अर्थ व घेतलेला निर्णय अंतिम असणार आहे. अशा परिस्थितीत बँक आपल्या अधिकारात ही प्रक्रिया रद्द करु शकेल आणि तारण मिळकत पुन्हा बँकेला सोयीस्कर असलेल्या तारीख आणि वेळेला विक्रीसाठी सादर करु शकेल. कोणत्याही प्रकारच्या वाद किंवा मतभेदप्रसंगी बोलीधारक यांनी संबंधित शाखेतील संबंधित अधिकृत अधिकारी यांचेशीच संपर्क करावा. **२४)** विक्रीच्या अंतिम किमतीचा संपूर्ण भरणा झाल्यावरच बँक विक्री प्रमाणपत्र अदा करेल. हे प्रमाणपत्र यशस्वी बोलीदाराचेच नावे अदा केले जाईल. नोंदणीकृत बोलीदाराव्यतिरिक्त, म्हणजे ज्याने ई लिलावात सहभागी होण्यासाठी नोंदणी केली आहे आणि यशस्वी झाला आहे त्याव्यतिरिक्त अन्य कुणाचेही नावे विक्री प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

दिनांक : ०६.०८.२०२२
स्थळ : पुणे
(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)
सही/-
अधिकृत अधिकारी, भारतीय स्टेट बँक



## फॉर्म 'ए'

### जाहीर घोषणा (अतिरिक्त)

(भारतीय नादारी व दिवाळखोरी मंडळाच्या विनियम ६ अंतर्गत)
(कॉर्पोरेट व्यक्तींकरिता नादारी ठराव प्रक्रिया) विनियम, २०१६)

### 'श्रवण मेडिसेल्स प्रायव्हेट लिमिटेड'च्या धनकोंनी लक्ष देण्याकरिता

| संबंधीत तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | **श्रवण मेडिसेल्स प्रायव्हेट लिमिटेड** |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या विधिसंस्थापनाची तारीख | १८/०३/२००९ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणको विधिसंस्थापित/ नोंदणीकृत आहेत | रजिस्ट्रार ऑफ कंपनीज (आरओसी)-पुणे |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर/ लिमिटेड लायबिलीटी आयडेन्टिफिकेशन नंबर | यू५२३९९पीएन२००९पीटीसी१३३६६० |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालय आणि प्रधान कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | १००२ सदाशिव पेठ स्टोअर १, ब्राम्हण कार्यालय, पुणे-४११०३०, महाराष्ट्र, भारत |
| ६. | कॉर्पोरेट ऋणकोच्या बाबतीत नादारी सुरू झाल्याची तारीख | ०१.०८.२०२२ (उदघोषणेची तारीख), तथापी, आदेश ०४.०८.२०२२ रोजी पोहचविला आहे. |
| ७. | नादारी ठराव प्रक्रिया बंद होण्याची अंदाजित तारीख | नादारी सुरु झाल्याच्या तारखेपासून १८० दिवस, म्हणजेच ३१.०१.२०२३ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून कार्यरत असलेल्या नादारी व्यावसायिकेचे नाव व नोंदणी क्रमांक | उदयकुमार भास्कर भट आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी/ पी-०१४२५/२०१८-२०१९/१२२३४ |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्याप्रमाणे अंतरिम ठराव व्यावसायिकेचा पत्ता व ई-मेल | बी-३०४, गोल्डव्हिल्ले, डांगे चौक, औंध रावेत रोड, थेरगाव, पुणे-४११०३३ udaybhat2805@gmail.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकेशी तत्सम पत्रव्यवहारकरिता वापरावयाचा पत्ता व ई-मेल | बी-३०४, गोल्डव्हिल्ले, डांगे चौक, औंध रावेत रोड, थेरगाव, पुणे-४११०३३ irp.shravanmedisales@gmail.com |
| ११. | दाव्यांच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख | १८.०८.२०२२ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकेद्वारा निश्चित केलेल्या, कलम २१ च्या पोट-कलम (६ए)च्या खंड(बी) अंतर्गत धनकोंचा वर्ग, जर असल्यास | वर्गांचे नाव<br>सदर धनकोंच्या अस्तित्वाबात काही माहिती नाही |
| १३. | वर्गात धनकोंचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून कार्यरत ज्ञात नादारी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गाकरिता तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (ए) संबंधित फॉर्म्स आणि (बी) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील येथे उपलब्ध आहे: | **वेबलिंक** : https://www.ibbi.gov.in/home/downloads<br>**प्रत्यक्ष पत्ता** : लागू नाही |

याद्वारा सूचना देण्यात येते की राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई बेंचने ०१.०८.२०२२ रोजी **श्रवण मेडिसेल्स प्रायव्हेट लिमिटेड**करिता कॉर्पोरेट नादारी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचा आदेश दिला आहे. **श्रवण मेडिसेल्स प्रायव्हेट लिमिटेड**च्या धनकोंना याद्वारा एन्ट्रि नं. १० च्या अनुसार नमूद केलेल्या पत्यावर अंतरिम ठराव व्यावसायिक याकरिता १८.०८.२०२२ रोजी किंवा तत्पूर्वी (अंतरिम ठराव व्यावसायिकाच्या नियुक्तीपासून चौदा दिवसात) सविस्तर पुरावे व शपथपत्रासह त्यांचे दावे सादर करण्याकरिता फर्मावण्यात आले आहे. वित्तिय धनको केवळ इलेक्ट्रॉनिक प्रणालीत पुराव्यासह त्यांचे दावे सादर करतील. अन्य सर्व धनको व्यक्तीश:, टपालाने किंवा इलेक्ट्रॉनिक प्रणालीत दावे सादर करु शकतील. **खोटे किंवा दिशाभूल करणाऱ्या दाव्यांचे सादरीकरण झाल्यास दंड आकारला जाईल.**

**अंतरिम ठराव व्यावसायिकाचे नाव व स्वाक्षरी : उ दयकुमार भास्कर भट**
**तारीख व स्थळ : ०५.०८.२०२२ पुणे.**



केनरा बँक Canara Bank
Syndicate

मॉडेल कॉलनी शाखा
थिनार हाईटस्, दीप बंगला चौक,
पुणे-१६, फोन : 7755926605

## मागणी सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ चे कलम १३ (२) अनुसार नोटीस

**१. कर्जदाराचे नाव आणि पत्ता**

| कर्जदाराचे नाव आणि पत्ता | मंजूर कर्ज रक्कम |
|---|---|
| **कर्जदार : १) शेरले ई पिल्ले**, स.नं.५६, भाग्यदे नगर, सुसईमा मिनी मार्केट, कोंढवा खुर्द, पुणे ४११०४८.<br>**२) फातीमा ई पिल्ले**, स.नं.५६, भाग्यदे नगर, सुसईमा मिनी मार्केट, कोंढवा खुर्द, पुणे ४११०४८.<br>**३) जेनिफर पिल्ले**, फ्लॅट ११, हेवन्स प्राईड, जगताप चौक, एसआरपीएफ गेट नं. २, विकासनगर स. नं. ५३, वानवडी ४११०४०.<br>**जामीनदार : ४) रवी पेरीस्वामी काऊंडर**, स. नं. ४७/२/२/२, एमपी १, जाधव वस्ती, घोरपडी, पुणे ४११०३६. | रु. ७,००,०००/- |

३. मुख्य कर्जदार (कर्जदार) याने/हिने/त्याच्या/त्यांच्या देणे रकमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने आम्ही यांचे/हिचे/त्याचे/त्यांचे खाते रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार अनुत्पादक मालमत्ता असे **दि. २३/०५/२०२१** रोजी निश्चित केले आहे.
आपणांस ही सूचना सिक्युरिटायझेशन ॲण्ड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ नुसार **दि. ०५/०७/२०२२ रोजी** जारी केली होती.

| अ. क्र. | खाते क्र. | कर्जाचे स्वरुप | येणे बाकी रक्कम दि. २१/०३/२००५ रोजी व व्याजदर |
|---|---|---|---|
| १. | ०२६२६१९०११३६० | गृह कर्ज | रु. ५,०८,०९४.४६<br>१०.५५% |

४. आपणांस देण्यात आलेली कर्जसुविधेची रक्कम पुढीलप्रमाणे मालमत्ता / सिक्युरिटीजद्वारे सुरक्षित करण्यात आली आहे,
फ्लॅट नं. ११ चे समतूल्य गहाणखत, चटई क्षेत्रफळ ६६.५१ चौ.मी., ३ रा मजला, हेवन्स प्राईड, स.नं. ५३, हिस्सा नं. २७/२ वर बांधण्यात आलेले, आणि वानवडी, पुणे येथे स्थित, पुणे महानगर पालिकेच्या हद्दीत, आणि नोंदणीकरण जिल्हा पुणे, उप जिल्हा तालुका हवेली, **चतु:सीमा : उत्तरेस** : स.नं. ५३, हिस्सा नं. २७/१, **दक्षिणेस** : स.नं. ५४ ची सीमा, **पूर्वेस** : स.नं. ५३ हिस्सा नं. २८-३२, **पश्चिमेस** : स.नं. ५३, हिस्सा नं. २६.

५. आता या जाहीर सूचनेद्वारे आम्ही आपणांस **रु.** ५,०८,०९४.४६ (**रु. पाच लाख आठ हजार चौऱ्याण्णव आणि पैसे सेहेचाळीस फक्त फक्त**) दि. २१/०२/२०२१ पासूनचे १०.५५% दराने थकीत रकमेवरील व्याज यांसहित या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करण्याचा सल्ला देत आहोत. अन्यथा बँक सरफेसी ॲक्ट २००२ अनुसार कारवाई करील.
खाली सही करणार यांच्याकडे सदर मालमत्तांचा ताबा घेणे. त्यानंतर सदर मालमत्तांची विक्री करण्याचे अधिकार आहेत आणि ते सरफेसी ॲक्ट सेक्शन १३ अनु
सार बँकेचे अधिकृत अधिकार आहेत.

**दिनांक : ०२/०८/२०२२**
**स्थळ : पुणे.**

**अधिकृत अधिकारी,**
**कॅनरा बँक**



# संत सोपानकाका सहकारी बँक लि., सासवड

(रजि. नं.: पी.एन.ए./बी.एन.के./१०७/१९९७ ला.नं.: यु.बी.डी./महाराष्ट्र/१४७१/पी.)
नोंदणीकृत कार्यालय: 'चंदुकाका जगताप सहकार भवन', सीटीएस नं. १६३४,
कन्हैय्या चौक, धान्य बाजार, मु. पो. सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे. फोन नं. ०२११५-२९५१०५
मुख्य/प्रशासकीय कार्यालय : ''सोपानकाका भवन'' १०३९ शुक्रवारपेठ, टिळकरोड, पुणे - ४११ ००२.
फोन: ०२०-२४४४४००१/२४४४४००२, फॅक्स: ०२०-२४४३३७०१
Email: headoffice@sopankakabank.com

## २५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

- फक्त सभासदांकरिता -

संत सोपानकाका सहकारी बँक लि., सासवड या बँकेची **२५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, रविवार, दि. २१/०८/२०२२ रोजी दुपारी १२.०० वा., बँकेचे अध्यक्ष, मा. श्री. संजय चंद्रकांत जगताप यांचे अध्यक्षतेखाली, ॐ श्री. शारदा लॉन्स, गार्डन मंगल कार्यालय, सरदार गोदाजी जगताप नगर, रेडीएटर कंपनीसमोर, हिवरे रोड, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे** या कार्यालयात प्रत्यक्षदर्शी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सदर सभेस आपण अवश्य उपस्थित रहावे, ही विनंती.

*** सभेपुढील विषय :**

१) मागील सभा दि. २६/०९/२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या सन २०२१-२२ चा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकृत करणे.
३) मा. वैधानिक लेखापरिक्षक यांच्या सन २०२१-२०२२ च्या वैधानिक लेखा परिक्षण अहवालाची नोंद घेणे.
४) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२१-२२ च्या नफा विभागणीस मान्यता देणे.
५) सन २०२१-२२ या वर्षीच्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
६) अहवाल वर्षात मा. संचालक मंडळातील सदस्य व त्यांचे नातेवाईकांस दिलेल्या म.रा.स.सं. अधिनियम १९६० कलम ७५(२) प्रमाणे कर्जाची माहिती घेणे.
७) सन २०२१-२२ मध्ये एक रकमी परतफेड योजनेत बंद केलेल्या व ११ महिने परतफेड मुदत दिलेल्या प्रकरणांचा आढावा घेणे.
८) मा. संचालक मंडळाने सन २०२२-२३ सालाकरीता वैधानिक लेखापरिक्षकांचा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेस सादर केला असून त्यांचेकडून येणाऱ्या मान्यतेनुसार सन २०२२-२३ सालाकरीता वैधानिक लेखापरिक्षक नियुक्त करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
९) सन २०२२-२३ या वर्षाकरिता मा. संचालक मंडळाने तयार केलेले खर्च व उत्पन्नाचे अंदाजपत्रक व वार्षिक ध्येय धोरणे मंजूर करणे.
१०) सन २०२२-२३ या वर्षाकरिता बाहेरील कर्ज उभारणीची मर्यादा ठरविणे व तसा प्रस्ताव मा. सहकार खात्याकडे मंजूरीसाठी पाठविण्यास मंजूरी देणे.
११) सेवक आकृतीबंध व नेमणूकीस मान्यता देणे.
१२) २५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची रजा मंजूर करणे.
१३) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**दिनांक : ०६/०८/२०२२**

**मा. संचालक मंडळाच्या आज्ञेवरुन,**
**(श्री. दिलीप मधुकर सावणे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

*** विशेष सूचना :**

१) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर होईल त्यास गणसंख्येची आवश्यकता भासणार नाही.
२) सदर नोटीशीप्रमाणे सर्व सभासदांना एसएमएस द्वारे अहवालाची लिंक पाठविण्यात आलेली आहे. तरी लिंक उघडून अहवाल वाचण्यात यावा.
३) ज्या सभासदांना लेखी सूचना किंवा प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपले लेखी प्रश्न किंवा सूचना दि. १२/०८/२०२२ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत बँकेचे मुख्य/प्रशासकीय कार्यालय, 'सोपानकाका भवन' १०३९ टिळक रोड, पुणे येथे आणून देवून लेखी पोहोच घ्यावी.
४) सभासदांनी आपापले सभासद अर्जातील वारस नोंद बरोबर असल्याची खात्री करावी, पत्ता बदललेला असेल अशा सभासदांनी नवीन पत्ता व संपर्क क्रमांक, बँकेकडे त्वरित कळवावा. फोटो दिले नसल्यास फोटो त्वरित बँकेकडे जमा करावेत.
५) सभासदांनी त्यांचा सन २०१८-२०१९ चा लाभांश जमा झाल्याची खात्री करावी, अन्यथा दि. ३०/०८/२०२२ रोजी प्रस्तुत लाभांश रक्कम उपविधी क्र. ५८ (ड) अन्वये रिझर्व्ह फंडाला वर्ग करण्यात येईल.
६) सभा संपल्यानंतर स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी स्नेहभोजनाचा अवश्य लाभ घ्यावा ही विनंती.
७) संपूर्ण वार्षिक अहवाल बँकेच्या www. sopankakabank.com या वेबसाईटवर प्रसिद्ध केला आहे.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती
चतुरंग
आपल्या प्रतिक्रिया व सूचना देण्यासाठी
chaturang@expressindia.com
शनिवार, ६ ऑगस्ट २०२२


# भेट... निसर्गपुत्रांशी !


१९९१ मध्ये मध्य अंदमानातील मोहिमेच्या वेळी जरावा बाळाबरोबर मधुमाला चट्टोपाध्याय.

**९ ऑगस्ट हा 'आंतरराष्ट्रीय आदिवासी दिन'. अंदमान-निकोबारमधील काही बेटांवर आजही हजारो वर्षांपूर्वीचे सहा आदिवासी समूह राहातात. माणसांपासून पूर्णतः फटकून राहाणाऱ्या यातल्या सेंटिनल आदिवासींना भेटण्यात एका भारतीय स्त्रीला यश आलं होतं. अंदमान येथील आदिवासींसंबंधी महत्त्वाचं संशोधन करणाऱ्या आणि त्यांना भेटणाऱ्या पहिल्या भारतीय स्त्री मानववंशशास्त्रज्ञ मधुमाला चट्टोपाध्याय यांच्याशी या विशेष दिवसाच्या निमित्तानं साधलेला हा संवाद…**

दुलारी देशपांडे

माणसानं भेटण्याचा किंवा मैत्रीचा हात पुढे करण्याचा प्रयत्न केला, तरी त्याला बाणांनी प्रत्युत्तर देणाऱ्या काही आदिवासी जमाती अजूनही भारताच्या अंदमानात आहेत, हे जाणून घेताना नवल वाटतं. देश स्वतंत्र होण्यापूर्वी ब्रिटिशांनीही या आदिवासींशी मैत्री करण्याचे खूप प्रयत्न केले. मात्र अंदमानपासून पश्चिमेला जवळपास ५० किमीवर असलेल्या नॉर्थ सेंटिनल बेटावरच्या आदिवासींशी आणि अंदमानातल्या जरावा आदिवासींशी संपर्क साधण्यात ब्रिटिशांना सपशेल अपयश आलं होतं. १९९१ मध्ये मधुमाला चट्टोपाध्याय या मानववंशशास्त्रज्ञ मात्र तिथं पोहोचल्या. सेंटिनल बेटावरच्या आदिवासींशी आणि जरावांशी मैत्रीपूर्ण संपर्क साधणाऱ्या त्या पहिल्या भारतीय स्त्री मानववंशशास्त्रज्ञ. त्या वेळी त्या 'ॲन्थ्रोपॉलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया'त 'रिसर्च असोसिएट' म्हणून काम करत होत्या आणि वय होतं अवघं सत्तावीस वर्षांचं. अनेक अडचणींचा सामना करत मधुमालांनी सहा वर्षं अंदमानातल्या सहा आदिवासी समूहांवर संशोधन केलं. मधुमालांचा सहभाग असलेल्या सेंटिनल बेटावरच्या दुसऱ्या मोहिमेनंतर अंदमान प्रशासनानं नॉर्थ सेंटिनल बेटावर जाण्यास पूर्णपणे बंदीच घातली आहे. या घटनेला ३० वर्षं होऊन गेलीत. नुकतीच मधुमालांशी संवाद साधण्याची संधी मिळाली आणि त्यांनी काही थरारक आठवणी सांगितल्या.

अंदमान-निकोबार द्वीपसमूहातल्या आदिवासी जमातींविषयी जाणून घेणं मोठं रंजक आहे. विशेषतः मधुमाला ज्या उत्साहानं हे सर्व उलगडत जातात, त्यामुळे ती केवळ माहिती राहात नाही, तर सुरस कथाच होऊन जाते. या द्वीपसमूहात ३२१ बेटं आहेत. त्यांपैकी फक्त ३८ बेटांवरच मानवी वस्ती आहे. या ३८ पैकी २६ बेटं अंदमानात आणि १२ निकोबारमध्ये आहेत. या द्वीपसमूहात एकूण सहा आदिवासी जमाती राहतात. निकोबार बेटांवर राहाणाऱ्या सर्वांना 'निकोबारी' म्हटलं जातं. ग्रेट निकोबार बेटावर 'शोम्पेन' आणि 'कोस्टल निकोबारीं'ची वस्ती आहे. अंदमानातल्या स्ट्रेट आयलंडवर 'ग्रेट अंदमानी' राहतात, तर लिटिल अंदमानातल्या ड्युगाँग क्रीक आणि साऊथ बे भागात 'ओंगी' आदिवासींची वस्ती आहे. दक्षिण आणि मध्य अंदमानच्या पश्चिम किनारपट्टीवर 'जरावा' आदिवासी समूह राहातो आणि नॉर्थ सेंटिनल बेटावर 'सेंटिनलीज' समूह राहातो. मानववंशशास्त्रानुसार 'मानव वंशा'ची सुरुवात साधारणतः दोन दशलक्ष वर्षांपूर्वीची. आधुनिकतेच्या बाबतीत आजच्या सेंटिनल बेटावरच्या आदिवासींची संस्कृती 'निओलिथिक' म्हणजे नूतन पाषाणयुगीन मानवाशी जुळणारी आहे. सेंटिनल आणि जरावा आदिवासींना 'निग्रो' वंशाचं (आताचा प्रचलित शब्द- कृष्णवर्णीय) मानलं जातं. भारतीय नागरिकांच्या आणि या आदिवासींच्या दिसण्यात मोठाच फरक आहे. असं का, हे विचारल्यावर मधुमाला जगभरातल्या बहुतेक वैज्ञानिकांनी मान्य केलेली 'आऊट ऑफ आफ्रिका' थिअरी सांगतात. म्हणजे हे आदिवासी पूर्व आफ्रिकेतून २.७ लाख ते ८०,००० वर्षांपूर्वी मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित झालेल्या होमो सेपियन मानवाच्या वंशजांपैकी असावेत. दुसऱ्या थिअरीच्या मते, अंदमानातल्या आदिवासी जमाती बाहेरून आलेल्या नसून या मूळच्या तिथल्याच स्थानिक जमाती- म्हणजे '*Aboriginal*' असाव्यात. यातही एक मजा अशी, की सेंटिनल, ग्रेट अंदमानी, जरावा, ओंगी आदिवासी कृष्णवर्णीय असले, तरी निकोबारी आणि शोम्पेन आदिवासी पीत वर्णाचे असल्यामुळे ते 'मंगोलियन' वंशाचे मानले जातात.

सेंटिनल बेटावरच्या आदिवासींशी आणि जरावा आदिवासींशी झालेल्या मधुमालांच्या भेटीला मानववंशशास्त्राच्या दृष्टीनं मोठं महत्त्व आहे. याचं कारण म्हणजे या आदिवासींचं इतर माणसांच्या प्रती असलेलं अतिशय आक्रमक धोरण. १९६६ मध्ये जरावा आणि बांगलादेश व श्रीलंकेतून आलेले निर्वासित यांना संरक्षण देण्यासाठी अंदमानात तैनात करण्यात आलेल्या भक्तवार सिंग या एका 'बुश पोलिसा'नं जरावांशी मैत्री केली होती. त्यामुळे 'ॲन्थ्रोपॉलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया'तर्फे जरावांना भेटणं मधुमालांना सोपं झालं. यातली अडचण अशी, की तत्पूर्वी करण्यात आलेल्या एका प्रयोगात बाहेरून आलेल्या तरुण स्त्रीला पाहून जरावा पुरुष उत्तेजित झाले आणि त्यांनी त्या स्त्रीला भेटण्यासाठी पुढे येण्याचा प्रयत्न केला असं निरीक्षण नोंदवलं गेलं होतं. त्यामुळे एक तरुणी म्हणून जरावांना भेटणं हे मधुमालांसाठी वेगळ्याच प्रकारचं आव्हान होतं. सेंटिनल आदिवासी मात्र जवळपास ६०,००० वर्षं इतक्या प्रदीर्घ काळापर्यंत आधुनिक मानवी सभ्यतेपासून पूर्णपणे फटकून राहिलेली, अस्पर्श आदिवासी जमात. त्यामुळे मधुमालांनी त्यांची घेतलेली भेट आधुनिक मानव समाजासाठी आणि मानववंशशास्त्रासाठीही ऐतिहासिकच होती. आज ३० वर्षं उलटल्यानंतरही मधुमालांच्या मनात या भेटींचे अनुभव अतिशय ताजे आहेत. त्यांच्यानंतर सेंटिनल आदिवासींना सामान्य नागरिकांपैकी इतर कुणीही भेटू शकलेलं नाही हे विशेष.


पक्षी जसं चोचीत चोच घालून पिल्लांना भरवतात त्याप्रमाणे जरावा आई आपल्या तोंडात घास चावून बाळाच्या तोंडात भरवते.

१९९० च्या जानेवारीत अंदमानचे लेफ्टनंट गव्हर्नर एक चमू घेऊन सेंटिनल बेटाच्या जवळ गेले होते. तेव्हा सेंटिनल आदिवासींनी मारलेला बाण त्यांच्या थेट छातीत घुसला. या प्राणघातक हल्ल्यातून ते थोडक्यात बचावले. ही घटना ताजी असतानाच १९९१ मध्ये मधुमालांची मोहीम सेंटिनल बेटांवर जाण्यासाठी सज्ज झाली. सेंटिनल आदिवासींनी परक्या माणसांशी इतकं फटकून वागण्यामागे कारणंही तशीच आहेत. मधुमाला सांगतात, की पूर्वीच्या काळी इंडोनेशिया-मलेशिया आणि इतरही देशांची जहाजं सेंटिनल बेटाजवळच्या समुद्रमार्गानं ये-जा करत असत. तेव्हा जहाजावरच्या लोकांना एकटा-दुकटा फिरणारा सेंटिनल आदिवासी पुरुष दिसला, की ते त्याला बळजबरीनं पळवून नेत आणि जन्मभर गुलाम म्हणून त्याचा वापर करत. सेंटिनल आदिवासी पुरुष इतके ताकदवान असतात, की एका हातात नारळ धरून कोणत्याही शस्त्राशिवाय ते तो नुसता हाताच्या बुक्कीनं फोडू शकतात. त्यांच्या पीळदार, काटक शरीराचं आकर्षण परदेशी नाविकांना वाटलं नसतं तरच नवल! अशा बऱ्याच घटना घडल्यानं सेंटिनल आदिवासींच्या मनात बाहेरच्या लोकांविषयी भीती आणि शत्रुत्वाच्या भावनेनं घर केलं. मधुमाला मात्र या सेंटिनल लोकांना दोन वेळा भेटल्या. १९९१ च्या मोहिमेत 'ॲन्थ्रोपॉलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया'तर्फे त्या, अंदमान व्यवस्थापनातर्फे एक डॉक्टर, वेळ पडल्यास हवेत गोळीबार करण्यासाठी एक पोलीस असे सगळे मिळून १३ जण होते.

३ जानेवारी १९९१ ला हा चमू रात्री नऊ-साडेनऊला छोटया जहाजात बसून अंदमानहून नॉर्थ सेंटिनल बेटाकडे निघाला आणि सकाळीच बेटाजवळच्या समुद्रात पोहोचला. मधुमाला सांगतात, ''जहाजावरून बेटावरचा निर्मनुष्य समुद्रकिनारा, किनाऱ्यालगतचं दाट जंगल दिसत होतं. सकाळी साडेसातच्या सुमारास जंगलाच्या बाजूनं थोडी हालचाल जाणवू लागली आणि पावणेनऊ वाजता जंगलात एका ठिकाणाहून धूर निघत असलेलाही दिसला. तिथे माणसं राहात असल्याची ती खूणच होती. आम्ही दोन लाईफ बोटींमध्ये सोबत नारळाच्या गोणी घेऊन निघालो. नॉर्थ सेंटिनल बेटाच्या किनाऱ्यापासून थोड्या दूर अंतरावर असताना किनाऱ्यावर काही आदिवासी फिरताना दिसले. आमच्या सहाय्यकांनी त्यांच्यापासून थोड्या दूर अंतरावर नारळाच्या एक-दोन गोणी नेऊन ठेवल्या. आमच्या बोटींचा वेग आम्ही अतिशय कमी ठेवला होता. थोड्या वेळानं काही तरुण, काही प्रौढ असे चार-पाच पुरुष गोणी उघडून नारळ काढू लागले. हातानं इशारा करून आणखी नारळ मागायला लागले. उरलेल्या गोणी लगेच त्यांना देऊन टाकल्या तर बरोबर आणलेले सगळे नारळ संपून जातील, म्हणून मग आम्ही गोणीतून एक एक नारळ काढून समुद्राच्या लाटेवर सोडत राहिलो आणि किनाऱ्याकडे वाहात जाणारे नारळ ते लोक गोळा करत राहिले. बराच वेळ हे सुरू होतं. त्यांच्यातला एक जण आमच्या बोटीजवळ येऊन बोटीला हात लावून कुतूहलानं बघू लागला. त्या दिवशी बहुधा त्यांचा 'मूड' चांगला असावा! बाकीची सेंटिनल मंडळी बोटीजवळ आली, तशी आम्ही त्यांच्या हातात नारळ देऊ लागलो. असं करत लाईफ बोटीवरचे सगळे नारळ संपले. आमच्या जहाजावर मात्र नारळाची अजून काही पोती शिल्लक होती. ती आणायला आम्ही बोटी जहाजाकडे वळवल्या. ''हम लोग फिरसे वापस आ रहे हैं... आप इधरही ठेहरो...'' वगैरे आमच्या भाषेत जोरात ओरडून त्यांना सांगितलं. त्यांना किती समजलं माहीत नाही, पण पुन्हा परतलो, तेव्हा समुद्रकिनाऱ्यावर जवळपास २८ जण जमलेले. पुरुष, स्त्रिया आणि मुलंही. काहींच्या हातात तर धनुष्यबाण. आम्ही गुडघाभर पाण्यात उतरून पुन्हा त्यांच्या हातात नारळ देऊ लागलो. किनाऱ्यावर एक पन्नाशीची स्त्री आणि एक विशी-पंचविशीचा मुलगा होता. त्या तरुणानं अचानक धनुष्यबाण ताणून सरळ माझ्यावर निशाणा धरला. ''तीर उठाया... मारेगा... बोट पे आ जाओ...'' आमच्या चमूतलं कुणीतरी ओरडलं. त्या वेळी मला ओंगी भाषा बऱ्यापैकी येत होती. त्या सेंटिनल स्त्रीला मी म्हटलं, ''कायरी इसेरा (मावशी, इकडे ये) नारियाली जबा जबा ( खूप नारळ आहेत)''. ते ऐकून तिनं धनुष्य-बाण ताणून उभ्या असलेल्या तरुणाचा हात दुसऱ्या दिशेला वळवला आणि पुढच्याच सेकंदाला तो तीर पाण्यात घुसल्याचं सर्वांनी पाहिलं! मग त्या स्त्रीनं त्याच मुलाला माझ्याकडून नारळ घेऊन येण्यासाठी पाठवलं. दुपारी तीन-चार वाजेपर्यंत आमचं हे नारळ वाटप चाललेलं होतं.'' तरुण मधुमालांच्या मनात या प्रसंगानंतरही भीती नव्हती, उलट सेंटिनल लोकांशी मैत्री करण्याचा उत्साहच वाढला.


मधुमाला चट्टोपाध्याय

सेंटिनल लोक जी भाषा बोलतात ती कोणालाच येत नाही, मात्र ओंगी आदिवासींच्या भाषेतले काही शब्द ते वापरताना दिसतात. सेंटिनल आदिवासी रंगानं अतिशय काळे, उंचीनं बुटके आणि काटक. पती-पत्नी-मुलं अशी कुटुंबसंस्था त्यांच्यात आहे. त्यांच्यात पुरुषसत्ताक पद्धत असावी. एकाच झोपडीत पाच-सात कुटुंबं एकत्र, मध्ये भिंत घालून राहातात. झोपड्या झावळ्यांपासून बनवलेल्या. जंगलात सापडणारी कंदमुळं, फळं, बेटावरचे छोटे प्राणी, खेकडे, मासे हे त्यांचं खाद्य. शिकारीसाठी ते भाले, धनुष्यबाण आणि चाकू वापरतात.

सेंटिनल बेटाजवळ फुटलेल्या 'प्रिमरोज' या जहाजावरून त्यांनी पहिल्यांदा लोखंड हा धातू पळवला. त्यापासून शस्त्रं बनवली. ते अंगावर कोणतेही कपडे घालत नाहीत, पण स्त्रिया कमरेला झाडाची साल बांधतात आणि समोरच्या बाजूस झाडाचं पान लावतात. पुरुष घनदाट जंगलात शिकारीला जाताना छाती-पोटाचं संरक्षण करण्यासाठी छातीभोवती झाडाची साल गुंडाळतात. त्यांची लोकसंख्या आज जवळपास शंभरच्या घरात असावी. ते निसर्गपूजक आहेत, पण वैज्ञानिकांना त्यांचे कलाप्रकार, नाचगाणं, याविषयी काहीही माहीत नाही.

अंदमानातल्या जरावा आदिवासींना भेटणाऱ्याही मधुमाला पहिल्या स्त्री मानववंशशास्त्रज्ञ. सेंटिनल भेटीनंतर ५ जानेवारी १९९१ ला हा चमू नारळ, लोखंड, कच्ची केळी (जरावा लोक ती भाजून खातात) घेऊन मध्य अंदमानात पोहोचला. मधुमाला सांगतात, ''जरावांचा पूर्वी नोंदवलेला परक्या स्त्रियांबद्दलचा व्यवहार लक्षात घेऊन माझ्या टीममधले पुरुष छोटया बोटीनं बेटावर पुढे निघून गेले. 'बेटावर यायचं की नाही हे तुमचं तुम्ही ठरवा. तुम्हाला काही झालं तर आमची जबाबदारी नाही,' असं मला सांगण्यात आलं. काहीही होवो, मी त्यांना भेटणारच, असा विचार मी करतच होते, तेवढ्यात तीन-चार जरावा तरुण पोहत माझ्या बोटीपाशी येऊन पोहोचले. मी बसले होते त्या दिशेनं हळूहळू सरकू लागले. ते पाहून नावाड्यानं मला पाण्यात उडी टाकायला सांगितलं. पण ते मला पाण्यातही सहज पकडू शकतील, या विचारानं मी शांतपणे होते तिथेच बसून राहिले. हे जरावा माझ्याकडे कुतूहलानं एकटक पाहात होते. मी हालचाल करत नाही हे पाहून त्यांचा धीर चेपला. मग त्यातल्या एकानं जवळ येऊन माझे केस ओढायला सुरुवात केली, दुसरा माझी त्वचा हातानं दाबून पाहू लागला. तेवढ्यात एक वयस्कर जरावा स्त्रीही बोटीवर चढली. तिला पाहून मी सुटकेचा निःश्वास टाकला! तिला मी माझ्याजवळ बसवून घेतलं आणि ओंगी भाषेत 'मी तुझी मैत्रीण आहे,' वगैरे बोलायला सुरुवात केली. तिनं स्वतःच्या स्त्री-अवयवांकडे बोट दाखवत माझं लक्ष वेधलं. 'मीही तुझ्यासारखीच एक बाई आहे,' असं मी तिला समजावू लागले. तेवढ्यात एक बारा-तेरा वर्षांची मुलगी सरळ येऊन माझ्या कुशीत बसली! बोट किनाऱ्याला लागली, तेव्हा तिथे पन्नासएक स्त्री-पुरुष जमले होते. मग त्यातल्या स्त्रिया पुरुषांना तिथून हकलू लागल्या. त्यांच्याकडे लाकडाचे गळ्यात आणि डोक्यावर घालायचे दागिने होते, ते त्यांनी मला भेट म्हणून दिले. दुसऱ्या दिवशी आम्ही पुन्हा तिथे गेलो तेव्हा मला पाहून जरावा स्त्रिया टाळी वाजवत, पाय दुमडून उडी मारत आणि मग हात मागे नेऊन पार्श्वभागावर आपटत नाचू लागल्या, आनंद व्यक्त करू लागल्या. त्यांनी मला माझ्यासाठी खास बनवलेले शिंपल्यांचे दागिने दिले आणि त्या निघून गेल्या. त्यानंतर एक वयस्कर माणूस तिथे आला. तो जरावांच्या कबिल्याचा सरदार असावा. माझ्या लक्षात राहिलेत ते त्या वयातही मजबूत असलेले त्याचे पांढरेशुभ्र दात! सगळ्यात मजा म्हणजे, केवळ मला- एका 'बाई'ला जरावांनी भेटवस्तू दिल्याचं पाहून चमूतल्या पुरुषांची तोंडं पाहण्यासारखी झाली होती!''

आदिवासींच्या जगण्याच्या-वागण्याच्या पद्धती अगदी वैशिष्टपूर्ण असतात. जरावा स्त्रिया आपल्या बाळाला दात येईपर्यंत स्वतःच्या तोंडात अन्नाचा घास घेऊन चर्वण करतात आणि पक्षी जसं चोचीत चोच घालून पिल्लांना भरवतात त्याप्रमाणे जरावा आई आपल्या तोंडातून बाळाच्या तोंडात घास भरवते. लहान मुलाला पाणीही याच पद्धतीनं पाजतात. लहान मुलांना आंघोळ घालतानासुद्धा तोंडात पाणी घेऊन ते पाणी त्याच्या अंगावर फेकतात. लाळ जंतुनाशक समजली जाते. अशा पद्धतीनं आंघोळ घातल्यानं मुलं टुकटुकीत राहातील, असं जरावा स्त्रियांना वाटतं.

सर्वच आदिवासी जमाती निसर्गपूजक. ग्रेट अंदमानीही याला अपवाद नाहीत. ते समुद्राची, भरतीची पूजा करतात. केवळ पक्ष्यांच्या, प्राण्यांच्या आवाजावरून आता पाऊस पडेल की नाही ते बरोबर सांगू शकतात. अनेकदा त्यांच्याबरोबर असताना आणि धो-धो पाऊस पडत असताना हा पाऊस आता थांबणारच नाही, असं मला वाटायचं. तेव्हा ग्रेट अंदमानी 'आता लवकरच पाऊस थांबेल' असं मला आत्मविश्वासानं सांगायचे आणि आकाशातून वाहाणारा नळ कुठल्या तरी अदृश्य हातानं बंद केल्यासारखा धो-धो कोसळणारा पाऊस अचानक थांबायचाही!

जरावांबरोबरची आणखी एक आठवण मधुमाला सांगतात, ''एकदा आमचं जहाज दूर समुद्रात उभं केलं होतं आणि मी किनाऱ्यावर दोन जरावा स्त्रियांबरोबर बसले होते. त्यातल्या एकीला तीन महिन्यांचं बाळ होतं. तिला अचानक काही तरी काम आठवलं आणि तिनं बाळाला सांभाळायला माझ्या हातात दिलं. तिची जरा गंमत करावी म्हणून मी आमच्या जहाजाकडे बोट दाखवत म्हटलं, ''तुझ्या बाळासारखं माझंही बाळ तिथं आहे!'' त्या दोघींनी एकमेकींकडे पाहिलं, त्या माझ्या जवळ आल्या आणि आपल्या हातांनी माझी कंबर पकडून कंबरेजवळच्या हाडाला चाचपलं. ''काहीही काय सांगतेस! तुझं तर अजून लग्नसुद्धा झालेलं नाही,'' असं म्हणत त्यांनी हसायला सुरुवात केली.

रूढार्थानं काहीही शिक्षण न झालेले निसर्गाच्या शाळेतले हे विद्यार्थी. आपल्यातलेच, पण सर्वार्थानं खूप दूर राहिलेले. त्यांच्याविषयी जेवढं ज्ञान आपल्याला आहे, तितकंच अज्ञात आहे! आदिवासी दिनाच्या निमित्तानं ज्ञानाचे काही कण आपल्यासमोर ठेवताना मधुमाला त्यांच्या शोधक, मैत्रीपूर्ण आणि खंबीर वृत्तीनं भारून टाकतात. अनेकींना मानववंशशास्त्राच्या क्षेत्रात येण्यासाठी यातून प्रेरणा मिळावी हीच सदिच्छा!

◆ *dularid111@gmail.com*

---

# मृगजळ : मानसिक आरोग्य विम्याचे !

**मानसिक आजारांनाही वैद्यकीय विम्याचे संरक्षण देणे 'मानसिक आरोग्य कायदा २०१७' नुसार बंधनकारक करण्यात आले. 'आयआरडीए'च्या आदेशानंतर मानसिक आजारांना यात स्थान मिळाले असले, तरी त्यात मेख आहेच. सध्या ज्यांना मानसिक आजार आहे, त्यांनाच नेमके यातून वगळण्यात आले आहे. अटींच्या अडथळ्यामुळे बहुतांश रुग्ण या विम्याच्या कवचाबाहेर फेकले जाणार आहेत.**

शैलजा तिवले



अनेक शारीरिक रोगांचे मूळ हे मानसिक अनारोग्यात असते, हे वैद्यकीय सत्य आता सिद्ध झालेले आहे आणि त्याचे चटके लोकांना थेट बसूही लागले आहेत. विविध तणावांखाली कुढत राहाणारे कित्येक लोक वेळीच उपचार न झाल्याने मनोरुग्ण झाल्याचीही उदाहरणे आहेत. शारीरिक आजारांना नावे असतात, जसे मधुमेह, कर्करोग आदी, पण मनोआजारांना मात्र कायम एकच लेबल लावले जायचे, ते म्हणजे 'मनोरुग्ण' असल्याचे. मात्र आता त्यातही अनेक प्रकार आहेत हे लक्षात आले आहे, त्यांची तीव्रता कमी जास्त असते, शिवाय ते दीर्घकालीन असू शकतात त्यामुळे त्यावर लागलीच उपचार केले जाणे आवश्यक असते. पण त्यासाठी होणारा खर्च कित्येकांना न परवडणारा. म्हणूनच मानसिक रोगांसाठीही आरोग्य विमा असणे गरजेचे झाले आहे.

मानसिक आजारांबाबत समाजात असलेल्या 'टॅबू'मुळे त्यात सरकारी दवाखान्यांच्या तुलनेत खासगी डॉक्टरांकडेच उपचार घेण्याचे प्रमाण जवळपास ८५ टक्के आहे. खासगी डॉक्टरांकडील मानसोपचारांचा खर्च खूपच मोठा असतो. तो परवडणं अनेकांना शक्य नसल्याने इतर शारीरिक आजारांप्रमाणे मानसिक आजारांनाही विमा कवच मिळावे, अशी मागणी अनेक वर्षांपासून रुग्ण, नातेवाईक व कार्यकर्त्यांकडून केली जात होती.

'मानसिक आरोग्य २०१७' च्या नव्या कायद्याने या मागणीला बळ दिले. शारीरिक आजारांप्रमाणेच मानसिक आजारांनाही विम्याचे कवच देण्याचे बंधन या कायद्यान्वये विमा कंपन्यांना घालण्यात आले. सुरूवातीला विमा कंपन्यांनी याकडे हेतूतः दुर्लक्ष केले. २०२० मध्ये करोनाची साथ आली आणि या काळात लागू झालेली टाळेबंदी, आर्थिक ताण, करोनाच्या भीतीने निर्माण झालेले मानसिक तणाव, यामुळे मानसिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित केले गेले. या पार्श्वभूमीवर ऑक्टोबर २०२० मध्ये 'आयआरडीए'ने (इन्श्युरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट ऑथॉरिटी) दबाव आणल्यामुळे नाइलाजाने का होईना, पण 'स्टार हेल्थ', 'एचडीएफसी एरगो', 'निवा बुपा', 'ओरिएन्टल' यांसारख्या काही कंपन्यांनी आरोग्य विम्यामध्ये मानसिक आजारांचा समावेश करायला सुरुवात केली आहे. पण 'हसावे की रडावे' असा प्रश्न निर्माण व्हावा, अशी परिस्थिती तर पुढेच आहे. मानसिक आजारांना आरोग्य विम्यामध्ये स्थान मिळाले असले, तरी आत्ता जे मानसिक रुग्ण आहेत त्यांना मात्र त्यातून डावलण्यात आले आहे. कारण ही विमा योजना या आजारांची बाधा झालेली नाही अशा सर्वसामान्य व्यक्तींसाठीच आहे. सद्यस्थितीस ज्यांना मानसिक आजार आहे, अशा रुग्णांना या विमा योजनेचा भाग होता येणार नाही, असे कंपन्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे मानसिक आजाराच्या रुग्णांना हा लाभ मिळणार नाही. याची दुसरी बाजू अशी, की मानसिक आजाराच्या रुग्णांनाही सामान्यांप्रमाणे मधुमेह, हृदयविकार, पोटाचे विकार असे शारीरिक आजार जडण्याची शक्यता असते. तेव्हा त्यांना या अन्य शारीरिक आजारांसाठी तरी विमा योजना देण्याची मागणी केली जात आहे. मात्र नव्या विमा योजनांमध्ये त्याचा समावेश नाही. परिणामी मानसिक आजाराच्या रुग्णांना मानसिक, शारीरिक अशा दोन्ही प्रकारच्या आजारासांठीही विम्याचे छत्र नव्या योजनेमध्ये प्राप्त झालेले नाही. मानसिक आजारांचा कुटुंबांवर पडणारा आर्थिक ताण फार मोठा असतो. अनेकदा मूळच्या मानसिक आजाराबरोबरच खासगी डॉक्टरांची प्रचंड फी (अनेक अनुभवी खासगी मानसोपचारतज्ज्ञांची एका सेशनची फी सध्या दीड ते तीन हजार रुपयांपर्यंत आहे.), औषधांचा खर्च याचाही बोजा आपल्यामुळे कुटुंबास झेलावा लागतोय याचाही ताण रुग्णाच्या मनावर येतो.

(पान १८ वर)





## समष्टी समज

- डॉ. प्रदीप पाटकर



# कुटुंबव्यवस्थेतली आव्हानं…

**‘कुटुंबं तुटलेली नाहीत, तर ती बदलली आहेत. जुन्यातून नवं होताना, आधुनिक जगाशी समायोजन साधताना, ती अनेक पातळ्यांवर झगडत आहेत. एकत्र आणि विभक्त कुटुंबपद्धतींमधल्या गुणदोषांचा अभ्यास करून दोन्ही पद्धतींमधलं चांगलं एकत्र केल्यास आजच्या जगातही कुटुंबं जपता येतील. काही कुटुंबं आणि वृद्धाश्रम अशी सार्वजनिक कुटुंब पद्धत जगून दाखवत आहेत…’ ‘कुटुंबव्यवस्थेकडे पाहाताना’ या लेखाचा हा भाग दुसरा.**

पूर्वीच्या काळी लग्न मोडणं किंवा घटस्फोट ही क्वचित घडणारी गोष्ट होती. आता मात्र तसं नाही. लग्न हे पवित्र बंधन मानलं जात असेल, पण ते सक्तीचं राहिलेलं नसून ते स्त्रीचा किंवा लग्न झालेल्या युगुलाचा केवळ ‘स्थिती बदल’ ठरत आहे. नव्यांचं असं, तर अनेक जुने भारतीय विवाह नाइलाजानं टिकून राहिलेले दिसतात, मात्र त्यांच्यामधला बंध ठिसूळ आणि कडवट *(not better but bitter)* झालेला दिसतो.

घटस्फोटांचं प्रमाण २००८ मध्ये १ टक्का होतं. ते शहरी कुटुंबांत वाढताना दिसतं आहे. संसारातलं नावीन्य जसं कमी होत जातं तसंतशी अनेकांच्या मानसिक घटस्फोटाला सुरूवात झालेली असते. यासंदर्भात संसार टिकावा म्हणून समुपदेशनासाठी दोघांनीही जाणं अपेक्षित असतं. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये कौमार्याच्या अतीव आग्रहापोटी घटस्फोटित स्त्रीचा पुनर्विवाह नापसंत असतो. विधवांची संख्या आपल्याकडे ९ टक्के इतकी आहे, त्यातल्या ४० टक्के पन्नाशी पार केलेल्या आहेत. या स्त्रिया दुसरं लग्न करत नाहीत, असं दिसतं. परावलंबी विधवा अजूनही अपराध/ न्यूनगंडानं वावरतात, कसंबसं जीवन कंठतात. स्त्रीभ्रूणहत्यांचं प्रमाण हे समाजातल्या स्त्री-पुरुष समानतेचं द्योतक असतं. जन्मापूर्वी गर्भाशयात किंवा जन्मतःच, कमी वयात होणाऱ्या गर्भधारणेत किंवा बाळंतपणात मुलगी मारली जाते. घरात मुलींना वाढवताना आजही भेदभाव केला जातो. त्यामुळे मुली कुपोषणामुळे होणाऱ्या आजारांनी अधिक बळी पडतात. मृत्यूचं प्रमाण पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये जास्त आहे. (२००६ चं सर्वेक्षण). म्हातारपणी आई-वडिलांची काळजी घेईल,आर्थिक आणि सामाजिक दर्जा उंचावेल यासाठी मुलग्याचं महत्त्व अधिक ठरतं. मुलगे अधिक असलेल्या गरीब कुटुंबात मुलीचं स्थान दुय्यम ठरतं. काही कुटुंबातल्या लहान मुलांना वेगवेगळ्या संकटांना सामोरं जावं लागतं. कठीण परिस्थितीत जीवन कंठणारी मुलं दक्षिण आशियात ३८५ दशलक्ष आहेत. भारत त्यात आघाडीवर असून, यातील ३० टक्के मुलं भारतात आहेत. गरिबीमुळे बालमजूर, बालकामगारांचं प्रमाण वाढतं. त्यातल्या अनेक मुलांचं शोषण होतं, त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर वाईट परिणाम होतो. बालकामगारांतही काम आणि रोजगाराबाबत मुलगा-मुलगी हा भेदभाव वाढतो, मुलींच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होतो, संधी मिळाली की लैंगिक शोषण केलं जातं. पालकांचा बालमजुरी/ कष्ट याबद्दलचा दृष्टिकोन इतर पर्याय नसल्यानं बदलतो. घरातून पळून गेलेली अल्पवयीन मुलं मजुरी, गुन्हेगारी, भीक मागणं याकडे वळतात किंवा अयोग्य कामांसाठी त्यांचं अपहरणही होतं. (या संदर्भात करोनाकाळात वेगवेगळ्या राज्यांतून पळून आलेली ६०० मुलं मुंबई रेल्वे स्थानकांवर सापडली आणि त्यात १६७ अल्पवयीन मुली होत्या, अशी बातमी होती). आजही हजारो बेघर मुलं अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण या प्राथमिक गरजांपासून वंचित राहातात.

अभ्यास दर्शवतो, की या देशातल्या ३ दशलक्ष ‘सेक्स वर्कर्स’मध्ये अदमासे ४० टक्के मुलंमुली आहेत. त्यांना सामावून घेऊ शकतील, त्यांचं पालनपोषण नीट करतील अशी कुटुंबं मिळायला हवीत. कुटुंब नसलेली, कुटुंबानं सोडलेली, घर सोडून पळून आलेली मुलं छळ, हिंसा, दारिद्र्य, गुन्हेगारी आणि देहव्यापार यांची बळी ठरू शकतात. तसंच बालकामगारांच्या लैंगिक छळाबाबत विशेष समाजजागृती होण्याची आवश्यकता आहे. त्याबाबत एक विचित्र मौन समाजात आढळतं.

अनुसूचित जाती-जमातीची अनुक्रमे ३८ टक्के व ४६ टक्के मुलं शाळेबाहेर आहेत. त्यांच्यातली बरीचशी मुले बेघर आहेत. पिढ्यानपिढ्यांतून प्रवाहित होणारी तंत्रकौशल्यं आता यंत्रयुगात, मार्केटच्या तडाख्यामुळे, निर्वाहासाठी निरुपयोगी ठरत आहेत आणि त्यातून मोठ्या प्रमाणात बेकारी वाढते आहे. विशेष प्रयत्न न केल्यास भविष्यात अशा बेकारांसाठी शिक्षण, संरक्षण, व्यवसाय- नोकरी- रोजगार उपलब्ध होतील का, हा प्रश्नच आहे.

करोनादरम्यान मुलांचं कुपोषण वाढलं, कामगार कायद्यांचं उल्लंघन वाढलं, श्रमशोषण वाढलं. गेल्या वर्षभरात आपल्या देशात करोनादरम्यान मुलांच्या छळाचं प्रमाण २० टक्क्यांवरून ४० टक्के इतकं वाढलं आहे. राष्ट्रीय स्तरावर लहान मुलांच्या समस्यांबाबत काम करणाऱ्या ‘चाइल्डलाइन’कडे मुलांचा छळ आणि हिंसेसंदर्भात ९२,००० कॉल्स आले. तेही फक्त ११ दिवसात. आणि हे टाळेबंदीच्या काळात आलेल्या एकूण कॉल्सच्या ३० टक्के होते.

याच काळात जुने मानसिक आजार परत उफाळले, नवे मनोविकार उद्भवले. विपत्त्योतर चिंता, मंत्रचळ, एकाग्रता आणि संयम यांत अडथळे, नकारात्मक वर्तन, चिंतारोग यांच्यात वाढ झाली.( गेल्या वर्षभरात ५ टक्क्यांवरून ४० टक्क्यांपर्यंत वाढ), तीव्र मनोविकार, मनोकायिक आजार, अति खाणं व खाणं टाळणं ( *Eating disorders* ) यात वाढ झालेली दिसते. मुलं, कुमार, तरुण आणि प्रौढ- या साऱ्या गटांमध्ये संधीनुसार अमली द्रव्यांचा वापर आणि व्यसनं, चिडचिड, नैराश्य, अभ्यासात अधोगती, नेट व पॉर्न ॲडिक्शन, स्व-दुखापत ते आत्महत्येचे प्रयत्न, घातक धाडस, वाढती आक्रमकता, अनावर लैंगिकता इत्यादी प्रकार-विकारांत वाढ आढळते. करोनामुळे घरात कोंडून गेलेली शहरी मुलं आता नेटच्या मोहजालात अडकलीत. एकंदरीत बालगुन्हेगारी वाढण्याबरोबरच मुलांना मोठ्या प्रमाणावर नेट, मोबाइल, नेट गेम्स, पॉर्नोग्राफीची चटक लागली. सायबर छळ (सायबर बुलिइंग), सायबर गुन्हे, सायबर बळी वाढले. स्पर्धेमुळे कुटुंबातले ताणतणाव वाढले. मैदानी खेळ कमी झाले. अनेक घरांमध्ये पैसे मुलांपेक्षा, मूल्यांपेक्षा अधिक महत्त्वाचे ठरले. पैसे कमी पडतील या भीतीनं मनं व्यापारी बनत गेली.

ज्येष्ठ नागरिकांचं वाढत चाललेलं आयुष्यमान हा वैद्यकशास्त्राचा विजय आहेच, पण आजच्या कुटुंबांसाठी ते अनेक बाबतीत आव्हान ठरत आहे. इतर देशांत वृद्धांचं प्रमाण ७ टक्क्यांवरून १४ टक्के वाढायला १०० वर्षं लागली, पण इथे भारतात, ती वाढ २० वर्षांत झाली. वाढलेल्या वयाबरोबर वाढलेले आजार आणि त्यातील उपचारांचा वाढलेला खर्च, जगण्याचा खर्च वाढत आहे. शासकीय आरोग्यसेवेतल्या त्रुटींमुळे अनेकांना म्हातारं माणूस घरात सांभाळणं आर्थिकदृष्ट्या झेपेनासं झालं आहे. गेल्या ५० वर्षांत लोकसंख्या वाढली तिप्पट, तर वृद्धांची संख्या झाली चौपट. अंदाज हा आहे, की २०५० पर्यंत लोकसंख्या दुपटीनं, तर वृद्धांची संख्या चौपटीनं वाढेल. म्हणजे आता एका वृद्धाबरोबर सुमारे आठ काळजीवाहक असतील, तर नंतर तीनच असतील. शिवाय निर्णयप्रक्रियेतून ज्येष्ठ मंडळी बाजूला केली जात आहेत. अनाथ वृद्ध संख्येनं वाढत जातील अशी साधार भीती वाटत आहे. ही स्थिती सुधारायला हवी.

वृद्धाश्रम आताच कमी पडत आहेत. त्यातल्या निगेचा (देखभालीचा) दर्जा सुधारायला हवा. आजी कुटुंबात उपयुक्त असतात, पण आजोबा ‘एटीएम मशीन’ नसतील, तर एकटे, निरुपयोगी, दुर्लक्षित होत जातात. त्यांचे वयानुसार होणारे आजार दुर्लक्षिले जातात अथवा अटळ म्हणून स्वीकारले जातात. आवश्यक ते वैद्यकीय उपचार मग केले जात नाहीत. त्यात मानसिक आजार, स्वभावदोष आणि स्मृतिभ्रंश असेल, तर साऱ्यांनाच नकोसं होत जातं.

‘वसुधैव कुटुंबकम्’ ही आता सत्यतेत उतरायला हवी अशी गरज बनते आहे. ही गरज आपल्याला सरकारी पातळीवरच प्रामुख्यानं सोडवावी लागेल. ती सामाजिक आणि वैयक्तिक स्वरुपात झेपणारी नसेल. सरकारमार्फत ज्येष्ठ आधार केंद्रं, जीवनविमा, आरोग्य विमा, निवृत्तिवेतन, कृतज्ञता निधी उभारावे लागतील. हे नियोजन आतापासून तातडीनं करावं लागेल.

करोना आणि अशा इतर विपत्तीकाळात कुटुंबातल्या दुर्बल, त्रस्त घटकांसाठी काय करता येईल? इथे उदाहरणादाखल आपण मुलं हा घटक लक्षात घेऊ. मुलांना होणाऱ्या त्रासाची कारणं आणि परिणाम जाणून घेऊन त्याबाबत कुटुंबात आणि समाजात जाणीव-जागृती करावी लागेल. याबद्दल शासनातर्फे मुलांच्या मदतीसाठी *Integrated child protection scheme* (आयसीपीएस), राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रम, आयसीडीएस, (*Integrated child development scheme*), राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम, केंद्रीय महिला व बाल विकास विभागाच्या योजना, अशा काही चांगल्या योजनांचा आधार घेता येईल. तसंच या काही सूचनाही उपयुक्त ठरू शकतील-

- कुटुंब सावरेपर्यंत काही काळापुरता काही निवासी संस्थांचा उपयोग करून घेता येईल.

- जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमातल्या *(District mental health program- DMHP)* सोयींचा उपयोग होऊ शकेल.

- प्रगती आणि शारीरिक व मानसिक आरोग्याबाबत स्वयंसेवी संस्थांच्या आणि स्वयंसेवकांच्या मदतीनं सतत निरीक्षण ठेवता येईल आणि पाठपुरावा करता येईल.

एकत्र आणि विभक्त कुटुंब पद्धतीतल्या गुणदोषांचा अभ्यास करून काही नियम नीट पाळल्यास, म्हणजेच दोन्ही पद्धतींमधील चांगलं एकत्र केल्यास आजच्या जगात अजून कुटुंबं जपता येतील असं वाटतं. काही कुटुंबं आणि वृद्धाश्रम अशी सार्वजनिक कुटुंबपद्धत जगून दाखवत आहेत. तिथे वेळ आणि अर्थव्यवस्थापन नीट सांभाळलं जातं. जरूर तिथे मानस सल्लागार आणि अर्थतज्ज्ञ यांचा सल्ला घेतला जातो. तिथे समुपदेशन मनाचं संतुलन राखण्यासाठी उपयुक्त ठरतं. मनं सावरली, की कुटुंब जपणं सोपं जातं. कुटुंबातली सामूहिक कामं आणि जबाबदाऱ्या यांचं योग्य वाटप, नव्या आवश्यक सवयी-तंत्रं शिकून घेणं, शक्यतो एकत्र जेवण- करमणूक- खेळ- सण- उत्सव- प्रार्थना करणं, सामूहिक अर्थ-व्यवहार चोख ठेवणं एवढं भान सतत सांभाळलं की सारं सोपं जाईल.

सध्या अस्तित्वात असलेल्या कुटुंबांना टिकण्यासाठी आपसात काय करता येईल ते पाहू-

- ज्यांना जे जमेल ते घरकाम त्यांनी करायला हवं. घरातल्या दैनंदिन कामाचं वाटप करून ठेवलं तर कामांचं व्यवस्थापन सोपं होईल. वादविवादात सम्यक, मध्यम, संतुलित मार्ग स्वीकारावा, महत्त्वाचं तेवढंच बोलावं आणि शक्यतो विसंवाद होऊ देऊ नये (तडजोड तर तुम्ही नेहमीच करत असणार!) एकमेकांच्या व्यवहारांत जरूर तेवढं अंतर ( *Privacy space*) राखलं तर अकारण घर्षण/ संघर्ष टाळता येतो.
- आर्थिक स्थितीचा आढावा नियमित घेत जाणं हितावह ठरतं.
- निर्णय शक्य तिथे सहमतीनं घ्यावेत. चर्चेत भावनेपेक्षा विवेकी विचारांना महत्त्व असू द्यावं. चुकीचे विचार कुणी व्यक्त केलेच, तर त्यांना सन्माननीय माघारीसाठी वाव ठेवावा, म्हणजे मग नाती तुटत नाहीत. व्यक्तिगत दोषारोप टाळावेत हे उत्तम! भूतकाळातली शल्यं हळूवार भूतकाळात सोडून द्यावीत. त्यांचं आता काही प्रयोजन उरलेलं नसतं. अडचण/ संकट आल्यास काय करायचं याचं पूर्व नियोजन करून ठेवलं पाहिजे. रोजचं चालणं, बागकाम, करमणूक किंवा सिनेमा पाहाणं एकत्र करता आलं तर नातेसंबंधातला ताण हलका होऊ शकतो.
- कुटुंबीयांच्या योग्य जरुरींकडे लक्ष ठेवून त्या वेळीच पूर्ण कराव्यात. मतभेद नवे असतानाच दूर करावेत. ते जुने झाले की त्यातल्या मुद्द्यांची गुंतागुंत वाढते.
- कुटुंबाच्या भविष्यातल्या गोष्टींबाबत शक्य तिथे एकत्र चर्चा करावी, मतभेदांचे मुद्दे लिहून काढावेत. त्याचं एकत्र वाचन करावं, उपाय जाणून घ्यावेत.

हे सर्व सोपं नाही हे मीही जाणून आहे… तसं नसतं तर मानस सल्लागारांचं काय झालं असतं?

थोडक्यात काय, तर कुटुंबं तुटली नाहीत, ती बदलली आहेत. जुन्यातून नवं होताना, आधुनिक जगाशी समायोजन साधताना, त्यांनी कात टाकली आहे. जगात गेल्या ५० वर्षांत झालेले विलक्षण सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय बदल जी उलथापालथ घडवत आहेत, त्यात जीवनमूल्यं सांभाळत, प्रतिगामी ते पुरोगामी होत, काही चांगले, काही वाईट, बरेचसे अनाकलनीय बदल स्वीकारत ही व्यवस्था टिकण्याची धडपड करत आहे. त्यातले घटक- पुरुष, स्त्रिया, मुलं-मुली, वृद्ध अनेक आव्हानांना सामोरे जात आहेत. या संघर्षात परिस्थितीतलं काही सुधारत आहे, काही जखमी होत आहे, काही जीर्ण होत निरोप घेत आहे.

मी या साऱ्या बदलांकडे उत्सुकतेनं पाहात आहे. आशावादी आहे, की जग चांगल्यासाठी बदलत आहे. प्रत्येक निर्णयाची किंमत चुकवावी लागतेच. पण सारंच काही वाईट होत आहे असं नाही. आज समोरचं चित्र अजूनही दुःख, चिंता आणि संभ्रम देणारं आहे, पण तेही सुधारता येईल असं मला वाटतं…

◆ *patkar.pradeep@gmail.com*

## सप्तपदीनंतर…

# तपपूर्तीच्या दिशेने…

– पल्लवी पाटील सांगवीकर

‘सप्तपदीनंतर…’ किती सार्थक नाव आहे या सदराचं! लग्नापूर्वीचे गोडगुलाबी, हळुवार, हवेत तरंगणारे दिवस सप्तपदीनंतर जेव्हा सत्यात उतरू लागतात, तेव्हा खऱ्या अर्थानं नव्या आयुष्याची, सहजीवनाची सुरुवात होते. आम्हा दोघांचं ‘ॲरेंज मॅरेज’. पारंपरिक कांदेपोहे पद्धतीनं झालेलं!

आम्ही दोघं स्वभावाच्या बाबतीत अगदी दोन टोकं. मला जितकं जास्त बोलायला आवडतं, तितका तो कमी बोलणारा. मी जितकी उतावळी, तो तितका संयमी. मी जेवढी फटकळ, रागीट, तेवढाच तो शांत, समंजस… अगदी दोन विरुद्ध स्वभावाची माणसं एका बंधनात बांधल्यामुळे एकत्र येतात आणि एवढी एकमेकांत गुंतून जातात, की आपल्याही नकळत आपण समोरच्यातले काही गुण उचलतो. एखाद्या प्रसंगी जेव्हा तो चिडतो आणि मी त्याचा राग त्याच्याच शैलीत शांतपणे हाताळते, त्यावेळी वाटतं, कुठून आला एवढा संयम माझ्यात? मी याच्यासारखी होत चालली आहे का? आणि तोही बऱ्याचदा जेव्हा एखादी गोष्ट माझ्यासारखी करून जातो तेव्हा मला म्हणतो, ‘तुझा वाण नाही, पण गुण लागला!’ मागच्या दहा वर्षांत सुखदुःखांच्या अनेक लाटा पचवताना एकमेकांचा हात हातात धरून या संसाररूपी वाळूत कधी ठामपणे उभे राहिलो हे आम्हालाच कळलं नाही! आणि या किनाऱ्यावर गवसलेल्या मोत्यांसारखी आमची दोन्ही लेकरं- मर्मबंधा आणि वितहार्य तर आमच्या सहजीवनाचा आनंद पदोपदी द्विगुणित करतात.

आम्ही दोघंही ‘आयटी’ क्षेत्रातले असल्यामुळे नोकरीच्या निमित्तानं आम्हाला वेगवेगळ्या देशांमध्ये फिरण्याची संधी मिळाली. फिनलँड, इंग्लंड, स्कॉटलँड, चीन असे वेगवेगळे देश फिरताना, तिथे राहाताना मजा तर केलीच, पण तिथे येणाऱ्या अडचणींवरही एकमेकांना साथ देऊन मात केली. बऱ्याचदा आपल्याला वाटतं, की अमुक एक जण परदेशामध्ये राहातात म्हणजे किती छान आयुष्य आहे यांचं! पण तिथलाही ‘स्ट्रगल’ पूर्णपणे वेगळा असतो. तिथे कोणत्याही कामासाठी मदतनीस मिळत नाही. मिळाले तरी ते फारच खर्चिक असतं. त्यामुळे केरवारे, लादी पुसणं, भांडी घासणं, ही कामं आपल्यालाच करावी लागतात. भाषेची समस्या असेल तर वेळेला ‘ट्रान्सलेटर’ वापरून समोरच्याला सांगावं लागतं. प्रसंगी भारतीय शाकाहार करण्यासाठी २-२ तासांचा प्रवास करावा लागतो. पासपोर्ट, व्हिसा, त्याची कागदपत्र नोंदणी बऱ्याचदा थकवून सोडते.

आम्ही दोघं चीनमध्ये नोकरी करत होतो तेव्हा घरकामं वाटलेली असायची. हे घरातलं, बायकांचं काम आहे आणि ‘हे तू कर, मी करणार नाही’ असं म्हणणारा नवरा- ओंकार मला कधीच आठवत नाही. तो घरातही बरोबरीनं मदत करू लागतो. मग ते घर आवरणं असो, मुलांना सांभाळणं असो, त्यांना खाऊ घालणं असो किंवा रात्री जागून त्यांना सांभाळणं. प्रत्येक गोष्टीत त्याचा सहभाग असतो. आणि त्याबरोबर मीही जेव्हा बाहेरची सगळी काम करते त्या वेळी त्यालासुद्धा माझं कौतुक असतं. आताही भारतात एक वर्षाचं बाळ आणि घर सांभाळून नोकरी करण्याची हिंमत मी फक्त त्याच्या जीवावर करू शकते. लेकीला जपणाऱ्या, मदत करणाऱ्या जावयाचं माझ्या आईला भारी कौतुक! तिच्या शब्दात तर तिचा जावई अगदी हिरा आहे आणि ‘या हिऱ्यापुढे तुझी मुलगी जणू गारगोटीच आहे असं तुला वाटतं’ असं मी नेहमी तिला गमतीत म्हणत असते.

आमच्यात भांडणंही भरपूर होतात. खासकरून मुलांच्या बाबतीत. ओंकारला मुलांवर आवाज चढवलेला, त्यांच्यावर हात उचललेला अजिबात आवडत नाही आणि मी प्रत्येक वेळेला परिस्थिती शांतपणे हाताळू शकत नाही. त्यामुळे बऱ्याचदा आमच्यात वादाची ठिणगी पडते. मात्र एक जण चिडला की दुसऱ्यानं शांत बसायचं, हा आमच्यातला अलिखित नियम आहे. त्यामुळे आमची भांडणं कधीही घराबाहेर जात नाहीत. नातेवाईकांच्या, मित्रमैत्रिणींच्या वागण्यालाही आम्ही आमच्या भांडणाचं कारण बनवणं कटाक्षानं टाळतो. समोरच्यानं कसं बोलावं, वागावं यावर आपला ताबा नाही, हे समजून घेतो. एकमेकांना त्रासदायक वाटणाऱ्या सवयींमुळे बऱ्याचदा आमच्यात वादाला तोंड फुटतं. ‘दोन मिनिटांत आलो’ असं सांगून दोन तास घेणारा, कोणालाही ‘नाही’ न म्हणणारा ओंकार आणि बऱ्याच वेळा वेळ पाळली नाही, कपाटात कपडे, कागदपत्रं नीट ठेवली नाहीत यावरून चिडचिड आणि (त्याच्या भाषेत) त्याचा अतिरेक करणारी मी, अशा कारणांमुळे आठवड्यातून एखाद्या वेळी तरी आमच्या सांगवीकर राज्यात धुमश्चक्री होतेच! अशा वेळी आमचं कन्यारत्न मध्यस्थी करून वाद मिटवायला मदत करतं.

२०१७-१८ ही वर्षं आमच्यासाठी अतिशय दुःखद होती. माझे वडील आणि त्याचे वडील दोघंही नऊ महिन्यांच्या अंतरानं वारले आणि त्या दोन्ही वेळी चीनमधून भारतात येणं हे जणू आमच्यासाठी अक्षरशः शिवधनुष्य उचलणं होतं. माझे वडील वारले तेव्हा आम्ही तीन दिवस चीनमध्ये अडकलो होतो. आमचा पासपोर्ट ‘व्हिसा एक्स्टेन्शन’साठी गेल्यामुळे काहीच करता येत नव्हतं आणि इकडे वडील अतिदक्षता विभागात. त्या वेळी मला समजावणारा, सावरणारा, माझ्या पाठीशी उभा राहाणारा ओंकार, माझ्या दुसऱ्या बाळंतपणाच्या वेळेस टाळेबंदी असल्यामुळे आणि इतर कुणीही रुग्णालयात सोबत नसल्यामुळे पूर्ण वेळ बाळाला सांभाळणारा ओंकार माझ्यासाठी ग्रेटच आहे!

मी नेहमी ओरडत असते, की ‘‘तुझी पोरं आगाऊ झाली आहेत. नऊ महिने यांना पोटात वाढवा, ‘सीझर’चे टाके सहन करा, बेड रेस्ट, उलट्या, एवढं सगळं सहन करून मुलांचा पहिला शब्द काय, तर ‘बाबा’!’’ तो हसत म्हणतो, ‘‘माझी लेकरं त्यांच्या आईवरच गेली आहेत! आईआधी त्यांना बाबाच लागतो. त्यांच्या आईसारखा!’’

◆ *pallavis311 @outlook. com*



# रथ सहजीवनाचा!

– वर्षा भिसे



कांद्यापोह्यांच्या कार्यक्रमानंतर दोन महिन्यांच्या आत आमचं लग्न झालंसुद्धा! लग्नाच्या आधी फारशा गाठीभेटी न झाल्यामुळे एकमेकांशी ओळख नव्हती. दोघांनाही एकमेकांच्या स्वभावाचा फारसा अंदाज येत नव्हता. फक्त लग्न जमायच्या वेळीच मी सांगितलं होतं, की नोकरी करणं हे बंधनकारक नसावं. माझं मी ठरवेन, की मला काय करायचं आहे. माझ्या नवऱ्यानं- केदारनं याला पूर्ण पाठिंबा दिला आणि अशा प्रकारे आमच्या सहजीवनाची सुरुवात झाली.

लग्न झाल्या झाल्या दहा दिवसांत आम्ही अमेरिकेला गेलो. दोन ते तीन वर्षं तरी तिथे राहू असा बेत होता. परंतु गेल्यावर साधारण तीन-चार महिन्यांतच माझ्या लक्षात आलं, की मी तिथे रमत नाहीये आणि आपण भारतात परत जावं. माझ्या या निर्णयाला केदारनं पाठिंबा दिला आणि सहा महिन्यांत आम्ही भारतात आलो. त्यानंतर पहिल्या मुलाचा- ईशानचा जन्म झाला. त्यानंतर आमच्या दोघांचा केंद्रबिंदू मुलगा होता, सगळे निर्णय त्याच्याभोवती फिरत होते. अशातच केदारच्या परदेशवाऱ्या चालू झाल्या. मुलासाठी शाळा शोधण्याची जबाबदारी माझ्यावर आली. आम्ही पुण्यात नवीन असल्यामुळे काहीच माहिती नव्हतं. मग मी सकाळी मुलाला घेऊन प्रत्येक शाळेत जाऊन बोलून यायचे आणि फोनवर नवऱ्याशी चर्चा करायचे. अशाप्रकारे आम्ही शाळा ठरवली. काही वर्षांत प्रथमचा जन्म झाला. आता तर माझी जबाबदारी अधिकच वाढली होती. नवऱ्याच्या परदेशवाऱ्याही वाढल्या होत्या. पण अशा वेळेस घर आणि मुलं मी सांभाळायचं हे मी आधीच ठरवलं होतं. एकदा नवरा परदेशात असताना अचानक प्रथम आजारी पडला आणि उपचारांसाठी छोटीशी शस्त्रक्रिया करावी लागणार होती. त्यावेळी पटापट निर्णय घेऊन सगळं पार पाडावं लागलं. नवरा परदेशात आणि मुलांचं आजारपण हे अगदी ठरलेलं असायचं. एकदा मोठ्या मुलाच्या शाळेच्या वेळेस नेमका छोटया मुलाला फणफणून ताप आला. त्याला औषध देऊन, उचलून घेऊन मोठ्याला सोडायला जावं लागलं, कारण घरात दुसरं कुणीही नाही. अशा वेळी नवऱ्याचीसुद्धा खूप घालमेल झाली, पण परदेशात असल्यामुळे त्याचा इलाज नसायचा. ‘आयटी’मध्ये मंदी चालू झाली की ताण यायचा, की आपली नोकरी तर नाही ना जाणार? तेव्हा ‘मी आहे, जे होईल ते निभावून नेऊ,’ हा विश्वास पुरुषाला बायकोनं देणं खूपच गरजेचं आहे असं प्रकर्षानं जाणवलं. बायको कोणत्याही परिस्थितीत आपल्याबरोबर आहे हे एकदा पुरुषाला जाणवलं की तो जास्त प्रगती करतो, असं मला वाटतं.

मुलं मोठी होऊ लागली तसं स्वतःचं काहीतरी करावं असं मनात आलं. गंमत म्हणून काही वर्षांपूर्वी केलेल्या छोट्याशा ज्वेलरी कोर्सचा मला उपयोग झाला. फक्त ‘इमिटेशन ज्वेलरी’ करायची नाही, काहीतरी सर्जनशील करावं, ज्यातून आपण काहीतरी नवीन करतोय याचा आनंद मिळावा ही इच्छा होती. त्यातून जन्म झाला माझा ब्रँड ‘सृजना बाय वर्षा’ याचा. सुरुवात क्रोशा ज्वेलरीनं केली आणि हळूहळू काही वर्षांनी त्यात फॅब्रिक ज्वेलरीचीही भर पडली. मित्रमैत्रिणी आणि नातेवाईकांमध्ये दागिने कितीसे विकले जाणार, व्यवसाय वाढवायला पाहिजे हे मनात आलं. नवऱ्यानं सुचवलं, की छोटी छोटी प्रदर्शनं करत जा, त्यातून ग्राहक वर्ग वाढेल. पण मी प्रदर्शनाला गेल्यावर मुलांकडे लक्ष कोण देईल, या काळजीनं फक्त शनिवार- रविवारची प्रदर्शनं घेतली. त्यामुळे नवऱ्याला पूर्णपणे मुलांकडे लक्ष देता यायचं. नंतर हळूहळू मोठी प्रदर्शनं चालू केली. तीन ते चार दिवसांचीसुद्धा प्रदर्शनं केली. अशा वेळेस नवरा पूर्णपणे मुलांसाठी घरात थांबायचा आणि त्यांच्याकडे लक्ष द्यायचा. त्यासाठी अगदी त्याच्या परदेशवाऱ्याही त्यानं ‘ॲडजस्ट’ केल्या आहेत.

आता मुलं मोठी झाली आहेत, पण नवऱ्यानं आतापर्यंत माझ्या कामाला दिलेल्या आदरामुळे मुलांच्यासुध्दा हे लक्षात आलं आहे, की आईसाठी घर हे पहिल्या क्रमांकावर आहे, पण तरीही तिला स्वतःचा व्यवसायसुद्धा तितकाच महत्त्वाचा आहे. त्यामुळे घरातल्या कामांमध्ये त्यांचाही सहभाग सतत असतो. त्यांना असं घडवण्यात नवऱ्याचा खूप मोठा वाटा आहे. घरामध्ये नवरा असल्यामुळे मला घराची काळजी अजिबात वाटत नाही. ‘‘तू तुझ्या कामाकडे लक्ष दे, खूप छान बिझनेस कर,’’ हेच कायम नवरा सांगत आला आहे. त्यानंच मला माझ्या ज्वेलरीचा ब्रँड करण्यास भाग पाडलं आणि ‘सृजना बाय वर्षा’ हा क्रोशे आणि फॅब्रिक ज्वेलरीमधला आता रजिस्टर्ड ट्रेडमार्क झाला आहे. गेल्या काही वर्षांत हळूहळू केदारनं कामाचं स्वरूप बदलत बदलत स्वतःची सॉफ्टवेअर कन्सल्टन्सी सुरू केली आहे. आता कोणाच्या हाताखाली काम करावं लागत नसल्यामुळे स्वतःच्या वेळेनुसार मनासारखं काम करता येतं. हे सगळे बदल होत असताना माझ्यावर घराचा ताण थोडा जास्त आला होता, पण एकमेकांशी बोलून हे सगळं ठरवल्यामुळे आम्ही ते व्यवस्थित पार पाडलं.

अशा प्रकारे आमच्या सहजीवनाचा रथ कधी उजवीकडच्या चाकावर, तर कधी डावीकडच्या चाकावर जोर देत यशस्वीपणे घोडदौड करतो आहे!

◆ *kedarvarsha@gmail. com*



वाचायलाच हवीत

नीरजा

# प्रांजळ, पारदर्शी आत्मकथन!

**धार्मिक वातावरणात वाढलेली, स्त्री-पुरुष नात्यांविषयीच्या रूढ कल्पना बाळगणारी 'कमळी' जग पाहात, नवे अनुभव घेत, कधी दुखावली जात, समृद्ध आणि कणखर होत जाते. स्वतःचे निर्णय घेण्याचा आत्मविश्वास तिच्यात येतो आणि या नव्या बळासह ती इतर पिचलेल्या स्त्रियांच्या उपयोगी पडायचं ठरवते. 'कमळी'चा 'कमल पाध्ये' होण्याचा हा सर्व प्रवास कोणत्याही अभिनिवेशाशिवाय, निर्मळपणे रेखाटला आहे तो 'बंध-अनुबंध' या त्यांच्या आत्मकथनात. घरगुती आणि सामाजिक परिप्रेक्ष्यातही स्त्रीला स्वतःला निरखायला प्रवृत्त करणारं हे पुस्तक म्हणूनच वाचायलाच हवं...**

आपल्या आयुष्यातल्या अनेक घटना अशा असतात, की त्या केवळ आपल्या अतिशय वैयक्तिक भावबंधांशी गुंफल्या गेलेल्या असतात. या घटना क्वचित कधी मनस्ताप देतात, तर कधी आपल्या जीवनातले अनेक एकाकी क्षण सुसह्य करून जातात. कुणाशी जिव्हाळ्यानं गप्पा मारताना अनेकदा आठवणींचे असे अनेक बंध मोकळे होतात. तरीही जीवनातल्या घटनांची केवळ नोंद करणाऱ्या पारंपरिक आत्मकथनातून स्वतःच्या मनाची संवेदनशील स्पंदनं आणि जीवनातल्या सर्व घटना अगदी प्रामाणिक मोकळेपणानं कुणी लिहू शकेल यावर कमल पाध्ये यांचा विश्वास नव्हता. कारण आत्मकथनात्मक लिखाणात पुष्कळदा निर्लेप वृत्तीपेक्षा स्वतःच्या वागण्याबोलण्याचं समर्थन होत राहातं. अर्थात ते अपरिहार्यही आहे. त्यामुळेच या दोन्ही प्रकारचं लेखन करायची कमल पाध्ये यांची इच्छा नव्हती. तरीही त्यांनी 'बंध-अनुबंध' हे आत्मकथन लिहिलं.

ते लिहीलं, कारण सामाजिक कार्य करताना 'तुम्हाला माणूस म्हणून न वागवल्यानं होणारा तुमचा मनोभंग चव्हाट्यावरून मांडा,' असं त्या इतर स्त्रियांना सांगत होत्या आणि स्वतः मात्र 'आपल्या घराचा आब आपणच राखला पाहिजे' या पारंपरिक संकेताच्या चौकटींचं पालन करत होत्या. हे अप्रामाणिकपणाचं आहे, असं सतत वाटल्यानं त्यांनी आपलं आत्मकथन लिहायला घेतलं आणि 'बंध-अनुबंध'सारखं एक पारदर्शी आणि चिंतनशील आत्मकथन मराठी वाचकांच्या हाती पडलं.



आपल्या समाजव्यवस्थेत स्त्री म्हणून जगताना, वाट्याला आलेल्या विविध भूमिका पार पाडताना जे जे प्रश्न पडत गेले, त्याविषयीचं आपलं म्हणणं त्या या आत्मकथनात मांडतातच, पण 'स्व'पासून सुरू झालेला प्रवास आजूबाजूच्या समाजातील स्त्रियांच्या प्रश्नांपर्यंत कसा पोहोचला हेही सांगत जातात. बाईपणाच्या कक्षा विस्तारणारा एक दीर्घ प्रवास या आत्मकथनातून त्या आपल्यासमोर उभा करतात. आपलं स्वत्व शोधताना आलेले सारे अनुभव प्रामाणिकपणे मांडताना कमल पाध्ये केवळ स्त्री-प्रश्नांच्या चौकटीत स्वतःला बंदिस्त करून घेत नाहीत. प्रेम, स्नेह, वात्सल्य, राग-लोभ, अशा माणसांच्या विविध भावनिक गरजांतून निर्माण होणारे भावभावनांचे, नात्यागोत्यांच्या गुंतागुंतीचे बंध-अनुबंध आणि त्यातून उद्भवणाऱ्या समस्या या आत्मकथनात तितक्याच उत्कटतेनं उलगडतात.

मुंबईमधील रामवाडीतल्या विनायक भटजींची मुलगी 'कमळी' ते प्रभाकर पाध्ये यांची बायको 'कमल प्रभाकर पाध्ये' आणि नंतर स्वतःला सापडल्यानंतरच्या 'सामाजिक कार्यकर्त्या कमल पाध्ये' असा दीर्घ प्रवास या आत्मकथनात अतिशय संवेदनशीलतेनं त्यांनी मांडला आहे. या प्रवासात प्रभाकर पाध्ये यांच्यासारख्या व्यासंगी, बुद्धिमान, पण थोड्या एककल्ली स्वभावाच्या नवऱ्याबरोबर संसार करताना आलेल्या विविध पेचप्रसंगांचं, भावनिक गुंत्याचं वर्णन त्या करतात. त्याचबरोबर पाध्यांच्या जोडीनं जगलेल्या साहित्यिक, सांस्कृतिक, राजकीय आणि सामाजिक विश्वातल्या विलक्षण अनुभवांनी समृद्ध झालेल्या कमलताईही आपल्याला भेटत जातात. कधी पाध्यांच्या अनाकलनीय वागण्यामुळे, कधी एकुलत्या एका मुलाच्या मृत्यूमुळे, तर कधी माणसांच्या आलेल्या कटू अनुभवांमुळे वेगवेगळ्या प्रसंगांत पराभूत आणि उध्वस्त झालेल्या कमलताईंचं अतिशय तरल, पण स्वयंपूर्ण असं व्यक्तिमत्त्व या आत्मकथनातून उलगडतं.

या आत्मकथनात त्या केवळ लहानपण, तारुण्य, लग्न, संसार, मग प्रौढत्व आणि त्यात आलेले बरेवाईट अनुभव यांचंच रेखाटन करतात असं नाही, तर अगदी तथाकथित उच्चवर्णातल्या जातिभेदापासून ते स्त्री-पुरुष समानतेविषयी लोकांमध्ये असलेला दुटप्पीपणा, अशा असंख्य प्रश्नांच्या उत्तरांचा शोध त्या घेत जातात. घडलेल्या प्रत्येक घटनेकडे त्रयस्थपणे पाहातात आणि त्याविषयीचं विश्लेषण आणि चिंतन करत राहातात. असं चिंतन स्त्रियांच्या आत्मकथनात क्वचितच दिसतं.

काळबादेवी रस्त्यावर असलेल्या रामवाडीत राममंदिरात मोठी झालेली, वयाच्या नवव्या वर्षी आई गमावलेली विनायक भटजींची कमळी आत्मकथनाच्या सुरूवातीलाच या मंदिराच्या सभामंडपात येऊन बसते आणि एखादं चलतचित्र सरकत जावं तसं आजवरचं आयुष्य 'फ्लॅशबॅक' पद्धतीनं तुकड्या-तुकड्यांतून आपल्यासमोर घेऊन येते. त्याला सलग कालखंड आहे, पण तरीही अनेक प्रसंगांचं वर्णन करता करता कधी भूतकाळात तर कधी वर्तमानात ही कमळी शिरते आणि स्वतःकडेच पाहात राहते. त्या काळातल्या घटनांवर विचार करत राहाते, त्याच्या सर्व बाजू समजावून घेऊ पाहाते.

रामवाडीतलं सारं जगणं पारंपरिक ब्राह्मण कुटुंबातलं. कीर्तन, गाणी, व्रतवैकल्यं यांच्या धबडग्यात बालपण गेलं. पण लहानपणापासूनच साऱ्याच गोष्टींचे संदर्भ तपासून पाहात, त्यावर विचार करणाऱ्या कमलताईंना स्वतःची अशी एक समज होतीच. त्यात प्रभाकर पाध्ये यांच्याशी झालेल्या लग्नानंतर वाढलेला साहित्यिक, वैचारिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातला वावर त्यांना जास्तीत जास्त प्रगल्भ आणि चिंतनशील करत गेला.

कमल पाध्ये यांचं हे आत्मकथन म्हणजे भावभावना, नातेसंबंध, त्यातले गुंते, त्यातून निर्माण झालेले ताण, मन मोडणाऱ्या घटना, सुखावणारे अनुभव, आई-मुलातील बंध, मैत्रीचं एक तरल नातं, यांचा कोलाज आहे. कुठेही आवेश नाही. सर्वसाधारणपणे बायकांच्या वाट्याला येतो तो अमानुष अन्याय नाही, पण शरीर जसं तुटून पडतं तसं समोरच्याच्या वागण्यानं मन मोडून पडण्याचे अनेक प्रसंग येतात. ते लग्नाच्या सुरूवातीच्या काळातच आले, तर आपलं माणूस म्हणून ज्याला स्वीकारलेलं असतं ते खरंच आपलं आहे का, या प्रश्नाभोवती मन आयुष्यभर रुंजी घालत राहातं. तसंच काहीसं कमलताईंचंही झालेलं आहे.

प्रभाकर पाध्ये हे मराठीतलं एक व्यासंगी व्यक्तिमत्त्व! बुद्धिमान असलेला हा पत्रकार, संपादक, साहित्यिक आणि विचारवंत. सतत साहित्यिक चर्चांमध्ये केंद्रस्थानी राहिलेला लेखक. कमलताई या त्यांच्या परिघावर! पण असं परिघावर असणं नाकारून स्वतःला केंद्रस्थानी आणण्यासाठी आपलं एक वेगळं काम कमलताई सुरू करतात आणि हळूहळू आपलं स्वतःचं आयुष्य सुरू करतात. कमलताईंच्या कथेत त्यांच्या जगण्याचा सारा पट येतो. त्यातली जी विशेष गोष्ट भावते ती त्यांचं स्त्री-पुरुषांतील मैत्रीवरचं चिंतन. स्त्रीपुरुषांतील मैत्री ही कल्पनाच आपल्या समाजाला न पटणारी, न भावणारी. त्यामुळे अनेकदा चोरून केलेली किंवा व्यक्त न करता आल्यानं आपोआप मरूनही गेलेली. खरं तर हे मैत्रीचं नातं इतकं निर्मळ असूनही आजही या मैत्रीकडे संशयानंच पाहिलं जातं. त्याला अनेकदा पुरुष आणि काही अंशी बायकाही कारणीभूत असतात. पन्नास-साठच्या दशकात तर याविषयी पूर्वग्रह मनात ठेवूनच बोललं जात होतं. ठरवून झालेल्या लग्नात अनेकदा विद्वान पुरुषांची बौद्धिक भूक भागत नव्हती. त्या वेळी 'बौद्धिक मैत्रिणीं'चं नातं साहित्यक्षेत्रात गाजत होतं, असं एका ठिकाणी कमलताईंनी म्हटलंय. त्या म्हणतात, 'मैत्रीचं नातंच सखोल भावनिक बंधांनी जोडलेलं. मग ते कुठल्याही पातळीवरचं का असेना. त्याला बौद्धिक हे विशेषण कशासाठी आणि मैत्री जर माणसांची भावनिक गरज असेल, तर त्याला कुठल्याही विशेषणांची जरुरीच असायला नको... आणि या मैत्रिणीचं स्थान कुठलं? आई-बहीण ही नाती निवडता येत नाहीत, ती नाती रक्ताची. पण पत्नी आणि मैत्रीण ही भावनिक बंध निर्माण करणारी, निवडलेली नाती. तशी स्त्रीला पती आणि मित्र निवडण्याची मुभाच समाजानं दिली नाही. पण या सर्व बंधांचं स्वरूप एकाच प्रकारचं. कुणाचंच स्वामित्व न मानणारं आणि तरीही एकमेकांचं स्वामित्व हवंहवंसं वाटणारं. जीवनाचं डायलेक्टिक्स तसं गुंतागुंतीचं.' या गुंतागुंतीमुळे त्यांच्याही आयुष्यात अनेकदा मन दुखावून जाण्याचे प्रसंग आले. लग्नानंतर रा.भि. जोशी यांच्या पत्नी सुधा जोशी आणि प्रभाकर पाध्ये यांच्यातल्या मैत्रीचं नातं त्यांना लग्न झाल्या दिवसापासून नीटसं कळत नव्हतं. त्यामुळे सुरूवातीच्या काळात हे नातं त्यांच्या मनात अस्वस्थता निर्माण करत होतं. पाध्यांचं त्यांना गृहीत धरणं आणि अनेक गोष्टी आपल्या मनाप्रमाणे करणं या नव्यानं घरात आलेल्या मुलीला कळत नव्हतं. एकदा दोन कॅलेंडर्स घरात घेऊन आलेले पाध्ये 'तुला हवं ते कॅलेंडर तू आपल्या भिंतीवर लाव' असं सांगून दुसरं सुधा जोशींना देतात. पण दुसऱ्या दिवशी कमलताईंना आवडलेलं कॅलेंडर सुधा जोशींच्या घरात गेल्याचं पाहून अजूनही या नात्याचे गुंते न कळलेली कमल दुखावते. तिनं पाध्यांना समजून घ्यायला हवं होतं, असं कदाचित वाचकांना वाटू शकतं. पण नवरा-बायकोच्या नात्यात सुरूवातीचे दिवस फार महत्त्वाचे असतात. मनात येणाऱ्या शंकाकुशंका बोलून दाखवणं आणि त्याचा उलगडा करणं दोन्ही बाजूंनी झालं नाही तर हे नातं एखाद्या भोवरीसारखं मनात टोचायला लागतं.

पाध्यांचा कर्मकांडावर विश्वास नव्हता. ही मुलगी वटसावित्रीचा उपवास करते हे कळल्यावर पाध्ये कमलताईंना उपवास जबरदस्तीनं मोडून जेवायला लावतात. खरं तर परंपरा, कर्मकांडात वाढलेल्या कमलला हळूहळू समजून घेत तिला बदलवणं त्या काळात पाध्यांना सहज शक्य होतं. पण तसं न करता तिनं काय करावं आणि काय करू नये याचे निर्णय पाध्ये घेत राहिले, ही गोष्ट कमलताईंना अनेकदा अस्वस्थ करत राहिली. लग्नानंतर मनं जुळण्याच्या, एकमेकांविषयी विश्वास आणि प्रेम निर्माण होण्याच्या काळात घडणारे असे अनेक प्रसंग बाईच्या मन तुटण्यासाठी कारणीभूत ठरत असतात. पण कमलताई आयुष्यातले असे अनेक छोटे छोटे प्रसंग पचवत, कधी पाध्यांनी केलेल्या प्रेमानं भारावून जात, तर कधी त्यांच्या अलिप्ततेनं दुखावत हळूहळू या अनुबंधात गुंतत जातात. पण नात्याच्या भावबंधात जास्त न अडकता स्वतःला मोकळं कसं करायचं हेही शिकतात. केवळ समाजकार्य नाही, तर राजकारणातही प्रवेश करतात. पाध्यांना त्यांनी राजकारणात जावं हे मान्य नसताना स्वतः निर्णय घेतात, निवडणुकीला उभ्या राहातात आणि नगरसेवक होतात. 'राष्ट्र सेवा दला'शी अगदी रामवाडीत असल्यापासून संबंध असलेल्या कमलताई पक्षाच्या राजकारणात सक्रिय होतात. या काळात मधू दंडवते, एस.एम.जोशी, बंडू गोरे, मृणाल गोरे अशा प्रभृतींशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध, काही मजेशीर किस्सेही त्यांनी रेखाटले आहेत. कमलताईंनी त्या काळातल्या मृणालताई गोरे यांच्या कामाची केलेली चिकित्सा मुळातून वाचण्यासारखीच आहे.



स्त्रियांच्या प्रश्नांवर काम करताना हिरिरीनं बोलणाऱ्या पुरुष सहकाऱ्यांच्या बायका मात्र भाषणं ऐकायला उपस्थित नसायच्या. त्या बहुतेक घरची कामं करत आणि नवऱ्यांची जेवणासाठी वाट पाहात असायच्या, हा विरोधाभास कमलताई त्यांच्या खास शैलीत टिपतात. कार्यकर्त्यांचं महत्त्व विशद करताना त्या लिहितात, 'कार्यकर्ते हे नेता आणि जनता यांच्यातील दुवा असतात. म्हणून मतांच्या राजकारणात त्यांना महत्त्वाचं स्थान असतं. आपल्या या शक्तीची जाणीव कार्यकर्त्यांना असते. ही शक्ती वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि हितसंबंध, सत्ताभिलाषा यांनी दुभंगली, की हेवेदावे आणि गटबाजी यांचं प्राबल्य होतं. तत्त्वापेक्षा 'आपला माणूस' याला महत्त्व येतं आणि या आपल्या माणसाला आपलाच ठेवायची धडपड सुरू होते. त्याची गुंडगिरी, भ्रष्टाचार यावर पांघरूण घातलं जातं. आचार्य अत्रे नेहमी म्हणायचे, 'तोही बदमाश हाही बदमाश. पण हा आपला बदमाश.'

कमलताईंची राजकीय नीतिमत्तेवरची काही भाष्यं आजच्या घडीलाही फार महत्त्वाची आहेत. सत्तेचं राजकारण न करता राजकारण करणाऱ्या, लोकसंग्रह करणाऱ्या, नैतिक अधिष्ठान असलेल्या, हिंसेचा लवलेश नसलेला संघर्ष करणाऱ्या सामाजिक संघटना आणि कार्यकर्त्यांच्या संस्था उभ्या करण्यावर त्यांचा विश्वास बसायला लागला आणि पक्षीय राजकारणातून त्या हळूहळू बाहेर पडल्या. कल्याणकारी कामापेक्षा समाजपरिवर्तनाच्या कामावर त्यांचा ठाम विश्वास होता. धर्माधिष्ठित, जातीयवादी विचारसरणी त्यांना कधीच मानवली नाही. स्त्रियांवर होणारा अन्याय दूर करून तिच्या मादी आणि माता या रूपांपेक्षा तिच्या स्वतंत्र व्यक्तित्वाचं दर्शन त्यांना अनुभवायचं होतं. त्यामुळे त्यांच्या एकुलत्या एका मुलाच्या, प्रशांतच्या मृत्यूनंतर आलेली पोकळी भरून काढण्यासाठी त्या या कामाला वाहून घेतात.

वेगवेगळ्या कारणानं कमलताईंच्या आयुष्यात आलेल्या अनेक राजकीय, सामाजिक क्षेत्रातील लोकांच्या आणि त्यांच्याशी झालेल्या मैत्रीच्या वेगवेगळ्या कथा आणि छटा त्यांनी या आत्मकथनात चितारल्या आहेत. मैत्रीच्या उबदार स्पर्शाच्या शोधात असलेल्या कमलताईंना त्या मित्रांतले पुरुषही जसे भेटले, तसेच त्यांचं मित्रविश्व उजळवून टाकणारे क्षणही त्यांच्या आयुष्यात आले. 'स्त्रीपुरुष मैत्री ही माणसाची भावनामय गरज. अर्धनारी नटेश्वराची कल्पना मला भावते ती या गरजेमुळंच. केवळ नरमादीचं नातं ओलांडून मुक्त आनंद देणारं हे तितक्याच मुक्तपणे जोपासायचं स्वातंत्र्य मात्र माणसांच्या या जगात नाही. म्हणूनच राधाकृष्णाच्या स्नेहाला अलौकिकत्वाच्या पातळीवर बसवून त्याची पूजा करणं एवढंच ती करतात. प्रत्यक्षात तो स्नेह निषिद्धच असतो. हीही या नात्याची एक शोकांतिका आहे' असं त्यांना वाटतं.

एकूणच रामवाडी, मुंबई, दिल्ली, पुणे असा सर्वार्थानं समृद्ध करणारा प्रवास आणि त्यामुळे आलेली साहित्यिक, राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक, वैचारिक समज आणि समृद्धी अनुभवलेल्या कमलताईंचं आत्मकथन आपल्याला भावनिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध करतं हे मात्र खरं!

◆ nrajan20@gmail.com

---



पालकत्व

तृप्ती जोशी-कुलश्रेष्ठ

# अभ्यासाचं काय करायचं?

**हल्ली मुलांचा अभ्यास नर्सरीनंतर सुरूच होतो आणि मग अनेक घरांमध्ये दररोज मुलांना अभ्यासाला बसवताना पालकांची डोकेदुखीही सुरु होते. मुलांचं अभ्यासाचं वय पाचपासून किमान २२ ते २३ वर्षांपर्यंत तरी असतं. शिक्षक आणि पालक दोघांनीही वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरत त्यांना लहानपणापासूनच अभ्यासाची गोडी लावली, तर अभ्यास ही गोष्ट नावडती न राहाता आवडती होऊ शकते...**

मागच्या (२३ जुलै) लेखातल्या 'आईच्या शाळे'ला वेळेचं बंधन नसतं आणि गणवेशाची सक्तीही नसते. भारी लाडाकोडात जातात ही पाच वर्षं. पण गोबऱ्या गालांची पहिली पाच वर्षं संपल्यानंतर सहावं लागतंच! पारतंत्र्याच्या काळातल्यासारख्या गोलमेज परिषदा भरतात. शेजारपाजारी, नातेवाईक, अनुभवी पालक या सगळ्या सभासदांबरोबर गंभीर चर्चा होतात आणि एकदाची पाल्याची शाळा ठरते. पूर्वी माध्यम कोणतं, हाही एक चर्चेचा विषय होता. आता तो फारसा राहिलेला नाही. त्याची जागा 'एसएससी बोर्ड' की 'सीबीएसई' की 'आयसीएस' बोर्ड या चर्चेनं घेतली आहे.

नवीन दप्तर, पाण्याची बाटली, वह्या-पुस्तकं (आता पाटी नसते) अशा सरंजामासह हे छोटे मावळे सकाळी सकाळी शाळेच्या युद्धावर जायला तयार होतात. भारी गोंडस दिसतात हे छोटे मावळे. पण शाळेची बस दिसली की हे मावळे भोंगा पसरून रडायला लागतात आणि सोडायला आलेले आई-बाबा दटावतात, 'टीचर रागावतील हां, जास्त लाड करू नकोस. जा गुपचूप'. बसमधून टीचरही 'आम्ही बघून घेतो काय करायचं ते' असं सांगतात. इथूनच शाळा म्हणजे धास्ती, एकट्यानं लढायची लढाई, असं काहीतरी मुलांच्या मनात येतं. आईच्या शाळेत मस्ती करणाऱ्या मुलाला, 'इथे घरी लाड चालतायत, शाळेत मात्र तुला टीचर बरोबर वठणीवर आणतील,' असं अगदी सहज सुनावलं जातं. पण ते करताना आपण शाळेविषयीच्या नकारात्मक भावनेचं बीज पेरतो आहोत हे आपण विसरूनही जातो.

लहानग्या अक्षराची आई मात्र अक्षराला शाळेत दाखल व्हायच्या आधीच इतर शाळांच्या बस दाखवायला घेऊन जायची. वेगवेगळ्या गणवेशांचे रंग दाखवायची, त्या बसमधल्या मुलांना टाटा करताना 'हे सगळं किती आनंददायक असतं' ते सांगायची. त्यामुळे अक्षराला शाळेत जायची उत्सुकता होती. तिला बळजबरी शाळेत कधीच पाठवावं लागलं नाही. ज्या मुलांच्या मनात शाळेविषयी, शिक्षकांविषयी लहानपणीच उत्सुकता असते ती 'टाटा' करतच शाळेला जातात. आईला सोडून नवीन शाळेत जाताना थोडी हुरहुर वाटणारच. थोडे दिवस रडू येणारच. पण काही जणांचं रडणं बराच काळ चालतं. त्याचा उगम शाळेविषयी मनात भरलेल्या धास्तीमध्ये असतो.

तर अशा या छोट्यांचा अभ्यास सुरू होतो आणि भरपूर लाड करणारी आई शस्त्र घेऊन सज्ज होते! घरात 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' अशी अवस्था होऊन बसते. दहावीच्या मुलाच्या आईला आणि त्या छोट्याच्या आईला सारखंच 'टेन्शन' असतं आणि प्रत्येक आई 'या अभ्यासाचं काय करायचं' असं म्हणून डोक्याला हात लावून बसते. बघू या आपण काय करता येईल या अभ्यासाचं... अभ्यास करायचा म्हणजे धडे वाचायचे, स्व-अभ्यासासाठी वेळ काढायचा किंवा अजून किती तरी उपाय आपल्याला म्हणजे पालकांना माहिती असतातच. पण आपण इथे मुख्यत्वे पालक काय करू शकतात, त्यांची भूमिका काय असावी, हे बघत आहोत. अभ्यासाच्या पद्धती इयत्ता वाढत जातील तशा बदलत जातील, विषय वाढत राहातील. पण एकदा अभ्यासाची गोडी लागली, की मग अभ्यासासाठी मुलांच्या मागे लागावं लागत नाही.

साधारण सहा ते आठ-नऊ वर्षांच्या मुलांच्या झोपेला थोडं प्राधान्य द्यावं लागेल. शाळा, अभ्यास याव्यतिरिक्तही ही मुलं खूप शारीरिक दगदग करत असतात. तुम्ही त्यांना नुसती हाक जरी मारलीत तरी ती पळतच येतात. घरभर चालत, पळतच राहातात. शरीराची झालेली झीज मुलं गाढ झोपल्यावरच पूर्ण होते. अशा झोपेला आलेल्या मुलांना तुम्ही गृहपाठ करण्यासाठी जागं ठेवलंत, तर अभ्यासाची गोडी लागण्याऐवजी अभ्यासाला झोपेचा वैरी म्हणून बघितलं जातं. अभ्यासाची वेळ ही खेळाच्या, झोपेच्या, खाण्याच्या आड येणारी नसावी.

पहिलीत असणारी ओवी म्हणजे उत्साहाचा खळखळणारा झराच आहे. शाळेतून आल्यानंतर जेवण करून झोपलेली ओवी चार वाजेपर्यंत उठायची. झोप झाल्यावर तिचं सगळं लक्ष इमारतीच्या खाली खेळणाऱ्या मुलांकडे लागायचं. मुलं एकेक करून साडेपाचपर्यंत खेळायला यायची. नेमकी त्याच वेळी ओवीची आई ऑफिसमधून घरी यायची. आल्यानंतर लगेच ती ओवीला अभ्यासाला बसवायची, कारण नंतर तिला स्वयंपाकासाठी वेळ हवा असायचा. त्यामुळे रोज ओवीची चिडचिड व्हायची आणि आईचाही पारा चढायचा. प्रत्येकाच्या घरातली परिस्थिती थोडीफार वेगळी असेल. पण ओवीची आई तिला खेळायला सोडून आधी त्या वेळेत स्वयंपाक करून ठेवू शकते. ओवीचं खेळणं झाल्यावर तिला घेऊन अभ्यासाला बसू शकते. पण आपलं वेळापत्रक मुलांवर लादलं की त्यातून विनाकारण गोंधळ होतो. त्याऐवजी परिस्थितीचा विचार करून वेळापत्रक ठरवलं, तर सर्वांचीच सोय होऊ शकते.

अभ्यासाच्या वेळेबाबत आणखी एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी असते. ती म्हणजे घरातला टीव्ही. अनेक घरांत सात वाजल्यानंतर टीव्ही लावला जातो. विशेषतः ज्या घरांमध्ये आजी-आजोबा असतात, त्यांच्यासाठी टीव्ही हा त्यांचा खास सोबती असतो. एकामागे एक असा दोन-तीन वेगवेगळ्या मालिकांचा रतीब असतोच. आजी-आजोबांना वाटतं, की आम्ही दिवसभर नातवंडांना सांभाळलं, आता तरी आम्हाला जरा निवांत बसून टीव्ही बघू द्या. मुलांसाठीही सक्रिय अभ्यास करण्यापेक्षा खरं तर रंगीबेरंगी टीव्ही निष्क्रियपणे बघत राहाणं जास्त सोपं असतं. 'प्राथमिक शाळेच्या मुलांचा अभ्यास तो काय असणार' असं म्हणून त्यांच्या अभ्यासाच्या वेळेला टीव्ही बंद केला जात नाही. मान्य आहे, त्यांचा अभ्यास खूप नसतो. पण महत्त्वाचा तर असतोच. शिवाय अभ्यासाची गोडी आणि शिस्त लागायचं वय हेच असतं. तेव्हा घरातल्या सगळ्यांनीच काहीतरी तडजोड करून हा प्रश्न सोडवायला पाहिजे. ज्या घरांमध्ये अभ्यासासाठी टीव्हीपासून लांब जागा असेल तिथे काही प्रश्न नाही, पण जिथे अशी सोय नसेल तिथे मात्र आवर्जून प्रयत्न करावे लागतील. टीव्हीसमोर बसून केलेला अभ्यास म्हणजे न करण्यासारखाच आहे. कारण हातानं केलेला अभ्यास मेंदूपर्यंत प्रवास करत नाही. ही गोष्ट प्राथमिक शाळेच्या नाही, तर सर्वच वयोगटातल्या मुला-मुलींना लागू आहे.

काही घरांमध्ये मुलांसाठी हे सगळं केलं जातं. पण तिथे काही वेगळे घटक कारणीभूत असू शकतात. उदाहरणार्थ- कित्येक पालक मुलाला शिक्षा होऊ नये म्हणून स्वतः त्यांच्या वहीत अभ्यास लिहून देतात. वर्तनशास्त्रानुसार शिक्षा ही चुकांना आळा घालण्यासाठी आणि बक्षीस हे योग्य वर्तनाला प्रोत्साहन देण्यासाठी असतं. त्यामुळे आपल्या पाल्याला शिक्षा होऊ नये म्हणून स्वतः त्यांच्या अभ्यासात मदत करण्यापेक्षा एखाद्-दुसऱ्यावेळी मुलांना शिक्षा होऊ देणंच जास्त योग्य असतं. झालेल्या शिक्षेनंतर पाल्याला काय वाटलं याची चर्चा करून त्याचं ते वर्तन आपण निश्चितच बदलू शकतो. त्या बदललेल्या वर्तनाला बक्षीस देऊन प्रोत्साहन देऊ शकतो. हे बक्षीस वयानुसार वेगवेगळं असू शकतं.



पाचवीतल्या पलकला रोजच अभ्यास करायचा कंटाळा यायचा. स्वतः उत्तरं शोधून लिहिणंही तिच्या जिवावर यायचं. पलकची आई तिच्यावर राग राग करत का होईना, पण व्हॉट्सअॅपवरून कोणाची तरी उत्तरं मागवून घ्यायची. केवळ उत्तरंच नाही, तर निबंधही अशा प्रकारे मागवले जायचे. अशानं आई पलकला शिक्षेपासून तर वाचवायची, पण उत्तरं शोधून लिहायची पद्धत पलकला कधी समजलीच नाही. त्याचा फटका पुढे आठवी-नववीत बसू लागला. मागच्या पिढीत फक्त दहावीलाच 'पेपर पॅटर्न'वगैरे विषय निघायचा. पण आता पाचवी-सहावीपासून मागच्या वर्षांचे पेपर मागवले जातात. त्यातून कोणते प्रश्न विकल्पाला टाकता येतील हे पाल्याला शिकवलं जातं. मुलाला परीक्षेसाठी कमी आणि नेमका अभ्यास करून जास्त गुण कसे मिळवायचे या युक्त्या शिकवल्या, तर त्याचा तात्कालिक लाभ होईल कदाचित, पण दीर्घकाळात त्याचा तोटाच होतो. कारण या विकल्पांच्या नादात विषयाचा काही भाग नेहमीच कच्चा राहातो. माझ्याकडे समुपदेशनाला आलेली एक पहिली-दुसरीतली मुलगी शाळेत जायला अचानक नकार देऊ लागली होती. दोन सेशन्सनंतर तिनं एकदा हळूच सांगितलं, की १९ चं स्पेलिंग किती मोठं आहे, त्यापेक्षा २० जास्त अवघड असेल. त्यामुळे शाळेत न गेलेलं बरं, असा निर्णय तिनं घेतला होता. अशा वेळी तिला शब्द फोडून दाखवून सोपा करून दाखवला, तर वेळीच मदत होऊ शकते. असाच प्रश्न पचनसंस्थेचा अभ्यास करताना मुलांना येतो. एका शिक्षिकेनं एका मुलाला वर्गाच्या मधोमध झोपवलं आणि खडूनं त्याच्याभोवती बाह्यरेषा काढून शरीराचा आकार तयार केला. मग एक शेंगदाणा त्या आकारात तोंडातून पायरी पायरीने कसा पचनसंस्थेतून जातो हे दाखवत खाली आणला. पुस्तकातल्या आकृत्यांमध्ये कठीण वाटणारा हा विषय या शिक्षिकेनं अगदी सोपा करून सांगितला. निनाद शाळेतून आल्यावर त्याची आई त्याला काय शिकवलं हे तोंडी सांगायला लावायची. भाषा विषयाचे धडे तो गोष्टीसारखे आईला सांगायचा. त्यातून आपोआप निनादची उजळणी व्हायची.

नोकरी-व्यवसाय तर प्रत्येकालाच करावा लागतो, पण ज्याला ते काम आवडतं त्याच्यासाठी ते आठ-नऊ तास आनंददायक असतात. त्याचप्रमाणे ज्याला वर्गात शिकवलेलं समजतं, अभ्यास वेळेवर पूर्ण झालेला असतो, त्याला शाळा किंवा अभ्यास जाचक वाटत नाही. काही वेळा काही विषयांचा अभ्यास व्यक्तीपरत्वे अवघड वाटू शकतो. पण त्यात पालकांनी मदत केली, तर त्या विषयांतही आवड निर्माण होऊ शकते. मानसशास्त्रामध्ये स्मृतितंत्र नावाचा एक भाग सांगितला आहे. या स्मृतितंत्रांपैकी एक आदि-अंत परिणाम सांगितला जातो. सुरूवातीला वाचलेलं किंवा पाहिलेलं आपल्याला नीट लक्षात राहातं, मधला भाग मात्र जास्त लक्षात राहात नाही. म्हणून अवघड भाग अभ्यासाच्या सुरूवातीला किंवा शेवटी करावा. त्यानं लक्षात राहायला मदत होते. चित्रपटांमधली गाणी आठवा- समूह नृत्यात कितीही कलाकार असले तरी आपल्याला हिरो किंवा हिरॉईनच लक्षात राहातात, कारण त्यांना वेगळे कपडे तरी दिलेले असतात किंवा त्यांच्यात काहीतरी वेगळं केलेलं असतं. हाच नियम अवघड प्रश्नांना लावता येतो. वेगळ्या पानावर वेगळ्या पद्धतीनं लिहिलेलं जसंच्या तसं परीक्षेत आठवू शकतं.

अभ्यासाची गोडी लागायला विषय सोपा नसला तरी तो तसा वाटला पाहिजे. आमचे सोलापूरचे गणिताचे जगताप सर अवघड गणित फळ्यावर पूर्ण सोडवून दाखवायचे आणि शेवटी विशिष्ट लयीत 'अरे झालं पण गणित, हाय काय नाय काय!' असं म्हणायचे. मला खरंच ते गणित सोपं असेल असं वाटायचं. तसंच 'पाय बाय टू' म्हणताना 'काय बाय तू, काय बाय तू' अशी मजा करायचे. अशी कित्येक तंत्रं आपल्याला अभ्यासामधून मिळू शकतील किंवा तुमच्या आजूबाजूला मानसशास्त्रातली तज्ज्ञ मंडळी असतील तर तेही मार्गदर्शन करू शकतात. अभ्यासाचं वय पाचपासून किमान २२ ते २३ वर्षांपर्यंत तरी असतं. आयुष्याचा एवढा मोठा काळ मुलांनी तणावात घालवण्यापेक्षा आनंदानं घालवण्यासाठी आपली भूमिका समजून घेत पालकांनी सक्रिय सहभाग घेतला, तर पाल्य आणि पालक या दोघांसाठीही ते महत्त्वाचं आणि उपयोगाचं ठरेल.

◆ trupti.kulshreshtha@gmail.com



## सोयरे सहचर

# शाश्वत प्रेम

''उत्क्रांतीत सर्वाधिक बुद्धीची देणगी लाभलेला माणूस सोयी-गैरसोयीचा, फायद्याचा विचार येताच प्राण्यापक्ष्यांशी प्रचंड क्रूरपणानं वागू शकतो, हे खरंच आश्चर्यकारक. रूढार्थानं आपली बुद्धी तल्लख झाली, तरी भावनिक उन्नती झाली का, असा प्रश्न पडावा असे अनुभव पशुवैद्य म्हणून काम करताना मला येतात. प्राण्यांना 'कमोडिटी' मानणारा माणूस एकीकडे आणि दुसरीकडे प्राण्यांचं निर्मळ विश्व, त्यांचं आपल्यावरचं शाश्वत प्रेम यातला विरोधाभास मला नेहमीच बुचकळ्यात टाकतो...'' सांगताहेत पशुवैद्य आणि प्राणीप्रेमी नीलिमा परांजपे.







दहा वर्षांची ती चिमुरडी. मैत्रिणींबरोबर दंगामस्ती करत शाळेतून घरी परतत होती. रस्त्यात तिला एक घोडागाडी उलटलेली दिसली आणि तिच्या बाजूलाच तिचा घोडाही पडलेला, विव्हळणारा, तडफडणारा! ती मुलगी घोड्याच्या शेजारी बसकण मारते. स्वतःच्या पाण्याच्या बाटलीतलं पाणी हळूहळू त्याच्या तोंडात सोडते. काहीही न सुचल्यामुळे घोड्यासाठी हरभरे आणायलाही धावते. घोड्याचं डोकं मांडीवर घेऊन त्याला हरभरे भरवण्याचा प्रयत्न करते. घोड्याला मायेनं थोपटताना तिला रडू फुटतं... काही क्षण असेच जातात आणि तो जखमी घोडा तिच्या मांडीवरच अखेरचा श्वास घेतो. ती हबकते, पण त्याच क्षणी तिच्या मनात एक निश्चय पक्का होतो, 'माझ्या मांडीवर असा कुठलाच प्राणी मरणार नाही. मी त्यांचा जीव वाचवीन. मी प्राण्यांची डॉक्टर होईन!'

ती मुलगी म्हणजे मी! निर्णय घेतल्याप्रमाणे मी खरोखरच प्राण्यांची डॉक्टर झाले. पण त्याहूनही अधिक मी प्राण्यांवर जिवापाड प्रेम करणारी प्राणिप्रेमी आहे. आज 'रेस्क्यू' केलेले तीन कुत्रे आणि पंधरा मांजरी माझ्या क्लिनिकमध्ये सुखेनैव नांदत आहेत. हा माझा परिवार! त्यांच्याव्यतिरिक्त आत्तापर्यंत उपचार केलेले असंख्य चतुष्पाद रुग्ण माझे मित्र आहेतच. काही मालकांबरोबर रुबाबात येणारे, काही कुणी जखमी अवस्थेत माझ्या दारात आणून सोडलेले निराधार, रस्त्यावरचे प्राणी... असा खरं तर माझा भला मोठा परिवार आहे.

माझ्या प्राणिप्रेमाची सुरुवात फार लहानपणी झाली. आई-वडिलांनी मी दोन वर्षांची असताना मला खेळण्यातला एक लाल रंगाचा गोंडस कुत्रा आणून दिला होता. तो माझा लाडका होताच, पण नंतर घरात एक छोटं कुत्र्याचं पिल्लू आलं. जणू ते खेळण्यातलं कुत्र्याचं पिल्लू जिवंत होऊन माझ्या घरात आलंय असंच मला वाटत असे!

आम्ही एका मोठ्या वाड्यात राहात असू. माझं वय जेमतेम चार वर्षांचं. एकदा आम्ही सगळे मच्छरदाणी लावून खाली झोपलो होतो आणि मी सकाळी जागी होऊन बघते तर काय... मनीमाऊची नुकती जन्मलेली इवली इवली पिल्लं चक्क माझ्या अंथरुणात, माझ्या कुशीत झोपलेली! माझ्यासाठी ते मोठं 'सरप्राईज' होतं. माझी अशी काही गडबड उडाली! मग आईच्या मदतीनं मऊ बिछाना तयार केला, दुधाची वाटी जवळ ठेवली. पुढे तर माझ्या कुशीत, अंगावर मांजराची पिल्लंच पिल्लं असायची. आमच्या वाड्यातल्या शेजाऱ्यांना मात्र माझ्या या मार्जारप्रेमाचा राग येत असे. ते म्हणायचे, ''हिच्या मांजरी आमच्या दारात नुसती घाण करून ठेवतात.'' मी तशी लहानच होते. तरीही सकाळी उठल्याबरोबर आईला घेऊन माझा पहिला कार्यक्रम हाच, की या मांजरींनी जिथे जिथे घाण केलीय तिथे जाऊन म्हणजे शेजाऱ्यांच्या दारातली घाण साफ करायची! पण हे काम करण्याचा मला कधी कंटाळा नाही आला.

आमची ही छोटी पिल्लं कधी आजारी पडायची. पण तेव्हा फारसे पशुवैद्य नसायचे. पिल्लं माझ्या डोळ्यांसमोर आचके देताना, मरताना मी पाहायचे. माझ्या बालमनाला त्याचं फार दुःख व्हायचं. पुढे मी खूप शोध घेतला तेव्हा घरापासून दूरवर मला एक प्राण्यांचा सरकारी दवाखाना सापडला. मग मी माझ्या आजारी मांजरींना आणि त्यांच्या छोट्या पिल्लांना पिशवीत घालून अर्धा तास चालत तिथवर जायचे. पण बहुतेक वेळा माझे प्राणी वाचू शकायचे नाहीत, कारण त्यांच्याकडे तेवढे आधुनिक उपचारच उपलब्ध नसायचे. त्याचं कारण मला पुढे कळलं. १४० वर्षांपूर्वी ब्रिटिशांनी भारतात 'बॉम्बे व्हेटरनरी कॉलेज'ची स्थापना केली, ती त्यांचे बग्गीचे घोडे आजारी पडायचे, त्यांच्यावर उपचार व्हावेत म्हणून. भारतात अशा डॉक्टरांना 'ढोरांचे डॉक्टर' म्हटलं जायचं. एके काळी गोरगरीब शेतकऱ्यांच्या मुलांना अक्षरशः पैसे व खाणंपिणं देऊन हे शिक्षण दिलं जायचं. हा व्यवसाय त्या काळी माणसाला उपयुक्त ठरणाऱ्या गाई, म्हशी, बैल, घोडे, कोंबड्या अशा जनावरांसाठी सुरू झाला. त्यामुळे कुत्रा, मांजरं, गाढवं ही तुलनेनं दुर्लक्षित जनावरं होती. आता मात्र निदान शहरांत चित्र बदलत आहे. कदाचित माणसा-माणसांमधली नाती वेगानं तुटत चालली आहेत, माणसांचा एकमेकांवरचा विश्वास उडत चाललाय. हे जाणवल्यामुळे की काय, पण माणसांना प्राण्यांमधला नैसर्गिक निर्मळपणा कळायला, जाणवायला आणि भावायलाही लागला आहे. प्राण्यांची डॉक्टर म्हणून सर्वच प्राण्यांना कदाचित मी वाचवू शकणार नाही, पण किमान त्यांचे क्लेश कमी करण्याचा तरी मी नक्की प्रयत्न करेन, हा निश्चय सुरुवातीपासूनच केला होता. गंमत म्हणजे माझी ही प्रामाणिक भावना आणि कळकळ माझ्या प्राणी-रुग्णांपर्यंत अचूक पोहोचते. तुम्हाला गंमत वाटेल, पण माझे काही रुग्ण प्राणी 'डॉ. नीलिमाकडे जायचंय' म्हटलं तरी नाचतात! ब्रूनो हा लॅब्रॅडॉर कुत्रा तर माझ्याकडे जायचं म्हटलं, की त्याच्या मालकिणीच्या हातात त्याचा पट्टा व गाडीच्या चाव्याच आणून देतो. माझ्याकडे आला की त्याला मुळी बाहेर थांबायचं नसतं. तो सरळ आत येऊन माझ्या टेबलावर उडी मारून बसतो. मी त्याला इंजेक्शन देत असो वा त्याची ब्लड टेस्ट करत असो... तो शांतपणे सगळं करून घेतो. पशुवैद्यकशास्त्र हे मूक प्राण्यांसाठी असलेलं करुणा, भूतदया आणि संवेदनशीलतेचं शास्त्र आहे. पण दुर्दैवानं आपल्याकडे काही क्षेत्रांत या शास्त्राचा तद्दन व्यावसायिक आणि भावनाहीन गोष्टींसाठीही वापर होतो. मला आठवतं, आमच्या अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून आम्हाला कत्तलखान्यात 'फील्ड व्हिजिट'साठी जावं लागे. त्या कोवळ्या वयात तिथलं अमानुष वास्तव बघून काळजाला चरे पडायचे. कत्तलखान्यात आणताना बारा-पंधरा तास एका छोट्या गाडीत कोंबून गाई, म्हशी, बैलांना आणलं जाई. तिथं येईपर्यंत दाटीवाटीनं भरल्यामुळे एकाचं शिंग दुसऱ्याच्या पोटात गेलेलं, कुणाचे पाय मोडलेले, असं विदीर्ण करणारं दृश्य असे. रेतीचा ट्रक उलटा करावा तसं त्यांना गाडीतून खाली टाकत. ते सगळे प्राणी पाण्यासाठी तहानलेले असत. मी तिथं काहीही शिकले नाही. कधी 'फील्ड वर्क'ही केलं नाही. मी सरळ तिथल्या विहिरीवर जाऊन बादलीत पाणी भरायचे आणि त्या प्राण्यांना पोटभर पाणी पाजायचे. पहिल्याच लेक्चरमध्ये प्राण्यांना 'वस्तू' (कमोडिटी) असं संबोधलेलं ऐकलं आणि मला अक्षरशः घृणा आली होती.

बालवयातल्या आणखीही काही प्रसंगांनी माझ्या मनावर खोल घाव निर्माण केले. लहानपणी आमच्या वाड्यात एकाच्या घरात एक भटका कुत्रा चुकून शिरला. त्यांनी त्या कुत्र्याला एका खोलीत डांबलं आणि महापालिकेची गाडी बोलावली. त्या लोकांनी त्याला खोलीबाहेर खेचून बेदम मारलं. ते भयंकर दृश्य पाहून माझ्या बालमनाला जी वेदना झाली होती ती अजूनही ठसठसते. प्राण्यांशी माणसांचं स्वार्थी, क्रूरपणाचं वागणं पाहिलं तेव्हापासून अशा माणसांच्या कृतीचा तिरस्कार निर्माण झाला. इतका की नको ती माणसं... नको ती नातीगोती... नको ते लग्न... नको ती मुलंबाळं... असहाय्य, मुक्या आणि सातत्यानं अन्यायाला बळी पडणाऱ्या प्राण्यांविषयी मला कमालीची अनुकंपा वाटू लागली. तेव्हा मनानं पक्कं केलं, की आपलं आयुष्य या प्राण्यांच्या कल्याणासाठीच वाहून घ्यायचं.

एकदा एका बारशाला आम्ही सगळे जण गेलो होतो. अचानक कळलं, की घरी माझ्या मांजरीच्या पिल्लावर काकांचा पाय पडून ते तडफडतंय. मी तडक घर गाठलं. पिल्लावर औषधोपचार केले. नंतर त्यावरून घरात बरंच वाजलं. माझं एकच म्हणणं होतं, ''दादाच्या बाळाचं कोडकौतुक करायला तिथं शंभर जण होते. माझं पोर तिथं एकटं तडफडत होतं. त्याच्याजवळ कोणी नव्हतं. मग मला जायला नको का?''

५-६ वर्षांपूर्वीची गोष्ट. माहीमला एका रस्त्यावरच्या कुत्रीला मार मार मारून शौचालयात डांबून ठेवलं होतं. रात्री एक वाजता तिथून तिला सोडवून काही लोक माझ्याकडे घेऊन आले. तिचे मागचे पाय मोडले होते. ती अत्यंत करुणपणे माझ्याकडे पाहात होती. मी तिच्यावर उपचार केले आणि तिला माझ्याचकडे ठेवून घेतलं. त्या रात्री मी तिला क्लिनिकमध्ये ठेवून गेले. दुसऱ्या दिवशी दार उघडून बघते तर काय... माझ्या पशुखाद्य भरलेल्या जवळपास २५ हजार रुपये किमतीच्या गोण्या तिनं फाडल्या होत्या, त्यावर प्रातर्विधी करून ठेवले होते. माझ्या लक्षात आलं, त्या अंधाऱ्या खोलीत रात्रभर ती एकटी होती. तिनं तिचं सगळं भय, वैफल्य त्या गोणींवर काढलं होतं. प्राण्यांनी कितीही नुकसान केलं तरी मी त्यांना रागावत नाही. ते त्यांच्या नैसर्गिक शिस्तीत जगत असतात. त्यांना स्वातंत्र्य प्रिय असतं. त्यांना सोबत हवी असते. त्यानंतर मी कधीही तिला एकटं ठेवलं नाही.

प्राणी किती जीव लावतात त्याचा एक मनोज्ञ किस्सा! माझ्या मैत्रिणीच्या घराच्या परिसरात एक माकडाचं पिल्लू राहायला लागलं होतं. तिथं एक रस्त्यावरची कुत्री होती- स्नोई. या माकडाच्या पिल्लानं स्नोईला जणू आई मानलंय! त्या दोघांचं एकमेकांवर इतकं प्रेम आहे, की स्नोईच्या जवळ कोणीही गेलं, तिला हात लावला की हे माकडाचं पिल्लू त्या व्यक्तीला कडकडून चावतं. मलाच ते दहा वेळा चावलं आहे. हे पिल्लू दिवसभर स्नोईच्या पाठीवर बसून भटकत असतं. ती जरा नजरेआड झाली की ते बेचैन होऊन भिरभिरत्या नजरेनं तिला शोधतं. असे अनुभव विलक्षण. एकदा एक महिन्याचं भटक्या कुत्र्याचं पिल्लू माझ्याकडे कुणी तरी आणलं. रिक्षानं उडवल्यामुळे ते जायबंदी झालं होतं. मी ठरवलं, की आपणच याचा सांभाळ करावा. त्याच्या पायाला प्लास्टर घातलं आणि दुसऱ्या एका पिल्लासोबत त्याला ठेवलं. कसंच काय! त्या दोघांचं भांडण जुंपलं. मात्र त्याच आवारात एक समंजस कुत्री होती- काळू. मी रात्री भटक्या कुत्र्यांना खाऊ घालायला जायचे तेव्हा काळू माझी वाट बघत असायची. आधी या पिल्लांना ती खाऊ घालायची, मग स्वतः खायची. काही दिवसांनी ती दोन्ही भांडणारी पिल्लं छान एकमेकांना बिलगून झोपलेली पाहिली तेव्हा लक्षात आलं, की प्राणी किती एकदिलानं राहतात! माणसांनी हे त्यांच्याकडून शिकायला हवं. आणखी एक गंमत सांगते, माझ्या खंडोबाची! तो गणेश चतुर्थीचा दिवस होता. एक कुत्रा थेट माझ्या टेबलाखाली येऊन बसला. मी त्याला खायला दिलं, पण त्यानं कशालाही तोंड लावलं नाही. तेव्हापासून दरवर्षी गणेश चतुर्थी, अनंत चतुर्दशी, दसरा आणि दिवाळीत तो न चुकता माझ्या क्लिनिकमध्ये येत असे. तो कुठून येतो, का येतो ते कळायचं नाही. मी त्याच्या चारही पायांना हात लावून पाया पडत असे. २०२१ च्या दिवाळीपर्यंत तो आला. मार्च २०२२ ला समाजमाध्यमांवर एक पोस्ट आली आणि त्यातून कळलं की तो कुत्रा मार्वे रोडला राहात होता आणि तो वारला. ही बातमी कळली आणि माझ्या पोटात खड्डाच पडला. आता खंडोबा इथं येणार नाही, म्हणजे मीही इथं असणार नाही, असं मला आतून वाटू लागलं. आश्चर्य म्हणजे ध्यानीमनी नसताना मला त्या क्लिनिकची जागा सोडावी लागली. मी क्लिनिकसाठी नवी जागा शोधू लागले. मला एक जागा आवडली, ती मी नक्की केली आणि कळलं, की हीच त्या खंडोबाची वास्तव्याची इमारत होती! मी त्याच्याशी किती घट्ट जोडली गेली आहे, हे जाणवून मी भर रस्त्यात ओक्साबोक्शी रडायला लागले. माझ्यासाठी तो श्वान नव्हता... ते शिवतत्त्वच होतं जणू!

प्रत्येक जीवजंतू सृष्टीच्या साखळीचा एक भाग आहे. ते एकमेकांसाठी उपयुक्त आहेत. पण माणसापासून कोणत्या प्राण्यांना फायदा होतो सांगा बरं? उलट माणूस निसर्गाचा नाश करून जीवसृष्टीला धोक्यात टाकतोय. नैसर्गिक उत्क्रांतीमध्ये माणसाचा मेंदू विकसित होत गेला. मग या प्रगत मेंदूनं प्राणिमात्रांच्या कल्याणाचा विचार नको का करायला? १९९५ मध्ये मी पशुवैद्य म्हणून उत्तन, गोराई आणि मनोरी इथे जात असे. तिथले रहिवासी रानटी कुत्रे, गाई आणि बैल पाळत. आज हे सर्व खारफुटीचं जंगल नामशेष होत चाललंय. तिथं मोठमोठ्या सोसायट्या उभ्या राहात आहेत. तिथले लोक तक्रार करतात, की इथं कुत्र्यांचा नुसता सुळसुळाट आहे. अरे पण हे कुत्रे त्या धरतीवरचे मूळ रहिवासी आहेत हे तुम्ही कसं विसरता? त्यांची तक्रार करण्यापेक्षा त्यांची नसबंदी करा. त्यांची काळजी घ्या! गगनचुंबी इमारती बांधून, झाडं तोडून आपण प्राण्यांपक्ष्यांच्या अधिवासावर आक्रमण करतोय याची मला खूप खंत वाटते. दलाई लामांचं एक वचन आहे- 'प्राण्यांविषयी ज्यांना करुणा वाटते, अनुकंपा वाटते, त्यांचा आत्मा उन्नत अवस्थेत असतो'. योगानंद म्हणतात, 'ज्यांना प्राण्यांचं दुःख व वेदना जाणवतात त्या आत्म्याला शांती- म्हणजे शाश्वत ज्ञानाची प्राप्ती होते'. आपण सगळे या शाश्वत ज्ञानाच्या शोधमार्गावरचे प्रवासीच तर आहोत!

शब्दांकन- माधुरी ताम्हणे
◆ madhuri.m.tamhane@gmail.com

---

# मृगजळ : मानसिक आरोग्य विम्याचे!

(पान १५ वरून) अनेकदा एवढा मोठा खर्च झेपणार नसल्यामुळे उपचार घेण्याचे टाळले वा पुढे ढकलले जाते. मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अद्वैत पाध्ये सांगतात, ''विविध थेरपी, समुपदेशन यांचा खर्च वारेमाप असतो. मानसिक आजार दीर्घकाळ सुरू राहात असल्यामुळे हा खर्च वर्षानुवर्षे पेलावा लागतो. नोकरी करत असलेल्या अनेक व्यक्ती या आजारांमुळे सक्षमतेने नोकरी करू शकत नाहीत किंवा नोकरी टिकवू शकत नाहीत. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या या व्यक्ती बहुतांश कुटुंबावरच अवलंबून असतात. अशा स्थितीत विम्याचे संरक्षण मिळाल्यास कुटुंबावरील आर्थिक ताण कमी होईल आणि रुग्णाची काळजी घेण्याबाबत कुटुंबामध्ये सकारात्मकता टिकून राहाण्यास मदत होईल.''

डॉ. पाध्ये यांच्या 'मनोदया ट्रस्ट'च्या माध्यमातून या समस्येचा पाठपुरावा 'आयआरडीए'कडे केला जात आहे. मानसिक रुग्ण शरीराची योग्य काळजी घेऊ शकत नाहीत. त्यांना दिल्या जाणाऱ्या काही औषधांमुळेही त्यांना मधुमेह, उच्च रक्तदाब इत्यादी आजार होण्याचा संभव अधिक असतो. तर हृदयविकार, पोटाचे विकार अशा आजारांमध्ये शस्त्रक्रियेसारख्या खर्चीक बाबींसाठी एकदम मोठी रक्कम जमा करणे बऱ्याचदा शक्य नसते. त्यामुळे या रुग्णांनाही शारीरिक आजारांसाठी विम्याचे संरक्षण मिळायलाच हवे. कायद्यात याविषयी स्पष्ट सूचना न दिल्यामुळे विमा कंपन्यांनी हात वर केले असल्याचेही डॉ. पाध्ये सांगतात.

मानसिक आजार कशाला म्हणावे, हे कायद्यात स्पष्टपणे नमूद केले आहे. माणसाचे विचार, मनःस्थिती, धारणा, निर्णयक्षमता, वागणूक, वास्तविकता ओळखण्याची क्षमता, सर्वसामान्य जीवन जगण्यासाठी आवश्यक बाबींची पूर्तता करणारी स्मरणशक्ती, यावर परिणाम करणारे लक्षणीय आजार तसेच मद्य किंवा अमली पदार्थांच्या गैरवापरामुळे निर्माण झालेली मानसिक स्थिती या सगळ्याचा समावेश मानसिक आजारांमध्ये होतो. सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपन्यांनी आपल्या आरोग्य विम्यामध्ये या मानसिक आजारांचा समावेश केलेला नाही. काही कंपन्यांनी तो केला आहे, परंतु काही अटीशर्तीसह. यातील पहिली अट म्हणजे विमा घेताना व्यक्तीला कोणत्याही प्रकारच्या मानसिक आजाराची बाधा झालेली नसावी! नंतर ती झाली तरी बहुतांश कंपन्यांनी मानसिक आजारांसाठी रुग्ण रुग्णालयात दोन ते तीन दिवस दाखल झाल्यानंतरच याचे फायदे मिळतील असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला, वैयक्तिक किंवा कौटुंबिक समुपदेशन, विविध थेरपीज, ज्यासाठी रुग्णालयात दाखल करण्याची आवश्यकता नसते, अशा कोणत्याही उपचारांसाठीच्या खर्चाचा परतावा यामधून मिळणार नाही, असे व्यावसायिक विमा सल्लागार भक्ती रसाळ स्पष्ट करतात. मद्य किंवा अमली पदार्थांच्या सेवनाशी संबंधित मानसिक आजारांनाही विम्यामधून वगळण्यात आले आहे. तसेच काही कंपन्यांनी स्मृतिभ्रंश (डिमेन्शिया किंवा अल्झायमर), कंपवात (पार्किन्सन) या आजारांची बाधा झाल्यासही विम्याचा लाभ घेता येणार नाही, असे योजनेत नमूद केले आहे.

मानसिक आजारांसाठी दिलेले विम्याचे कवच आणि प्रत्यक्ष आवश्यकता याचा ताळमेळ बसत नसल्याचे सध्या तरी दिसते. मानसोपचारतज्ज्ञ डॉ. धरव शाह ते उलगडून सांगतात. ''मानसिक आजारांमध्ये स्क्रिझोफ्रेनिया, बायपोलर डिसऑर्डर, तीव्र नैराश्य अशा काही आजारांसाठीच रुग्णालयात दाखल करण्याची वेळ येते. जवळपास ९० टक्के आजार हे डॉक्टरांचे समुपदेशन, विविध थेरपीज्, दीर्घकाळ समुपदेशन या माध्यमातून बरे करण्याचा प्रयत्न होतो. त्यांचा खर्च दरमहा सुमारे दहा ते पंधरा हजारांच्या घरात असतो. हा खर्च परवडणारा नाही.''

'राष्ट्रीय मानसिक आरोग्य सर्वेक्षणा'नुसार मूड डिसऑर्डर, नैराश्य असलेल्या रुग्णांचे प्रमाण सुमारे ५ टक्के आहे, तर मानसिक ताणतणाव, अस्वस्थता, फोबिया असे आजार असलेल्या रुग्णांचे प्रमाण सुमारे ४ टक्के आहे. या आजारांना रुग्णालयात दाखल करण्याची आवश्यकता नसते. परंतु या आजारांची तीव्रता वाढू नये, संभाव्य आत्महत्या टाळाव्यात आणि रुग्णांनी उपचार पूर्ण करावेत यासाठी समुपदेशन, विविध थेरपीज अशा उपचारांचाही विम्यामध्ये सहभाग होणे गरजेचे आहे.

मानसोपचारतज्ज्ञ डॉ. आशिष देशपांडे यातील अधिक अडचणी मांडतात. ''शारीरिक आजारांसाठी रुग्णालयातून घरी सोडल्यानंतर ६० दिवसांचा खर्च विम्यामध्ये समाविष्ट असतो. तीव्र मानसिक आजारांमध्ये रुग्णालयातून रुग्ण घरी आला, तरी पुढील तपासण्या, औषधोपचार हे काही महिने सुरू असतात. त्याचा समावेश विम्यामध्ये केलेला नाही. त्यामुळे आर्थिक भार पुन्हा रुग्णावरच राहाणार आहे. मानसिक आजारांमध्ये रुग्णाला रुग्णालयात दाखल केल्यावर किमान दोन ते तीन आठवडे ठेवावे लागते. रुग्णांचे समुपदेशन आणि पुनर्वसन या दोन महत्त्वाच्या व महागड्या उपचारपद्धती आहेत. त्यामुळे या दोन्हींचा विम्यामध्ये समावेश करायला हवा.''

मानसिक आजारांच्या व्याख्येमध्ये मद्य किंवा अमली पदार्थांच्या सेवनाशी संबंधित मानसिक आजारांचा समावेश केलेला आहे. परंतु विमा कंपन्यांनी याचे उल्लंघन करत या मानसिक आजारांच्या रुग्णांना विमा संरक्षण न देण्याची भूमिका जाहीर केली आहे. हे अत्यंत चुकीचे आहे, असेच मत डॉ. देशपांडे व्यक्त करतात. 'राष्ट्रीय मानसिक आरोग्य सर्वेक्षणा'नुसार दारू, तंबाखू इत्यादी पदार्थांच्या सेवनामुळे



मानसिक आजारांचे बळी ठरलेल्या रुग्णांचे प्रमाण सर्वांत जास्त, म्हणजे सुमारे २२ टक्के आहे. यात दारूमुळे मानसिक आजारांची लागण झाल्याचे प्रमाण सुमारे पाच टक्के, तर अमली पदार्थांच्या सेवनामुळे ०.६ टक्के जणांना बाधा झाली आहे. याबाबत डॉ. धरव शाह सांगतात, की मद्य किंवा अमली पदार्थांच्या आहारी जाण्याचा निर्णय हा त्या व्यक्तीचा असतो. त्यामुळे त्यासाठी विम्याचे कवच का द्यावे, असा प्रश्न उपस्थित केला जाऊ शकतो. परंतु एखादे व्यसन लागणे किंवा व्यसन सहज सोडता न येणे यामागे गुंतागुंतीची मानसिक प्रक्रिया असते. त्यामुळे केवळ व्यसनी व्यक्तीस दोष देऊन समाज म्हणून आपल्याला मोकळे होता येणार नाही. सरसकट अशा सर्व व्यक्तींना विम्यातून वगळण्याऐवजी विम्याचा गैरफायदा कसा घेतला जाणार नाही या दृष्टीने अटी-शर्ती तयार केल्यास गरजू रुग्णांना योग्य मदत मिळेल.

अमेरिका, ब्रिटन यांसारख्या विकसित देशांत मानसिक आजारांना प्राधान्याने विमा संरक्षण दिलेले आहे. यात रुग्णालयीन खर्चासह, समुपदेशन, बाह्यरुग्ण विभागातील उपचार, पुनर्वसन, घरी काळजी घेण्यासाठीचा खर्च, औषधे, विविध थेरपी, समूह आधार सेवा, इत्यादी सेवांचा खर्चही विम्यामध्ये समाविष्ट केलेला आहे. काही विमा योजनांमध्ये तर आपत्कालीन सेवा, बालकांचे मानसिक आजार, मद्य आणि अमली पदार्थांशी संबंधित मानसिक आजार, या सेवादेखील विम्याअंतर्गत उपलब्ध आहेत.

मानसिक आजारांमध्ये रुग्णाच्या पुनर्वसनात त्याचा राहाणे, खाणे-पिणे, औषधे, उपचार हा दर महिन्याचा खर्च असतो. वर्षांचे गणित लक्षात घेता ही रक्कम फार मोठी आहे. कॉर्पोरेट विमा कंपन्या त्यामुळे पुनर्वसनासारखे उपचार विम्यामध्ये देण्यासाठी फारशा उत्सुक नाहीत. त्यांच्याकडे यासाठी काही योजनाही नाहीत. कायद्याची अंमलबजावणी करणे बंधनकारक असल्यामुळे मग अनेक अटी-शर्थी लावण्यात आल्या आहेत, असे डॉ. आशीष देशपांडे सांगतात.

मानसिक आजार हा शारीरिक आजारांप्रमाणे चाचण्या, तपासण्या यांतून सिद्ध करता येणारा आजार नाही. त्यामुळे समुपदेशन, विविध थेरपींच्या नावाखाली विम्याचा गैरवापर केला जाईल, अशी भीती कंपन्यामार्फत व्यक्त केली जाते. यावर डॉ. धरव शाह सांगतात, की परदेशात समुपदेशन किंवा विविध थेरपीज देताना काय पद्धतींचा वापर केला आहे, याचा अभ्यास केल्यास विम्याच्या गैरवापरावर निर्बंध नक्कीच आणता येतील. आपल्याकडे ज्याप्रमाणे विकलांगता सिद्ध करण्यासाठी सरकारी रुग्णालयातून तपासणी केल्याचे प्रमाणपत्र बंधनकारक केले आहे. त्याचप्रमाणे सरकारी रुग्णालयाने मानसिक आजार असल्याची खात्री करून पात्र ठरवलेल्यांना विम्याचा फायदा घेता येईल, असे काही नियम लागू करता येतील. शारीरिक आजारांप्रमाणे रुग्णालयात दाखल न करता केल्या जाणाऱ्या 'डे केअर' उपचारपद्धतीचा समावेश मानसिक आजारांच्या विम्यामध्येही करणे शक्य आहे. अगदी सर्व नाही, परंतु विद्युत थेरपीसारख्या थेरपींना निश्चितच विमा कवच देणे शक्य आहे. तसेच समुपदेशनाच्या काही ठरावीक सत्रांचा खर्च विम्याअंतर्गत समाविष्ट करणे शक्य आहे. त्यामुळे सरसकट निर्बंध लावण्याऐवजी अशा काही उपाययोजनांचा विचार केला तर नक्कीच मार्ग सापडतील, असे विमा सल्लागार सांगतात.

विमा कंपन्या काही कल्याणकारी योजना देणाऱ्या संस्था नाहीत. त्या नफा कमावणाऱ्या कंपन्या आहेत. त्यामुळे मानसिक आजारांसाठी विमा देण्यास विविध अटी-शर्ती लावत प्रतिरोध असणारच आहे. ''मानसिक आजारांचे क्षेत्र आपल्याकडे विमा कंपन्यांसाठी अगदी नवीन आहे. मानसिक आजार काय आहेत, त्यातील उपचार कोणते, त्यासाठी लागणारा खर्च, रुग्णांची संख्या, मागणी असे आर्थिक गणित विमा कंपन्यांना समजावून सांगणाऱ्या मार्गदर्शक यंत्रणांचा अभाव असल्याने कंपन्या या क्षेत्रात पाय रोवण्यास तयार नाहीत. मानसिक आजारांवरील उपचारांच्या गरजा आणि विमा कंपन्यांच्या अडचणी यामध्ये आदानप्रदान झालेलेच नाही. हे आदानप्रदान होण्यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, तज्ज्ञ आणि विमा कंपन्या यांना एका व्यासपीठावर आणणे गरजेचे आहे. 'आयआरडीए'ने यासाठी पुढाकार घेऊन परिषदा आयोजित केल्यास विमा कंपन्यांचा या क्षेत्रातील रस निश्चितच वाढेल,'' असे मानसोपचारतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी सांगतात. मानसिक आजारांचे रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक यांची एकत्रित अशी आधार गट चळवळ आपल्याकडे निर्माणच झालेली नाही, असेही डॉ. नाडकर्णी सांगतात.

मानसिक आजारांना विम्याचे संरक्षण कायद्यात मिळाले असले तरी त्याच्या वास्तविक अंमलबजावणीचा पल्ला अजून बराच लांब असल्याचेच या सर्व गोष्टींवरून सूचित होते. त्यामुळे सध्या तरी हे एका मृगजळासारखे आहे. ते मृगजळच राहू नये, यासाठी कायद्याच्या अंमलबजावणीपासून विमा कंपन्याशी चर्चा अशा अनेक पातळ्यांवर काम होणे महत्त्वाचे आहे.

◆ shailaja486@gmail.com



# भारताचे मालिका विजयाचे लक्ष्य

पीटीआय, फोर्ट लॉडरहिल




**वेस्ट इंडिजवरील** वर्चस्व कायम राखताना शनिवारी चौथा ट्वेन्टी-२० क्रिकेट सामना जिंकून पाच सामन्यांच्या मालिकेत विजयी आघाडी मिळवण्याचे भारतीय संघाचे लक्ष्य असेल. या सामन्यात मधल्या फळीतील स्थानासाठी श्रेयस अय्यर आणि दीपक हुडा यांच्यात स्पर्धा आहे.

कॅरेबियन बेटांवर झालेल्या

**भारत-विंडीज ट्वेन्टी-२० मालिका**

पहिल्या तीन ट्वेन्टी-२० सामन्यांत रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने उत्तम कामगिरी केली. त्यांना मालिकेत २-१ अशी आघाडी मिळवण्यात यश आले असून पुढील दोन्ही सामने अमेरिकेतील फ्लोरिडा येथे रंगणार आहेत. हे दोन्ही सामने जिंकून आगामी आशिया चषक स्पर्धेसाठी आपण पूर्णपणे सज्ज असल्याचे सिद्ध करण्याचा भारताचा प्रयत्न असेल.

पहिल्या तिन्ही सामन्यांमध्ये निराशाजनक कामगिरी केल्यामुळे मुंबईकर श्रेयसचे भारतीय संघातील स्थान धोक्यात आले आहे. श्रेयसला या तीन सामन्यांत अनुक्रमे ०, १० (११ चेंडूंत) आणि २४ (२७ चेंडूंत) धावाच करता आल्या. त्यामुळे केवळ विंडीजविरुद्धचे पुढील दोन सामनेच नाही, तर ऑस्ट्रेलियात होणाऱ्या ट्वेन्टी-२० विश्वचषकासाठीही श्रेयसला डावलण्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्याच्या जागी हुडाला संघात स्थान मिळू शकेल. हुडाने सात ट्वेन्टी-२० सामन्यांत ७१.६६च्या सरासरी आणि १७०.६३च्या धावगतीने २१५ धावा केल्या आहेत. विंडीजविरुद्ध उर्वरित दोन सामन्यांत संधी मिळाल्यास हुडाचा दमदार कामगिरीचा मानस असेल.

● **वेळ** : रात्री ८ वा.
● **थेट प्रक्षेपण** : फॅनकोड ॲप, डीडी स्पोर्ट्स.

### कर्णधार रोहित उपलब्ध

विंडीजविरुद्ध तिसऱ्या ट्वेन्टी-२० सामन्यात ११ धावांवर फलंदाजी करत असताना पाठीच्या दुखापतीमुळे भारताचा कर्णधार रोहित शर्माला मैदानाबाहेर जावे लागले होते. मात्र, तिसऱ्या आणि चौथ्या सामन्यादरम्यान तीन दिवसांचे अंतर असल्याचा रोहितला फायदा झाला आहे. तो तंदुरुस्त झाला असून उर्वरित दोन सामन्यांसाठी उपलब्ध आहे. त्याच्यासह सूर्यकुमार यादव, ऋषभ पंत, हार्दिक पंड्या आणि दिनेश कार्तिक या फलंदाजांवर भारताची भिस्त आहे. गोलंदाजीची धुरा रविचंद्रन अश्विन, अर्शदीप सिंग आणि भुवनेश्वर कुमार सांभाळतील.

# भारताच्या ‘अ’ संघाची ‘क’ संघावर मात

वृत्तसंस्था, चेन्नई

**अर्जुन इरिगेसी** आणि एसएल नारायणन यांच्या निर्णायक विजयांमुळे खुल्या विभागातील दुसऱ्या मानांकित भारतीय ‘अ’ संघाने शुक्रवारी ऑलिम्पियाड बुद्धिबळ स्पर्धेच्या सातव्या फेरीत भारताच्या ‘क’ संघावर ३-१ अशा फरकाने मात केली.

**बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धा**

या स्पर्धेत प्रथमच दोन भारतीय संघ आमनेसामने आल्याने चाहत्यांमध्ये उत्सुकता होती. भारताच्या ‘अ’ संघात आघाडीच्या खेळाडूंचा समावेश असल्याने त्यांचे या लढतीत पारडे जड मानले जात होते. मात्र, ‘क’ संघाने त्यांना चांगली झुंज दिली. ‘अ’ संघाकडून पहिल्या दोन पटांवर



खेळणाऱ्या पी. हरिकृष्णा आणि विदित गुजराथी यांना अनुक्रमे सूर्यशेखर गांगुली आणि एस. पी. सेतुरामन यांनी बरोबरीत रोखले. परंतु तिसऱ्या पटावरील इरिगेसीने अभिजित गुप्ताला ४६ चालींमध्ये नमवले, तर नारायणनने अभिमन्यू पुराणिकचा ३८ चालींमध्ये पराभव केल्याने भारताच्या ‘अ’ संघाने या लढतीत सरशी साधली.

# पवनवर दोन कोटी, २६ लाखांची विक्रमी बोली

लोकसत्ता क्रीडा प्रतिनिधी

**मुंबई :** प्रो कबड्डी लीगच्या नवव्या हंगामासाठी शुक्रवारी मुंबईत झालेल्या लिलाव प्रक्रियेच्या पहिल्या दिवशी पवन शेरावतवर दोन कोटी, २६ लाख रुपयांची विक्रमी बोली लागली. यू मुंबाशी बोलीयुद्ध जिंकत तमिळ थलायव्हाजने त्याला आपल्या संघात सामील केले. लिलावाच्या पहिल्या दिवशी झालेल्या अ-गटाच्या लिलावात अपेक्षेप्रमाणेच तीन खेळाडूंनी एक कोटी रुपयांचा आकडा पार केला. विकास खंडोलाला बंगळूरु बुल्सने



एक कोटी, ७० लाख रुपये मोजत ताफ्यात घेतले. प्रो कबड्डीच्या आठव्या हंगामात प्रदीपसाठी एक कोटी, ६५ लाखांची विक्रमी बोली लागली होती. तो विक्रम पवन व विकास यांनी मोडीत काढला.

पुणेरी पलटणने इराणचा डावा कोपररक्षक फझल अत्राचालीवर एक कोटी, ३८ लाख रुपयांची, तर अष्टपैलू मोहम्मद ईस्माइल नबीबक्षसाठी ८७ लाखांची बोली लावली.

**श्रीगणेश सहकारी बँक मर्यादित,पुणे**
स.नं. ५३/१ब/२ व १४, विनायक नगर, नवी सांगवी, पिंपळे गुरव, पुणे ४११०६१.
Ph.: 020 27286314, 27284304 | E-Mail : admin@shriganeshbank.co.in

फॉर्म झेड (Z) नोटीस
(म.स .सं .अधिनियम १९६१ चे नियम १०७ (११) (ड-१)अन्वये )

**स्थावर मिळकत प्रतिकात्मक ताबा नोटीस**

**ज्याअर्थी,** खाली सही करणार वसुली अधिकारी, पुणे, व्दारा श्रीगणेश सहकारी बँक मर्यादित, पुणे, यांनी म.स.सं. अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्यानुसार थकबाकीदार **श्री. पंडीत नारायण जाधव, श्री. संभाजी दत्तात्रय शितोळे, श्री. चेतन प्रदीप कुंभार व प्रशांत जयराम गड्डेवार** यांना **दि.३०.०५. २०१९ रोजी** मागणी नोटिस पाठवुन **रक्कम रू.९,५५,४७७/- (अक्षरी नऊ लाख पंचावण्ण हजार चारशे सत्त्याहत्तर रूपये फक्त)** अधिक पुढील व्याज, वसुली खर्च, लिगल खर्च, सरचार्ज इ. रकमेच्या परतफेडीची मागणी केली होती. परंतु उपरोक्त थकबाकीदार यांनी सदर नोटिसीप्रमाणे अद्यापपर्यंत रक्कमेचा भरणा केलेला नाही. त्यामुळे वसुली अधिकारी, पुणे व्दारा. श्रीगणेश सहकारी बँक मर्यादित, पुणे यांनी म.स.सं. अधिनियम १९६० चे कलम १५६ व म.स.सं. अधिनियम १९६१ चे नियम १०७ अन्वये थकबाकीदार **श्री. संभाजी दत्तात्रय शितोळे** यांची खालील स्थावर मिळकत दि .०१.०८.२०२२ रोजीच्या आदेशाने जप्त केली आहे.

**त्याअर्थी,** सदरील जप्ती आदेश पारित केल्यानंतर व त्यानुसार मुदत देऊनही थकबाकीदार **श्री. संभाजी दत्तात्रय शितोळे व इतर ३** यांनी दि. ३१.०७.२०२२ अखेर असलेली येणेबाकी रक्कम **रू . ७,३७,५१७/- (अक्षरी सात लाख सदोतीस हजार पाचशे सतरा रूपये फक्त)** अधिक पुढील व्याज, वसुली खर्च, लिगल खर्च, सरचार्ज इ. रक्कमेचा भरणा न केल्याने वसुली अधिकारी, पुणे व्दारा . श्रीगणेश सहकारी बँक मर्यादित, पुणे यांनी त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारानुसार म .स.सं. अधिनियम १९६१ चे नियम १०७ (११) (ड-१) (६ )अन्वये **श्री. संभाजी दत्तात्रय शितोळे** यांची खालील नमुद मिळकतीचा प्रतिकात्मक ताबा आज **दि.०१.०८.२०२२** रोजी घेतलेला आहे.

**त्याअर्थी, थकबाकीदार श्री. संभाजी दत्तात्रय शितोळे व इतर ३** यांना तसेच तमाम लोकांस सुचित करण्यात येते की, खालील परिशिष्ठात वर्णन केलेली मिळकत **श्री. संभाजी दत्तात्रय शितोळे** यांची असून या संदर्भात कोणीही, कोणताही, कसल्याही प्रकारचा व्यवहार श्रीगणेश सहकारी बँक मर्यादित, नवी सांगवी, पिंपळे गुरव, पुणे ६१ यांच्या लेखी परवानगीशिवाय करू नये आणि जर असा व्यवहार केल्यास सदरील व्यवहार हा बँकेवर बंधनकारक राहणार नाही. तसेच सदर मिळकतीवरील बँकेच्या कर्जाचा बोजा अबाधित राहिल याची कृपया नोंद घ्यावी.

**परिशिष्ठ**

| मिळकत धारकाचे नाव | मिळकतीचे वर्णन | अंदाजे क्षेत्रफळ |
|---|---|---|
| श्री. संभाजी दत्तात्रय शितोळे | फ्लॅट नं.२, १ला मजला, धनंजय बिल्डिंग, स.नं. २ हिस्सा नं.१/५, मौजे सांगवी, पुणे ४११०२७. | ७२०.०० चौ.फुट |

**श्री.ईश्वर धोडिंबा काटे**
वसुली अधिकारी, पुणे
(म.स.सं.अधिनियम १९६० चे कलम १५६ व म.स.सं.अधिनियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)
व्दारा श्रीगणेश सहकारी बँक मर्यादित,पुणे

स्थळ : पुणे
दिनांक : ०१.०८.२०२२

# पुन्हा अर्धा टक्के ‘रेपो’वाढीची मात्रा

## अर्थव्यवस्था सुस्थितीत, महागाई नियंत्रणावर रिझर्व्ह बँकेचा कटाक्ष

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी



**मुंबई :** ज्या आधारे बँकांकडून कर्जावरील व्याजदर ठरविला जातो त्या ‘रेपो दरा’त रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी पुन्हा ५० आधार बिंदूंनी म्हणजेच अर्ध्या टक्क्याची वाढ केली. मे महिन्यापासून झालेल्या या सलग तिसऱ्या व एकूण १.४० टक्के वाढीने रेपो दर आता ५.४० टक्क्यांवर म्हणजे करोनापूर्व ५.१५ पातळीपेक्षा अधिक गेला असून, ऑगस्ट २०१९ नंतरचा त्याचा हा सर्वोच्च स्तर आहे. या रेपो दरवाढीतून बँकांकडून गृह कर्ज, वाहन कर्ज व अन्य ग्राहक कर्जांचे व्याजदर वाढविले जाणे क्रमप्राप्त असल्याने, स्थावर मालमत्ता क्षेत्रासह एकूणच उद्योग क्षेत्रात यासंबंधाने निराशेची भावना आहे.

बुधवारपासून तीन दिवस रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्या अध्यक्षतेखालील सहा सदस्यीय पतधोरण निर्धारण समितीच्या या बैठकीत, सर्व सदस्यांनी दरवाढीच्या बाजूने एकमताने कौल दिला. महागाईचा टक्का हा रिझर्व्ह बँकेसाठी अप्रिय सहा टक्क्यांच्या पातळीपुढे कायम असल्याने, त्यावर नियंत्रणासाठी हे आवश्यक असल्याचे कारण या दरवाढीसाठी गव्हर्नर शक्तिकांत यांनी दिले. जगभरातील मध्यवर्ती बँकांकडून व्याजदरात करण्यात येणाऱ्या व्याज दरवाढीचा आक्रमक कल पाहता, ताजी अर्धा टक्के वाढ ही तुलनेने ‘सामान्य’च असल्याची त्यांनी पुस्ती जोडली. अर्थविश्लेषकांच्या वर्तुळात यंदा रेपो दरात ३५ आधार बिंदूंपर्यंत वाढ केली जाईल, अशी अपेक्षा होती.

दरवाढीची घोषणा करताना,गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी प्राधान्यक्रम महागाई नियंत्रणाकडे कायम असल्याचे संकेत दिले. तसेच आगामी पतधोरणात दरवाढीला संभाव्य विराम देण्याचे कोणते संकेतही दिले नाहीत. ३१ मार्च २०२३ रोजी संपणाऱ्या चालू आर्थिक वर्षासाठी सकल राष्ट्रीय उत्पादनाचा दर (जीडीपी) ७.२ टक्के या पूर्वअंदाजित पातळीवरच मध्यवर्ती बँकेने कायम ठेवला आहे. तर वर्षभरातील महागाईसंबंधी अदांजातही कोणताही बदल न करता तो ६.७ टक्क्यांवर अपरिवर्तित ठेवला आहे. यानुसार, चालू आर्थिक वर्षातील तिसऱ्या तिमाहीअखेर म्हणजे डिसेंबरपर्यंत महागाई दर ६ टक्क्यांच्या वरच राहण्याची शक्यता आहे, तर जानेवारी ते मार्च २०२३ मध्ये तो ५.८ टक्क्यांवर ओसरेल.. जूनमध्ये सलग सहाव्या महिन्यात महागाई दर रिझर्व्ह बँकेच्या सहनशील पातळीच्या वर राहिला आहे.

**महागाई दिलासा**

जागतिक पातळीवर महत्त्वाचे जिन्नस, धातू आणि अन्नधान्याच्या किमतींमध्ये काही प्रमाणात घट झाल्याचे गव्हर्नर म्हणाले. याचबरोबर प्रमुख उत्पादकांकडून पुरवठ्यात सुधारणा झाल्यामुळे देशांतर्गत खाद्यतेलाच्या किमती आणखी कमी होण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मान्सून देशभरात सक्रिय झाल्याने सगळीकडे खरिपाच्या पेरण्यांनी गेल्या काही आठवड्यांत वेग घेतला आहे. भाताच्या खरीप पेरणीत काहीसा विलंब झाल्याने उत्पादन घटण्याची शक्यता आहे. मात्र, देशात अतिरिक्त साठा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. तरीही, याकडे बारकाईने पाहणे आवश्यक आहे. तथापि हा महागाईचा घाला बहुतांश ‘आयातीत’ असल्याने त्यावर नियंत्रणाची आयुधेही मर्यादित असल्याची कबुलीही त्यांनी दिली.

### ठेवींवर जादा व्याजदर शक्य

बँकांना जास्त ठेवी आकर्षित करता आल्या तर त्यांना पतपुरवठा वाढविता येईल, असे गव्हर्नर दास यांनी नमूद केले. ठेवींवरील व्याजदर हे रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणापासून मुक्त असून, बँकांनीच त्यासंबंधाने गरज पाहून निर्णय घ्यायचा आहे, अशी पुस्तीही त्यांनी जोडली. रिझर्व्ह बँकेने रेपो दरात वाढ केल्याची प्रतिक्रिया म्हणून बँकांनी ठेवींवरील व्याजदरात वाढ करण्यास सुरुवात केली आहे. भविष्यातदेखील हा कल कायम राहण्याची आशा दास यांनी व्यक्त केली.

# नागपूर जिल्हा बँक घोटाळ्याची आता न्यायालयीन चौकशी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील १५० कोटींच्या घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी पश्चिम बंगाल उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त मुख्य न्यायमूर्ती जयनारायण पटेल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नागपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेत २००१-०२ मध्ये १५० कोटींचा गैरव्यवहार उघडकीस आल्यानंतर बँकेचे तत्कालीन अध्यक्ष सुनील केदार यांच्यासह इतर ११ जणांविरुद्ध गणेशपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र या घोटाळ्याची सखोल चौकशी करण्याबाबत उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल झाल्यानंतर, सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश किंवा सहकार न्यायाधीशाच्या माध्यमातून घोटाळ्याची चौकशी करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

त्यानुसार सरकारने सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश एस. डी. मोहोड यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. मात्र उच्च न्यायालयाने १३ जुलै रोजी पुन्हा एकदा या घोटाळ्याची सहकार कायद्याच्या कलम ८८ अन्वये जलद चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्तीची नियुक्ती करण्याचे आदेश दिले.

त्यानुसार आता या घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी न्या. पटेल यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना या कामासाठी प्रतिदिन एक लाख रुपये मानधन देण्यात येणार आहे.

**श्रीगणेश सहकारी बँक मर्यादित,पुणे**
स.नं. ५३/१ब/२ व १४, विनायक नगर, नवी सांगवी, पिंपळे गुरव, पुणे ४११०६१.
Ph.: 020 27286314, 27284304 | E-Mail : admin@shriganeshbank.co.in

फॉर्म झेड (Z) नोटीस
(म.स .सं .अधिनियम १९६१ चे नियम १०७ (११) (ड-१)अन्वये )

**स्थावर मिळकत प्रतिकात्मक ताबा नोटीस**

**ज्याअर्थी,** खाली सही करणार वसुली अधिकारी, पुणे, व्दारा श्रीगणेश सहकारी बँक मर्यादित, पुणे, यांनी म.स.सं. अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्यानुसार थकबाकीदार **मे.हर्षिता कन्स्ट्रक्शन (भागीदारी संस्था) भागीदार १) श्री. साईबाबु नरसप्पा म्हेत्रे, २) सौ. राणी साईबाबु म्हेत्रे, श्री. नरसप्पा कुरमय्या म्हेत्रे, श्री. बाबु नरसप्पा म्हेत्रे व श्री. रामदास शंकरराव शेळके** यांना **दि.१६.०१. २०१८ रोजी** मागणी नोटिस पाठवुन **रक्कम रू . १,३०,९०,८०२ /- (अक्षरी एक कोटी तीस लाख नव्वद हजार आठशे दोन रूपये फक्त)** अधिक पुढील व्याज, वसुली खर्च, लिगल खर्च, सरचार्ज इ . रकमेच्या परतफेडीची मागणी केली होती . परंतु उपरोक्त थकबाकीदार यांनी सदर नोटिसीप्रमाणे अद्यापपर्यंत रक्कमेचा भरणा केलेला नाही. त्यामुळे वसुली अधिकारी, पुणे व्दारा. श्रीगणेश सहकारी बँक मर्यादित, पुणे यांनी म.स.सं. अधिनियम १९६० चे कलम १५६ व म.स.सं. अधिनियम १९६१ चे नियम १०७ अन्वये थकबाकीदार **श्री.नरसप्पा कुरमय्या म्हेत्रे** यांची खालील स्थावर मिळकत दि .०२.०८.२०२२ रोजीच्या आदेशाने जप्त केली आहे .

**त्याअर्थी,** सदरील जप्ती आदेश पारित केल्यानंतर व त्यानुसार मुदत देऊनही थकबाकीदार **मे.हर्षिता कन्स्ट्रक्शन (भागीदारी संस्था) भागीदार १) श्री. साईबाबु नरसप्पा म्हेत्रे, २) सौ. राणी साईबाबु म्हेत्रे व इतर ३** यांनी दि. ३१.०७.२०२२ अखेर असलेली येणेबाकी रक्कम **रू . ७८,३३,१०८/- (अक्षरी अठ्ठ्याहत्तर लाख तेहतीस हजार एकशे आठ रूपये फक्त)** अधिक पुढील व्याज, वसुली खर्च, लिगल खर्च, सरचार्ज इ. रक्कमेचा भरणा न केल्याने वसुली अधिकारी, पुणे व्दारा, श्रीगणेश सहकारी बँक मर्यादित, पुणे यांनी त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारानुसार म .स.सं. अधिनियम १९६१ चे नियम १०७ (११) (ड-१)(६)अन्वये **श्री. नरसप्पा कुरमय्या म्हेत्रे** यांची खालील नमुद मिळकतीचा प्रतिकात्मक ताबा आज **दि.०२.०८.२०२२** रोजी घेतलेला आहे.

**त्याअर्थी, थकबाकीदार मे. हर्षिता कन्स्ट्रक्शन (भागीदारी संस्था) भागीदार १) श्री. साईबाबु नरसप्पा म्हेत्रे, २) सौ. राणी साईबाबु म्हेत्रे व इतर ३** यांना तसेच तमाम लोकांस सुचित करण्यात येते की, खालील परिशिष्ठात वर्णन केलेली मिळकत **श्री. नरसप्पा कुरमय्या म्हेत्रे** यांची असून या संदर्भात कोणीही, कोणताही, कसल्याही प्रकारचा व्यवहार श्रीगणेश सहकारी बँक मर्यादित, नवी सांगवी, पिंपळे गुरव, पुणे ६१ यांच्या लेखी परवानगीशिवाय करू नये आणि जर असा व्यवहार केल्यास सदरील व्यवहार हा बँकेवर बंधनकारक राहणार नाही. तसेच सदर मिळकतीवरील बँकेच्या कर्जाचा बोजा अबाधित राहिल याची कृपया नोंद घ्यावी.

**परिशिष्ठ**

| मिळकत धारकाचे नाव | मिळकतीचे वर्णन | अंदाजे क्षेत्रफळ |
|---|---|---|
| श्री. नरसप्पा कुरमय्या म्हेत्रे | गट नं. १३२६, स.नं.३०८, लक्ष्मी निवास, मौजे चिखली, साने कॉलनी, मोरे वस्ती, पुणे ४१२११४. | जमीन क्षेत्रफळ ५७५०.०० चौ.फुट व त्यावरील दुमजली बांधकाम क्षेत्र ४९९६.०० चौ.फुट |

**श्री.ईश्वर धोडिंबा काटे**
वसुली अधिकारी, पुणे
(म.स.सं.अधिनियम १९६० चे कलम १५६ व म.स.सं.अधिनियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)
व्दारा श्रीगणेश सहकारी बँक मर्यादित,पुणे

स्थळ : पुणे
दिनांक : ०२.०८.२०२२

**ॲक्सिस बँक लि.**

**शाखा :** स्टर्लिंग प्लाझा, तळ मजला, साई पेट्रोल पंपासमोर, जे. एम. रोड, पुणे - ४११ ००४.
**नोंदणीकृत कार्यालय :** 'त्रिशूल', ३रा मजला, समर्थेश्वर मंदिरासमोर, लॉ गार्डन एलिस ब्रिजजवळ, अहमदाबाद ३८०००६

**ताबा नोटीस**
रुल ८(१)
स्थावर मालमत्तांकरीता

ज्याअर्थी खाली सही करणार **ॲक्सिस बँक लि.**चे अधिकृत अधिकारी यांनी, दि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३(१२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स् २००२ च्या रूल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेले कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार यांना सदर कायद्याच्या सेक्शन १३(२) अंतर्गत त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या तारखांना मागणी नोटीस बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत त्यांच्या नावासमोर नमूद केलेली, बँकेला येणे असलेली रक्कम सदर नोटीसीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करावी. कर्जदार/जामीनदार सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्याने, विशेषतः कर्जदार/जामीनदार व सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सेक्शन १३(४) रुल ६ व ८ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार/जामीनदार यांच्या नावासमोर नमूद केलेल्या गहाण मालमत्तांचा सदर नमूद तारखांना **प्रत्यक्ष ताबा घेतला आहे**. विशेषतः कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार तसेच सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तांसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास तो **ॲक्सिस बँक लि., पुणे** यांना खाली नमूद केलेल्या येणे असलेल्या रक्कमेच्या अधीन राहील. सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सदर कायद्याच्या सेक्शन १३(८) अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे.

| अ. क्र. | कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार यांची नावे आणि पत्ते | येणे रक्कम रूपये | मागणी नोटीसीची तारीख | ताबा घेतल्याची तारीख आणि प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | **अविनाश कृष्णाप्पा गोचडे, अमोल के. गोचडे,** श्रीकृष्ण रंजन निवास, स्वामी विवेकानंद नगर, स.नं. ६७, सनशाईन रेसिडेन्सी, फार्महाऊस चौक, नवी सांगवी, पुणे-४११०२७. **तसेच** : फ्लॅट नं. २०१, २ रा मजला, शामनाथ रेसिडेन्सी, गट नं. ८६२, प्लॉट नं. ८९ आणि ९०, वाघोली, पुणे-४१२२०७. | रु. २१,१८,८८३/- (रु. एकवीस लाख अठरा हजार आठशे त्र्याऐंशी फक्त) दि. १०/०६/२०२१ रोजी (दि. १०/०६/२०२१ पर्यंतचे लागू केलेल्या व्याजासहीत) आणि त्यावरील दि. ११/०६/२०२१ पासूनचे करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज यांसहीत आणि प्रासंगिक खर्च, किंमत, आकार अशी, सदर संपूर्ण रक्कम परत करेपर्यंत आकारली जाणारी रक्कम | १४/०६/२०२१ | ०३/०८/२०२२ |
| | **स्थावर मालमत्तेचा तपशील :** फ्लॅट नं. २०१ चा सर्वसामाईक भाग, २ रा मजला, विक्रीयोग्य क्षेत्रफळ ६४० चौ.फू. म्हणजेच ५९.४७ चौ.मी., १ बीएचके लगतची बाल्कनीसहीत, 'शामनाथ रेसिडेन्सी' बिल्डींग, नवीन गट नं. ८६२ (जुना गट नं. ८६३ ) वर बांधण्यात आलेली, लेआऊट प्लॉट नं. ८९ आणि ९०, गांव वाघोली, ता. हवेली, जि. पुणे येथे स्थित. | | | |
| २ | **रुमाना पटेल, फैय्याज अहमद शेख,** ४१/४ए, मुरलीधर सोसायटी, सोमनाथ नगर, वडगांव शेरी, ऊर्जा सोसायटीजवळ, पुणे-४११०१४. **तसेच :** फ्लॅट नं. ए-७०२, ७ वा मजला, मॅपल वूडस् को ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसाटी लि., वाघोली, ता. हवेली, जि. पुणे-४१२२०७ | रु. २५,१२,९२२/- (रु. पंचवीस लाख बारा हजार नऊशे बावीस फक्त) दि. १६/०४/२०२१ रोजी (दि. १६/०४/२०२१ पर्यंतचे लागू केलेल्या व्याजासहीत) आणि त्यावरील दि. १७/०४/२०२१ पासूनचे करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज यांसहीत आणि प्रासंगिक खर्च, किंमत, आकार अशी, सदर संपूर्ण रक्कम परत करेपर्यंत आकारली जाणारी रक्कम | २०/०४/२०२१ | ०३/०८/२०२२ |
| | **स्थावर मालमत्तेचा तपशील :** फ्लॅट नं. ए-७०२ चा सर्वसामाईक भाग,चटई क्षेत्रफळ ३६.२४ चौ. मी., ७वा मजला, मॅपल वूडस् को ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., गट नं. ८६१/१ व ८६१/२, गाव वाघोली, ता. हवेली, जि, पुणे येथे स्थित, वाघोली ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद यांच्या हद्दीत, **चतु:सीमा : महसूल नोंदीनुसार** | | | |
| ३ | **राकेश मोहन शर्मा, ज्योती राकेश शर्मा, राहणार :** सर्व्हे नं. २६/३/३/१, प्लॉट नं. १४३, पितृछाया बंगला, राम मंदिराजवळ, आंबेगांव पठार, कात्रज, पुणे-४११०४६. **तसेच :** फ्लॅट नं. १०२, १ ला मजला, विंग बी, फेज-१, 'स्प्रिंग वुडस्', सर्व्हे नं. २, हिस्सा नं. २/८, गांव मारुंजी, तालुका मुळशी, जिल्हा पुणे-४११०५७. | रु. ४१,३८,५५४/- (रु. एकेचाळीस लाख अडतीस हजार पाचशे चोपन्न फक्त) दि. १६/०४/२०२१ रोजी (दि. १६/०४/२०२१ पर्यंतचे लागू केलेल्या व्याजासहीत) आणि त्यावरील दि. १७/०४/२०२१ पासूनचे करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज यांसहीत आणि प्रासंगिक खर्च, किंमत, आकार अशी, सदर संपूर्ण रक्कम परत करेपर्यंत आकारली जाणारी रक्कम | २०/०४/२०२१ | ०३/०८/२०२२ |
| | **स्थावर मालमत्तेचा तपशील :** फ्लॅट नं. १०२ चा सर्वसामाईक भाग, चटई क्षेत्रफळ ५६.९८ चौ.मी., जोडून असलेल्या टेरसचे क्षेत्रफळ २.७६ चौ.मी., बाल्कनीचे क्षेत्रफळ ५.१० चौ.मी. सहीत, फ्लॅटचे एकूण क्षेत्रफळ ६४.८४ चौ.मी., १ ला मजला, विंग 'बी', फेज-१, 'स्प्रिंग वुडस्' बिल्डींग / स्कीम पार्किंगसहीत, गांव मारुंजी, तालुका मुळशी, जिल्हा पुणे येथे स्थित, नोंदणीकरण जिल्हा पुणे यांच्या हद्दीत आणि **चतु:सीमा : महसूल नोंदीनुसार.** | | | |
| ४ | **माधव गोरख खांडवे, लंका माधव खांडवे, दोघेही राहणार :** स.नं. ५९/ए/१, साई सागर कॉलनी नं. ३, रायगड कॉलनी जवळ, रहाटणी, पुणे-४११०१७. **तसेच दोघेही राहणार :** फ्लॅट नं. ८०१, ८ वा मजला, बिल्डींग / विंग नं. बी, 'स्प्रिंग वुड' स.नं. २, हिस्सा नं. २/८, मारुंजी, तालुका मुळशी, जिल्हा पुणे | रु. ३८,४५,३६५/- (रु. अडतीस लाख पंचेचाळीस हजार तीनशे पासष्ट फक्त) दि. १६/०४/२०२१ रोजी (दि. १६/०४/२०२१ पर्यंतचे लागू केलेल्या व्याजासहीत) आणि त्यावरील दि. १७/०४/२०२१ पासूनचे करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज यांसहीत आणि प्रासंगिक खर्च, किंमत, आकार अशी, सदर संपूर्ण रक्कम परत करेपर्यंत आकारली जाणारी रक्कम | २०/०४/२०२१ | ०३/०८/२०२२ |
| | **स्थावर मालमत्तेचा तपशील :** फ्लॅट नं. ८०१ चा सर्वसामाईक भाग, बांधकाम क्षेत्रफळ ८९१ चौ.फू. म्हणजेच ८२.८० चौ.मी. (कव्हर्ड पार्किंग जागेसहीत), ८ वा मजला, बिल्डींग / विंग नं. बी, 'स्प्रिंग वुड' प्रोजेक्ट, सर्व्हे नं. २, हिस्सा नं. २/८ वर बांधण्यात आलेले, गांव मारुंजी, तालुका मुळशी, जिल्हा पुणे येथे स्थित. श्री. माधव गोरख खांडवे यांच्या मालकीची | | | |
| ५ | **माधव गोरख खांडवे, लंका माधव खांडवे, दोघेही राहणार : १ व २ राहणार :** स. नं. ५९/ए/१, साई सागर कॉलनी नं. ३, रायगड कॉलनी जवळ, रहाटणी, पुणे-४११०१७. **तसेच दोघेही राहणार :** फ्लॅट नं. ३०२, ३ रा मजला, बिल्डींग / विंग नं. बी, 'स्प्रिंग वुड' स.नं. २, हिस्सा नं. २/८, मारुंजी, तालुका मुळशी, जिल्हा पुणे | रु. ४४,७०,७७१/- (रु. चव्वेचाळीस लाख सत्तर हजार सातशे एक्काहत्तर फक्त) दि. १६/०४/२०२१ रोजी (दि. १६/०४/२०२१ पर्यंतचे लागू केलेल्या व्याजासहीत) आणि त्यावरील दि. १७/०४/२०२१ पासूनचे करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज यांसहीत आणि प्रासंगिक खर्च, किंमत, आकार अशी, सदर संपूर्ण रक्कम परत करेपर्यंत आकारली जाणारी रक्कम | २०/०४/२०२१ | ०३/०८/२०२२ |
| | **स्थावर मालमत्तेचा तपशील :** फ्लॅट नं. ३०२ चा सर्वसामाईक भाग, बांधकाम क्षेत्रफळ ८८५ चौ.फू. म्हणजेच ८२.२४ चौ.मी. (कव्हर्ड पार्किंग जागेसहीत), ३ रा मजला, बिल्डींग / विंग नं. बी, 'स्प्रिंग वुड' प्रोजेक्ट, सर्व्हे नं. २, हिस्सा नं. २/८ वर बांधण्यात आलेले, गांव मारुंजी, तालुका मुळशी, जिल्हा पुणे येथे स्थित. श्री. माधव गोरख खांडवे यांच्या मालकीची. | | | |

दिनांक : ०३/०८/२०२२
स्थळ : पुणे

अधिकृत अधिकारी,
ॲक्सिस बँक लि.

**दि विश्वेश्वर सहकारी बँक लि., पुणे**
(मल्टीस्टेट बँक)
**मुख्य कार्यालय :** प्लॉट क्र. 471/472, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-411037.
फोन : 020 - 24261755/24262745, फॅक्स : 020-24260577
ईमेल : agm_recovery@vishweshwarbank.com, वेब : www.vishweshwarbank.com

**जाहीर लिलावाद्वारे विक्री नोटीस**

ज्या अर्थी, दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002, (2002 चा कायदा 54, दि. 17.12.2002) अन्वये आणि कायद्याच्या कलम 13(12) अन्वये व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम 2002 च्या नियम 3 अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन, **दि विश्वेश्वर सहकारी बँक लि.,** पुणे च्या अधिकृत अधिकाऱ्याने खालील तपशीलात नमूद केलेल्या कर्जदाराला व त्यांचे जामीनदार यांना **दि. 01.08.2019** रोजी सदर कायद्याच्या कलम 13(2) नुसार मागणी नोटीस दिली होती. कर्जदार हे कर्जाची परतफेड करण्यास निष्फळ ठरले असून, खाली सही करणाऱ्याने उक्त कायद्याच्या कलम 13(4) तसेच उक्त नियम 8 अन्वये त्याला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन, **दि. 10.06.2022** रोजी खाली वर्णन केलेल्या स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. ज्यामध्ये खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत समाविष्ट आहे. कर्जदार/गहाणखतदार व जामीनदार यांना व सर्व साधारण जनतेस कायद्याच्या तरतूदीनुसार **दि. 15.06.2022** च्या दैनिक लोकसत्ता व दैनिक फायनान्शिल एक्सप्रेस या दोन वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करुन खालील मिळकतीबाबत कोणताही व्यवहार करु नये, असा इशारा देण्यात आलेला आहे. खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या मिळकतीची विक्री करुन, बँकेचे येणे पूर्ण वसूल होण्याची शक्यता असल्याने, खालीलप्रमाणे अटी व शर्तीनुसार स्थावर मिळकत **मंगळवार, दि. 06.09.2022 रोजी ठीक दुपारी 12.00 वा. सि.टी.एस. नं. 2565, सर्व्हे नं. 1A/17, 'शैलेश टॉवर', 'ए' कॉ-ऑप. हौसिंग सोसायटी, बिल्डिंग नं. A, फ्लॅट नं. 8, दुसरा मजला, औंध, पुणे-411007** येथील पत्त्यावर जाहीर लिलावाद्वारे विक्रीस काढलेली आहे.

**विक्रीच्या अटी व शर्ती**

1) मिळकतीचा तपशील खालील परिशिष्टात दिला असून, या मिळकतीची विक्री "जसे आहे तसे व जेथे आहे तेथे आणि तिथे जे आहे ते" या तत्त्वावर होत असून, मिळकतीची स्थिती किंवा अन्य बाबींसाठी बँक जबाबदार नाही.
2) इच्छुक खरेदीदाराने परिशिष्टामध्ये उल्लेखिल्यानुसार बयाणा रक्कम (अर्नेस्ट मनी) डिमांड ड्राफ्ट/पे-ऑर्डर स्वरुपात अधिकृत अधिकारी यांचेकडे लिलावापूर्वी जमा करावयाची आहे. डिमांड ड्राफ्ट/पे-ऑर्डर **"दि विश्वेश्वर सहकारी बँक लि., पुणे"** या नांवाने पुणे येथे देय असलेले असावेत. बयाणा रकमेवर कोणत्याही स्वरुपात व्याज दिले जाणार नाही.
3) कोणतेही कारण न देता अधिकृत अधिकारी त्यांच्या अधिकारात विक्री रद्द करु शकतील.
4) स्थावर मिळकतीच्या लिलावाबाबत बोली धारकांपैकी जो कोणी यशस्वी ठरेल त्याने अधिकृत अधिकाऱ्याने जाहीर करताच विक्री रकमेच्या 25% इतकी रक्कम (भरलेली बयाणा रक्कम धरुन) भरावयाची आहे आणि उर्वरीत रक्कम लिलावाचे निर्धारण (कन्फर्मेशन) दिनांकापासून 15 दिवसांचे आत भरावयाची आहे.
5) विक्रीची ठरलेली संपूर्ण रक्कम भरल्यानंतर अधिकृत अधिकारी विक्री प्रमाणपत्र जारी करतील आणि ते होताच लिलाव प्रक्रिया पूर्ण झाली असे समजण्यात येईल.
6) राखीव किंमतीपेक्षा कमी बोली विचारात घेतली जाणार नाही.
7) कर्जदारांने बँकेच्या नावे गहाणखत लिहून दिलेल्यानुसार सदर मालमत्तांवर बँकेचा बोजा आहे.
8) सदर मालमत्ते संदर्भातील अन्य पूर्तता उदा. स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन फी, विक्रीप्रमाणपत्राची नोंदणी करणे, इलेक्ट्रिसिटी चार्जेस, देय मिळकत कर व इतर अनुशंगिक खर्च याची जबाबदारी खरेदीदाराची आहे.
9) तारण मालमत्तेसंदर्भातील कोणत्याही अधिकाऱ्याने कायद्याने प्रस्थापित केलेली देणी इ. ची जबाबदारी बँक घेणार नाही. तसेच सदर मालमत्तेच्या कागदपत्रासंबंधीच्या चुका, त्रुटी, कमतरता इ. याकरीता बँक जबाबदार राहणार नाही. खरेदीदाराने मालमत्ते-संबंधातील तपशीलाची स्वतः शहानिशा करावी. अधिकृत अधिकारी यांना विनंती केल्यास कागदपत्रांची पाहणी करता येवू शकेल.
10) तारण मालमत्ता बँकेचा बोजापासून मुक्त करुन विकण्यात येत आहेत. अधिकृत अधिकारी यांचे ज्ञान आणि माहितीनुसार सदर मालमत्तेवर अन्य बोजा पुढील प्रमाणे :- **पुणे म.न.पा. देय मिळकत कर रु. 55,161/- (31.03.2023 अखेर) + वीज बील रु. 850/- (30.06.2022 अखेर) + सोसायटी मेन्टेनन्स अंदाजे रु. 50,000/-**
11) खालील मिळकत पाहणीसाठी **दि. 01.09.2022 ते दि. 03.09.2022 पर्यंत सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00** या वेळेत प्राधिकृत अधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीने पाहावयास मिळतील.

**: परिशिष्ट :**

**कर्जदार/जामीनदारांची नावे**

| कर्जदार | जामीनदार |
|---|---|
| **कर्जदार :- सौ. नंदा सतिश गोसावी व श्री. सतिश गणपत गोसावी (सहकर्जदार)**<br>**पत्ता : 1)** गिते बिल्डिंग, पहिला मजला, गल्ली क्र. 1 समोर, गंगोत्रीनगर, पिंपळे गुरव, पुणे-411061.<br>**पत्ता : 2)** सि.टी.एस. नं. 2565, सर्व्हे नं. 1A/17, 'शैलेश टॉवर', 'ए' कॉ-ऑप. हौसिंग सोसायटी, बिल्डिंग नं. A, फ्लॅट नं. 8, दुसरा मजला, औंध, पुणे-411007. | **जामीनदार :- 1) श्री. चंद्रकांत बापुराव ढवळे**<br>**पत्ता :-** B-6, शिवप्रताप हौसिंग सोसायटी, पवार नगर, जुनी सांगवी, पुणे-411027.<br>**2) श्री. लोकबहादूर शंखबहादूर मल्ला**<br>**पत्ता :-** 8, मुळा रोड, आदर्श नगर, गणेश मित्र मंडळाजवळ, खडकी, पुणे-411003.<br>**3) श्री. संजय कन्हैया बोयाट**<br>**पत्ता :-** सी.क्यु.ए. (एम.ई.) कॉलनी, पी/10/15, गुंठा विहार, सांगवी, पुणे-411027. |

**स्थावर मिळकतीचा तपशील**

**अचल मालमत्ता :- मालक : सौ. नंदा सतिश गोसावी व श्री. सतिश गणपत गोसावी (सहकर्जदार)**
सी.टी.एस. नं. 2565, सर्व्हे नं. 1A/17, औंध, ता. हवेली, जि. पुणे-411007 येथील 'शैलेश टॉवर्स' 'ए' को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. मधील 'ए' बिल्डिंग मधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. 8, अंदाजे क्षेत्र 51.85 चौ.मी. (बिल्टअप) म्हणजेच 558.00 चौ. फूट.

| राखीव किंमती ₹ 38,00,000/- | बयाणा रक्कम ₹ 3,80,000/- |
|---|---|

**उपरोक्त कर्जाची येणे बाकी दि. 31.07.2022 अखेर ₹ 34,77,093.46 + दि. 01.08.2022 पासून व्याज व इतर खर्च**

**सरफेसी अधिनियम 2002 अंतर्गत सांविधिक 30 दिवसांची विक्री सूचना**

कर्जदार/जामीनदार यांना या नोटीशीद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी लिलावाचे तारखेपूर्वी वर उल्लेखिलेली कर्जाची येणे बाकी रक्कम भरावी. अन्यथा वरील मालमत्तेची लिलावाद्वारे विक्री केली जाईल आणि उर्वरित रक्कम व्याज व इतर शुल्कासह आपल्याकडून वसूल केली जाईल.

ठिकाणी : पुणे
दिनांक : 06.08.2022

सही/-
संतोष बनकर
सहाय्यक सरव्यवस्थापक व अधिकृत अधिकारी
दि विश्वेश्वर सहकारी बँक लि., पुणे
मो. नं. +91 9922959642

(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा.)

# कुस्तीमध्ये भारताचा पदकचौकार!

## बजरंग, साक्षी, दीपकची सुवर्ण, तर अंशूची रौप्यकमाई


दीपक पुनिया


साक्षी मलिक


अंशू मलिक


बजरंग पुनिया

**पीटीआय, बर्मिंगहॅम**

कुस्ती

**भारतीय कुस्तीगीरांनी** शुक्रवारी पदकसंख्येत चार पदकांची मोलाची भर घातली. ऑलिम्पिक पदक विजेत्या बजरंग पुनिया (६५ किलो), दीपक पुनिया (८६ किलो) आणि साक्षी मलिक (६२ किलो) यांनी सुवर्णपदक पटकावले, तर अंशु मलिकला (५७ किलो) रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा

बजरंग पुनियाने ६५ किलोच्या अंतिम लढतीत आक्रमक खेळ केला. त्याचवेळी कॅनडाचा प्रतिस्पर्धी लाच्लान मॅकनिलकडून सातत्याने पायावर होणारे आक्रमण बजरंगने चपळता दाखवून प्रत्येक वेळेस परतवून लावले. निर्णायक विजय मिळवून अंतिम फेरीत आलेल्या बजरंगने सुवर्ण लढतीत अखेरीस ९-२ असा विजय मिळवला.

बजरंगपाठोपाठ साक्षी मलिकने भारताला कुस्तीमधील दुसरे सुवर्णपदक मिळवून दिले. साक्षीला सुवर्णपदकाच्या लढतीत मात्र कॅनडाच्या अॅना गोन्झालेसविरुद्ध पहिल्या फेरीत ०-४ असे पिछाडीवर राहावे लागले होते. मात्र, दुसऱ्या फेरीत सुरुवातीलाच दुहेरी पट काढून साक्षीने दोन गुणांची कमाई केली आणि नंतर धोकादायक स्थितीत आलेल्या क्षणाचा फायदा उठवून गोन्झालेसला चितपट करून सुवर्णपदक मिळवले. महिला विभागातील ५७ किलो लढतीत अंशू मलिकला नायजेरियाच्या ओडुनायो अॅडेकुओरोयेचे आव्हान पेलवले नाही. अंशूला सुवर्णपदकाच्या लढतीत ओडुनायोकडून ३-७ असा पराभव पत्करावा लागला.

पुरुषांच्या ८६ किलो वजनी गटात भारताच्या दीपक पुनियाने पाकिस्तानच्या मुहम्मद इनामविरुद्ध ३-० अशी बाजी मारली.

### टेबल टेनिस

**मनिका, श्रीजा उपांत्यपूर्व फेरीत**

मनिका बात्रा आणि श्रीजा अकुला यांनी राष्ट्रकुल टेबल टेनिस स्पर्धेच्या महिला एकेरीची उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. मनिकाने ऑस्ट्रेलियाच्या जी मिनह्युंगवर ११-४, ११-८, ११-६, १२-१० असा विजय मिळवला. श्रीजाने वेल्सच्या चार्लोट केरीला ८-११, ११-७, १२-१४, ९-११, ११-४, १५-१३, १२-१० असे नामोहरम केले. पुरुष एकेरीत कमालने ऑस्ट्रेलियाच्या फिन लू याचा १२-१०, ११-८, ११-७, ११-६ असा फडशा पाडला.

### बॅडमिंटन

**सिंधू, श्रीकांतची आगेकूच**

पीव्ही सिंधू आणि किदम्बी श्रीकांत यांनी बॅडमिंटनमधील एकेरीतून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. सिंधूने हुसिना कोबुगाबेचा २१-१०, २१-९, तर श्रीकांतने श्रीलंकेच्या डुमिंडूचा २१-९, २१-१२ असा पराभव केला. महिला दुहेरीतही ट्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद जोडीने उपांत्यपूर्व फेरी गाठली.

# श्रीशंकरला रौप्यपदक

अॅथलेटिक्स

**पीटीआय, बर्मिंगहॅम**

**लांब उडी** प्रकारात भारताच्या मुरली श्रीशंकरने आव्हानांवर मात करत रौप्यपदकाची कमाई केली. राष्ट्रकुल स्पर्धेत भारताने पुरुष विभागात तब्बल ४४ वर्षांनी पदकाला गवसणी घातली.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा

श्रीशंकरने पाचव्या प्रयत्नात ८.०८ मीटर उडी मारताना आपले रौप्यपदक निश्चित केले. सुवर्णपदक विजेता बहामासचा लॅक्वान नैर्ननेही ८.०८ मीटर उडी मारली होती. अखेरचा प्रयत्न सुरू झाला, तेव्हा 'काऊंटबॅक'चा निर्णय घेण्यात आला. यात नैर्न ७.९८ मीटरपर्यंत पोहोचला होता. श्रीशंकरला ७.९९ मीटर उडी मारायची होती. मात्र, या अखेरच्या प्रयत्नात श्रीशंकर ७.८४ मीटरपर्यंतच पोहोचू शकला. त्यामुळे सर्वोत्तम दुसरा प्रयत्न या नियमाच्या आधारावर त्याला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

> **“राष्ट्रकुल स्पर्धेतील पदक हे पहिले पाऊल आहे. पॅरिस ऑलिम्पिक मला खुणावत आहे. आजपर्यंत मी कायम सहाव्या, सातव्या क्रमांकावर राहिलो. राष्ट्रकुल स्पर्धेतील या रौप्यपदकाने मला आनंद झाला आहे. मला प्रेरित करणाऱ्या प्रत्येक भारतीयाला मी हे पदक अर्पण करतो.** – मुरली श्रीशंकर



## सुधीरला सुवर्ण



**बर्मिंगहॅम :** भारताच्या सुधीरने राष्ट्रकुल पॅरा-पॉवरलिफ्टिंगमध्ये उच्च वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. सुधीरने १३४.५ गुणांची कमाई करताना स्पर्धा विक्रमासह ही कामगिरी केली.

सुधीरने पहिल्या प्रयत्नात २०८ किलो वजन उचलले. त्यानंतर सुधीरने दुसऱ्या प्रयत्नात २१२ किलो वजन उचलताना आवश्यक गुण मिळवत सुवर्णपदकाला गवसणी घातली.









हे पत्र वैदेही ठाकर यांनी द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड, 'एक्स्प्रेस हाऊस', प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी- ६७२४१०००. फॅक्स - ६७२४११४७. लोकसत्ता मुंबई कार्यालय : मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. नागपूर कार्यालय : प्लॉट. न. ३८, ऑडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, अहमदनगर ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. कोल्हापूर ०२३१- २६४४९९४.
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठाकर ■ संपादक : गिरीश कुबेर ■ सहायक संपादक : मुकुंद संगोराम * (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd, No. RNI 56975/92 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.

epaper.loksatta.com